# मुंबई ते कोलकाता
## सायकल प्रवास



अंबरीश सुरेश गुरव

# मुंबई ते कोलकाता सायकल प्रवास

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# मुंबई ते कोलकाता सायकल प्रवास

लेखक

अंबरीश सुरेश गुरव

# मुंबई ते कोलकाता सायकल प्रवास

## लेखक... अंबरीश सुरेश गुरव

पत्ता - जालगाव (लष्करवाडी), ता. दापोली, जि. रत्नागिरी, महाराष्ट्र - ४१५७१२.
मोबाईल - ८६५५८७४४८६
ईमेल - ambarish.gurav@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604

**प्रकाशन : २५ ऑक्टोबर २०२० (विजयादशमी)**



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक-आहे.

# मुंबई ते कोलकाता सायकल प्रवास

अंबरीश सुरेश गुरव

# अर्पणपत्रिका

प्रिय आई आणि बाबा यांस,
सविनय अर्पण.

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १. | मनोगत | ३ |
| २. | पार्श्वभूमी | ५ |
| ३. | पूर्वतयारी | ७ |
| ४. | सायकल मोहिमेचा मार्ग | ९ |
| ५. | टीम | ११ |
| ६. | सायकल मोहिमेसाठी हे महत्वाचे | १५ |
| ७. | आमचा दैनंदिन कार्यक्रम | २० |
| ८. | गप्पा रंगल्या म्हणजे | २७ |
| ९. | प्रदूषणमुक्त भारत | ३२ |
| १०. | आता आतुरता २३ तारखेची | ३५ |
| ११. | दिवस पहिला: मुंबई बांद्रा सीलिंक ते कसारा | ३६ |
| १२. | दिवस दुसरा: कसारा ते शिर्डी | ४५ |
| १३. | दिवस तिसरा: शिर्डी ते औरंगाबाद | ५९ |
| १४. | दिवस चौथा: औरंगाबाद ते मेहकर | ६९ |
| १५. | दिवस पाचवा: मेहकर ते कारंजा | ८० |
| १६. | दिवस सहावा: कारंजा ते वर्धा | ८९ |
| १७. | दिवस सातवा: वर्धा ते भंडारा | १०० |
| १८. | दिवस आठवा: भंडारा ते राजनांदगाव | ११० |

| | | |
|---|---|---|
| १९. | दिवस नऊवा: राजनांदगाव ते आरंग | १२२ |
| २०. | दिवस दहावा: आरंग ते सरायपाली | १३१ |
| २१. | दिवस अकरावा: सरायपाली ते संबलपुर | १४३ |
| २२. | दिवस बारावा: संबलपुर ते देवगढ | १५७ |
| २३. | दिवस तेरावा: देवगढ ते केन्दुझर | १६८ |
| २४. | दिवस चौदावा: केन्दुझर ते बांगरीपोसी | १७७ |
| २५. | दिवस पंधरावा: बांगरीपोसी ते मेचेदा | १८६ |
| २६. | दिवस सोळावा: मेचेदा ते हावडा ब्रिज कोलकाता | १९८ |
| २७. | कोलकाता शहर भटकंती | २०४ |
| २८. | परतीचा रेल्वे प्रवास | २०९ |
| २९. | मोहिमेबद्दलच्या बातम्या | २११ |
| ३०. | आभार | २१३ |

***

# मनोगत

भटकंती सगळेच करत असतात. भटकायला आवडत नाही असे फारच कमी जण असतील. दूरच्या ठिकाणी जाण्यासाठी बाईक, गाडी, बस, रेल्वे, विमान यांचा वापर केला जातो. आम्ही पण काही जण एकत्र येऊन दरवर्षी सुट्टी घेऊन फिरायला जातो. आम्ही यासाठी सायकलचा वापर करतो. सायकलमुळे पैसे वाचतात आणि स्थानिक लोकांबरोबर पटकन जोडले जातो. सहकार्य मिळते. लोकांमध्ये सायकल चालवण्याबद्दलची गोडी निर्माण होते.

आम्ही २०१९ नोव्हेंबर- डिसेंबर मध्ये मुंबई ते कोलकाता हा २१०० किमीचा सायकल प्रवास सोळा दिवसात पूर्ण केला. महाराष्ट्र, छत्तीसगढ, ओडिशा, झारखंड आणि पश्चिम बंगाल या राज्यातून जाणारी ही सायकल मोहीम अविस्मरणीय झाली. अनेक मित्र जोडले गेले. वेगळी माहिती मिळाली. नवीन अनुभव, गमती जमती यांनी गोड आठवणी दिल्या.

लॉकडाऊनच्या काळात वेळ असल्यामुळे ह्या आठवणी आणि फोटो एकत्र करुन पुस्तकरुपात लिहून काढल्या. त्यासाठी आमच्या टीम मधील सर्वांची खूपच मदत झाली. हे फोटो केव्हाही पहिले तरी या आठवणी जाग्या होतात आणि मन मोहरुन जाते. ही सायकल मोहीम यशस्वी करण्यासाठी आम्ही काय तयारी केली. मोहिमेदरम्यान काय काय गमती जमती केल्या त्या वाचून तुम्हालाही अशी सायकल मोहीम करावीशी वाटेल. हे पुस्तक अधिक चांगल्या प्रकारे तयार व्हावे यासाठी ई साहित्य टीमने खूपच सहकार्य केले.

कोणत्याही भागाची माहिती जाणून घ्यायची असेल तर तेथील निसर्ग चक्राचा अभ्यास असायला पाहिजे. त्या जिल्ह्यात असलेले पर्वत डोंगर, खनिजे, जंगल जैव विविधता, त्या भागातून वाहणाऱ्या नद्या, नद्यांच्या खोऱ्यामध्ये घेतली जाणारी पिके, त्यावर आधारित व्यवसाय, उद्योग, कारखाने, तेथील अर्थव्यवस्था, लोकांचे राहणीमान, त्यांच्या बोलीभाषा, अन्नपदार्थ आहार, चालीरीती सणउत्सव, देवालये, प्रेक्षणीय स्थळे, त्यांचा इतिहास, दळणवळण वाहतूक इत्यादी घटकांचा अभ्यास असेल तर त्या भागातून प्रवास करताना अजून मजा येते. दर दोन मैलांवर बोलीभाषेचे एक वेगळे रुप बघायला मिळते तशी खाद्यसंस्कृतीतील विविधताही दिसून येते. प्रांताप्रमाणे विविध प्रकारचे खाद्यपदार्थ खायला मिळतात.

सोळा दिवसाच्या सायकल प्रवासात आम्ही दररोज अनेक तालुके, जिल्हे पार करुन पुढे जात होतो. प्रत्येक जिल्ह्यामध्ये काहीतरी वेगळेपण सापडत होते. ज्या जिल्ह्यांमधून आम्ही प्रवास केला त्या जिल्ह्यांची ऐतिहासिक आणि भौगोलिक माहिती थोडक्यात दिली आहे. खरोखरच आपल्या भारत देशात खूपच विविधता आहे. प्रत्येक काही अंतरावर येणारी गावे नैसर्गिक सौंदर्य, सांस्कृतिक अध्यात्मिक चालीरीती, रुढी परंपरा, भाषा, सण इत्यादींनी सजलेली आहेत. सायकल प्रवासामध्ये आमचा खूपच पाहुणचार झाला. खास करुन छत्तीसगढ, ओडिशा, झारखंड, पश्चिम बंगाल मधील काही गावामध्ये तर आमचा सत्कार पण झाला. अनेक ठिकाणी चहापाणी नाष्टासाठी आग्रह झाला. या आयुष्यभर लक्षात राहतील अशा गोड आठवणी आहेत. हे सर्व पाहायचे असेल, अनुभवायचे असेल तर सायकल प्रवास एक चांगला पर्याय आहे.

खरे सांगायचे तर, काही वर्षांपूर्वी पर्यंत मला ही वाटले नव्हते की, मी कधी एव्हढ्या लांबवर सायकल चालवत जाईन. लहानपणी मजा म्हणून सायकल चालवायचो. नंतर कॉलेज, नोकरी सुरु झाल्यावर सायकल चालवणे बंद झाले होते. आणि खूप वर्षानंतर इतरांना पाहून पुन्हा सायकल चालवायला लागलो. कधीकधी ऑफिसला सायकल चालवत जायला लागलो. सायकल मित्र जोडले गेले आणि अशा मोहिमा हळूहळू बनायला लागल्या.

या अशा लांबच्या सायकल मोहिमेसाठी जास्त असे कठीण काही करावे लागत नाही. अशी मोहीम कोणीही करु शकते. त्याप्रमाणे परिपूर्ण तयारी करुन तुम्हीही अशी सायकल मोहीम यशस्वी करु शकता आणि अशा प्रकारचा आनंद उपभोगू शकता. तुमच्या सायकल मोहिमेसाठी हे पुस्तक नक्कीच प्रेरणा देईल आणि तुम्ही दैनंदिन जीवनात अधिकाधिक सायकलचा वापर कराल ही माफक अपेक्षा.


धन्यवाद.
अंबरीश सुरेश गुरव

# पार्श्वभूमी

नोव्हेंबर २०१८ मध्ये गेटवे ऑफ इंडिया मुंबई ते अमृतसर, अत्तारी- वाघा बॉर्डर हा १८५० किमीचा सायकल प्रवास, बरोबर कोणतीही बॅकअप गाडी न घेता आम्ही १५ जणांनी १७ दिवसात पूर्ण केला होता. हा सायकल प्रवास आम्ही महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, हरियाणा आणि पंजाब या राज्यातील अनेक भागांना भेटी देत केला होता. या पूर्ण प्रवासात सगळीकडे खूप आपुलकीने आदरपूर्वक पाहुणचार झाला. नवीन मित्र जोडले गेले. भरपूर चांगले अनुभव आले. नवीन ऊर्जा देणारा असा हा प्रवास होता.

त्यामुळे लगेच पुढील वर्षी कोणती सायकल मोहीम आखायची याबद्दल तयारी सुरु झाली. अनेक वेगवेगळया मार्गांबद्दल चर्चा झाल्यानंतर शेवटी मुंबई ते कोलकाता हा मार्ग नक्की करण्यात आला. त्यासाठी नोव्हेंबर २०१९ हा महिना ठरवण्यात आला.










गेटवे ऑफ इंडिया मुंबई ते अमृतसर अत्तारी-वाघा बॉर्डर सायकल मोहीम २०१८

टीम: नितीन भोसले, अँथोनी फर्नांडिस, मुकुंद जोशी, संतोष शिर्के, अरुण देशमुख, तुकाराम फडतरे, सुनिल गाडगीळ, सिडनी मिरांडा, नारायण पेरुमल, डॉ. धनंजय गंभीरे, उपेंद्र गुप्ते, निखिल गोरेगावकर, जयश्री पंडित, डॉ. रामेश्वर भगत, अंबरीश गुरव.

***

# पूर्वतयारी

जुलै २०१९ मध्ये हालचालींना वेग आला. कोलकाताला जाण्यासाठी वेगवेगळे अनेक मार्ग होते. त्यापैकी नागपूर मार्गे जाणारा मार्ग नक्की करण्यात आला. हे अंतर होत होते जवळपास २१०० किमी. दररोज १०० किमीचा प्रवास, असे केले असते तर २०-२१ दिवस लागणार होते. दिवस थोडे जास्त होत होते, शेवटी सोळा दिवसात हे अंतर कापायचे ठरले आणि दोन दिवस अधिक, परत मुंबईला येण्यासाठी.

गेल्या वर्षी अमृतसर पंजाबहुन आम्ही सायकल कुरिअरने पाठवून विमानाने आलो होतो. कुरिअरमध्ये अनेक सायकलींना नुकसान होऊन त्यांच्या काही भागांना हानी पोहोचली होती. रेल्वे सामान डब्यातून सायकल सुरक्षित येतात म्हणून या मोहिमेसाठी रेल्वेचा पर्याय नक्की करण्यात आला.

दर महिन्याला एक-दोन वेळा भेटी व्हायला लागल्या. व्हाट्सअँप ग्रुप बनला, सर्वांचा सायकल चालवण्याचा सराव सुरु होता. सायकल कशी दुरुस्त करायची? पंक्चर कसे काढायचे? याचे प्रशिक्षण आणि अभ्यास सुरु झाला. मोहिमेची तारीख २३ नोव्हेंबर ते ८ डिसेंबर ठरली. टीम ठरत होती, जे नक्की होते त्यांची रेल्वे तिकिटे काढण्यात आली. काही जणांनी विमान तिकिटे काढली.



गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी, सामानासाठी आणि मदतीसाठी बरोबर कोणतीही गाडी न घेता जायचे ठरले. म्हणजेच प्रत्येकाचे साहित्य, कपडे, पंक्चर किट, टायर ट्यूब इत्यादी प्रत्येकाच्या सायकलवर पॅनिअरमध्ये असणार होते. दर दिवशी कापायचे अंतर, रात्री थांबायचे ठिकाण ठरवण्यात आले. रात्रीच्या मुक्कामासाठी लॉजचे आगाऊ आरक्षण करण्यात आले.

या मोहिमेसाठी प्रदूषणमुक्त भारत हे ब्रीदवाक्य ठरवण्यात आले. टिशर्ट लोगो, रंग ठरला. टिशर्ट बनवले गेले. सायकल मोहिमेचा मार्ग मुंबई बांद्रा सीलिंक ते हावडा ब्रिज कोलकाता असा ठरवण्यात आला. ऑफिस, घरगुती व इतर कामामुळे काही जणांना या मोहिमेमध्ये इच्छा असूनही भाग घेता आला नाही. शेवटी नऊ जणांची टीम तयार झाली.

मोहिमेला लागणारे साहित्य जमा करण्यात आले. सायकलची सर्व्हिसिंग झाली. सराव मोहिमा झाल्या. मोहिमेच्या अगोदर शेवटची सभा ठाणे तलावपाली येथे झाली. टिशर्ट वाटप झाले. मोहीम यशस्वीरित्या पूर्ण व्हावी यासाठी मार्गदर्शन मिळाले.

***

# सायकल मोहिमेचा मार्ग

मुंबई ते कोलकाता या आमच्या सायकल मोहिमेसाठी मुंबई मधील बांद्रा सीलिंक हे सुरवातीचे ठिकाण ठरवण्यात आले. आणि कोलकाता मधील हावडा ब्रिज हे शेवटचे ठिकाण ठरवण्यात आले.

हावडा ब्रिज हा कोलकातामधील सर्वात लोकप्रिय खुणांपैकी एक आहे. पश्चिम बंगाल राज्यातील हुगली नदीवर बांधलेला हा ऐतिहासिक ब्रिटिशकालीन पूल आहे. ३ फेब्रुवारी १९४३ रोजी वाहतूकीस खुला करण्यात आलेला हा पूल कोलकाता शहराला हावडा ह्या उपनगरासोबत जोडतो. त्यामुळे हावडा ब्रिजला कोलकाताचे प्रवेशद्वार असेही संबोधतात. हावडा ब्रिज सारखा मुंबईमध्ये असलेला लोकप्रिय पूल म्हणजे वरळी- बांद्रा सीलिंक. म्हणून बांद्रा सीलिंक हे सुरवातीचे ठिकाण ठरवण्यात आले.




मुंबई बांद्रा सीलिंक ते हावडा ब्रिज कोलकाता हे अंदाजे २१०० किमीचे अंतर सोळा दिवसात पूर्ण करायचे ठरले होते. त्यासाठी दररोजचे ११० ते १६० किमी याप्रमाणे अंतर ठरवण्यात आले. घाट रस्ता असेल तिथे कमी अंतर ठेवले होते आणि शेवटच्या सोळाव्या दिवशी कमी अंतर होते. रात्रीचा मुक्काम लॉज मध्ये होता.

दर दिवशी कापायचे अंतर जास्त असेल तर त्या भागातील जनजीवन अनुभवता येत नाही. त्यामुळे आम्ही १६० किमीपेक्षा जास्त अंतर ठेवले नाही. आमचे नेहमीचे सरासरी अंतर १३० किमी होते. हे सरासरी अंतर कमी असलेले चांगले.

आमचा सोळा दिवसांचा मार्ग खालीलप्रमाणे होता.

**महाराष्ट्र राज्य**

दिवस १) २३ नोव्हेंबर: मुंबई बांद्रा सीलिंक ते कसारा (११६/ ११६ किमी)

दिवस २) २४ नोव्हेंबर: कसारा ते शिर्डी (१४८/ २६४ किमी)
दिवस ३) २५ नोव्हेंबर: शिर्डी ते औरंगाबाद (१४२/ ४०६ किमी)
दिवस ४) २६ नोव्हेंबर: औरंगाबाद ते मेहकर (१३८/ ५४४ किमी)
दिवस ५) २७ नोव्हेंबर: मेहकर ते कारंजा (११८/ ६६२ किमी)
दिवस ६) २८ नोव्हेंबर: कारंजा ते वर्धा (१४१/ ८०३ किमी)
दिवस ७) २९ नोव्हेंबर: वर्धा ते भंडारा (१३८/ ९४१ किमी)

**छत्तीसगढ राज्य**

दिवस ८) ३० नोव्हेंबर: भंडारा ते राजनांदगाव (१५६/ १०९७ किमी)
दिवस ९) १ डिसेंबर: राजनांदगाव ते आरंग (११६/ १२१३ किमी)
दिवस १०) २ डिसेंबर: आरंग ते सरायपाली (१२४/ १३३७ किमी)
दिवस ११) ३ डिसेंबर: सरायपाली ते संबलपुर (१२७/ १४६४ किमी)

**ओडिशा राज्य**

दिवस १२) ४ डिसेंबर: संबलपुर ते देवगढ (१२४/ १५८८ किमी)
दिवस १३) ५ डिसेंबर: देवगढ ते केन्दुझर (१३१/ १७१९ किमी)
दिवस १४) ६ डिसेंबर: केन्दुझर ते बांगरीपोसी (१२५/ १८४४ किमी)

**झारखंड राज्य**

दिवस १५) ७ डिसेंबर: बांगरीपोसी ते मेचेदा (१५९/ २००३ किमी)

**पश्चिम बंगाल राज्य**

दिवस १६) ८ डिसेंबर: मेचेदा ते हावडा ब्रिज कोलकाता (७०/ २०७३ किमी)

***

# टीम

अशा लांब अंतराच्या सायकल मोहिमेमध्ये भाग घेणारे सायकलपटू तंदुरुस्त पाहिजेत. इथे शारीरिक तंदुरुस्ती बरोबरच मानसिक ताकद पण महत्वाची. या मोहिमेमध्ये टीम ठरवताना जे ओळखीचे आहेत आणि ज्यांना एका दिवसात १५०+ किमी अंतर सायकल चालवण्याचा अनुभव आहे त्यांनाच घेण्यात आले होते. ऑफिस, घरगुती व इतर कामामुळे काही जणांना या मोहिमेमध्ये इच्छा असूनही भाग घेता आला नाही. शेवटी नऊ जणांची टीम तयार झाली.



आमची टीम: (डावीकडून उजवीकडे) डॉ. रामेश्वर भगत, सिडनी मिरांडा, अंबरीश गुरव, अरुण देशमुख, तुकाराम फडतरे, अक्षय खांडेकर, नारायण पेरुमल, सुनिल गाडगीळ, नितीन भोसले.

आमची नऊ जणांची टीम अशी होती. यामध्ये अक्षय वगळता इतर सर्वजण गेल्या वर्षीच्या गेटवे ऑफ इंडिया मुंबई ते अमृतसर अत्तारी-वाघा बॉर्डर या १८५० किमीच्या सायकल मोहिमेमध्ये होते. आणि अक्षयनेही यापैकी काही जणांबरोबर सायकल चालवली होती. त्यामुळे टीम एकरुप आणि तंदुरुस्त बनली होती.

**नितीन भोसले:** सर्वांना सांभाळून घेणारे व सतत हसरे व्यक्तिमत्व असणारे नितीन भोसले हे टीम प्रमुखाच्या भूमिकेमध्ये होते. पन्नाशीत असणाऱ्या त्यांनी अनेक सायकल व भटकंती मोहिमांचे नेतृत्व केले आहे. त्यांना सायकल दुरुस्तीचे परिपूर्ण ज्ञान असल्यामुळे आम्ही

बिनधास्त होतो. निसर्गाची आवड असल्यामुळे त्यांनी गडकिल्ले, जंगल, दऱ्या खोऱ्यातून फिरत अनेक ट्रेक केले होते. नितीन भाई गावातील लोकांमध्ये पटकन मिसळून जायचे आणि मग वेगवेगळया विषयावर गप्पा रंगायच्या. त्यामुळे सायकल चालवताना त्यांच्याबरोबर असताना इतर भरपूर माहिती मिळत गेली. आमच्या सायकल मोहिमेदरम्यान, सायकल पंक्चर झाल्यामुळे किंवा बिघडल्यामुळे कोणी सर्वात मागे राहू नये म्हणून नितीन भाई सर्वात शेवटच्या ग्रुप मध्ये असायचे. सर्वात शेवटी राहून सायकल चालवणे हे अनेक वेळेला त्रासदायक ठरते. आणि हे कोणालाही जमत नाही, त्यासाठी संयम पाहिजे.

**नारायण पेरुमल:** सायकल हाय गियरवर पळवणारा पन्नाशीतील नारायण तंदुरुस्तीमुळे सगळयात पुढे असायचा. आयटी कंपनीमध्ये अधिकारी असलेले नारायण अनेक सामाजिक कार्यामध्ये हिरीरीने भाग घेतात. ठरलेल्या वेळेमध्ये नाष्टा जेवणाच्या थांब्यावर आणि मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी बाकीच्यांना हुरुप देऊन पळायला लावायचा. आमच्या या मोहिमेतील दैनंदिन जमा खर्चाचा हिशोब नारायणकडे होता. मोहिमेदरम्यान वेळोवेळी आणि मोहीम संपूर्ण होताच त्यांनी तो हिशोब विस्तृतमध्ये परिपूर्णपणे लिहून सर्वांना दिला होता. हिशोबामध्ये एक रुपयाची पण अफरातफर नव्हती.

**सिडनी मिरांडा:** ६३ वर्षाचा हा तरुण सायकल चालवताना नारायण बरोबर पुढच्या ग्रुपमध्ये असायचा. मुंबईमधील एका स्टॉक एक्स्चेंजमध्ये सेवा देऊन निवृत्त झाल्यावर त्यांनी सायकल चालवण्याचा छंद जोपासला. ते मुंबईमधील अनेक सायकल ग्रुपबरोबर नेहमी सायकल चालवतात. तसेच ते अनेक सामाजिक कार्यामध्ये सक्रिय आहेत. दिव्यांग मुलांबरोबर ते टॅन्डम सायकल चालवत असतात. शांत स्वभाव आणि कमी नेमकेच बोलणे असे व्यक्तिमत्व असलेले सिडनी यांची सायकल क्षेत्रामध्ये भरपूर ओळख आहे. त्यांची तंदुरुस्ती वाखाणण्याजोगी आहे.

**अरुण देशमुख- तुकाराम फडतरे:** दोघेही सिडकोमध्ये स्थापत्य अभियंता असून निवृत्त व्हायला काही वर्षे बाकी अशी ही तरुण जोडी. दोघेही एकाच कार्यालयात अधिकारी आणि रहायला पण एकमेकांच्या शेजारी. त्यामुळे सकाळी नेहमीची सायकल फेरी पण एकत्रच. सायकल चालवण्याचा छंद सुरु लागल्यावर त्यांनी अनेक सायकल मोहीम केल्या. अगदी

परदेशातील पण अनेक देश सायकलवर पालथे घातले. या दोघांची तंदुरुस्ती समान, त्यामुळे आमच्या सायकल मोहिमेमध्ये हे पहिल्या ग्रुपमध्ये असायचे. आणि नाष्टा जेवणासाठी मस्तपैकी हॉटेल धाबे शोधून काढायचे. दोघांचा पण हसमुख, विनोदी स्वभाव त्यामुळे भरपूर गप्पा रंगायच्या आणि सर्व पोट दुखेपर्यंत हसायचे.

**सुनिल गाडगीळ:** सुनिल गाडगीळ सर भारतीय रेल्वेमधील जन संपर्क अधिकारी आहेत. एक दोन वर्षांत निवृत्त होण्याच्या वाटेवर असणारा असा हा अजून एक तरुण. हसरे व्यक्तिमत्व, मदत करण्याचा स्वभाव आणि तंदुरुस्त शरीर यामुळे त्यांचे तरुणपण टिकून आहे. सायकल चालवण्याची खूप आवड असल्यामुळे त्यांनी अनेक सायकल मोहिमा केल्या आहेत. सायकल दुरुस्तीचे परिपूर्ण ज्ञान असल्यामुळे कोणाचीही सायकल बिघडली किंवा पंक्चर झाली तर ती सायकल पटकन दुरुस्त करायचे. आगाऊ सुट्टी काढून पण अचानक उद्भवलेल्या कार्यालयीन कामामुळे त्यांना सुरवातीचे सात दिवस येता नाही आले. ही सायकल मोहीम ठरवण्यात आणि नियोजन करण्यामध्ये सुरवातीपासूनच गाडगीळ सरांचा महत्वाचा सहभाग होता. त्यामुळे ते काम आटपून आठव्या दिवशी टीममध्ये सामील झाले.

**डॉ. रामेश्वर भगत:** वय फक्त ६४ वर्षे. भटकंतीची आवड त्यामुळे सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यावर भगत सरांनी अनेक ठिकाणांना भेटी दिल्या. तसेच अनेक मोठ्या लांबच्या सायकल मोहीमा पण पूर्ण केल्या. शांत स्वभाव आणि माहितीपूर्ण बोलणे त्यामुळे टीममध्ये पटकन एकरुप झाले. भगत सर रस्त्यामध्ये भेटणाऱ्या गावामधील व्यक्तींबरोबर गप्पा मारायला सुरु झाले की त्यामध्ये गुंगून जायचे. त्यांना फोटो काढायची आवड असल्यामुळे सायकल चालवताना अनेक ठिकाणी थांबून ते निसर्गाचे फोटो काढायचे. असे असताना पण ते सायकल चालवताना कधीच मागे रहायचे नाहीत. ते पहिल्या किंवा मधल्या ग्रुप मध्ये राहून सायकल चालवायचे.

**अक्षय खांडेकर:** शांत स्वभाव आणि मदत करण्याची वृत्ती असलेला तिशीतला अक्षय हा आमच्या टीममधील सर्वात कमी वयाचा सदस्य. त्याची ही पहिलीच लांब अंतराची मोठी सायकल मोहीम असल्यामुळे तो उत्साहात होता. या मोहिमेसाठी त्याने खूप सराव केला होता. मार्केटिंग क्षेत्रामध्ये नोकरीला असलेला अक्षय दररोज सायकल चालवत ऑफिसला

जातो. एक गिअर असलेली सायकल तो अनेक वर्षे चालवत होता. या सायकल मोहिमेसाठी त्याने अनेक गिअर असलेली नवीन सायकल घेतली.

**अंबरीश गुरव:** मी आयटी कंपनीमध्ये इंजिनिअर आहे. सायकल चालवायची आणि भटकंतीची आवड असल्यामुळे अनेक ट्रेक, सायकल मोहीमा माझ्याकडून पूर्ण झाल्या. त्यामुळेच ओळख वाढत गेली व अनेक चांगली माणसे जोडली गेली. या सायकल मोहिमेमध्ये मी शेवटच्या ग्रुपमध्ये नितीन भाईंबरोबर असायचो.

टीममध्ये मी, अक्षय तिशीतले आणि बाकीचे पन्नाशी, साठी ओलांडलेले होते. काही जणांचे वय जास्त होते पण या सर्वांची तंदुरुस्ती भारीच होती त्यामुळे वयाचा अडसर



कोणाचाच आडवा आला नाही. उलट त्यांच्यामुळे बाकीच्या सर्वांना अनेक नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या. हे सगळे आपआपल्या व्यवसायात उच्च पदावरील अधिकारी पण सगळे स्वभावाने साधे, एकमेकांचा आदर करणारे. त्यामुळे सगळे लहान मुलांप्रमाणे एकमेकांमध्ये मिसळले आणि मस्त टीम बनली.

या मोहिमेला अँथोनी फर्नांडिस, मुकुंद जोशी काका, किशोर केणी, कुणाल सुतार, संतोष शिर्के यांना काही कारणामुळे येता नाही आले. पण ते सुरवातीपासून या मोहिमेसाठी सहकार्य करत होते. ही आमची मुंबई मधील बॅकअप टीम होती. आम्हाला मोहिमेदरम्यान सर्व माहिती, मदत यांच्यामार्फत मिळत असे. याशिवाय अनेक जणांनी या मोहिमेसाठी बहुमोल सहकार्य केले.

***

# सायकल मोहिमेसाठी हे महत्वाचे

लांब अंतराच्या सायकल मोहिमेसाठी काही महत्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे:

**लॉज- हॉटेल आरक्षण:**

रात्रीचा मुक्काम करण्यासाठी दोन पर्याय होते.

१. दररोज जास्तीच जास्त अंतर कापून ठरलेल्या ठिकाणी पोहोचून राहण्यासाठी सोय करायची. यामध्ये शोधाशोध करण्यात दररोज काही वेळ जाणार होता, त्यामुळे हा पर्याय रद्द करण्यात आला.

२. दुसरा पर्याय असा होता कि, रात्रीच्या मुक्कामाचे लॉज, हॉटेल अगोदरच आरक्षित करायचे. यामध्ये थोडे पैसे जास्त जाणार होते पण दररोजचा शोधाशोध करण्याचा वेळ वाचणार होता. त्या वेळात आजूबाजूचा परिसर पण फिरता येणार होता. त्यामुळे हा पर्याय नक्की करण्यात आला.

त्यानुसार सायकल मोहीम सुरु व्हायच्या अगोदरच रात्रीच्या मुक्कामासाठी लॉज आरक्षित केले गेले. लॉज निवडताना आम्ही तेथील रात्री सायकल सुरक्षित ठेवण्यासाठी असलेल्या व्यवस्थेबद्दल पण पाहिले.

**एकाच रंगाच्या सायकल जर्सीचे महत्व:**

या सायकल मोहिमेसाठी आम्ही पोपटी रंगाच्या प्रत्येकी दोन जर्सी बनवल्या. या जर्सीसाठी लोगो नितीन भाईंनी तयार केला. आणि जर्सी किशोर केणी यांनी ओळखीच्या ठिकाणी बनवून घेतल्या. जर्सीवरील मुंबई कोलकाता हे शब्द पटकन दिसून यायचे. या जर्सी संपूर्ण मोहिमेमध्ये दररोज वापरल्या. याचा फायदा असा झाला की कोणीही पुढे किंवा मागे कुठेही असले तरी पटकन दिसून यायचे. वाटेवरील लोकांनकडून पण समजायचे की हा जर्सीवाला पुढे या वाटेवर गेला आहे किंवा इथे थांबला आहे.




हे एकटे नसून यांचा ग्रुप आहे याची जाणीव एकाच रंगाच्या जर्सीमुळे बाकीच्यांना व्हायची. वाटेवरील लोकांकडून आणि वाहनांच्या

चालकांकरुन आदर मिळत असे. रस्त्यावरुन ओव्हरटेक करताना बाकीच्या गाड्या लांबून जायच्या. या मोहिमेमध्ये कोणताही वाहनवाला वेगाने कट मारुन गेला नाही किंवा कोणी काही त्रास पण दिला नाही. काही ट्रक गाडीवाले थांबून विचारपूस करायचे. धाब्यावर जेव्हा सकाळी नाष्टासाठी किंवा दुपारी जेवणासाठी थांबायचो तेव्हा आपुलकीने विचारपूस व्हायची. बाकीच्या गाडीचे चालक पण आपुलकीने सांगायचे की आम्ही तुम्हाला काल इथे पहिले. त्यामुळे अशा मोठया लांब अंतराच्या सायकल मोहिमेमध्ये सर्वांची जर्सी एकाच प्रकारची पाहिजे.

**सराव:**

टीममधील सगळेजण अनेक काळापासून नेहमी किंवा आठवड्यातून दोन-तीनवेळा २०-३० किमी सायकल चालवणारे होते. काहीजण दररोज ऑफिसला सायकल घेऊन जात होते. सुट्टीच्या दिवशी १५०+ किमीचा सराव चालू होता. अनेक वेळेला सर्व जण एकत्र येऊन सायकलिंग करत होते.

अशा मोठया मोहिमेमध्ये पाय दुखणे दुय्यम असते. पण सीटवर सारखे बसून सायकल चालवणे हेच सर्वात कठीण असते. तुम्ही कोणतीही जेल असणारी सीट किंवा पॅड असलेली पॅन्ट वापरा, थोड्या वेळाने तो भाग सुन्न होतोच, व खूप दुखायला लागतोच. अशा वेळेला सराव महत्वाचा ठरतो. आम्हा सर्वांचा सराव चांगला झाला होता त्यामुळे पूर्ण मोहिमेमध्ये कोणालाही त्रास झाला नाही.

**सायकल:**

सायकल एक ते अनेक गियर असणाऱ्या असतात. तसेच टायर वरुन रोड बाईक, हायब्रीड बाईक आणि माउंटन ट्रेल बाईक असे प्रकार पडतात. यामध्ये रोड बाईक कच्चा रस्त्यावर उपयोगी पडत नाहीत. त्यामुळे या मोहिमेमध्ये सर्वांनी हायब्रीड किंवा माउंटन ट्रेल बाईक वापरली. सर्वांच्या



सायकलला मागे कॅरियर आणि त्यावर सामानासाठी पॅनिएर लावण्यात आले. पाण्याच्या बाटल्या ठेवण्यासाठी स्टॅन्ड लावले.

भगत सर सोडून सर्वांच्या सायकलची चाके क्विक रिलीझ असणारी होती. त्यामुळे पंक्चर झाल्यावर चाक पटकन काढून पंक्चर कमी वेळात दुरुस्त केला जायचा. अशा लांबच्या सायकल मोहिमेसाठी फक्त चांगली गिअरची सायकल पाहिजे असे नाही. तुम्ही कोणतीही साध्या प्रकारची, एक गिअर असणारी सायकल वापरु शकता. अनेकजण साधी सायकल वापरुन जग फिरले आहेत.

**सायकल सोबत घेतलेले साहित्य:**

- ✓ ३ सायकल ट्यूब, पंक्चर किट, ऍलन की, हॅन्ड पंप, लॉक
- ✓ सायकल पुसायला कपड्याचे तुकडे. चैन साफ करण्यासाठी ब्रश
- ✓ २ पाण्याच्या बाटल्या
- ✓ हेल्मेट, पुढची आणि मागची लाईट, चार्जर, रिफ्लेक्टिव बेल्ट, शिट्टी.
- ✓ २ सायकल जर्सी, ३ सायकल शॉर्ट, बफ (सायकल चालवताना वापरण्यासाठी)
- ✓ २ जोडी कपडे (रात्री व इतर ठिकाणी वापरण्यासाठी)
- ✓ २ पंचे (वजनाने हलके आणि पटकन सुकतात म्हणून)
- ✓ पायामधे हलके स्पोर्ट शूज, ३ सॉक्स
- ✓ मोबाईल, चार्जर, पॉवरबँक
- ✓ ओळखपत्र, पैसे
- ✓ सुका मेवा, चिक्की, चॉकोलेट, फळे (हे संपले की नवीन घ्यायचो)
- ✓ औषधे, ग्लुकॉन-डी,
- ✓ ब्रश पेस्ट, आंघोळीचा साबण, कपडे धुण्याचा साबण, किशी, तेल

सर्वांनी कमीत कमी कपडे आणले होते. कपडे दररोज संध्याकाळी धुवायचो आणि ते सकाळ पर्यंत वाळत असत. अशा प्रकारे ह्या सगळ्याचे वजन ५-७ किलो होते. सायकल पॅनिअरमध्ये जेवढे वजन कमी तेव्हढी ती जास्त वेगात पळते.

**मोहिमेचा खर्च:**

आम्हा सर्वांना सायकल चालवण्याची खूपच आवड आहे. फक्त सायकल घेऊन भटकायला, आजूबाजूचे जग अनुभवायला जायचे हा हेतू ठेवून दरवर्षीप्रमाणे ही सायकल मोहीम ठरली होती. यामध्ये आम्ही सायकल वापराला प्रोत्साहन देण्यासाठी ठिकठिकाणी जनजागृती केली. या मोहिमेसाठी कोणी प्रायोजक नव्हता. जो काही खर्च येणार होता तो आम्हा सर्वांमध्ये विभागण्यात येणार होता. त्यामुळे खूपच कमी खर्चात ही मोहीम झाली.

**मोहीम ओळखपत्र:**

प्रत्येकाकडे आधार कार्ड, पॅन कार्ड, वाहन लायसन्स असे ओळखपत्र तर असणारच होते. प्रत्येकाची माहिती टीममधील प्रत्येकाकडे होतीच. आम्ही या सायकल मोहिमेसाठी एक वेगळे छोटे मोहीम ओळखपत्र तयार केले. त्यावर नाव, पत्ता, फोटो, जन्मतारीख, रक्त गट, मोबाईल नंबर, टीममधील इतरांचे मोबाईल नंबर आणि अत्यावश्यक वेळी मुंबईमधील आमच्या बॅकअप टीमचे नंबर इत्यादी माहिती लिहिलेली होती. हे मोहीम ओळखपत्र आम्ही गळयात घालायचो किंवा जर्सीच्या खिशात ठेवायचो. त्या ओळखपत्राची दुसरी प्रत सामानाच्या पॅनिअरमध्ये पण वरच्या कप्प्यात असायची.

**काही मूलभूत नियम:**

सायकल चालवताना काही मूलभूत नियम आहेत. ते आम्ही कसोशीने पाळले.

- ✓ सायकल चालवताना डोक्यावर हेल्मेट आणि हातामध्ये ग्लोव्हस असावेत.
- ✓ सायकल चालवताना गडद रंगाची सायकल जर्सी घालावी जेणेकरुन तुम्ही लांबून सुद्धा अगदी स्पष्टपणे आणि ठळक ओळखू याल.
- ✓ रात्रीचा प्रवास टाळावा, तो टाळणे अशक्य असल्यास सुरक्षा प्रतिबिंबित जॅकेट वापरावे. काळोख असताना सायकलची पुढील लाईट आणि मागील लाल इंडिकेटर लाईट चालू असावी.
- ✓ रस्त्यावर बाजूबाजूला दोन-तीनजण असे घोळक्याने सायकल चालवून रस्ता अडवू नये. एकाच्या मागे दुसरा असे रांगेत सायकल चालवावे.
- ✓ शहरामधून जाताना सिग्नल इत्यादी वाहतुकीचे नियम पाळावेत.

- ✓ रस्त्याच्या डाव्या बाजूने पांढऱ्या पट्टीवर किंवा त्यांच्या आत राहून सायकल चालवावी. रस्त्याच्या मधोमध सायकल जाता कामा नये.
- ✓ अचानक ब्रेक मारुन रस्त्यावर थांबू नये. थांबायचे असल्यास रस्त्याच्या बाहेर येऊन थांबावे.
- ✓ सायकल चालवताना मोबाईलवर बोलणे आणि गाणी ऐकणे टाळावे. फोन आल्यास सायकल बाजूला थांबवून मोबाईलवर बोलावे.
- ✓ हॉटेल, दुकान किंवा इतर ठिकाणी सायकल उभी करुन ठेवताना ती इतरांना अडथळा होणार नाही अशा ठिकाणी ठेवावी.
- ✓ स्थानिक लोकांना, त्यांच्या चालीरीतींना मान द्या. त्यांचा अपमान करु नका. त्यांच्याशी प्रेमाने वागा.

***

# आमचा दैनंदिन कार्यक्रम

आमचे दैनंदिन कार्यक्रमाचे वेळापत्रक कसे असायचे त्याबद्दल येथे विस्तृतपणे माहिती देतो.

पहाटे चार वाजता गजर लावून उठणे. प्रत्येक रुममध्ये जाऊन एकमेकांना उठवणे. त्या रुममध्ये कोणी एकतरी उठला आहे हे तपासणे. एका रुममध्ये तिघेजण राहायचो. रुममधे एकच बाथरुम असल्यामुळे एका वेळेला एकालाच त्याचा वापर करता यायचा. त्यामुळे कधीकधी पहिला उठणारा बाथरुम मध्ये गेला की बाकीचे परत झोपायचे किंवा ते नंतर उठायचे. प्रातर्विधी, आंघोळ व्हायची. थंडी असेल आणि गिझर नसेल तर काहीजण सकाळी आंघोळीला सुट्टी द्यायचे. कोणाच्या रुमध्ये गरम पाणी येत नसेल तर त्याला चिडवायचो. अशा प्रकारे दिवसाची सुरवात हसत हसत होत असे.

पॅनिअरमध्ये सामान भरुन तयार व्हायचो. रुममधील सर्व आटपून रुमची चावी मुख्य कॉउंटरला जमा करायचो. पाण्याच्या बाटल्या भरुन घ्यायचो. लॉज बाहेर जमायचो. लॉजबाहेर कोणत्या रुममधील ग्रुप उशिरा येईल त्यांची खेचायचो. लॉज पार्किंगमध्ये येऊन




सायकल तपासायचो. टायर ट्यूबमधील हवेचा दाब बरोबर आहे ना हे पाहायचो. सायकलला पॅनिअर, मागची, पुढची लाईट लावून तयार व्हायचो. माग थोडा वेळ वार्मअप व्यायाम, स्ट्रेचिंग कसरती करून झाल्या की आजच्या मार्गाबद्दल पुन्हा थोडक्यात चर्चा व्हायची. लॉज सहसा शहरामध्ये असायचा त्यामुळे शहरातून मुख्य रस्त्यावर कसे पोचायचे ते गुगल मॅपवर पाहायचो. आणि रस्ता ठरवला जायचा. साडेपाच वाजता सायकल प्रवास सुरु व्हायचा. त्यावेळेला काळोख असायचा त्यामुळे सायकलवरील लाईटच्या उजेडात आम्ही निघायचो.

लॉजमध्ये सहसा एवढ्या सकाळी चहा मिळायचा नाही, मग आजूबाजूला टपरी शोधून तिथे चहा बिस्कीट खाऊन प्रवास सुरु करायचो. आजूबाजूला कुठे चहाची टपरी नसेल तर, वाटेत पहिली चहा टपरी मिळेल तिथे चहा पिऊन पुढे निघायचो. सकाळी टपरीवर चहा तयार होईपर्यंत गप्पा सुरु व्हायच्या. चहाबरोबर बिस्किटे खायचो. त्यामुळे सकाळी गरमागरम दोन- तीन कप चहा प्यायचो.



सायकल प्रवास सुरु झाला की प्रत्येकी १५-२० किमीनंतर सर्व एकत्र थांबून दहा मिनिटे आराम करायचो. प्रवासात रस्त्यावर सहसा कोणी एकटा सायकल चालवायचा नाही. दोन किंवा तीन जणांचा ग्रुप करुनच सगळे असायचे. जो ग्रुप पुढे असेल तो ठराविक वेळानंतर बाकीच्यांसाठी थांबत असे.



तसेच पुढे असणारा ग्रुप नाष्टा-जेवणासाठी हॉटेल शोधायचे काम पण करायचा. त्या हॉटेलचे गुगल मॅपवरील स्थान व्हाट्सअॅप वर टाकले जात असे. त्यामुळे मागे असणाऱ्या इतरांना ते समजत असे. वेळ वाचवण्यासाठी जेवणाची ऑर्डर पण दिली जायची. तोपर्यंत बाकीचे सर्व पोहोचायचे.





आम्हा सर्वांचा सायकल चालवण्याचा वेग सारखा होता. सगळे फिट तंदुरुस्त होते. त्यामुळे पुढचा ग्रुप आणि मागचा ग्रुप यामध्ये जास्त अंतर नसायचे. सगळे जण एकमेकांशी मोबाईलच्या मदतीने संपर्कात असायचे. कोणाला रस्त्याबद्दल काही शंका आली तर तो एकमेकांना संपर्क करत असे. किंवा गुगल मॅप वर मार्ग तपासत असे. रस्त्यामध्ये जर कोणाची सायकल पंक्चर झाली किंवा इतर काही बिघाड झाला तर तो तिथल्या तिथे थांबून दुरुस्त केली जात असे. बहुतेक सर्वांना पंक्चर काढता येत होता. काही महत्वाचा बिघाड झाला तर सर्वात शेवटी नितीन भाई असायचे. त्यांच्याबरोबर मी पण थांबायचो.



नऊ वाजण्याच्या सुमारास ५०-६० किमी अंतर पार करुन नाष्टा करण्यासाठी थांबायचो. पोटभर नाष्टा करायचो. नंतर चहा होत असे. नाष्टासाठी बहुतेक वेळेला गावातील छोटे हॉटेल असायचे. आमच्या सायकली पाहण्यासाठी गावातली मुले आणि गावकरी जमायचे. त्यांच्याबरोबर गप्पा रंगायच्या. काहीवेळेला सकाळी नाष्टासाठी मोठे हॉटेल मिळत नसे. तिथे पोटभर नाष्टा मिळत नसे. त्यामुळे पुढे पुन्हा नाष्टा करायला थांबायचो. अशा वेळेला नाष्टा दोन वेळा होत असे. रस्त्यामध्ये सकाळी सायकलवर शाळेत जाणारी मुले आणि कामावर जाणारे लोक भेटायचे. त्यांच्याबरोबर सायकल चालवत गप्पा मारत जायचो.



दुपारी एक वाजण्याच्या आसपास अजून ४०-५० किमी अंतर पार करुन जेवणासाठी हॉटेल किंवा धाब्यावर थांबायचो. आम्ही सायकल चालवत मुंबईहून आलोय हे समजल्यावर मालक खुश व्हायचा. आणि आमचा जोरदार पाहुणचार व्हायचा. आम्हाला मस्तपैकी स्थानिक पद्धतीचे जेवण बनवून मिळायचे. बरोबर ताक, दही खायचो. जेवणानंतर थोडा वेळ आराम करायचो.





धाब्यावर खाट आणि चारपाई असतातच. त्यावर फळीचा आडवा तुकडा असतो. त्याचा वापर जेवणाची भांडी, ताट वाटी ठेवण्यासाठी केला जातो. जेवण झाल्यावर आम्ही या चारपाईवर थोडा वेळ झोपायचो. धाब्यावर वाहने घेऊन इतर चालक, प्रवाशी पण आलेले असायचे. त्यांच्याबरोबर गप्पा रंगायच्या.

आमचे नेहमीचे अंतर ११० ते १६० किमी होते. जेवणापर्यंत ८० ते ११० किमी अंतर पार करुन जेवणानंतर शक्यतो जास्तीच जास्त ३० ते ५० किमी अंतर ठेवायचो. संध्याकाळी चारच्या सुमारास चहासाठी थांबायचो. आणि मग अंधार पडायच्या अगोदर लॉजवर पोहोचायचो. काही वेळेला संध्याकाळी लवकर मुक्कामाच्या लॉजवर पोहोचून चहा होत असे.





प्रत्येकाकडे पाण्याच्या दोन-तीन बाटल्या होत्या त्या रिकाम्या होत आल्या की वेळोवेळी त्यामध्ये पाणी भरुन घेत असू. त्यासाठी पेट्रोल पंपावरील फिल्टर, ढाबा, हॉटेल किंवा गावातील घरामधून पाणी घेत असू. बिसलरीचे पाणी न वापरता स्थानिक गावातील पाणी प्यायचो. प्रवासामध्ये आपल्या शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊन डी-हाइड्रेशन होऊ नये याची काळजी घ्यायचो. ठिकठिकाणी उसाचा रस आणि फळांचे सरबत प्यायचो. फळे पण खायचो. दिवसभर वाटेमध्ये ठिकठिकाणी अनेक लोक थांबवून आपुलकीने विचारपूस करायचे. जिथे आम्ही थांबायचो तिथे गर्दी जमा व्हायची. मुंबईहून सायकल चालवत आलोय हे समजल्यावर पाहुणचार व्हायचा. अनेकजण मुंबईमध्ये येऊन गेलेले असायचे किंवा त्यांचे नातेवाईक मुंबईला असायचे. त्यामुळे गप्पा रंगायच्या.





काही वेळेला रस्त्यामध्ये प्राचीन ऐतिहासिक प्रेक्षणीय ठिकाणे, मंदिरे, जुन्या पद्धतीची घरे, राजवाडे, वेगवेगळी झाडे, फुले, पक्षी, प्राणी दिसायचे. काही गावे, जंगले आणि आजूबाजूचा परिसर मन मोहून घ्यायचा. मग आपोआपच सायकल पॅंडल मारायचे थांबले जायचे. थोडा वेळ थांबून हा निसर्ग अनुभवायचो. सर्व डोळे भरुन पाहायचो आणि पुढील प्रवास सुरु व्हायचा.

काही वेळेला यामध्ये आमचा जास्त वेळ जायचा. पण मज्जा यायची. लॉजवर लवकर पोहोचून आराम करणे यावर जोर न देता पूर्ण दिवस आम्ही मस्तपणे जगायचो आणि रात्री अंधार व्हायच्या अगोदर लॉजवर पोहोचायचो. लॉजवर पोहोचल्यावर कागद पत्रांची औपचारिकता झाल्यावर रुम तपासून घ्यायचो.





काही रुममध्ये सोई नसायच्या. बाथरुममध्ये गिझर, गरम पाणी आहे ना हे पाहायचो. नंतर सायकलवरुन पॅनिअर काढून सायकल साफ करायचो. ओल्या कपड्याने सायकल पुसायचो. इतर काही बिघाड नाही ना हे पहायचो. सायकल योग्य जागी एकत्र ठेवून सर्वांना कुलूप लावायचे.

लॉजमध्ये एका रुममध्ये तीनजण याप्रमाणे रहायचो. पहिला मोबाइल आणि सायकल लाईट चार्ज करायला ठेवायचो. आंघोळ, कपडे धुणे इत्यादी आटपून तयार व्हायचो. काहीजण सायकल जर्सी दोन-तीन दिवसानंतर एकत्र धुवायचे. धुतलेले कपडे पंख्यामुळे सकाळपर्यंत सुकायचे. एका वेळेला बाथरुमचा वापर एक जणच करु शकत असल्यामुळे थोडा जास्त वेळ जायचा.



वेळ असेल तर लॉजच्या आजूबाजूचा परिसर फिरायचो. बहुतेक मुक्कामाचे लॉज शहरामध्ये होते. त्यामुळे शहर फिरुन यायचो. तिथे मिळणारे स्थानिक लोकप्रिय पदार्थ खायचो. दुसऱ्या दिवशी पहाटे पाच वाजता कुठे चहा मिळेल याचा अंदाज घ्यायचो.



रात्री आठ वाजता जेवण जेवायचो. काही वेळेला हे जेवण लॉजवर मिळायचे नाही त्यावेळेला बाहेर हॉटेलमध्ये जाऊन जेवण करायचो. काही ठिकाणी हॉटेल रात्री लवकर बंद होत असत. त्यामुळे रात्रीचे जेवण लवकर करत असू. काही ठिकाणी रात्री थंडी पण खूप असायची.

जेवण झाल्यावर एकत्र जमून उद्याच्या मार्गाबद्दल चर्चा होत असे. रस्त्यामध्ये कोणते प्रेक्षणीय स्थळे आहेत त्याबद्दल माहिती दिली जायची. नाष्टा आणि जेवण किती किमीनंतर करायचे हे ठरायचे. आजच्या दिवसभरात काय काय झाले याच्या गप्पा व्हायच्या.

आमच्या टीममध्ये एकापेक्षा एक अवलिये होते. कुठेही असताना आमच्यामध्ये गप्पा सुरु झाल्या की पोट दुखेपर्यंत आम्ही हसायचो. जुनी-नवी गाणी, जोक, आठवणी इत्यादी भरपूर विषय तयार असायचेच.

रात्री दहा वाजता झोपायला जायचो. पहाटेचा गजर लावायचो. दिवसभर दमल्यामुळे झोप पटकन यायची. कोण किती घोरतोय कोणालाच काही समजायचे नाही.

***

# गप्पा रंगल्या म्हणजे

मुंबई ते कोलकाता या आमच्या सायकल मोहिमेमध्ये आम्ही महाराष्ट्र, छत्तीसगढ, ओडिशा, झारखंड आणि पश्चिम बंगाल या राज्यातून सायकल प्रवास केला. ठिकठिकाणी अनेक लोक भेटत गेले. सर्वांकडून आमचे आदरपूर्वक स्वागत झाले. मुंबईहुन कोलकाताला सायकल वर जातोय हे समजल्यावर त्यांच्या मनात अनेक आश्चर्यकारक प्रश्न उपस्थित व्हायचे. त्या सर्वांचे प्रश्न सारखेच असायचे. त्यांना आम्ही काय उत्तर द्यायचो आणि त्यांच्याशी कोणकोणत्या विषयावर चर्चा करायचो याबद्दल येथे विस्तृतपणे लिहतो.



पुढे वाचनामध्ये कुठेही गप्पा रंगल्या किंवा गप्पा सुरु झाल्या असे वाक्यप्रचार वाचले की समजून जा की त्यावेळेला एवढी सगळी चर्चा झाली आहे. पण ही चर्चा पुन्हा पुन्हा लिहायला नको म्हणून प्रत्येक ठिकाणी गप्पा रंगल्या यासारखे वाक्यप्रचार वापरले आहेत. समोर असणाऱ्या व्यक्तीच्या वयानुसार आम्ही वेगवेगळ्या गप्पा मारायचो.

प्रश्न: कुठून आलात? कुठे जात आहेत?
उत्तर: आम्ही मुंबईहून कोलकाताला सायकल चालवत जातोय.

प्रश्न: सायकलवर एवढ्या लांब का जात आहेत?

उत्तर: आम्हा सर्वांना सायकल चालवायला आवडते. बाकीचे कसे गाडी करुन, बाईक वर, ट्रेनने किंवा विमानाने फिरायला जातात त्याप्रमाणे आम्ही आमच्या सायकल घेऊन फिरायला जातोय.

प्रश्न: यातून तुम्हाला काय मिळते?

उत्तर: आम्ही आमच्या नेहमीच्या जीवनामध्ये सायकलचा जास्तीच जास्त वापर करतो. बाजारात, ऑफिसला व मित्रांकडे जाण्यासाठी आम्ही सायकल वापरतो. त्यामुळे आमचे पैसे वाचतात. शरीराची हालचाल होऊन आरोग्य पण चांगले राहते. जर कमी अंतरासाठी इतर वाहन वापरले तर पैसे पण खर्च होतात आणि धुरामुळे प्रदूषण पण वाढते. त्यामुळे सर्वांनी जास्तीच जास्त सायकलचा वापर करुया. जसे आम्ही सायकल चालवतोय तसे तुम्ही पण सायकल चालवा आणि कुटुंबातील लहान मुलांना पण सायकलची सवय लावा. म्हणजे ते मोठे झाल्यावर कॉलेजला जाताना बाईक मागणार नाहीत.

प्रश्न: दिवसरात्र सायकल चालवता काय? थांबता कुठे? खाता काय?

उत्तर: दररोज आम्ही दिवसा १०० ते १६० किमी सायकल चालवतो आणि ठरलेल्या ठिकाणी पोहोचल्यावर ढाबा किंवा हॉटेलमध्ये थांबून आराम करतो. रात्री सायकल चालवत नाही. नाष्टा जेवण रस्त्यामध्ये लागणाऱ्या हॉटेल किंवा धाब्यावर करतो.

प्रश्न: सायकल गियरची आहे काय? किती वेगाने पळते? अव्हरेज किती? ऑटोमॅटिक आहे काय?

उत्तर: या सायकलला गिअर आहेत. ऑटोमॅटिक काही नसते यामध्ये. गिअर असले तरी पॅंडल मारावेच लागतात. तुम्ही जेव्हढ्या वेगाने पॅंडल मारणार तेव्हढ्या वेगाने ती पळणार. चढणामध्ये फक्त गिअरचा वापर होतो. गिअर असल्यामुळे जास्त जोर लावावा लागत नाही.

प्रश्न: सायकल पंक्चर होत नाही काय?

उत्तर: ही बाकीच्या सायकल सारखीच आहे. पंक्चर झाली तर आमच्याकडे पंक्चर किट आहे.

प्रश्न: किंमत किती?

उत्तर: समोर कोणी माहितगार असेल तर त्याला या सायकलींची किंमत माहित असायची त्यामुळे तो असे प्रश्न विचारायचा नाही. पण बाकीचे बहुतेक सगळे जण हा प्रश्न विचारायचेच. ह्या प्रश्नाचे उत्तर आम्ही जपून द्यायचो. सायकलची किंमत आम्ही कमी करुन पाच हजार सांगायचो. जण कोणी जास्तच जाणकार असेल तर दहा हजार सांगायचो.

प्रश्न: सायकलची किंमत एवढी कमी कशी काय? आमच्याइथे अशी सायकल मिळत नाही.

उत्तर: मुंबईला सर्व सायकली स्वस्त मिळतात. दुकानदार त्या तिकडून तुमच्या इथे आणतात. त्यामुळे त्यांची किंमत वाढते. तुम्ही मुंबईला सायकल घेतलीत तर स्वस्त मिळेल.

प्रश्न: मला पण सायकल चालवायला द्या ना.

उत्तर: आम्हाला आज भरपूर अंतर जायचे आहे. ही सायकल तुमच्या सायकलसारखीच आहे. यामध्ये वेगळे असे काही नाही. ही ऑटोमॅटिक नाही. याला पण पँडल मारावेच लागतात.

असे सांगून आम्ही समोरच्याला आदरपूर्वक नकार द्यायचो.

असे सायकल बद्दल अनेक प्रश्न विचारले जायचे. तसेच पॅनिअर, डिस्क ब्रेक आणि सायकलच्या इतर भागांविषयी माहिती विचारली जात असे. आम्ही पण सायकलची किंमत सोडून बाकीचे सगळे खरे सांगायचो. किंमत कमी सांगितल्यामुळे समोरच्याचे आमच्या सायकलबद्दलचे अधिक आकर्षण कमी व्हायचे. त्यामुळे तो जबदस्तीने सायकल चालवायला द्या म्हणून पण मागे लागत नसे.

सायकल हे सर्वसामान्य व्यक्तीचे वाहन आहे. त्यामुळे आम्ही कुठेही सायकल थांबवली तरी त्या गावातील व्यक्ती न घाबरता आमच्याजवळ येऊन मोकळेपणाने बोलत असत.

त्यांच्याबरोबर अनेक स्थानिक विषयावर चर्चा होत असे. त्यातून त्या भागातील चालीरीती, इतिहास, वन्यजीव, पिके इत्यादींबद्दल माहिती मिळत असे. काही वेळेला समोरच्याला हिंदी भाषा समजत नसे तरी पण ते खुणेने हावभाव करुन विचारपूस करत असत.

चर्चेला सुरवात म्हणून आमच्याकडून विचारले जाणारे प्रश्न:

- या गावाचे नाव काय?
- मागे गेले ते कोणते गाव होते?
- या नदीचे नाव काय?
- हे कोणत्या देवाचे मंदिर आहे?
- शेतामध्ये हे कोणते पीक आहे? अजुन कोणकोणते पीक घेतले जाते?
- हे कोणते झाड आहे?
- या जंगलात कोणते प्राणी आहेत? ते त्रास देतात काय?
- तुम्हाला जवळचा बाजार कोणता?
- गावामध्ये शाळा कितवीपर्यंत आहे?
- जवळ कॉलेज कुठे आहे?
- दवाखाना किती लांब आहे?

असे साधे नेहमीचे प्रश्न विचारुन आम्ही बोलायला सुरवात करायचो. आणि चर्चा वाढत जायची. समोरच्याला त्याच्या वयानुसार सायकल चालवण्याचे महत्व आम्ही समजावून सांगायचो त्यामुळे ते खुश व्हायचेत. आणि त्यांच्याकडून चहा पाणी नाष्टासाठी आग्रह पण होत असे. वेळ कमी असल्यामुळे आम्ही आदरपूर्वक नकार देऊन पुढे निघत असू.

हॉटेल, ढाबा किंवा टपरीवर चहा, नाष्टा, जेवण करण्यासाठी थांबल्यावर तिथे वेगळे दिसणारे स्थानिक पदार्थ, मिठाई आम्ही आवडीने खायचो आणि त्याबद्दलची माहिती पण विचारायचो. त्यामुळे तिथले कारागीर खुश होऊन अजून विस्तृतमध्ये माहिती द्यायचे. आमच्यासाठी खास स्थानिक जेवण, पदार्थ बनवला जायचा. ट्रक कंटेनर इत्यादी वाहन घेऊन जेवणासाठी धाब्यावर आलेले चालक त्यांच्या प्रवासाच्या गमतीजमती सांगायचे. पुढे कसा रस्ता आहे त्याबद्दल माहिती द्यायचे.

मुंबईहुन आलोय हे समजल्यावर सगळे खुश व्हायचे. मुंबईबद्दल बहुतेक सर्वांना आकर्षण आहे. अनेकजण मुंबईमध्ये येऊन गेलेले असायचे किंवा त्यांचे नातेवाईक, मित्र मुंबईमध्ये असायचे. त्यामुळे त्यांच्याबरोबर मुंबई विषयावर चर्चा व्हायची.

या गप्पांमुळे अनेक माणसे जोडली गेली. ती माणसे मोहीम झाल्यानंतर आताही संपर्कात आहेत. या गप्पांमधून अजून एक गोस्ट समजली ती म्हणजे गावामध्ये काबाडकष्ट करुन जीवन जगणारी अनेक कुटुंब आहेत. ती गरीब असली तरी मनाने खूप श्रीमंत आहेत, खूप समाधानी आहेत. निसर्गाच्या सानिध्यात मस्तपैकी जीवन जगत आहेत. या जगामध्ये खूपच चांगली माणसे आहेत. आणि तुमचे कर्म चांगले असेल तर तुम्हाला चांगलीच माणसे भेटतात.

***

# प्रदूषणमुक्त भारत

सायकल चालवा, प्रदूषण घटवा..!

पृथ्वीवर वनस्पती, मानव व इतर प्राणी ज्या पर्यावरणात राहतात त्या पर्यावरणातील विविध घटकांत संतुलन प्रस्थापित झालेले असते. सजीवांच्या एका प्रजातीने त्याज्य केलेले घटक दुसऱ्या एखाद्या प्रजातीला पोषणासाठी इष्ट असू शकतात. अशा परस्परावलंबनामुळे पर्यावरणाची संरचना सातत्याने टिकून राहते. परंतु सध्याच्या अफाट लोकसंख्यावाढीमुळे व औद्योगिकीकरणामुळे पृथ्वीच्या पर्यावरणातील नेहमीच्या घटकांव्यतिरिक्त इतर अपायकारक घटक मोठ्या प्रमाणात पर्यावरणात शिरतात. त्यामुळे पर्यावरणाच्या विविध घटकांतील संतुलन बिघडते आणि पृथ्वीवरील वनस्पती व प्राणी यांच्या जीवनाच्या सातत्याला धोका निर्माण होतो. वातावरणात, पाण्यात किंवा हवेत सजीवांना हानिकारक असलेले पदार्थ मिसळण्याच्या क्रियेला प्रदूषण म्हणतात.

प्रदूषण अनेक प्रकारचे असते. प्रदूषणाची काही महत्त्वाची उदाहरणे खालीलप्रमाणे:

**पाणी प्रदूषण:** अशुद्ध पाणी म्हणजे पाणी प्रदूषण. कारखान्याचे रसायने मिसळेले पाणी तसेच सांडपाणी, तलाव नदी इत्यादी मध्ये सोडले जाते त्यामुळे पाणी प्रदूषण होते.

**हवा प्रदूषण:** हवा प्रदूषण हे प्रामुख्याने कारखान्यांमधून निघणारे वायु, वाहनांचा धूर इत्यादींमुळे होते.

**ध्वनि प्रदूषण:** मनुष्य, प्राणी किंवा यांत्रिक पर्यावरणामुळे निर्माण झालेला मर्यादेपलीकडील असह्य ध्वनी म्हणजे ध्वनिप्रदूषण. कारखान्यातील यंत्र, वाहनाचा मोठा कर्कश आवाज तसेच गाण्यांचा मोठा आवाज या मुळे ध्वनी प्रदूषण होते.

**मृदा प्रदूषण:** जमिनीत शेतीसाठी रासायनिक खतांचा अतिवापर तसेच कचर्यावर प्रक्रिया न करता पुरणे यामुळे मातीत असलेली सुपीकता कमी होते आणि त्यात विषारी पदार्थ मिसळले जातात. याला मृदा प्रदूषण म्हणतात.

जसजसे लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे, त्याप्रमाणात उद्योगधंदे व वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे केवळ मनुष्यच नव्हे तर निसर्गातील इतर घटकांवर पण प्रदूषणाचे विपरीत परिणाम होत आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन श्वसनाचे रोग, त्वचेचे रोग, हृदय विकार, मेंदूचे रोग असे अनेक आजार वाढत आहेत.

विविध प्रकारचे कडक नियम व कायदे यांनी औद्योगिक क्षेत्रातून होणाऱ्या प्रदूषणावर नियंत्रण ठेवले जात आहे. तंत्रज्ञानातील सुधारणा किंवा प्रदूषणरहित नवीन व स्वस्त ऊर्जास्रोताचा वापर यासारख्या अनेक उपाय योजना केल्या जात आहेत. परंतु कायद्याची कडक अंमलबजावणी मधील त्रुटी, तंत्रज्ञान वापरण्याबद्दल असलेली उदासीनता व माहितीचा अभाव यामुळे प्रदूषण वाढत आहे.

वाहनांच्या माध्यमातून होणारे वायुप्रदूषण, ध्वनिप्रदूषणही अधिक आहे. त्यामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी एक मोठी समस्या आहे. अरुंद रस्त्यांवर एकाच वेळी येणारी वाहने रोखण्यासाठी आणि प्रदूषणावर मात करण्यासाठी सायकल या वाहनाचा चांगला पर्याय म्हणून उपयोग होऊ शकतो. शारीरिक शक्तीने चालविले जाणारे दोन चाकी वाहन म्हणजे सायकल. अनेक ठिकाणी हे वाहतुकीचे, व्यायामाचे आणि खेळाचे मुख्य व स्वस्त साधन आहे. सायकल लहानांपासून ते वृद्ध व्यक्ती चालऊ शकतात.



दैनंदिन जीवनातील कामे करताना कमी अंतरासाठी आणि ऑफिसला जाण्यासाठी, मोटरसायकल किंवा कारचा वापर न करता सायकलचा वापर करु शकतो. सायकल वापरण्याचे अनेक फायदे आहेत.

१) सायकल चालवण्याने शारीरिक व्यायाम होतो आणि त्यामुळे आपले आरोग्य सुधारते.
२) इंधन वाचले जाईल जेणेकरुन आपण देशाच्या विकासात हातभार लावू शकतो.
३) सायकल चालवल्यामुळे कोणतेही प्रदूषण होत नसल्यामुळे प्रदूषणापासून मुक्तता मिळते.
४) सायकलसाठी इंधन लागत नाही त्यामुळे पैसे वाचतात.
५) सायकल वापरामुळे वाहनांची गर्दी कमी होते.

त्यामुळे सध्या या धावपळीच्या जीवनात सायकलला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. सायकल चालवून पेट्रोलची बचत केल्याचे समाधान काही वेगळेच आहे. पर्यावरण संवर्धनाचा, प्रदुषण मुक्तीचा केलेला हा खटाटोपही मनाला मोठे समाधान देणारा आहे. आमच्या सायकल मोहिमेमध्ये आम्ही सायकल चालवण्याचे हे फायदे सांगून ठिकठिकाणी जनजागृती केली.

***

# आता आतुरता २३ तारखेची

सगळी तयारी झाली होती. जसेजसे या आमच्या सायकल मोहिमेबद्दल मित्रांना समजले. सर्वांकडून शुभेच्छा मिळू लागल्या. काहीजण पहिल्या दिवशी सकाळी बांद्रा सीलिंकजवळ येणार होते. काहीजण आमच्या सायकल मार्गामध्ये भेटणार होते. आता आतुरता फक्त २३ तारखेची, पहिल्या दिवसाची...







# दिवस पहिला: मुंबई बांद्रा सीलिंक ते कसारा

मार्ग: बांद्रा सीलिंक- बीकेसी- घाटकोपर- ठाणे- पडघा- कसारा (११६/ ११६ किमी)
(जिल्हे: मुंबई- ठाणे)

आज सकाळी साडेपाचला बांद्रा सीलिंकजवळ जमून सहा वाजता सायकल प्रवास सुरु करायचे ठरले होते. नेहमीप्रमाणे कोणत्याही मोठ्या आवडत्या मोहिमेच्या एक दिवस अगोदर रात्री झोप येत नाही त्यामुळे रात्रभर थोड्या थोड्या वेळाने किती वाजले ते पाहत होतो. आणि एकदाचे तीन वाजले आणि उठून सर्व कार्यक्रम उरकून चार वाजता तयार झालो. सायकल इतर साहित्यासह तयार होतीच. मी वरळीला दुसऱ्या माळ्यावर राहतो. मग सायकल खांद्यावर घेऊन खाली उतरलो आणि टांग मारली. बांद्रा सीलिंक जवळ असणाऱ्या लव्ह मुंबई चिन्हाकडे निघालो.

बाकीचे पण आपापल्या घरातून निघाले होते. फडतरे व देशमुख सर पनवेलहून कारमध्ये सायकल घेऊन निघाले होते. नितीन भाई भाईंदरहून, अक्षय अंधेरीहून व भगत सर चेंबूरहून सायकल चालवत निघाले होते. नारायण आणि सिडनी सायनहून सायकल चालवत येत होते. बरोबर प्रत्येकाचे मित्र पण जमणार होते. गेल्या वर्षी केलेल्या मुंबई ते अत्तारी वाघा बॉर्डर सायकल मोहिमेचे मित्र पण येणार होते.



वरळी पार करुन प्रभादेवीला पोहोचलो. सिद्धिविनायक मंदिराजवळ थांबून बाहेरुन कलश दर्शन घेतले. गणपती बाप्पाला नमस्कार करुन पुढे निघालो. नेहमीप्रमाणे अनेकजण सकाळी व्यायाम, रन करण्यासाठी बाहेर पडले होते. रस्त्यामध्ये अनेक सायकलपटू पण दिसले. शिवाजीपार्कला चालणाऱ्यांची आणि धावणाऱ्यांची गर्दी होती. या सर्वांना सुप्रभात करत, ओळख दाखवत, चिअरअप करत पुढे माहीम ओलांडून बांद्रा सीलिंकजवळ

असणाऱ्या लव्ह मुंबई चिन्हाच्या इथे पोहोचलो. सगळे जमले होते आणि आम्हा सर्वांचे मित्र पण आले होते. आमच्या सायकल मोहिमेला शुभेच्छा देण्यासाठी मुंबईमधील अनेक सायकल ग्रुप पण आले होते. सर्वांकडून शुभेच्छांचा स्वीकार करुन



सर्वांबरोबर फोटो काढणे सुरु झाले. सहा वाजला फ्लॅग ऑफ झाला आणि आमचा सायकल प्रवास सुरु झाला. बरोबर अनेक सायकलपटू होते. हे आमच्यासाठी खूपच प्रेरणादायी होते.

कलानगरहून बीकेसीला आलो. काही नवीन सायकल मित्र भेटले. निखिल कार घेऊन भेटण्यासाठी आला होता. सर्वांचे आभार मानत आम्ही पुढे निघालो. सांताक्रूझ चेंबूर लिंक



रोड वर आलो. समोर आकाशात तांबडे फुटून सूर्य उगवण्याचा संकेत होत होता. अमर महाल जंक्शन पोहोचेपर्यंत सूर्य देवतेने दर्शन दिले होते. मुख्य हायवेला आलो होतो. गाड्यांची वर्दळ होती. घाटकोपरला वाटेमध्ये संजीव वेंगुर्लेकर सर आणि मित्र आमच्यासाठी चिक्की व आवळा सरबत घेऊन थांबले होते. हे आदरातिथ्य घेऊन पुढे निघालो.

थोड्या वेळाने समजले की फडतरे सरांची सायकल पंक्चर झाली आहे. पहिल्याच दिवशी मानाचा नारळ फुटला होता. पहिला नंबर फडतरे सरांच्या सायकलने लावला होता. सायकल बिघडणे किंवा पंक्चर होणे हे शुल्लक आहे. ती दुरुस्त करण्यासाठी आम्ही सर्व साहित्यासह पूर्ण तयारीत होतो. पण पहिला नंबर कोण लावतो हे महत्वाचे. नारळ फोडण्याचा मान कोणाला हे महत्वाचे. पहिल्याच दिवसाच्या सुरवातीला पंक्चर झाला होता. म्हणजे पुढचे सोळा दिवस मस्त मजेदार जाणार हे नक्की होते.



नाहूर जवळ लक्ष्मण नवले काका, विकास चव्हाण आणि मित्र सर्वांसाठी चिक्की आणि फळे घेऊन थांबले होते. हे सर्व नवी मुंबईहून आले होते. अशा प्रकारे वाटेमध्ये सर्वांना भेटत, त्यांनी आणलेल्या भेटींचा जबरदस्तीने स्वीकार करत त्यांच्या शुभेच्छांचा मान राखत आमचा सायकल प्रवास सुरु झाला. मुलुंड, ठाणेला अजून काही सायकल मित्र भेटले.

ठाणे माजिवडा चौकात नाष्टा करण्यासाठी थांबलो. नाष्टा झाल्यावर सर्वांना निरोप देऊन आम्ही नऊ जण पुढे निघालो. यामध्ये गाडगीळ सर ऑफिसमुळे राजनांदगावला येऊन



मिळणार होते. त्यामुळे ते थांबले. आणि चेतन सुट्टी असल्यामुळे आमच्याबरोबर कसारापर्यंत येणार म्हणून पुढे निघाला. तसेच ऍंथोनी, जोशी काका, किशोर केणी मागे फिरत होते. त्यांचा या सायकल मोहिमेच्या नियोजनामध्ये मोठा वाटा होता. ते आता पुढे बरोबर नसणार म्हणून थोडे वाईट पण वाटत होते.

**ठाणे जिल्हा** कोकण विभागातील उत्तरेकडे वसलेला असून तो औद्योगिकदृष्टया प्रगत जिल्हा आहे. हा जिल्हा पूर्वेकडे असणा-या सहयाद्रीच्या रांगा व पश्चिमेकडील अरबी समुद्राच्या किनारपट्टीच्या दरम्यान पसरला आहे. ठाणे जिल्ह्याच्या उत्तरेला पालघर जिल्हा, पूर्वेला नाशिक व अहमदनगर जिल्हे, दक्षिणेला पुणे व रायगड जिल्हे आणि पश्चिमेला मुंबई जिल्हा व अरबी समुद्र आहे. जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय ठाणे आहे.

ऐतिहासिक काळापासून ठाणे जिल्हातील मुख्यता सोपारा, कल्याण, ठाणे व संजान यांचा पश्चिम भारताच्या विदेशी व्यापारात एक अग्रगण्य सहभाग होता. पूर्व-ऐतिहासिक

काळापासून ठाण्याची किनारपट्टी हिंद महासागरामध्ये गणली जात असे. इ.स. पूर्व २५०० ते इ.स. पूर्व ५०० इजिप्त, पिनॅसिया आणि बॅबिलोन यांच्याशी व्यापारी संबंध होते. इ.स. पूर्व २५० ते इ.स. २५० मध्ये ग्रीक आणि पार्थियन लोकांच्या वसाहती निर्माण झाल्या. इ.स. २५० ते इ.स. ६४० पर्यंत पारशी टोळया व त्यांच्या वसाहती होत्या. इ.स. ७०० ते इ.स. १२०० पर्यंत मुस्लीम व्यापारी संबंध आणि अरब व पारशी लोकांच्या वसाहती झाल्या. इ.स. १५३० मध्ये पोर्तुगीजांनी ह्या वसाहती काबीज केल्या. इ.स. १६६४ मध्ये ब्रिटिशांनी ह्या वसाहती ताब्यात घेतल्या. नंतर हा भाग मराठ्यांकडे आला. ठाणे समुद्रकिनारा जहाज बांधणीसाठी प्रसिद्ध होता.

ठाणे हा उत्तर कोकणाचा भाग असून ज्याचे नाव अप्परंत म्हणजेच पश्चिमी टोक असे होते. नंतर पुरी कोकण म्हणून ओळखले जात असे. शिलाहारांच्या शासनकाळात ठाणे शहराला अरब लेखकांनी अतिशय सुंदर शहर म्हणून घोषित केले होते. ठाणे शहरातील व्यापार स्थानिक हिंदू, मुस्लीम आणि पारशी यांच्यामध्ये होत असे. शिलाहारांनी ४०० वर्षांपेक्षा अधिक काळ उत्तर कोकणवर राज्य केले. त्यांनी कला आणि संस्कृतीला उदारमतवादी संरक्षण दिले. अंबरनाथमधील मंदिर जे अद्यापही वास्तुशास्त्रातील व शिल्पकलांचे कौशल्य दाखवते.



औद्योगिक विकासाच्या दृष्टीने ठाणे जिल्हयाचा राज्यामध्ये तिसरा क्रमांक असून जिल्हयाच्या निम्म्यापेक्षा जास्त भागाचा आर्थिक व सामाजिक विकास हा औद्योगिकरणामुळे झाला आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने विकसित अनेक औद्योगिक वसाहती विकसीत केल्या आहेत. मुंबई सारखे आंतरराष्ट्रीय बाजारपेठ व सोयीचे बंदर, दळणवळणाच्या जलद सोयी आणि शासनामार्फत पुरविल्या जाणा-या सुविधा यामुळे जिल्हयामध्ये उद्योगधंदयाची भरभराट झालेली आहे. विशेषत: जिल्हयाच्या दक्षिण व पश्चिम भागामध्ये उद्योंगाचे केंद्रीकरण झालेले दिसून येते. जिल्हयामध्ये नोंदणी झालेल्या उद्योगात प्रामुख्याने रसायने व औषधे यांचे मोठया प्रमाणावर उत्पादन केले जाते. याशिवाय प्लॅस्टिकच्या वस्तू, लोखंडी साहित्य आणि पॉवरलूम कापड यांची निर्मिती करणारे मध्यम व

छोटे उदयोग मोठया प्रमाणात चालू आहेत. भिवंडी येथील यंत्रमागावर कापड विणण्याचा व्यवसाय प्रसिध्द आहे. केंद्रशासन अंगिकृत दारुगोळा व शस्त्र निर्मितीचा कारखाना अंबरनाथ येथे आहे. वाढत्या औद्योगिकरणामुळे कुशल व अकुशल कामगारांना मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध झाला आहे. जिल्हयामध्ये खनिज उत्पादन फारसे नसले तरी बांधकामासाठी रेती काढण्याचा व्यवसाय मुंब्रा, ठाणे, घोडबंदर या परिसरात मोठया प्रमाणावर चालतो.

ठाणे जिल्ह्यातून वैतरणा आणि उल्हास या दोन प्रमुख नद्या वाहतात. वैतरणा नदीच्या उपनद्या पिंजाळ, दहेरजा, सूर्या व तानसा या आहेत आणि बारवी, भातसा, काळू या उल्हास नदीच्या उपनद्या आहेत. या जिल्ह्यात काळी व वाळू मिश्रित जमीन आढळून येते. ही जमीन सुपीक असून ती मुख्यत: भाताचे पीक, भाजीपाला व फळबागा यांच्या लागवडीस योग्य आहे. तसेच सहयाद्री घाटमाथ्याच्या उतरणीच्या दऱ्या खोऱ्यात तपकिरी लालसर जमीन आढळून येते. ती भात लागवडीस उपयुक्त आहे.



ठाणे माजिवडा नंतरचा पुढचा रस्ता दुहेरी पण खूपच अरुंद होता. या रस्त्यावरील वाहनांची गर्दी, त्यामुळे उडणारा धुरळा, डोक्यावर रणरणते ऊन, छोटे चढ उतार, यातून मजल दरमजल करत आम्ही पुढे निघालो. खारेगाव टोल नाका ओलांडून उल्हास नदीच्या पुलावर आलो. दूरवर कशेळी पूल दिसत होता. दिवे अंजूरगाव सुरु झाले. या भागामध्ये अनेक कारखाने आणि गोदामे आहेत. त्यामुळे येथे मोठ्या वाहनांची गर्दी असतेच. कल्याण भिवंडी नाक्यानंतर वाहनांची गर्दी थोडी कमी झाली. जरा हायसे वाटले. आता रस्ता बऱ्यापैकी मोकळा झाला होता.

समोर दूरवर सोनाळे गावाजवळ असलेल्या डोंगरावरील पांढऱ्या रंगाचे पुरातन दिंडेश्वर महादेव मंदिर दिसू लागले. या भागातील हा डोंगर सर्वात उंच असल्यामुळे आणि हा महामार्ग या डोंगराला वळसा मारुन जात असल्यामुळे शेवटपर्यंत हे मंदीर अनेक ठिकाणाहून दिसत राहते. तसेच या मंदिराच्या परिसरातून नागमोडी वाहणाऱ्या उल्हास नदीचे पात्र आणि

आजूबाजूचा भिवंडी, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, ठाणे परिसर विस्तृत पसरलेला दिसतो.

थोड्या वेळाने एका उतारानंतर छोट्या चढणाच्या सुरवातीला भगत सरांच्या सायकलची चैन निघाली आणि ती मागच्या गियर मध्ये अडकली. ती काही पटकन निघेना. भगत सरांच्या सायकलला पुढे फक्त एक गिअर होता आणि त्यांनी सायकल चालवताना उलट पँडल फिरवल्यामुळे ती चैन उतरुन अडकली होती. मागचे पॅनिअर काढून आम्ही ती सायकल बाजूला घेतली आणि पक्कडच्या मदतीने ती अडकलेली चैन नितीन भाईनी सोडवून लावली. पुढचा प्रवास सुरु झाला.



भूक जोरात लागली होती आणि जेवणाची वेळ पण झाली होती. पडघा गावाच्या पुढे एका धाब्यावर जेवणासाठी थांबलो. तिथे टीव्हीवर महाराष्ट्र राज्यातील सत्ता स्थापनेबद्दलची बातमी पाहिली आणि त्यावर चर्चा रंगली. पोटभर जेवण झाले. जेवण झाल्यावर हात धुवून आलो आणि खुर्चीमध्येच बसलेल्या अवस्थेत सर्वांचे डोळे मिटले. थोडा आराम करुन पुढे निघालो.



हा मुंबई ते शिर्डी पदयात्रेच्या मार्ग होता. माझ्याकडून काही शिर्डी पदयात्रा झाल्या होत्या, त्यामुळे हा रस्ता खास ओळखीचा होता. पदयात्रेमधील आमचे मुक्कामाचे थांबे मागे जात होते. त्या आठवणींना उजाळा देत पुढे निघालो. दरवर्षी देशातील अनेक ठिकाणाहून शिर्डीसाठी साईबाबांच्या पालखी पदयात्रा निघतात. मुंबईहूनही अनेक पालखी निघतात.

आमची साईश मित्र मंडळ परेल भोईवाडा ची पालखी दरवर्षी गुढीपाडवा ते रामनवमी या काळामध्ये निघते. यामध्ये दररोज ३५ ते ४५ किमी अंतर पायी चालत कापले जाते. देवावर किती विश्वास ठेवावा हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. तुम्ही आस्तिक असा किंवा नास्तिक, पण प्रत्येकाने आपली नोकरी, व्यवसाय सांभाळून एकदातरी एखादी पदयात्रा, दिंडी, वारी करावी आणि त्यातील आनंद उत्साह नक्कीच अनुभवावा.

वासिंदला पोहोचलो. डाव्या बाजूला दूरवर डोंगररांगांमध्ये माहुली किल्ल्याचे सुळके दिसू लागले. भटकंतीची आवड आणि मुंबईपासून जवळचा किल्ला म्हणून माहुलीवर खूपवेळा जाता आले. भौगालिकदृष्ट्या शहापूरच्या वायव्येला असलेला हा किल्ला मध्ययुगीन कालखंडात भोवतालच्या महत्त्वाच्या ठिकाणाशी जोडलेला गेला होता. कल्याण सुभ्याजवळ किल्ला म्हणून शिवकाळात त्याला विशेष महत्त्व होते. तसेच नाशिक व सुरत परिसराशी सुद्धा माहुलीचा संबंध होता. माहुली वरुन जव्हार मार्गे सुरत तर माहुली वरुन नाशिक आणि माहुली वरुन किन्हवली-मुरबाड मार्गे नाणेघाट ओलांडून जुन्नर तसेच अहमदनगर अश्या भौगोलिक रचनेमुळे माहुलीला अधिक महत्त्व प्राप्त झाले होते. ठाणे, कल्याण, भिवंडी, जव्हार, नाशिक, सुरत, मुरबाड अश्या महत्त्वाच्या ठिकाणांना माहुली किल्ला जोडलेला असल्याने त्याला महत्त्व प्राप्त झाले होते.

सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये येणारा आणि अग्निजन्य खडका पासून बनलेला हा किल्ला एक दुर्गत्रिकुट आहे. माहुली, भंडारगड, आणि पळसगड मिळून हा किल्ला तयार झाला आहे.त्यामुळे ह्या किल्ल्याची रचना तीन वेगवेगळया भागांनी बनलेली आहे. मध्यभागी माहुली, उत्तरेस पळसगड आणि दक्षिनेस भंडारगड अश्या दुर्गत्रिकुटाचा एक दुर्ग बनलेला असून त्यातील माहुली हा मोठा किल्ला आहे. भारत सरकारने या किल्ल्याला महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे. आसनगाव या रेल्वे स्थानकापासून हा किल्ला पाच किमी अंतरावर आहे. या किल्ल्यावर शिवाजी महाराजांचे बराच काळ वास्तव्य होते असे सांगितले जाते. किल्ल्याजवळून भारंगी नदी वाहते.ही नदी भातसई नदीची उपनदी आहे.






माहुली किल्ल्याचे हे अभेद्य सुळके पाहत आसनगाव पार केले. शहापूरचा घाट चढवून आटगावला आलो. आजूबाजूचे छोटे डोंगर आणि त्यामधून जाणारा रस्ता, दूरवर दिसणारी टुमदार घरे, आदिवासी पाडे पाहत खर्डी गावाच्या पुढे आलो. आता मुक्कामाचे हॉटेल फक्त तीन किमी दूर होते म्हणून एके ठिकाणी चहा पिण्यासाठी थांबलो.

आज पहिल्या दिवशी आपण खूपच लवकर पोहोचणार म्हणून सर्व खुश होते. चहा पिऊन निघालो आणि संध्याकाळी चार वाजला कसारा हॉटेल ड्रिमलँडला पोहोचलो. तेथे गेल्यावर समजले की हे आपले हॉटेल नाही. आपण आरक्षित केलेले हॉटेल ड्रिमलँड चार किमी आत कच्चा रस्त्यावर आहे.




म्हणजे अजून पहिला दिवस संपला नाही तर. आमचा पोपट झाला होता. मुख्य रस्ता सोडून अजून चार किमी आत कच्चा रस्यावर सायकलने जायचे होते त्यामध्ये सुरवातीचा एक किमी तीव्र चढण होते. आम्ही मॅनेजरला फोन करुन ते हॉटेल बदलून किंवा पैसे परत मिळतील का हे विचारले. समोरुन नकार आला. त्या हॉटेलचे पैसे आम्ही अगोदरच दिले होते. ते पैसे फुकट जाऊ नयेत आणि अंधार पडायला अजून खूप वेळ होता त्यामुळे आम्ही त्या हॉटेल मध्ये जायचे ठरवले.

मुख्य रस्त्यापासून आम्ही आत निघालो. सुरवातीचा एक किमीचा चढ हळूहळू सायकल चालवत, मधेमधे थांबत चढवला आणि डोंगराच्या माथ्यावर पोहोचलो. समोर सूर्य पश्चिम क्षितिजाकडे झुकत होता. गार वारा सुटला होता. त्यामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूचे गवत आवाज करत सळसळत होते. पक्षी किलबिल करत होते. दिवसभर वाहनांच्या आवाजात आणि धूळ खात सायकल चालवल्यामुळे आलेला थकवा क्षणात गायब झाला. पाच मिनिटे थांबलो, निसर्गाची छटा अनुभवली आणि पुढे निघालो.



मुक्कामाच्या हॉटेलला पोहोचेपर्यंत अंधार झाला होता. पहिल्याच दिवसाचा शेवट असा होईल असे वाटले नव्हते त्यामुळे थोडी नाराजी आली होती. पण हॉटेल रिसॉर्ट आणि तिथले आदरातिथ्य पाहून ही नाराजी गायब झाली. बरोबर सायकल असल्यामुळे त्यांनी एक वेगळा बंगलो दिला.

सर्वांनी सायकल तपासली, साफसफाई झाली. आंघोळ झाल्यावर आजूबाजूचा परिसर पाहिला. तेथे असलेल्या पर्यटकांबरोबर गप्पा रंगल्या. हॉटेलमध्ये आम्हाला पोपटभाऊ भेटले. त्यांच्याकडून समजले की उद्याचा घोटी फाट्यानंतरचा रस्ता खूपच खराब आहे. त्यांनी आम्हाला मुंढेगाव दराणे मार्गे जाणारा पर्यायी रस्ता सांगितला. दुसऱ्या दिवशी घाटरस्ता होता. कसाऱ्याचा घाट आणि घोरवड घाट चढवायचा होता.

रात्री जेवण झाल्यावर गप्पा रंगल्या. हसूनहसून पोट दुखायला लागले. गेल्या वर्षीच्या मोहिमेतील इतर मित्रांची आठवण काढली गेली. सर्वांबरोबर फोनवर, व्हिडीओ कॉलवर बोलणे झाले.

आज पहिलाच दिवस होता त्यामुळे सगळे दमलेले होते. शरीराचे कोणते कोणते भाग दुखत आहेत त्याचा अंदाज घेत आम्ही सर्वजण दहा वाजताच झोपी गेलो.

***

# दिवस दुसरा: कसारा ते शिर्डी

मार्ग: कसारा- इगतपुरी- मुंढेगाव- दारणा- साकुर- सिन्नर- वावी- शिर्डी (१४८/ २६४ किमी) (जिल्हे: ठाणे- नाशिक- अहमदनगर)

सगळ्यांचे मोबाईल एकसाथ ओरडायला लागले. गजर ऐकून जाग आली. घडाळ्यात चार वाजले होते. काहीजण गुड मॉर्निंग, सुप्रभात ते उठा उठा हो सकळिक करत एकमेकांना उठवायला लागले. काहीजण मुद्दाम चादर डोक्यावर घेऊन होते. काहीजण गाणी बोलत, गुणगुणत बाथरुममध्ये पळाले. बाकीचे आपापले पॅनिअर आवरु लागले. प्रातर्विधी आटपून पाच वाजेपर्यंत सर्व तयार झाले. सायकल तपासल्या आणि मार्गस्त झालो. आज दोन घाट पार करायचे होते.



मुख्य रस्त्यावर आलो. अजून काळोखच होता. मुख्य रस्त्यावरील हॉटेल, धाब्यावर लगबग चालू होती. कसारा गाव ओलांडून आम्ही घाटाच्या पायथ्याशी असणाऱ्या लतिफवाडीकडे निघालो. थोड्या वेळाने उजेड झाला आणि समोर पूर्व दिशेला आकाश लालसर दिसू लागले. समोर कसारा घाटाचा डोंगर आणि उजवीकडे अलंग मदन कुलंगचे सुळके दिसू लागले. आजूबाजूला मस्त धुके पसरले होते. पाखरांची किलबिल सुरु होती. पहाटे लवकर काहीच न खाता निघालो होतो त्यामुळे कसारा घाटाच्या सुरवातीला चहासाठी थांबायचे ठरले होते. या मार्गावर प्रवास करणारे बहुतेकजण येथे चहा नाष्टासाठी थांबतातच.

लतिफवाडीमधील चहा नाष्ट्याच्या टपऱ्या आणि समोर असणारा बाबा दा ढाबा हा प्रवासी आणि ट्रेकर लोकांचा खास अड्डाच आहे. सुट्टीच्या दिवशी तर भरपूरच गर्दी असते. आम्ही येथे थांबून गरमागरम भजी, चहा आणि बिस्कीट खाल्ले. नितीन भाईंनी बाजूला

असलेल्या कुत्र्याला बिस्कीट दिले आणि त्याच्याबरोबर खेळू लागले. आज रविवार होता त्यामुळे रेसिंग स्पोर्ट बाईक घेऊन अनेक जण मुंबईहून बाहेर पडले होते. त्यापैकी काही जणांचा एक ग्रुप इथे चहा पिण्यासाठी थांबला. आमच्या जर्सीवरील मुंबई कोलकाता ही अक्षरे पाहून ते आमच्याजवळ आले. त्यांच्याशी गप्पा सुरु झाल्या. त्यांच्या शुभेच्छा स्विकारुन आम्ही पुढे निघालो.



नुकताच सूर्य उगवून कोवळे ऊन पडले होते. आम्ही कसारा घाट चढवायला सुरवात केली. सायकलचे गियर कमी झाले. वेग कमी झाला. हळूहळू पँडल मारत आम्ही सायकल हाकू लागलो. जसजसे आम्ही घाट चढवत उंचावर जाऊ लागलो तसे आजूबाजूचा परिसर, डोंगर दऱ्या आणि निसर्गाचे वेगळे रुप दिसू लागले. डाव्या बाजूला दूरवर डोंगरावर दिसणारी



रेल्वे गाडी आणि त्याचे रुळ थोड्या वेळाने रस्त्याच्या बाजूला आले होते. विहिगावकडे जाणारा रस्ता ओलांडून पुढे आलो. या रेल्वे मार्गावर असणारे बोगदे आणि पूल पाहत आम्ही घाट चढवत होतो. घाट रस्त्याच्या वळणावर थोडा वेळ थांबून आजूबाजूचे सौंदर्य अनुभवत होतो.

काही वेळाने आम्ही अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेल्या बारवेजवळ आलो. कसारा घाटात नाशिककडे चढताना रेल्वे बोगद्याच्या पुढे येताच उजव्या हातास गोल घुमटाकार वास्तू दिसून येते. साधारण उलट्या टोपलीच्या आकाराची किंवा इगलू समान दिसणारी ही प्राचीन बारव वास्तू कुणाचेही लक्ष वेधते. अंदाजे १५ फूट व्यासाची ही बारव म्हणजेच विहीर पूर्ण दगडी बांधकाम करुन, सुबक पद्धतीने बांधलेली आहे. झाडपाला, जंगली प्राणी पडून पाणी दूषित होऊ नये म्हणून त्यावर तीन बाजूंनी अर्धगोलाकार आकाराच्या खिडक्या सोडत

गोल घुमट बनवले आहे. दगडी शिळा एकमेकांवर ठेवत राजवाडे किंवा महालाच्या घुमटासमान हे छत्र बनवताना बारवीच्या सौंदर्यात अजूनच भर टाकत तिची स्वच्छताही ठेवण्याचं काम केलेले दिसते. बारवेत वर्षभर पिण्यायोग्य पाणी टिकून असते घाटातील वाड्यांतील महिला आजही वर्षभर ह्याच बारवेच पाणी ओढून नेट असतात. स्थानिक व अभ्यासकांच्या मतानुसार ही बारव अहिल्याबाई होळकरांनी बांधलेली असल्याचं समजते.



आताचा कसारा घाट म्हणजे पूर्वीचा थळ घाट. थळ घाटाला मोठा प्राचीन इतिहास आहे. पूर्वीपासून ह्या घाटातून मोठी व्यापारी वाहतूक होत असायची. ह्या वाटेत प्रवाशी, व्यापारी व सोबत सैन्यासही तहान भागवण्यासाठी पाण्याच्या नैसर्गिक स्रोतांवर विसंबून चालावे लागत असे. हीच बाब लक्षात घेत अहिल्याबाई होळकर यांची ही बारव बांधली. आजही बारव आपले जलदानाचे काम इमानेइतबारे करताना पाहून मान आपसूक अहिल्याबाई होळकरांपुढे झुकते. १७६७ ला पतीच्या निधनानंतर त्यांना अनपेक्षितपणाने राजगादीची जबाबदारी सांभाळावी लागली, मात्र यामुळे हबकून न जाता त्यांनी आपली कामे अपेक्षेपलीकडे यशस्वी करुन दाखवली. स्वतःच्या कल्पकतेने दुरदृष्ट्या अहिल्याबाईंनी प्रजेसाठी धोरणात्मक कामे करण्याचं ठरवत भारतभर अनेक कामे केली. भारताच्या अनेक भागांत सीमा व हिस्सा न बघता बारव, नदीकाठी प्रशस्त दगडी घाट, देखणी मंदिरे व यात्रेकरूंच्या सोयीसाठी पाणपोया



व धर्मशाळा बांधल्या. ज्या काळात मुलींना शाळेत जाऊ देणे व त्यांच्या बुद्धीचा विकास मान्य करणे हे समाजाला कठीण वाटत असे, त्याच काळात स्वत:ला मिळालेल्या संधीचा समर्थपणे उपयोग करुन इतरांच्या सुखसोयी वाढविणारी, अडचणी दूर करणारी राज्यकर्ती म्हणजे अहिल्याबाई होळकर.

या विहिरीचे पाणी नेण्यासाठी बाजूच्या वाडीतून काही बायका आल्या होत्या. त्या वर्षभर हे पाणी पिण्यासाठी वापरतात. आम्हीही विहिरीचे पाणी प्यायलो. सोबतच्या पाण्याच्या बाटल्या भरुन घेतल्या आणि पुढे निघालो. थोड्या वेळात घाट संपला आणि आम्ही इगतपुरीच्या घाटन देवी मंदिराजवळ आलो.

आता रस्त्याच्या बाजूला रिकामा सरळ सर्व्हिस रोड असल्यामुळे आमच्या सायकलचा वेग वाढला होता. उजव्या बाजूला लांबवर दिसणारी अलंग मदन कुलंग कळसुबाई ही डोंगररांग आणि आजूबाजूचे छोट्या मोठ्या टेकड्यांच्या माथ्यावर डौलाने फडकणारा झेंडा पाहत आम्ही सायकल पळवत होतो. ठाणे जिल्हा ओलांडून नाशिक जिल्ह्यामध्ये आलो होतो.

**नाशिक जिल्हा** महाराष्ट्राच्या उत्तरपश्चिम भागांमध्ये स्थित आहे. या जिल्ह्याच्या उत्तरेला धुळे जिल्हा, पूर्वेस जळगांव जिल्हा, दक्षिणपूर्व ओरंगाबाद जिल्हा, दक्षिणेकडील अहमदनगर जिल्हा, नैऋत्येला ठाणे जिल्हा, पश्चिमेला गुजरातचे वलसाड व नवसारी जिल्हे, आणि उत्तर पश्चिमेला डांग जिल्हा आहे.

नाशिक शहर हे जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय आहे. पुरातन काळापासून नाशिक शहर व त्या आसपासचा परिसर विविध नावांनी ओळखला जात असे. जनस्थान, त्रिकंटक, गुलशनाबाद, नासिक, नाशिक अशी नावे या परिसरास होती असे उल्लेख आढळतात.




ऐतिहासिक काळापासून नाशिक धार्मिक स्थळ मानले गेले आहे. या शहराला नाशिक हे नाव कसे पडले या बाबत दोन मान्यता आहेत. येथील गोदावरी नदी नऊ टेकड्यांच्या मधून वाहते. नऊ शिखरांचे शहर म्हणून नवशिख आणि नंतर अपभ्रंश होऊन नाशिक असा एक मतप्रवाह आहे. तसेच दुसरा संदर्भ रामायणाशी आहे. राम, त्यांची पत्नी सीता आणि बंधु लक्ष्मण नाशिक मधील पंचवटी परिसरात वास्तव्यास असताना शूर्पणखा या रावणाच्या बहिणीचे नाक म्हणजेच संस्कृत भाषेमध्ये नासिका लक्ष्मणाने या ठिकाणी कापले. त्यावरुन नासिक अथवा नाशिक हे नाव पडले असेही म्हणतात. सातवाहन काळात नाशिकला फार महत्त्व होते.

इ.स.१५० मध्ये भारतात आलेल्या टॉलेमी या इजिप्शियन प्रवाशाने नाशिक धर्मपीठ असल्याचा उल्लेख केला आहे.

नाशिक जिल्हा दख्खन पठारावरील, सह्याद्रीच्या पूर्व उतारावरील जिल्हा आहे. सह्याद्रीची प्रमुख रांग जिल्ह्याच्या पश्चिम भागातून दक्षिणोत्तर दिशेने जाते व या रांगेच्या तीन शाखा या जिल्ह्यात पश्चिम–पूर्व दिशेने जातात. अगदी उत्तर भागात सेलबारी डोंगररांग, याच्या दक्षिणेस घोलबारी डोंगररांग आहे. या रांगेच्या दक्षिणेस जिल्ह्याच्या मध्यातून जाऊन तापी व गोदावरी यांची खोरी अलग करणारी सातमाळा किंवा चांदवड वा अजिंठा डोंगररांग आहे. इगतपुरी तालुक्याच्या अगदी दक्षिण टोकाशी पश्चिम–पूर्व पसरणाऱ्या उपशाखेमध्येच कळसूबाई हे महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर आहे. याशिवाय इतर अनेक छोट्या डोंगररांगा, टेकड्या जिल्ह्यामध्ये आहेत. या जिल्ह्यात अनेक डोंगरी किल्ले, लेणी आहेत.



नाशिक जिल्ह्यात गोदावरी ही दक्षिण भारतातील सर्वांत मोठी नदी, त्र्यंबकेश्वर येथे उगम पावते. या नदीवर बांधलेले जगातील सर्वांत पहिले व मोठे मातीचे धरण गंगापूर येथेच आहे. गोदावरी व्यतिरिक्त वैतरणा, भीमा, गिरणा, कश्यपी, दारणा इत्यादी महत्वाच्या नद्या या जिल्ह्यातून वाहतात. या नद्यांचा जिल्ह्याला सिंचनाच्या दृष्टीने बराच उपयोग होतो. नाशिक जिल्ह्यात द्राक्ष व कांद्याचे उत्पादन होते. त्याप्रमाणेच वाईन-निर्मितीसाठीही नाशिक प्रसिद्ध होत आहे. या भागात ओलीता खालील क्षेत्र मुबलक असल्यामुळे दुधाकरीता आवश्यक असलेल्या हिरव्या चा-याची पिके मोठया प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यामुळे दुधाचे उत्पादन भरपूर होते. जिल्हयात उत्पादन होणारा भाजीपाला मोठया प्रमाणात मुंबईला पुरविला जातो म्हणून नाशिक जिल्हयास मुंबईची परसबाग असेही म्हणतात.

महाराष्ट्रातील पुणे आणि मुंबईनंतर नाशिक हे महाराष्ट्राचे तिसरे औद्योगिक केंद्र आहे. नाशिकमध्ये अनेक सरकारी कंपन्या आहेत. चांदीच्या दागिन्यांसाठीही शहर प्रसिद्ध आहे. नाशिक जिल्ह्यातील येवला येथील पैठणी प्रसिद्ध आहे. भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक मानले जाणारे दादासाहेब फाळके यांचे जन्मगांव त्र्यंबकेश्वर असून फाळक्यांचा पहिला स्टुडियो नाशिकमध्ये होता.

नाशिक जिल्ह्याला महान पौराणिक पार्श्वभूमी आहे. भगवान राम आपल्या वनवासा दरम्यान पंचवटी येथे वास्तव्य करीत होते. अगस्ती ऋषी तपस्यासाठी नाशिकमध्ये राहिले. पवित्र गोदावरी नदी नाशिकच्या त्र्यंबकेश्वर येथुन उगम पावते. त्र्यंबकेश्वर शिवमंदिर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. भारतातल्या चार कुंभमेळयांपैकी सिंहस्थ कुंभमेळयाचे क्षेत्र नाशिक आहे. दर बारा वर्षांनी येथे कुंभमेळा भरतो. येथील मंदिरे व गोदावरी नदीवरील घाट प्रसिद्ध आहेत.

हिंदू पौराणिक आख्यायिकेनुसार समुद्रमंथनातून अमृतकुंभ बाहेर निघाला. त्यावरुन देव व दानव यांच्यात युद्ध झाले होते. युद्धात अमृतकुंभातील चार थेंब जमिनीवर पडले. ज्या चार ठिकाणी हे अमृताचे थेंब पडले, त्या चार ठिकाणी कुंभमेळे भरतात. पहिला थेंब हरिद्वारमधील



गंगा नदीत, दुसरा थेंब उज्जैन येथील क्षिप्रा नदीत, तिसरा थेंब नाशिक येथील गोदावरी नदीत व चौथा थेंब प्रयाग येथील गंगा, यमुना व सरस्वती नद्यांच्या संगमावर पडला होता. आज ही चार स्थळे तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असून येथे कुंभमेळा भरतो. हा जगातील सर्वात मोठा धार्मिक उत्सव आहे. कुंभमेळा नाशिकमध्ये पंचवटी-रामकुंड येथे आणि त्र्यंबकेश्वरला कुशावर्त घाटावर भरतो. या कुंभमेळयासाठी साधू, महंत, भाविक हे लाखोंच्या संख्येने गोदावरीच्या तीरी पवित्र स्नान करण्यासाठी उपस्थित असतात. नाशिकला २०१५ साली कुंभमेळा भरला होता, आता पुढील कुंभमेळा २०२७ साली असेल. परदेशी लोकांना याचे खूप आकर्षण आहे.

नाशिक जिल्ह्यामध्ये काळाराम मंदिर, मुक्तीधाम, भक्ती धाम, कपालेश्वर महादेव मंदिर, लक्ष्मी नारायण मंदिर, सोमेश्वर मंदिर अशी अनेक पवित्र मंदिरे आहेत. सप्तशृंगी मंदिर हे भारतातील ५२ शक्ती पीठांपैकी एक आहे. तसेच तोफखाना विभाग केंद्र, नांदूर मधमेश्वर अभयारण्य, धम्मगिरी, सापुतारा, चांभार लेणी, रामकुंड, सीता गुंफा, पांडवलेणी, गोदावरी घाट, वीर सावरकर स्मारक, दूधसागर धबधबा, अंजनेरी, दिंडोरी ही अजून काही प्रेक्षणीय स्थळे आहेत.

इगतपुरी शहर आणि विपश्यना पॅगोडा पाहत घोटी नाक्याजवळ आलो. हॉटेल शोधून नाष्टासाठी थांबलो. आज नारायणाचा वाढदिवस होता. त्याला सर्वांनी शुभेच्छा दिल्या आणि वाढदिवस इडली कापून साजरा केला. सर्वांनी पोटभर नाष्टा केला. आमच्या सायकल पाहून अनेकजणांनी विचारपूस केली. त्यांच्याबरोबर गप्पा सुरु झाल्या. इथून पुढे घोटी मार्गे रस्ता खूपच खराब होता. कसाऱ्याला भेटलेल्या पोपट भाऊंमुळे आम्हाला घोटी रस्त्याला पर्यायी, मुंढेगाव दराणे मार्गे रस्ता समजला होता. याबद्दल पुन्हा चौकशी केली आणि आम्ही त्या रस्त्याने जाण्याचा निर्णय घेतला.



मुंढेगावला मुख्य रस्ता सोडून उजवीकडे वळलो. सूर्य पण हळूहळू वर सरकत होता. गरमी वाढत होती. हा गावातून जाणारा छोटा रस्ता असल्यामुळे अनेक चढउतार होते. काही ठिकाणी रस्ता खड्डे पडून खराब झाला होता. खडी आणि माती भरपूर होती. बाजूने गाडी गेली की धूळ उडत होती. थोड्या वेळाने एका मंदिराजवळ पोहोचलो. ते मरीमातेचे मंदिर होते आणि त्याच्या बाजूला एक मोठे वडाचे झाड होते. त्या झाडाच्या सावलीत थांबून आम्ही आराम करत होतो. मस्त वारा सुटला होता. समोर रस्ता संपतोय की नाही हे पाहत होतो. मंदिरात आलेल्या काही गाववाल्यांनी देवीजवळ नारळ फोडून प्रसाद म्हणून खोबरे वाटले. त्यांच्याबरोबर गप्पा मारल्या आणि खोबरे चघळत पुढे निघालो.



पुढचा रस्ता मस्तच होता. एका बाजूला दारणा जलाशयाचे साचलेले पाणी आणि दुसऱ्या बाजूला हिरवीगार शेती होती. रस्त्याच्या बाजूला झाडे असल्यामुळे भरपूर सावली होती. गावातील छोटी टुमदार घरे पाहत पुढे निघालो. थोड्या वेळाने दारणा धरणाच्या मुख्य

दरवाजा जवळ आलो. धरणाला खूपच मोठी आणि लांब भिंत होती. ठिकठिकाणी झडपांमधून पाणी सोडले जात होते. काही ठिकाणी कपडे धुण्याचे काम चालू होते. धुतलेले कपडे, चादरी बाजूच्या खडकांवर वाळत घातल्यामुळे लांबून दोन्ही काठ रंगीबेरंगी झाले होते. दारणा नदी ही इगतपुरीच्या आग्नेयीस असलेल्या सह्याद्रीतील कुलंग किल्ले टेकडीच्या उत्तर उतारावर उगम पावून सामान्यतः ईशान्येकडे वाहत जाऊन पुढे गोदावरीस मिळते. या नदीवर नांदगाव बुद्रुक या गावाजवळ दारणा धरण बांधले आहे. त्यामुळे मोठा जलाशय निर्माण झाला आहे.



सन १८९२ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. त्या दुष्काळाची झळ येथील आजूबाजूच्या प्रदेशात मोठ्या प्रमाणावर बसलेली होती. तत्कालीन ब्रिटिश सरकारने गोदावरीच्या खोऱ्यात धरणे बांधायचे धोरण अंगिकारले. त्यानुसार दारणा नदीवर नांदगाव इथे धरण बांधायचे निश्चित झाले. १९०७ साली इथे धरण बांधायला सुरुवात झाली आणि १९१२ ला हे धरण बांधून तयार झाले. त्यासाठीचा खर्च त्याकाळी जवळजवळ २७ लाख रुपये इतका होता. या सर्व कामावर देखरेख करायला एच. एफ. बिल हे सुपरिटेंडेंट इंजिनीयर होते. त्यांनी दुष्काळ निवारणार्थ केलेल्या पाटबंधाऱ्याच्या कामात हे सर्वात पहिले काम होते म्हणून या जलाशयाला लेक बिल असे नाव दिले गेले. दारणेच्या या जलाशयामुळे कित्येक गावांना त्याचा फायदा झालेला आहे. मोगरे, उभाडे, बेलगाव तरळे, मुरंबी, माळुंजे अशी कित्येक गावे दारणेमुळे सुखावलेली आहेत. या लेक बिल जलाशयाचा विस्तार खूप मोठा आहे.



गावातून जात असताना एका घराच्या बाजूला आम्हाला वृंदावन समाधी शिळा दिसल्या. महाराष्ट्रात गावोगावी अशा शिळा सापडतात. भारतात प्राचीन काळापासून स्मारके



बनविण्याची प्रथा आहे. महाराष्ट्र ही संतांची, शूर वीरांची, सत्पुरुषांची भूमी आणि म्हणूनच ही धारातीर्थे अजूनही मोठ्या भक्तीभावाने पुजली जातात. तुलसी वृंदावन, समाधी, शिवलींग, घुमटी, देवळी, वीरगळ, सतीशिळा अशा स्वरुपात स्मारके उभारुन आपल्या पूर्वजांचे स्मरण करुन देतात आणि पुढील पिढीसाठी प्रेरणा व स्फूर्ती देतात.

या दारणा धरणाच्या पाण्यामुळे येथील गावामध्ये भरपूर भाजीपाला होतो. भरपूर ठिकाणी आम्हाला थांबवून विचारपूस केली जायची. कोलकाताला सायकल चालवत जातोय हे सांगितल्यावर त्यांना आश्चर्य व खूपच हेवा वाटायचा, चहापाणीसाठी आग्रह व्हायचा आणि त्यांच्या मळ्यातल्या काकड्या दिल्या जायच्या. अशा या काकड्यांमुळे आमचे पॅनिअर जड झाले होते.



दुपारी आम्ही साकुर फाट्यावर जेवणासाठी थांबलो. पोटभर जेवलो. सोबत घट्ट दही खाल्ले. जेवल्यावर थोडा आराम करुन पुढे निघालो. काही अंतर पुढे आल्यावर मोबाईल



फोनवर समजले की भगत सरांचा पैसे असलेला पाऊच हरवला होता. आणि त्यामध्येच त्यांच्या सायकल लॉकची चावी असल्यामुळे ते आणि नितीन भाई हॉटेल जवळच होते. पुढे आलेलो आम्ही त्यांच्यासाठी थांबलो. मस्तपैकी झाड पाहून त्याच्या सावलीत आडवे झालो. काही जण मागे त्यांच्या मदतीसाठी गेलो.

भगत सर गडबडीमध्ये तो पाऊच सायकलच्या सीटवर ठेऊन जेवणासाठी आत हॉटेलमध्ये आले होते. जेवण झाल्यावर जेव्हा सर्व सायकल घेऊन निघाल्यावर त्यांना पाऊचची आठवण झाली होती. तोपर्यंत तिथून तो पाऊच गायब झाला होता. आजूबाजूला शोध घेऊन पण पाऊच मिळाला नाही त्यामुळे नितीन भाईंनी तो सायकलचा लॉक कटरने कापला. पाऊचमधील पैसे गेले म्हणून सर्वच नाराज होते.

या सगळ्यात आमचा काही वेळ गेला होता त्यामुळे आम्ही सायकल पळवायला लागलो. साकुर फाटा नंतर मुख्य मोठा रस्ता सुरु झाला होता. शेणित पांढरुलि करत घोरवड घाटरस्ता पार करुन आम्ही वरती आलो. दूरवर औंढा किल्ला, पट्टागड पर्यंत पसरलेली डोंगराची रांग दिसत होती. मस्त वारा सुटला होता. सभोवतालच्या डोंगरांवर पवनचक्क्या फिरत होत्या. तिथे असलेल्या स्थानिक लोकांबरोबर गप्पा रंगल्या. त्यांनी हरसुळेजवळ असलेल्या डोंगरावर लेणीमध्ये असलेले आई भवानी मंदिर दाखवले.



थोड्या वेळाने सिन्नरला पोहोचलो. सिन्नरला गोंदेश्वर मंदिर पाहिले. बाणासूर राक्षसाने सिन्नर नगरी उचलून पालथी केली, अशी अख्यायिका पण सिन्नरबाबत सांगितली जाते. सेऊणपुरा, सिंधीनगर, सेनुनापूर व नंतर सिन्नर अशी अनेक नावं एखाद्या नक्षीदार शालीसारखे पांघरत या नगरीने मोठा प्रवास केला आहे. सेऊणचंद्राने सेऊणपुरा या नावाने स्वतंत्र पेठ किंवा वस्ती निर्माण केली असे काही ताम्रपटात म्हटल्याचे दिसते.



सिन्नरचा इतिहास जेवढा अनोखा आहे. तेवढीच तेथील मंदिरेही देखणी आहेत. सुमारे आठशे वर्षांपूर्वी सिन्नरवर यादव वंशातील राजा राव गोविंद यांचे शासन होते. या राजावरुनच मंदिराचे नाव गोविंदेश्वर व पुढे गोंदेश्वर पडले असावे. हे मंदिर ११६० साली बांधले असावे असा अंदाज अभ्यासक लावतात. हे मंदिर पुरातन भूमिज स्थापत्यशैली बांधकामाचा उत्तम नमुना आहे. हे मंदिर पाच मुख्य मंदिरांचा समूह असल्याने त्याला शैवपंचायतन म्हटले जाते.

यांतील गोंदेश्वराचे मुख्य शिवमंदिर मध्यावर असून सभोवतीची चार उपदिशांना असणारी मंदिरे पार्वती, गणपती, सूर्य आणि विष्णू यांची आहेत. मंदिरात सभामंडप व गाभारा आहे. गर्भगृहावर बांधलेले, आकाशाकडे झेपावणारे मंदिराचे पटईचे शिखर अतिशय देखणे असून



अप्रतिम कोरीवकामाने सजवलेले आहे. गर्भगृहात रेखीव शिवपिंडी आहे. सभामंडपातील खांब नक्षीने कोरलेले असून त्यांवर आणि मंदिरांच्या भिंतींवर देव-देवता, गंधर्व-अप्सरा, पौराणिक आणि रामायणातील प्रसंग कोरलेले आहेत. मंदिरातील शिल्पकाम त्रिमित असून त्यावर पडणार्या परावर्तित प्रकाशाच्या आणि सावलीच्या छटांतून मंदिराचे देखणेपण अधिकच उठावदार दिसते. भारत सरकारने या मंदिराला महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून १९०९ रोजी घोषित केलेले आहे.

हे मंदिर पाहून आम्ही पुढे निघालो. मुसळगाव, पांगरी, वावी, पाठारे करत सोनेवाडी ला आलो. नाशिक जिल्हा संपून अहमदनगर म्हणजेच नगर जिल्हा सुरु झाला होता.

**अहमदनगर जिल्हा** हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्वांत मोठा जिल्हा आहे. राज्याच्या मध्यभागी असलेल्या अहमदनगर जिल्ह्याच्या उत्तरेस नाशिक जिल्हा व औरंगाबाद जिल्हा, पूर्वेस बीड जिल्हा, पूर्व व आग्नेय दिशेस उस्मानाबाद जिल्हा, दक्षिणेस सोलापूर जिल्हा तर नैर्ऋत्येस व पश्चिमेस पुणे जिल्हा व ठाणे जिल्हा हे जिल्हे वसलेले आहेत.

जिल्ह्याच्या पश्चिमेकडील अकोले व संगमनेर तालुक्यात सह्याद्रीच्या डोंगररांगा पसरलेल्या आहेत. महाराष्ट्रातील सर्वांत उंच शिखर कळसूबाई याच डोंगररांगांमध्ये नगर आणि नाशिक जिल्ह्यांच्या सीमेवर आहे. शिखराची समुद्रसपाटीपासून उंची १६४६ मीटर आहे. जिल्ह्याच्या पश्चिमेकडील प्रमुख डोंगररांग हरिश्चंद्राची रांग या नावाने ओळखली जाते. जिल्ह्याचा मध्य व उत्तर भाग बाळेश्वराचे पठार या नावाने संबोधला जातो. तसेच जिल्ह्याचा दक्षिण भाग हा घोड नदी, भीमा व सीना या नद्यांचे खोरे म्हणून ओळखला जातो.

गोदावरी, भीमा, सीना, मुळा व प्रवरा या अहमदनगर जिल्ह्यातील प्रमुख नद्या असून आढळा, ढोरा, घोड नदी, कुकडी याही नद्या जिल्ह्यातून व जिल्ह्याच्या सीमा भागातून

वाहतात. बहुतांशी नद्या पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहतात. प्रवरा व गोदावरी नद्यांचा संगम नेवासे तालुक्यात होतो, या स्थळाला प्रवरासंगम असे म्हटले जाते. अकोले तालुक्यातील डोंगराळ



भागात भंडारदरा येथे प्रवरा नदीवर १९२६ मध्ये धरण बांधण्यात आले आहे.भारतातील जुन्या धरणांत याचा समावेश केला जातो. मुळा नदीवर जिल्ह्यातील सर्वांत मोठे धरण राहुरी तालुक्यात बांधण्यात आले आहे. या प्रकल्पातून अहमदनगर शहराला पाणी पुरवठा केला जातो. येथील जलाशयास ज्ञानेश्वरसागर असे म्हटले जाते. अहमदनगर जिल्ह्यातील सिंचनात प्रामुख्याने विहिरींचा वाटा जास्त आहे.

महाराष्ट्रामध्ये पहिली मानवी वसाहत याच जिल्ह्यात प्रवरा व गोदावरी नद्यांच्या किनाऱ्यावर झाली, असा निष्कर्ष पुण्याच्या डेक्कन कॉलेजने नेवासातील उत्खननानंतर काढला आहे. भारतीय पुरातत्व विभागाने श्रीरामपूर तालुक्यातील दायमाबाद येथे केलेल्या उत्खननातून या जिल्ह्यात सिंधु संस्कृतीचे अस्तित्व सिद्ध झालेले आहे.

पंधराव्या शतकाच्या शेवटी, इ.स. १४८६ मध्ये तत्कालीन बहामनी राज्याचे पाच तुकडे झाले. त्यामधून फुटून निघालेल्या मलिक अहमदशहा बहिरी या निजामशहाने सीना नदीकाठी



शहर वसवण्यास सुरुवात केली. याच्या नावावरुनच या शहराला अहमदनगर असे नाव पडले. १४९४ मध्ये शहर रचना पूर्ण होऊन अहमदनगर निजामशहाची राजधानी बनले. या शहराची तुलना त्या काळी कैरो, बगदाद या समृद्ध शहरांशी केली जात असे. अहमदशहा, बुऱ्हाणशहा, सुलताना चांदबिबी यांची कारकीर्द असणारी निजामशाही येथे १६३६ पर्यंत टिकली.

पुढे काही काळ नगरने मराठेशाही व शहाजहान बादशहाची मोगलशाही अनुभवली. १७५९ मध्ये नगर पेशव्यांकडे आले आणि १८०३ मध्ये ते इंग्रजांच्या ताब्यात गेले. १८२२ मध्ये ब्रिटिशांनी अहमदनगर जिल्ह्याची स्थापना केली. १९४२ च्या चलेजाव आंदोलनाच्या

काळात पंडित जवाहरलाल नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद, डॉ. पी.सी. घोष इत्यादी राष्ट्रीय नेते नगरमधील भुईकोट किल्ल्यात बंदिवासात होते.

ज्वारी हे नगर जिल्ह्यातील प्रमुख पीक असून ते दोन्ही हंगामांत घेतले जाते. ऊस हेदेखील महत्त्वाचे पीक असून जिल्ह्यातील साखर कारखान्यांची संख्या जास्त आहे. अलीकडच्या काळात, जिल्ह्यात द्राक्ष, मोसंबी, डाळिंब या फळांचे तसेच सूर्यफुलाचे क्षेत्र व उत्पादन वाढते आहे. जिल्ह्यातील शेवंतीची फुलेही महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. राज्याबाहेरही शेवंतीला मागणी असते. जिल्ह्यात श्रीरामपूर येथे मोसंबी संशोधन केंद्र आहे.

अहमदनगर जिल्ह्यात सर्वाधिक साखर कारखाने आहेत. प्रवरानगर येथे आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना सहकार महर्षी विठ्ठलराव विखे पाटील यांनी स्थापन केला होता. अण्णा हजारे यांच्या आदर्श ग्राम या संकल्पनेतून राळेगण सिद्धी या खेड्याने जलव्यवस्थापनाचा एक आदर्श निर्माण केला, तर पोपटराव पवार यांच्या संकल्पनेतून हिवरेबाजार हे आदर्श खेडे म्हणून नावारुपास आले आहे. अहमदनगर जिल्याला शहराला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे.

कृषी व शैक्षणिकदृष्ट्या नगर जिल्ह्याचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे राहुरी येथे स्थापन झालेले, महाराष्ट्रातील पहिले (१९६८) कृषी विद्यापीठ होय. या ठिकाणी कृषीविषयक विविध अभ्यासक्रम शिकवले जातात, तसेच अनेक पिकांबाबत संशोधन केले जाते. स्थापनेनंतर राहुरी विद्यापीठाचे महात्मा फुले कृषी विद्यापीठ असे नामकरण करण्यात आले. या विद्यापीठाने संशोधन करुन वापरात आणलेल्या विविध पिकांच्या जाती राज्यातील शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय आहेत.



अहमदनगरला मराठवाड्याचे प्रवेशद्वार म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्रात सर्वप्रथम १९४८ मध्ये महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची एसटी बस अहमदनगर-पुणे या मार्गावर धावली. जिल्ह्यामध्ये अनेक पर्यटनस्थळे आहेत. त्यापैकी रेणूका माता मंदिर धामणगाव देवी,

अमृतेश्वर मंदिर रतनवाडी, चांदबिबीचा महाल, चिंकारा व माळढोक अभयारण्य, जगदंबा मंदिर मोहटा, जगदंबामाता मंदिर टाहाकरी, श्री ढोकेश्वर मंदिर, गवानगड, भुईकोट किल्ला, रेणुकामाता मंदिर केडगाव, शनी-शिंगणापूर, साईबाबा मंदिर शिर्डी, सिद्धटेक, हरिश्चंद्रगड, रांजण खळगे निघोज, मेहराबाद, श्रीगोदा, दायमाबाद पुरातत्त्वीय उत्खनन स्थळ, इत्यादी प्रसिद्ध आहेत.

मराठी भाषेतील सार्वकालिक सर्वोत्कृष्ट ग्रंथ म्हणजे ग्रंथराज ज्ञानेश्वरी आहे. ज्या ज्ञानेश्वरीची एक तरी ओवी अनुभवावी असे म्हटले जाते, तो ग्रंथ अहमदनगर जिल्ह्यातील श्रीक्षेत्र नेवासे येथे संत ज्ञानेश्वरांनी लिहिला. या आध्यात्मिक वैशिष्ट्यांसह आज अहमदनगर जिल्हा महाराष्ट्रात सर्वांत जास्त क्षेत्रफळ असलेला जिल्हा, सर्वाधिक सिंचन क्षेत्र असलेला, आणि सर्वाधिक सहकारी साखर कारखाने असलेला राज्यातील जिल्हा अशी वैशिष्ट्ये दिमाखाने मिरवत आहे.



रात्री आठच्या आसपास शिर्डीला मुक्कामाच्या लॉजवर पोहोचलो. आज जास्तच दमछाक झाली होती. गरम पाण्याने शरीराच्या अवयवांना शेकवत आंघोळ करण्यात भरपूर वेळ गेला. हात, पाय, गुडघा, पाठ इत्यादी व्यवस्थित जागच्या जागी आहे ना हे पाहिले गेले. गप्पा रंगल्या. भूक तर भरपूर लागली होती. पोटभर जेवण झाले. उद्याची तयारी करुन सगळेजण पटकन झोपी गेले.

***

# दिवस तिसरा: शिर्डी ते औरंगाबाद

मार्ग: शिर्डी- कोपरगाव फाटा- वैजापूर- लासूर- औरंगाबाद (१४२/ ४०६ किमी)
(जिल्हे: अहमदनगर- औरंगाबाद)

सकाळी पहाटे उठून सर्व तयार झाले. बाहेर भरपूर थंडी होती. आमच्या हॉटेलपासून श्री साईबाबा समाधी मंदिर जवळच होते. तिथे जाऊन बाहेरुन कलश दर्शन घेतले. शिर्डी हे महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्हयातील राहता तालुक्यातले एक शहर आहे. शिर्डी हा शिलधी या शब्दाचा अपभ्रंश आहे असे समजले जाते. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात संत साईबाबांच्या वास्तव्यामुळे शिर्डी नावारुपास येऊ लागले. साईबाबांच्या पश्चात तेथे भक्तांनी उभारलेल्या साईबाबा मंदिरामुळे धार्मिक क्षेत्र म्हणून हे प्रसिद्धी पावले आहे. येथूनच बाबांनी सर्वांना श्रद्धा व सबुरी हा महामंत्र दिला. शिर्डीस आल्यावर प्राप्त होणारी मनःशांती व मिळणारा आत्मविश्वास यामुळे शिर्डी हे भारतासह जगभरातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे. येथे असलेले प्रासादालय खूपच मोठे आहे. एका वेळेला ५५०० भाविक बसून जेवु शकतात. अशा प्रकारे येथे एका दिवसात एक लाखापेक्षा जास्त भाविक प्रसादाचा लाभ घेतात. पहाटेची वेळ असल्यामुळे प्रसादाचे लाडू मिळणारे काउंटर बंद होते. या लाडूंची चव काही वेगळीच असते. चहा पिऊन आम्ही पुढे मार्गस्त झालो.







कोपरगाव नाक्यावर पोहोचलो. उजवीकडे असलेला वैजापूरचा रस्ता पकडला. थोड्या वेळाने गोदावरी नदीवर असलेल्या पुलावर पोहोचलो. सूर्य नुकताच

उगवत होता. आकाशात तांबडे पसरले होते. हे सगळे प्रतिबिंब गोदावरीच्या पाण्यामध्ये अप्रतिम दिसत होते. आजूबाजूला पक्षांचा किलबिलाट चालू होता. थोडा वेळ पुलावर थांबून आम्ही हे निसर्गाचे आल्हाददायक रुप अनुभवले. सूर्योदयाचे फोटो काढले आणि पुढे निघालो. गोदावरी नदीमुळे येथील



जमीन खूपच सुपीक आहे. या गोदावरीच्या खोऱ्यामध्ये भरपूर शेती केली जाते.



हिरवेगार शेतमळे, त्यावर पसरलेली धुक्याची चादर, आकाशातील तांबूस ढग व त्यामागे चाललेला सूर्याचा लपंडाव असे हे मस्तच वातावरण होते. आजूबाजूला कोणी वेगळा पक्षी दिसला की थांबून आम्ही पाहायचो. त्याचा फोटो काढेपर्यंत तो गायब व्हायचा.

कोपरगाव नाक्यानंतर हा रस्ता एकेरी झाला होता. या रस्त्यावर मोठे ट्रक, कंटेनर यांची वाहतूक चालू होती. त्यामुळे या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले होते. खडी आणि माती निघाली होती. खाली रस्ता म्हणून काहीच उरला नव्हता. यावरुन सायकल चालवणे हे एक दिव्यच होते. बाजूने वाहन गेले की सगळी धूळ उडत होती. काही वेळेला समोरासमोर वाहने आली की सायकल थांबवून बाजूला व्हावे लागत होते. त्यामुळे सायकलचा वेग कमी झाला होता. सायकल पंक्चर होऊ नये म्हणून रस्त्यावरील खडी, खड्डे चुकवत, कसरत करत पँडल मारत होतो. ज्यांच्या



सायकलचे टायर रुंद होते ते एमटीबी वाले मस्तपैकी सायकल पळवत होते. पण हायब्रीड

सायकल असणारे अरुंद टायर असल्यामुळे हळूहळू येत होते. खडीमध्ये त्यांची सायकल घसरत होती. मधेच चांगला रस्ता मिळाला की सगळेच जण सायकल पळवायचे.

नाष्टाची वेळ झाली होती त्यामुळे हॉटेल शोधू लागलो. रस्त्याला भरपूर धाबे हॉटेल होते पण सर्व बंद होते. बहुतेक ते रात्री उशिरापर्यंत चालू असल्यामुळे आता सकाळी बंद असतील.



थोड्या वेळाने एक ढाबा भेटला. मस्तपैकी मटकीची काळ्या रश्याची मिसळ आणि पाव यावर सगळे तुटून पडले. आजचा दिवस मस्तच सुरु झाला होता. अशी फक्कड मिसळ खाऊन बरे वाटले. मुंबईमध्ये अशी मिसळ अजूनपर्यंत मिळाली नव्हती. ही सर्व स्थानिक काळ्या मसाल्याची कमाल होती. भौगोलिक रचनेनुसार प्रत्येकाची खाद्यशैली एकमेकांपेक्षा वेगळी असते. स्वयंपाक करण्याची पद्धत बदलत जाते. मसाल्यांचे प्रमाण, पदार्थामध्ये वापरले जाणारे जिन्नस या सगळ्या गोष्टी बदलत जातात. अजून कोणते स्थानिक पदार्थ आहेत काय याबाबद्दल विचापूस केली. पण नुकतेच हॉटेल उघडले असल्यामुळे इतर पदार्थ तयार व्हायला वेळ जाणार होता. चहा प्यायलो आणि थोडा आराम करुन पुढे निघालो.

वैजापूर ओलांडून पुढे आलो. रस्ता खड्ड्या खड्ड्यांचा असल्यामुळे सर्वांचा वेग कमी झाला होता. खडी-माती वरुन सायकल घसरत होती. वरती ऊन वाढत होते. धूळ खात आणि खड्डे वाचवत आम्ही सायकल चालवत होतो. अंतर संपत नव्हते. रस्त्याच्या आजूबाजूला सर्व हिरवागार सुपीक प्रदेश, ऊस, कांदा, तूर, मक्याची शेती पण हा खराब रस्ता हे थोडे पटत नव्हते. आज तिसरा दिवस आणि अजून पुढे अशा प्रकारचा रस्ता असणार तर नाही ना हा विचार मनात येऊन भीती वाटत होती. काही जण मागे राहिले होते. आणि मोबाईलवर समजले की अक्षयची सायकल पंक्चर झाली आहे. सर्वात शेवटी नितीन भाई होते त्यामुळे



काही घाबरण्यासारखे नव्हते. अक्षयने या मोहिमेसाठी नवीन ट्रेक कंपनीची सायकल घेतली होती. त्याच्याकडे जुनी एका गिअरची सायकल होती.

या अशा रस्त्यावर सायकल पंक्चर होणार हे ठरलेलेच होते, या रस्त्यावर काही होऊ नये म्हणून सगळेजण जपून सायकल चालवत होते. पण विकेट पडलीच. हा मान अक्षयने



मिळवला होता. नितीन भाईंनी त्याची सायकल रस्त्याच्या बाजूला घेऊन उलटी केली आणि त्याचे चाक काढले. टायर खोकल्यावर त्यांना ट्यूब फाटलेली दिसली. मग नवीन ट्यूब टाकून सायकल तयार केली.

त्या दोघांची वाट पाहत आम्ही एका ठिकाणी थांबलो. नेहमीप्रमाणे आजूबाजूचे लोक जमा झाले. गप्पा टप्पा रंगल्या. वारा मस्त सुटला होता. आणि खुर्चीवर बसून बोलता बोलता काहीजण शांत झाले. डोळे मिटून हे खुर्चीमध्येच झोपले होते. आम्हीपण मग बाजूच्या विरभद्र मंदिरात आडवे झालो. थोड्या वेळाने अक्षय आणि नितीन भाई आले. थोडा आराम करुन पुढे निघालो.



प्रत्येक पंधरा-वीस किमी नंतर एका झाडाखाली सर्वजण थांबून थोडा वेळ आराम



करायचो. गावातील लोकांशी गप्पा मारुन आजूबाजूच्या प्रदेशाची ओळख करुन घ्यायचो. गावातील नागरीकांचे जीवन राहणीमान याबद्दल माहिती घ्यायचो. तेव्हा आम्हाला समजले की काही ठिकाणी लोकांना रस्ता रुंदीकरणासाठी योग्य मोबदला मिळाला नसल्यामुळे या रस्त्याच्या रुंदीकरणाला काही ठिकाणी विरोध होत होता. तसेच मुंबई नागपूर समृद्धी

महामार्गासाठी पण येथे जमीन अधिग्रहण केल्या जात आहेत. काही ठिकाणी या महामार्गाचे काम पण सुरु झाले होते. आम्ही सायकलवाले त्यामुळे गावकरी मनमोकळेपणाने गप्पा मारायचे आणि चहा पाण्यासाठी आग्रह पण व्हायचा. या मार्गावर जुन्या काळातील भरपूर विहिरी पहायला मिळाल्या. मोठा व्यास आणि दगड विटांचे रेखीव प्रमाणबद्ध बांधकाम यामुळे त्यांचे वेगळेपण उठून दिसत होते.



दुपारी लासूरला जेवण्यासाठी थांबायचे ठरले. येथे जवळच श्री दाक्षायणी देवीचे तिर्थक्षेत्र होते. औरंगाबादच्या लासूर गावात शिवना नदीच्या काठावर दाक्षायणी देवीचं भव्य मंदिर वसलेलं आहे. प्रसन्न मूर्ती, आकर्षित करणारी विद्यूत रोषणाई, डोक्यावर चांदीचा टोप आणि अंगभर दागिन्यांनी नटलेली ही देवी दाक्षायणी दक्ष राजाची कन्या आहे. देशात ही एकमेव देवी आहे जिचं पीठ या गावाखेरीज कुठेही नाही. त्यामुळे देशभरातले भाविक देवीच्या दर्शनासाठी गर्दी करतात.

या देवीच्या लासुर गावात प्रकट होण्याची आख्यायिका आहे. दाक्षायणी देवीचा आई-वडिलांकडून अपमान झाल्यावर तिनं पुत्रकामेष्टी यज्ञात उडी घेतली. त्यानंतर शंकरानं जटा आपटून तांडव केलं आणि देवी पुन्हा लासुर गावी प्रकटली. देवीनं पुत्रकामेष्टी यज्ञात उडी घेतल्याची आख्यायिका असल्यानं हा यज्ञ कायम तेवत असतो. या यज्ञाचा अंगारा कपाळावर लावला की आपण देवीला घातलेलं साकडं पूर्ण होतं असं सांगितलं जातं. वर्षातून दोन वेळा गावात मोठा उत्सव पार पडतो. एप्रिल-मे महिन्यात मोठी यात्रा आणि नवरात्रीत नऊ दिवस मंदिर भक्तांनी गजबजलेलं असतं.

पुढे असणारे फडतरे सर जेवणासाठी चांगला ढाबा शोधात होते. आम्हाला या मार्गावर फारच कमी धाबे दिसले आणि जे पण धाबे होते ते एक तर बंद होते किंवा तिथे जेवण नव्हते, फक्त नाष्टा होता. शेवटी एक ढाबा सापडला. तेथे मालकाला स्थानिक मराठवाडा पद्धतीच्या भाज्या आणि भाकरी बनवायला सांगून मागून येणाऱ्यांची वाट पाहत थांबलो. आमच्या सायकल मोहिमेबद्दल मालकाला समजल्यावर तो पण खुश झाला. मस्तपैकी झणझणीत

गाठीची आमटी, काळ्या मसाल्यातील भाज्या, गरमागरम बाजरीची भाकरी, भात, शेंगदाणा घालून बनवलेली चटणी, ठेचा, दही आणि मांसाहारी लोकांसाठी घट्ट रस्सा असलेले चिकन असा जेवणाचा थाट बनला. बाकीचे पोहोचल्यावर सगळे जेवणावर तुटून पडले. धाब्यावर खाट आणि चारपाई असतातच. त्यावर फळीचा आडवा तुकडा असतो. त्याचा वापर जेवणाची भांडी, ताट वाटी ठेवण्यासाठी केला जातो. जेवण झाल्यावर आम्ही या चारपाईवर थोडा वेळ झोपलो. आज मस्तच मराठवाडा पद्धतीचे जेवण मिळाले होते. रस्सा आणि मसाला चवीचे वेगळेपण जाणवत होते. गाठीची किंवा गोळ्यांची आमची म्हणजे जाडसर दळलेल्या बेसनाच्या भरडा पिठामध्ये हळद, तिखट, मीठ घालून घट्ट गोळा मळून घेतला जातो. त्याचे छोटे गोळे बनवून आमटीमध्ये घालून शिजवले जातात. मालक आणि कामगारांबरोबर गप्पा रंगल्या. थोड्या वेळाने त्यांचे आभार मानून पुढे निघालो. शिवना नदी ओलांडली.



रांजणगाव पोळ गेल्यावर थोड्या वेळाने उजव्या बाजूला लांबवर छोटी डोंगररांग दिसू लागली. काल सिन्नरनंतर आज येथे डोंगर पाहत होतो. देवगिरी म्हणजेच दौलताबाद किल्ला दिसू लागला. बाहेरुन अतिशय आकर्षक आणि आतून आश्चर्यचकीत करणारा पिरॅमडच्या आकाराचा टेकडीवर वसलेला हा किल्ला मध्ययुगीन काळातला आहे हे आज पाहून पटणार नाही. जगात जे काही हाताच्या बोटावर मोजण्याइतके किल्ले चांगले जतन केले आहेत त्यात या किल्ल्याचा समावेश होतो. या अजिंक्य गडावर अनेक राजांनी राज्य केले आणि याचे वैशिष्ट्य म्हणजे सैनिकांच्या बळावर अथवा युद्ध सामग्रीच्या बळावर हा किल्ला कधीच कुणाला जिंकता आला नाही. प्रत्येकवेळी तो



जिंकला गेला तो फितुरीने, विश्वासघाताने आणि रक्तपाताने. आजही या किल्ल्यावर राज्य केलेल्या बलशाली राजांच्या अनेक कथा तो सांगतोच आहे. यादव राजांची राजधानी असलेला हा किल्ला राजा भिल्लमराजा याने बांधला असे इतिहास सांगतो. ११८७ साली त्याचे नामकरण देवगिरी असे केले गेले. पन्नास हजार सैन्याचा पराभव अवघा दोन हजार सैनिकांनी करण्याचा इतिहास इथे अनेकवेळा लिहिला गेला.

औरंगाबाद शहर यायच्या पंधरा किमी अगोदर रस्त्यावर पत्नी पीडित पुरुष आश्रम हा फलक पाहिला आणि थांबलो. इथे पत्नी पीडितांनी एकत्र येऊन हा आश्रम सुरु केला आहे.



या आश्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे केवळ पत्नी पीडित पुरुषांना प्रवेश दिला जातो. १९ नोव्हेंबर २०१६ रोजी पुरुष अधिकार दिनी स्थापन करण्यात आलेल्या या आश्रमात आतापर्यंत देशभरातील पाचशेहून जास्त पुरुषांचे समुपदेशन करण्यात आले आहे. सुरुवातीला केवळ औरंगाबाद शहर आणि आजुबाजुचे लोक आश्रमात येत होते. आता मात्र, छत्तीसगढ, गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेशमधून बहुतांश लोक येथे येतात.



नवरा-बायको समान असल्याचा दावा केला जातो, परंतु काहीवेळा पुरुषाची चूक नसतानाही नाहक त्रास सहन करावा लागतो. त्यांना कायदेशीर मदत करणं, मानसिक आधार देणं, त्यांना स्वत:च्या पायावर उभं करण्यासाठी पत्नी पीडित संघटना झटत आहे. आश्रमाजवळ फोटो काढून आणि तिथली माहिती घेऊन औरंगाबाद शहराकडे निघालो. या आश्रमाची माहिती आमच्या अनेक मित्रांनी, बायकोला हे कळता कामा नये असे सांगून घेतली पण.

एके ठिकाणी गुळाची चहा म्हणून फलक दिसला. मग थांबून गुळाची काळी चहा प्यायलो. थोडे पुढे आल्यावर एक डोंगर लक्ष वेधून घेत होता. तो इतर डोंगररांगेपासून लांब एकटाच उभा होता. हाच भांगशी मातेचा गड. यावर भांगशी मातेचे मंदिर आहे.

औरंगाबाद शहर जवळ आले म्हणून सर्वजण एकत्र थांबलो. सायकल बाजूला घेऊन गुगल मॅपवर मार्ग तपासू लागलो. एक पांढरी टोपी घातलेले काका जवळ येऊन विचारपूस करु लागले. सायकल हेल्मेट गिअर इत्यादी बद्दल माहिती घेतल्यावर त्यांनी मोबाईलमध्ये फोटो काढून घेतला. फडतरे सरांनी फोटोसाठी त्यांना हेल्मेट पण दिले. थोड्या वेळात आमच्याबरोबर फोटो काढण्यासाठी गर्दी वाढू लागली. लॉजमध्ये जाण्यासाठी कोणता कमी गर्दीचा मार्ग आहे हे विचारुन आम्ही निघालो.



आमचा रात्रीचा मुक्कामाचा लॉज शहराच्या पलीकडे होता. शहरात काही ठिकाणे रस्ता रुंदीकरणाचे काम चालू असल्याने वाहनांची गर्दी खूप होती. यातून वाट काढत आणि नाक्या-नाक्यांवरील सिग्नल पाळत आम्ही शहरात आलो. एका नाक्यावर थांबून चहा प्यायलो आणि थोड्या वेळात लॉजवर पोहोचलो.

**औरंगाबाद जिल्हा** हा मराठवाडा विभागात वसलेला आहे. या जिल्ह्याच्या उत्तरेला नाशिक व जळगाव, पूर्वेला जालना, दक्षिणेला बीड आणि पश्चिमेला अहमदनगर हे जिल्हे वसलेले आहेत. जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय औरंगाबाद हे आहे. ते महाराष्ट्र राज्यातील एक महत्त्वाचे, मध्यवर्ती, औद्योगिक व ऐतिहासिक पर्यटनकेंद्र आहे.

औरंगाबाद शहराने मुस्लिम शासनाच्या आगमन होईपर्यंत, सेतावचन, वौस्तीक, चालुक्य, राष्ट्रकुट, यादव अशा अनेक वंशांचे उदय आणि पतन पाहिले आहेत. विक्रमादित्य राजाच्या काळातही या परिसराचा उल्लेख आहे. सातवाहनाच्या काळात खाम नदीकिनारी अनेक लहान मोठी खेडी होती. त्यापैकी एक असलेले खडकी हे आजचे औरंगाबाद मानले जाते आहे. सातवाहन काळात शांततेचे व समृद्धतेचे युग होते आणि म्हणूनच त्यावेळेला हे दख्खनच्या सामाजिक-सांस्कृतिक कार्याचा केंद्रबिंदू बनले होते. सातव्या शतकात या गावाच्या उत्तरेस बुद्धलेणी व विहार खोदण्यात आले. नंतरच्या शतकामध्ये या गावाचा राजतलक किंवा राजतडाग म्हणूनही उल्लेख आढळतो. चौदाव्या शतकापर्यंत या परिसरात देवगिरीच्या यादवांचे राज्य होते. पैठण ही सातवाहन राज घराण्याची शाही राजधानी, तसेच दौलताबाद किंवा देवगिरी ही यादव घराण्याची राजधानी होती.

काही इतिहासकारांच्या मते १३०८ मध्ये सुलतान अलाउद्दीन खलजींच्या कारकिर्दीत हा प्रदेश दिल्ली सल्तनतला जोडला गेला होता. १३२७ ते १३३४ मध्ये दिल्ली सल्तनतची राजधानी दिल्लीहून दौलताबाद येथे सुलतान मुहम्मद बिन तुगलकांच्या कारकिर्दीत स्थानांतरित झाली होती. १४९९ मध्ये, दौलताबाद अहमदनगर सल्तनतचा एक भाग बनला. अहमदनगरचा निजामशहा मूर्तझा द्वितीय याचा मंत्री मलिक अंबरने येथे १६१० मध्ये खडकी जवळ नवीन शहर वसवले. व त्याच्यानंतर त्याचा मुलगा फतेह खान यांनी नाव बदलून फतेहपूर केले. १६३४ मध्ये औरंगजेब ह्या शहरात दख्खन विभागाचा सुभेदार म्हणून आला. १६४४ मध्ये तो आग्र्याला परत गेला. त्यानंतर १६८१ मध्ये औरंगजेब मुघल बादशाह असताना पुन्हा ह्या शहरात आला. १७०७ मध्ये त्याच्या मृत्यूपर्यंत औरंगजेब इथेच राहिला. औरंगाबाद हे नाव औरंगजेब ह्या मुघल सम्राटाच्या नावावरुन त्याच्या मृत्यूनंतर ठेवले गेले असावे. १७०७ नंतर औरंगाबादचा ताबा हैदराबादच्या निझाम राजवटीकडे आला. हैदराबाद संस्थानाच्या विलिनीकरणानंतर मराठवाड्यासह औरंगाबाद शहर ही भाषिक आधारावर महाराष्ट्राशी जोडण्यात आले. संयुक्त महाराष्ट्राची स्थापना १ मे, १९६० ला झाली. त्या दिवशीपासून औरंगाबाद महाराष्ट्राचा भाग बनले.



औरंगाबाद हे ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे शहर आहे. औरंगाबादचे विशेष असे की या शहराला ५२ दरवाजे, ५२ खिडक्या आणि बेगमपुरा, उस्मानपुरा इत्यादी ५२ पुरे होते. सद्यस्थितीतील यातील अनेक दरवाजे हे शेवटची घटका मोजत आहेत. या जिल्ह्यात अनेक प्रेक्षणीय ठिकाणे आहेत. त्यापैकी अजंठा वेरुळ लेण्या, घृष्णेश्वर मंदिर, दौलताबाद किल्ला, खुलताबाद ऐतिहासिक मनोरे, बीबी का मकबरा, सोनेरी महल, पाणचक्की, जलमार्ग, औरंगाबाद गुफा, इत्यादी प्रसिद्ध आहेत.



येथील हिमरु शाल नावाजलेली आहे. हिमरु हे रेशीम व कापसाचे बनलेले एक फॅब्रिक आहे जे औरंगाबादमध्ये स्थानिक पातळीवर घेतले जाते. हिमरु ही कुमख्वाबची प्रतिकृती आहे, जी प्राचीन काळातील शुद्ध सोनेरी आणि चांदीच्या धाग्यांसह विणलेली होती आणि शाही कुटुंबांसाठी होती. तसेच जवळच असलेले पैठण हे ऐतिहासीक शहर पैठणी साड्यांसाठी प्रसिद्ध आहे. पैठणी साडी रेशीमाने बनविल्या जातात आणि ती भारतातील सर्वात श्रीमंत साड्यांपैकी एक मानली जाते.

मुक्कामाच्या लॉजमध्ये जेवणाची सोय नव्हती. मग आजूबाजूला मस्तपैकी स्थानिक ढाबा शोधून काढला. औरंगाबादमध्ये स्वतंत्र ओळख असणारी खाद्य पदार्थांची रेलचेल पाहायला मिळते. कांदा, टोमॅटो, बटाटा घालून बनवलेला हा भात भन्नाट चवीचा होता. त्यावर मराठवाडा स्पेशल झणझणीत रस्सा आणि सोबतीला डाळीच्या भाज्या, मांसाहारी लोकांसाठी चिकन कंटकी, हलीम. येथे मांसाहारामध्ये विविध प्रकार चाखायला मिळतात.



कांदा लसणाचा भरपूर वापर करुन केला जाणारा मटणाचा रस्सा देखील यांची खासियत आहे. पोटभर जेवण झाले. आज तिसरा दिवस होता त्यामुळे शरीरातील अवयव दुखायचे थांबले होते त्यांना सवय झाली होती. चटकदार खाण्यासाठी जन्म आपुला या उक्तीला साजेसे असे आम्ही जिभेवरील जेवणाची चव आठवत झोपी गेलो.

***

# दिवस चौथा: औरंगाबाद ते मेहकर

मार्ग: औरंगाबाद- जालना- नाव्हा- सिंदखेड राजा- बिबी- मेहकर (१३८/ ५४४ किमी)
(जिल्हे: औरंगाबाद- जालना- बुलढाणा)

पहाटे सर्वजण तयार होऊन हॉटेलबाहेर आलो. थंडी खूपच पडली होती. बाजूच्या टपरीवर चहा तयार होईपर्यंत शेकोटीजवळ शेक घेतला. चहा पिऊन निघणार इतक्यात काही सायकल स्वार आले. त्यामध्ये विजय व्यवहारे, अनंत ढवळे काका, पराजी जाधव आणि औरंगाबाद सायकलिस्ट क्लबचे त्यांचे मित्र होते. ते त्यांच्या नेहमीच्या सकाळच्या सायकल फेरीसाठी निघाले होते. आम्हाला पाहून ते थांबले होते. आपुलकीने विचारपूस झाली. औरंगाबादमध्ये औरंगाबाद सायकलिस्ट क्लब हा मोठा सायकल प्रेमींचा ग्रुप बनला आहे. या ग्रुप मार्फत नेहमी सायकल फेरी व इतर अनेक उपक्रम राबवले जातात.





या सर्वांना भेटून खूप प्रसन्न वाटले. यातील काही जण आमच्याबरोबर काही अंतर सायकल चालवत आले. त्यांच्याकडून चहा नाष्टासाठी पुन्हा आग्रह झाला. त्यांनी पुढे येणाऱ्या जालना मधील त्यांच्या काही सायकल मित्रांना फोन करुन आमच्याबद्दल सांगितले. व आम्हाला त्यांचे नंबर देऊन अजून काही मदत पाहिजे का याबद्दल विचारले. त्या सर्वांचे आभार मानून आम्ही पुढे निघालो.

औरंगाबादनंतर दुहेरी मोठा, चढ उतार नसलेला रस्ता होता. सायकल वेगात पळत होत्या. टोल नाका ओलांडून शेकटा बाजारात पोहोचलो होतो. लोकांची लगबग चालू होती.

दुकाने उघडली जात होती. मिठाईची दुकाने तर भरपूर होती. या भागात फरसाण आणि गोडाचे अनेक पदार्थ प्रसिद्ध आहेत. लस्सी, घेवर, बासुंदी उत्तम मिळते. आले, लसूण आणि मसाले घालून उकडलेले सेलूचे चणे विशेष लोकप्रिय आहेत. तसेच भरडवडी, मेथीफळ, ताहरी, हलवा पराठा, खाजा पुरी या पदार्थांची रेलचेल पाहायला मिळते. करमाड, वरुडी करत नाणेगावला आलो. औरंगाबाद जिल्हा संपून जालना जिल्हा सुरु झाला.



**जालना जिल्हा** महाराष्ट्र राज्याच्या मध्यभागी आहे. तसेच मराठवाड्याच्या उत्तर दिशेस आहे. जालना जिल्ह्याच्या पुर्वेस परभणी व बुलढाणा, पश्चिमेला औरंगाबाद, उत्तरेला जळगाव आणि दक्षिणेला बीड हे जिल्हे वसलेले आहेत. जालना जिल्हा हा पूर्वी निझाम राज्याचा भाग होता. मराठवाडा मुक्ती संग्रामानंतर औरंगाबाद जिल्ह्यातील हा एक तालुका झाला. आणि १ मे १९८१ रोजी तो जिल्हा म्हणून स्थापित झाला.

जालना जिल्ह्याचे मुख्यालय जालना असून हे शहर कुंडलिका नदीच्या किनाऱ्यावर वसलेले आहे. हे मराठवाड्यातील एक महत्वाचे व्यावसायिक केंद्र आहे. जालना शहराचे पूर्वीचे नाव जानकीपुर होते. पूर्वी जालना शहर माती आणि विटांच्या भिंतीनी पूर्णतः सुरक्षित होते. मात्र आता त्यातील दोनच दरवाजे अस्तित्वात आहेत. एक मूर्ती दरवाजा आणि दुसरा हैद्राबाद दरवाजा. मलिक अंबरच्या काळात जमशेद खान याने शहराच्या पश्चिमेला मोती तलाव उभारला होता. पाणीसाठ्यात पाणी साचविण्यासाठी एक भूमिगत पाईपलाइनही या शहरात उभारण्यात आलेली होती. तथापि ही यंत्रणा आता उपयोगात नाही. या शहराच्या गौरवशाली कालखंडात येथे पाच तलाव तयार करण्यात आले होते. सध्या जालना शहराला प्रामुख्याने जायकवाडी धरण आणि घाणेवाडी तलावातुन पाणीपुरवठा करण्यात येतो.



भौगोलिकदृष्टया जालना जिल्हा राज्याच्या मध्यभागी येत असल्याने केंद्रीय दळणवळण मंत्रालयाने जालना शहराजवळील इंदेवाडी येथे उपग्रह अनुश्रवण भूकेंद्र ऊभारले आहे. अंतराळात सोडलेल्या उपग्रहांशी सातत्याने संपर्क ठेवणे सोईचे ठरते.

गोदावरी ही जिल्ह्यातील प्रमुख नदी असून ती जिल्ह्याच्या दक्षिण सीमा प्रदेशातून पश्चिमेकडून पूर्वेकडे अशी वाहते. दुधना व गल्हाटी या गोदावरीच्या उपनदया मध्य भागातून तर उत्तर भागातून पुर्णा, खेळणा व गिरजा या उपनदया वाहतात. कुंडलिका ही दुधनाची उपनदी जालना शहरातुन वाहते.

जालना जिल्ह्यातील रोजगाराचे प्रमुख साधन शेती हे आहे. हा जिल्हा संकरित बियाणे-प्रक्रिया सारख्या कृषि-आधारित उद्योगांसाठी प्रसिद्ध आहे. येथे मोसंब्यांची मोठी बाजारपेठ आहे. तसेच ते हातमाग व यंत्रमाग द्वारे कापड बनविण्याचे महत्त्वाचे केंद्र आहे. येथील जमीन सुपीक व काळी असून कापसाच्या पिकासाठी योग्य आहे. ज्वारी, गहू व इतर धान्ये, कापूस ही प्रमुख पिके आहेत. जिल्ह्यातील वनक्षेत्र अतिशय कमी आहे.

जालना जिल्ह्यात अनेक पर्यटन केंद्रे विकसित होत आहेत. त्यामध्ये काही धार्मिक तीर्थक्षेत्रे, यात्रास्थळे आहेत. जालना शहराची मंमादेवी, आनंदस्वामी मठ, दुर्गामाता मंदिर, अंबड येथील मत्स्योदरी देवीचे हेमाडपंथी मंदिर, पराडा, अन्वा गावातील पुरातन भव्य हेमाडपंथी शिवपंदिर, वालसावंगी, रोहिलागड, मस्तगड, इत्यादी पर्यटन स्थळे प्रसिद्ध आहेत. घनसांवगी तालुक्यातील जांमसमर्थ येथे समर्थ रामदास स्वामींचे जन्मस्थान आहे.

बदनापूरला आलो. हे तालुक्याचे ठिकाण असून दुधना नदीच्या किनाऱ्यावर वसलेले आहे. पुढे जालना शहर येताच आम्हाला जालना इटिव्ही भारत चॅनलचे दिलीप पोहनेर सर भेटले. त्यांनी आम्हाला थांबवून चौकशी केली. प्रदूषण मुक्त भारत हे ब्रीद आणि दैनंदिन जीवनात सर्वांनी सायकलचा जास्तीच जास्त वापर करावा हा



आमच्या मोहिमेचा हेतू त्यांना आवडला. आमच्या सायकल मोहिमेबद्दल त्यांनी आम्हा

सर्वांची मुलाखत घेतली आणि ती तिथल्या लोकल न्युज चॅनेल वर दाखवली गेली. आणि सायकल मोहिमेची बातमी पेपरमध्ये पण छापून आली. पहिल्यांदाच न्युज मिडिया मध्ये आमच्या सायकल मोहिमेबद्दल आल्यामुळे सर्वजण खुश होते.

जालना शहरामध्ये तेथील सायकल ग्रुपचे काही जण भेटणार होते. त्यासाठी आम्हाला आत शहरात जावे लागणार होते. जालना हे तालुका आणि जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असल्यामुळे शहरात गर्दी खूप असणार हे नक्की होते. मुलाखतीमध्ये अगोदरच थोडा जास्त वेळ गेल्यामुळे आम्ही जालना शहरात आत न जाता बाहेरुन जाण्याचे ठरवले. जालना शहरातील सायकल ग्रुपच्या सायकलिस्टची आम्ही फोन वर भेट घेऊन पुढे निघालो. आम्हालाही हे पटत नव्हते पण वेळ वाचवण्यासाठी हे करावे लागले.




आज नाष्टा करायचा राहून गेला होता. एका ठिकाणी थांबून नाष्टासाठी थांबलो. भजी, वडा आणि धपाटे खाल्ले. धपाटे हा थालिपिठांशी साधर्म्य असणारा पदार्थ आहे. धपाधप थापून केले जातात म्हणून ते धपाटे. धपाट्यांना मसाला भाकरीही म्हणता येईल. कारण यात वापरला जाणारा मुख्य घटक पदार्थ आहे ज्वारीचं पीठ. काहीजण चहा प्यायले. केळी खाल्ली आणि पुढे सिंदखेड राजा ला निघालो. रस्त्याच्या बाजूला कापूस आणि तुराची शेती खूप होती.



नाव्हा गावाजवळ श्री रंगनाथ स्वामी महाराज विश्रांती मठ आहे. तेथे पुण्यतिथी सोहळा व जत्रा महोत्सव चालू होता. आम्ही थांबून मंदिराचे दर्शन घेतले आणि जत्रेमध्ये आलो. खूप वर्षांनी जत्रेमध्ये आलो होतो. लहानपणी गावाची जत्रा म्हणजे आनंदाचा सण. जत्रा म्हणजे नवीन खेळणी मिळणार, म्हणून आम्ही वर्षभर त्याची वाट पाहत असायचो. येथेही वेगवेगळ्या प्रकारची मिठाई, खाऊची दुकाने, खेळण्यांची व कपड्याची दुकाने, विविध प्रकारच्या वस्तूंचा बाजार, गोल फिरणारे आकाशपाळणे, तंबू, करमणुकीचे कार्यक्रम, स्पर्धा,

भजन कीर्तन, पालखी, लोकांची गर्दी यांनी जत्रा भरगच्च भरलेली होती. संपूर्ण गावात उत्साह होता. ग्रामीण भागामध्ये लोकसंपर्काच्या ज्या अनेक पद्धती आहेत त्यापैकी जत्रा ही एक अतिशय महत्त्वाची पद्धती आहे. अशा या जत्रेत लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्व स्तरातील, सर्व जाती-धर्मातील समुदाय या जत्रेत मोठ्या आनंदाने सहभागी होताना दिसतात. या अशा जत्रेतून सामाजिक एकोपा जपला जातो. खरंच गावातील जत्रा आणि शहरातील फन फेअर यामध्ये खूपच अंतर आहे. या जत्रेची सर त्याला नाहीच.



दुपारची जेवणाची वेळ झाली होती. जे पुढे होते ते जेवणासाठी स्थानिक हॉटेल शोधू लागले. सावरगावला एक हॉटेल सापडले. तिथे स्थानिक पदार्थ काय काय बनवून मिळतील हे पहिले. आणि त्याप्रमाणे ऑर्डर देऊन बाकीच्यांची वाट पाहू लागलो. त्यांनी वांग्याचे भरीत, खानदेशी मिरचीची भाजी, आणि शेवभाजी सारखी असणारी शेंगोळी हे पदार्थ बनवले. सोबत डाळीची घट्ट आमटी, भात, चुलीवरील गरमागरम ज्वारीच्या भाकऱ्या आणि झणझणीत ठेचा असा चटकदार बेत बनला. पोटभर जेवण झाले. इतरांबरोबर गप्पा रंगल्या. हॉटेलच्या भिंतींवर बुलढाणा जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचे फोटो लावले होते. बुलढाणा जिल्हा सुरु झाला होता. त्यांच्याकडून त्याबद्दल माहिती मिळाली.



**बुलढाणा जिल्हा** हा महाराष्ट्र राज्याच्या अमरावती विभागात आहे. जिल्ह्याच्या पूर्व, पश्चिम व दक्षिण दिशेस अनुक्रमे अकोला-वाशीम, अमरावती, जळगाव-जालना व परभणी हे जिल्हे आहेत. तर उत्तरेस मध्यप्रदेश राज्यातील नेमाड जिल्हा आहे. जिल्ह्याच्या उत्तरेकडील सर्व नद्या पश्चिम दिशेस वाहणाऱ्या आहेत व त्या तापी नदीला जाऊन मिळतात तर दक्षिणेकडील नद्या पैनगंगा नदीच्या उपनद्या आहेत. कापूस, ज्वारी, सोयाबीन, सूर्यफूल ही

या जिल्ह्यातील महत्त्वाची पिके आहेत. जिल्ह्यात खामगाव, मलकापूर ही औद्योगिक शहरे आहेत.

येथून जवळ असलेल्या खाऱ्या पाण्याच्या विस्तीर्ण व नैसर्गिक सरोवराने बुलढाणा जिल्ह्यास आंतरराष्ट्रीय किर्ती मिळवून दिली आहे. याची निर्मिती एका उल्केमुळे झाली. उल्कापातामुळे सुमारे पावणे दोन किलोमीटर व्यासाचे आणि दहा ते अकरा किमी परिघाचे एक प्रचंड विवर तयार झाले आहे. लोणारचा उल्काघाती खळगा हा जगातील ज्ञात विवरामध्ये तिसऱ्या क्रमांकाचा असून बेसॉल्ट खडकात निर्माण झालेले जगातील एकमेव विवर आहे. हे खाऱ्या पाण्याचे आणि अल्कधर्मी सरोवर आहे. लोणार सरोवराच्या जतन व संवर्धनासाठी लोणार विवर हे वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित केले आहे. या परिसरात अंदाजे बाराशे वर्षांपूर्वीची मंदिरे आहेत. त्यातील पंधरा मंदिरे विवरातच आहेत. प्राचीन ग्रंथात या सरोवराचा उल्लेख विराजतीर्थ किंवा बैरजतीर्थ असा केला जात असे.

बुलढाणा जिल्ह्यात इतर अनेक पर्यटन स्थळे आहेत. त्यापैकी श्री संत गजानन




महाराजाचे मंदिर आनंदसागर शेगाव, नांदुरा, बालाजी मंदिर देऊळगाव राजा, पार्डा दराडे, पांगरा डोले, बुधनेश्वर, हेमाडपंथी शिवमंदिर साकेगाव, तारापुर येथील राजा हरिश्चंद्रद्वारा स्थापित जागृत देवस्थान अंबादेवीचे मंदिर, सुलतानपुर येथील पुरातन वास्तू सिद्धेश्वर मंदिर, शिवमंदिर वडाळी, बल्लाळ देवी मंदिर अमडापुर, गिरडा, हजरत सैलानीबाबा दर्गा पिंपळगांव इत्यादी प्रसिद्ध आहेत.

जेवण झाल्यावर थोड्या वेळात आम्ही सिंदखेड राजा गावी पोहोचलो. राजमाता जिजाऊ हयांचा जन्म १२ जानेवारी १५९८ साली बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा येथे झाला. राजमाता जिजाऊ ह्या हिंदवी साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री, त्यामुळे सिंदखेड राजाला एक आगळे ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.





सिंदखेड राजा शहरात जुन्या काळात बांधलेला जिजाबाईंचे वडील लखुजीराजे यांचा वाडा, रंगमहाल, सावकारवाडा, काळाकोट, नीलकंठेश्वराचे प्राचीन मंदिर, हेमाडपंथी रामेश्वर मंदिर, लखुजी राजांची समाधी, पुतळा बारव, सजना बारव, गंगासागर, बाळसमुद्र या नावाच्या विहिरी, चांदणीतलाव, मोतीतलाव हे ऐतिहासिक जलसाठे इत्यादी प्रेक्षणीय वास्तू आहेत. मोतीतलाव म्हणजे सिंचनासाठी पाणी सोडण्याची अति सुव्यवस्थीत आणि त्या काळातील जल अभियांत्रीकीचा अतिउत्कृष्ट नमुना. या तलावाच्या समोरील भाग एका किल्ल्याप्रमाणे बांधण्यात आला असून, विलोभनीय असा परिसर याला लाभला आहे.



मोतीतलावाबरोबरच चांदणी तलाव हे देखील एक प्रेक्षणीय स्थळ आहे. तलावाच्या मधोमध तीन मजली इमारत बांधण्यात आली आहे. या परिसरात अतिशय रेखीव पद्धतीने बांधण्यात आलेली पुतळाबारव आहे. ही म्हणजे असंख्य मूर्ती व शिल्पांचा एकत्र वापर करुन बनविलेली देखणी शिल्पकृती. तसेच येथे एक सजनाबाई विहीर आहे, त्या काळी या विहिरीतून गावामध्ये पाणी पुरवठा भुमिगत बंधिस्त नाल्यांच्या द्वारे केल्या जात होत्या, या विहरीत आतपर्यंत उतरण्यासाठी पायऱ्यांची सुविधा देखील आहे.



महाराष्ट्रात स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या शिवरायांच्या मातोश्री जिजाऊ यांचे जन्मस्थान, राजे लखुजीराव जाधव यांचा राजवाडा व तेथे चालू असलेले जतन दुरुस्तीचे काम पाहून बाहेर आलो. नेहमीप्रमाणे अनेक लोकांकडून विचारपूस झाली, गप्पा रंगल्या. आमच्याबरोबर फोटो, सेल्फी काढले. स्थानिक सायकल ग्रुपचे गोविंद माने सर आणि मित्र भेटले. आम्हाला चहा नाष्टासाठी आग्रह झाला.



किणगाव राजा, राहेरी ओलांडून पूर्णा नदीजवळ आलो. पूर्णा नदीचा उगम सातपुड्याच्या डोंगरांत मध्यप्रदेश राज्याच्या दक्षिण भागात भैसदेही येथून झाला आहे. ही नदी तापी नदीला संमातर अशी पश्चिमेकडे वाहत वाहत, शेवटी जळगाव जिल्ह्यातील चांगदेव येथे तापी नदीला मिळते. एकेकाळी बारमाही वाहणारी ही नदी आता अपुरा पाऊस व उगम स्थळावरील जंगलतोड यामुळे मृतावस्थेकडे झुकत आहे. पूर्णा नदीला संपूर्णा नदी किंवा पयोष्णी नदी असेही म्हणतात.

कालच्या खड्ड्या-खड्ड्याच्या रस्त्यावर सायकल चालवल्यामुळे आजचा रस्ता चांगला वाटत होता. आज सायकल चालवत असताना एके ठिकाणी नारायणच्या सायकलचे कॅरिअर पॅनिअरसह मागे पडले. करिअरचे स्क्रू निघून ते पडले होते. त्यामुळे मग जुगाड करुन ते कॅरिअर तारेने सायकलला बांधले आणि सायकल दुरुस्तीचे दुकान शोधत पुढे निघालो. दुसराबिडला चहासाठी थांबलो. बाजूलाच सायकल दुरुस्तीचे दुकान होते. नारायणच्या सायकल कॅरिअरचा स्क्रू पडला होता तो तेथे लावून घेतला.



नंतर बिबी, भानापुर, सुलतानपूर करत मेहकरला मुक्कामाच्या लॉजवर पोहोचलो. मेहकर हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील बुलढाणा जिल्ह्याचा एक तालुका आहे. या शहराजवळून पैनगंगा नदी वाहते. आधीच हा सुपीक भूभाग होता आणि त्यातच कोराडी, उतावळी, पेनटाकळी या सिंचन प्रकल्पांमुळे तालुक्यातील ओलीत क्षेत्रात वाढ झाली आहे.



ब्रह्मांड पुराणात मेघंकर म्हणजेच आताचे मेहकर या नगरीचा उल्लेख आहे. सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वी ब्रह्मदेवाने तप करुन यज्ञारंभ केला. त्या यज्ञकर्माला आवश्यक प्रणितापात्र हे भांडे मेघंकरात होते. या भांड्यातील पाणी मंत्रपूर्वक जमिनीवर सांडले व त्यातून प्रणिता म्हणजेच सध्याची पैनगंगा नदीचा उगम झाला. पैनगंगेला प्राणहिता, पावनगंगा अशीही नावे आहेत.

गौतमी महात्म्य ग्रंथातही या यज्ञकथेचा उल्लेख आहे व त्यातच मेहकरातील प्रसिद्ध शारंगधराचा म्हणजेच श्री बालाजीचा उल्लेख आहे. मत्स्य पुराणातही मेघंकर नगरी व शारंगधराचा उल्लेख आढळतो. पद्म पुराणातील अध्यायात शारंगधराच्या ज्या मूर्तीचे सुंदर वर्णन केलेले आहे, ती अकरा फूट उंचीची अखंड शाळिग्राम शिळेत अतिशय कलात्मकरित्या कोरलेली बालाजीची मूर्ती मेहकरमध्ये आहे. मूर्तीच्या डाव्या बाजूला श्रीलक्ष्मी व उजव्या बाजूला भूदेवीची मूर्ती आहे. जय-विजय यांच्या सुबक मूर्तीसोबतच मुख्य मूर्तीभोवती दहा लहान मूर्ती कोरलेल्या आहेत. शंख, चक्र, गदा, पद्म या चार आयुधांना चार हातात धारण केलेली ही मूर्ती म्हणजे श्रीविष्णूचे त्रिविक्रम रुप मानले जाते. बालाजीची इतकी भव्य व कलात्मक मूर्ती देशात कुठेही नाही. देव-देवतांना छळणाऱ्या मेघंकर नामक राक्षसाचा श्रीविष्णूने त्रिविक्रम रुप धारण करुन नाश केल्याची कथा आहे.



बालाजी मंदिरात दरवर्षी डिसेंबरात मूर्तीचा प्रगटदिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होतो. चैत्र, श्रावण, भाद्रपद, मार्गशीर्ष महिन्यांमध्ये विविध उत्सव साजरे केले जातात. गढीचे खोदकाम सुरु असताना १८८८ मध्ये ही बालाजीची मूर्ती सापडली. अखंड शिळेत अत्यंत कलाकुसरीने कोरलली ही रेखीव मूर्ती पाहून तत्कालीन इंग्रज जिल्हाधिकारी टेंपल यांनी ही मूर्ती लंडनला नेण्याचे ठरवले परंतु, परिसरातील लोकांचा विरोध पाहून त्याने निर्णय बदलला पण, मूर्तीसोबत सापडलेले तांबे, पितळ, सोने या धातूंत कोरलेले शिलालेख व जडजवाहीर मात्र हा इंग्रज अधिकारी सोबत घेऊन गेला, असा उल्लेख जुन्या कागदपत्रांमध्ये आहे असे म्हणतात.

मेहकरला यज्ञभूमी मानले गेल्याचा उल्लेख मत्स्यपुराणात आहे. शुद्ध तूप यज्ञात अर्पण करणारी नदी म्हणून पैनगंगेचा उल्लेख आहे. म्हणून पैनगंगेच्या काठीच येथे मोठ्या संख्येने मंदिरे व यज्ञकुंडे आहेत. मेहेकर ही दंडकारण्यातील तपस्व्यांची तपोभूमी होती असेही मानले जाते. या तालुक्यात बगदालभ्य ऋषींचे देळप, वसिष्ठांचे वडाळी, गौतम



ऋषींचे गोमेश्वर, पाराशराचे पाथर्डी, दुर्वासाचे द्रुगबोरी व विश्वमित्रांचे विश्वी, अशा सात गावी जंगल झाडीतल्या नैसर्गिकदृष्ट्या देखण्या ठिकाणी सप्तर्षींची पुरातन मंदिरे आहेत. मेहकरला



तयार होणारी धोतरजोडी प्रसिद्ध होती. श्रीमद्भगवद्गीतेच्या अकराव्या अध्यायात पैनगंगा नदी व मेहकरचा गौरवपूर्ण उल्लेख आला आहे. शैक्षणिक क्षेत्रातली मेहकरची घोडदौड नजरेत भरण्यासारखी आहे. लॉजवर सर्व कार्यक्रम आटोपल्यावर आम्ही शहर फिरायला बाहेर पडलो.

येथील लोकांकडून माहिती घेऊन चांगले हॉटेल शोधून काढले. आज आम्ही मराठवाडा ओलांडून विदर्भामध्ये पोहोचलो होतो. विदर्भात जेव्हढ्या आवडीने तिखटाचे झणझणीत पदार्थ खाल्ले जातात तेव्हढेच गोड पदार्थही खातात. उन्हापासून बचाव करण्यासाठी येथे ज्वारीचे आंबील केले जाते. उकडपेंड हा असाच चविष्ट पदार्थ ज्वारीच्या पिठापासून बनवला जातो. अमरावती, अकोला, बुलढाणा भागात ज्वारीच्या पिठापासून रोडगा बनवला जातो. येथेही भाकरीबरोबर वरणाचे किंवा डाळीचे घट्ट प्रकार खाण्याची पध्दत आहे. आम्हीही अशा पद्धतीचे जेवण जेवलो.

जेवण झाल्यावर लॉजवर आलो. उद्याची तयारी केली. आजच्या दिवसातील गमतीजमती आठवत झोपी गेलो.

***

# दिवस पाचवा: मेहकर ते कारंजा

मार्ग: मेहकर- डोणगाव- मालेगाव- किन्हीराजा- शेलू बाजार- कारंजा (११८/ ६६२ किमी) (जिल्हे: बुलढाणा- वाशिम)

पहाटे तयार होऊन सायकल घेऊन हॉटेल बाहेर आलो. थंडी भरपूर होती. तरीही रस्त्यावर सकाळचे व्यायाम, चालणे यासाठी स्थानिक पुरुष-स्त्रिया यांची खूप गर्दी होती. येथील नागरिक आरोग्याप्रती खूपच जागरुक आहेत. काही जणांकडून आमच्या सायकल मोहिमेबद्दल विचारपूस झाली. गप्पा झाल्या. मेहकर शहरातून आम्ही मुख्य रस्त्यावर आलो. एक चहाची टपरी उघडलेली दिसली. तेथे चहा पिण्यासाठी थांबलो.



चहा बिस्कीट खाऊन निघालो. रस्ता एकेरी झाला होता. सगळीकडे खूप धुके होते. धुक्यामुळे रस्त्यावरील वाहनांचा वेग कमी झाला होता. आम्हा सर्वांच्या सायकलला जास्त प्रकाश असणारी पुढील आणि मागची लाल इंडिकेटर लाईट असल्यामुळे या वाहनांचा काही त्रास झाला नाही. थोड्या वेळाने उजेड झाल्यावर आजूबाजूचे वातावरण मस्तच होते. धुक्याची शाल ओढून नटलेली झाडे, शेते, पक्षांची किलबिल, वाहनांची कमी वर्दळ असलेला रस्ता सगळेच अवर्णनीय होते.



डोणगावला पोहोचलो. नुकताच सूर्य उगवत होता. थांबून सूर्योदयाचे फोटो काढले. हवेतील गारवा आणि मुबलक पाणी यामुळे येथील शेतमळे हिरवीगार दिसत होते. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूला जी जंगली झाडे झुडपे होती, त्यावर अनेक रंगीबेरंगी फुलांच्या वेली पण भरपूर होत्या. या जंगली फुलांमुळे रस्ता सजला होता. आता बुलढाणा जिल्हा ओलांडून वाशिम जिल्ह्यामध्ये आलो.

**वाशिम जिल्हा** विदर्भाच्या पूर्व भागात स्थित आहे. वाशिम जिल्हाच्या पूर्वेस यवतमाळ, उत्तरेस अकोला, ईशान्येस अमरावती, पश्चिमेस बुलढाणा आणि दक्षिणेस हिंगोली हे जिल्हे आहेत. पैनगंगा ही जिल्ह्यातील मुख्य नदी आहे. कास ही तिची मुख्य उपनदी आहे.



कास नदी पैनगंगेस मसला पेन या गावाजवळ मिळते. अडाण नदी वाशीम तालुक्यात उगम पावते आणि मंगरुळपीर व मानोरा तालुक्यातून वाहते. जिल्ह्यातील मुख्य पिके सोयाबीन, गहू, ज्वारी, बाजरी, तूर, कापूस, ऊस व हळद ही आहेत.

वाशिमचे प्राचीन नाव वत्सगुल्म व वात्सुलग्राम आहे. यास बच्छोम, बासम असेही म्हणतात. इ.स.पूर्व सुमारे ३०० पासून येथे सातवाहन या राजवंशाची सत्ता होती. प्राचीन विदर्भात प्रशासकीय सोईसाठी दोन ठिकाणी राजधान्या करण्यात आल्या. एक म्हणजे वाशिम व दुसरे नागपूर जिल्ह्याच्या रामटेक तालुक्यातील नंदिवर्धन म्हणजेच सध्याचे नगरधन. वाशिम येथे वाकाटकांची राजधानी होती. वाकाटकांचे साहित्यातील योगदान महत्त्वाचे आहे. त्यांच्या काळात वत्सगुल्मच्या परिसरात अनेक तीर्थक्षेत्रे होती. आजही वाशीमचा बालाजी प्रसिद्ध आहे. येथे पद्मतीर्थ नावाचे तीर्थस्थानही आहे.

वाकाटक हे प्राचीन भारतातील एक बलाढ्य आणि समृद्ध साम्राज्य होते. इ.स. २५० ते सुमारे ५०० या काळात त्यांनी विदर्भ आणि त्या लगतच्या परिसरावर राज्य केले. या काळात त्यांची सत्ता साधारणपणे, दक्षिणोत्तर नर्मदानदीपासून तुंगभद्रानदीपर्यंत आणि पूर्व-पश्चिम, अरबी समुद्रापासून बंगालच्या उपसागरापर्यंत होती. या राजवंशच्या कार्यकाळात त्यांतील

राजांनी संस्कृत आणि प्राकृत कवींना उदार आश्रय दिलेला दिसतो. होणाऱ्या वाङ्मयनिर्मितीत वैदर्भी आणि वच्छोमी पद्धतींना प्राध्यान्य दिलेले आढळते. या राजांच्या मांडलिकांनी आणि अमात्यांनी शिल्पकलेच्या निर्मितीलाही उत्तेजन दिल्याचे आढळते. याची साक्ष अजिंठा व गुलवाडा येथील टेकड्यांवरील लेणी देतात. या लेणांतील शिल्पांची गणना प्राचीन काळातील उत्कृष्ट कलाकृतींमध्ये केली जाते. त्यामुळेच इसवीसनाच्या तिसऱ्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंत दक्षिणेत जे राजवंश झाले त्यांमध्ये वाकाटक राजवंश हा श्रेष्ठ असून त्याच्या कामगिरीने अखिल दक्षिण भारताच्या संस्कृतीवर फार मोठा परिणाम झाला आहे असे एका फ्रेंच इतिहासकाराचे उद्गार आहेत.



त्यानंतर चालुक्यांचे राज्य आले. त्यांनी आपली राजधानी दुसर्या ठिकाणी नेली. त्यामुळे या शहराचे महत्त्व कमी झाले. त्यानंतर आलेल्या यादवांच्या राजवटीत पुन्हा या स्थानाचे महत्त्व वाढू लागले. वाशिम येथे निजामाची टाकसाळ होती. त्यानंतर इंग्रजांच्या राज्यात वर्हाड हा मुलूख आल्यावर त्यांनी वाशिमला जिल्ह्याचे ठिकाण केले. परंतु, महाराष्ट्रातील जिल्ह्यांच्या १९०५ मध्ये झालेल्या पुनर्रचनेत हा भाग नजीकच्या अकोला जिल्ह्यास जोडण्यात आला. त्यानंतर १९९८ मध्ये पुन्हा वाशिम हा जिल्हा घोषित करण्यात आला.

जिल्ह्यामध्ये अनेक पर्यटनस्थळे आहेत. त्यापैकी श्री संत अमरदास बाबा मंदिर,श्री सितला मंदिर रिसोड, श्री रेणुकामाता देवाळा, श्री मध्यमेश्वर मंदिर, श्री क्षेत्र पोहरादेवी, पद्मतीर्थ शिवमंदिर, गणपती मंदिर हिवरा, शिरपूर जैन मंदिर, गुरुमंदिर कारंजा, सखाराम महाराज मंदिर लोणी, चामुंडा देवी, गोंदेश्वर इत्यादी प्रसिद्ध आहेत.

गोदावरी खोरे पार करुन तापी खोऱ्यामध्ये आलो. रस्ता एकेरी होता पण चांगला होता. रस्त्याच्या बाजूला मोठी झाडे होती त्यामुळे सावली पण भरपूर होती. अचानक एके ठिकाणी समोर दूरवर आमच्यापैकी कोणीतरी सायकल हातात घेऊन चालताना दिसले. जवळ जाऊन पहिले तेव्हा समजले की फडतरे सरांच्या सायकलचे पुढचे चाक पंक्चर झाले आहे. मग

रस्त्याच्या बाजूला झाडाच्या सावलीत सायकल उलटी लावून पंक्चर झालेले चाक काढले.



चाकाच्या रीममधून टायर निघत नव्हता. थोडा जोर लावल्यावर निघाला. तोपर्यंत नितीनभाई पण आले. टायर आणि ट्यूब कुठे पंक्चर झाली आहे ते तपासले. ट्यूब पंक्चर झालेल्या जागी पॅच लावून दुरुस्त केला. टायर रीमला लावला, त्यामध्ये हवा भरली आणि चाक सायकलला जोडून सायकल तयार झाली.

या मार्गावर रस्त्याच्या बाजूला अनेक ठिकाणी प्राचीन हनुमानाच्या मूर्ती स्थापन केलेल्या दिसल्या. काही ठिकाणी त्या मूर्तींवर छोटे मंदिर उभारलेले आहे तर काही ठिकाणी छोटा चौथरा बांधलेला आहे. आम्ही ठिकठिकाणी या मूर्तीबद्दल गावकऱ्यांना विचारले, त्यांच्यामते या भागात अशा अनेक हनुमानाच्या मूर्ती आहेत आणि त्या खूप वर्षांपूर्वीच्या आहेत. काहींच्या मते समर्थ



रामदास स्वामींच्या काळातील किंवा त्यांनी स्थापन केलेल्या असाव्यात. समर्थ रामदास स्वामींचा जन्म येथून जवळच जालना जिल्ह्यातील जांबसमर्थ या गावी झाला. ते समर्थ




संप्रदायाचे संस्थापक होते. रामाला व हनुमंताला उपास्य मानणाऱ्या समर्थ रामदासांनी परमार्थ, स्वधर्मनिष्ठा, राष्ट्रप्रेम यांच्या प्रसारार्थ देशभरात प्रबोधन व संघटन केले. तात्कालीन देशपरिस्थिती, समाजस्थिती यांचे योग्य

आकलन करुन समर्थांनी प्रजेपुढे शक्तीचे, तेजाचे प्रतीक असलेले हे मारुती उभे केले. त्यांच्यायोगे बलोपासना आणि कोणत्याही संकटासमोर ठामपणे उभे राहण्याची प्रेरणा समर्थांनी लोकांना दिली. नेमके त्याच वेळी सह्याद्रीच्या साथीने शिवराय आणि त्यांच्या



जिवलगांनी आदिलशाहीसमोर मोठे आव्हान उभे केले होते. स्वराज्य निर्मितीची भावना जनमनात रुजवली. स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. समर्थ रामदास स्वामींनी चाफळ आणि परिसरात अकरा ठिकाणी स्थापन केलेल्या मारुतींना विशेष महत्त्व आहे. हे सर्व मारुती कृष्णानदीच्या तीरावर आहेत. एके ठिकाणी आम्हाला श्री रोकडा हनुमान मूर्ती दिसती. तिला नमस्कार करुन आणि कोणत्याही संकटाला न डगमगता सामोरे जाण्याची प्रेरणा घेऊन आम्ही पुढे निघालो.

चंदास, डोंगरकिन्ही पार करुन कलमेश्वर धरण जलाशय जवळ आलो. जलाशयाचे पण



खूप दूरवर पसरलेले दिसत होते. मालेगावला तालुका सुरु झाला होता. मालेगाव वाशीम जिल्ह्यातील एक तालुक्याचे ठिकाण आहे. मालेगाव तालुक्यात अनेक छोट्या नदी नाल्यांवर धरणे बंधारे बांधून तलाव जलाशय तयार केले आहेत. त्यामुळे भरपूर जमीन सिंचनाखाली आली आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला तुराची शेती होती.

मालेगाव शहरात पोहोचलो. आम्हाला पासून अनेक जणांनी विचारपूस केली. गप्पा रंगल्या. शहरात डावीकडे वळून कारंजाला जाणारा मार्ग पकडला. तिथे पण एक रस्त्याच्या बाजूला असलेली एक हनुमानाची मूर्ती आणि घुमटी दिसली.

नागरतास मधील जगदंबा देवीचे मंदिर पहिले. जाऊळकाला मुख्य रस्त्यावर रेल्वे पटरी फाटक होते. रेल्वे गाडी जाणार असल्यामुळे फाटक बंद केले होते. दोन्ही बाजूला वाहनांची खूप गर्दी झाली होती. तसेच उड्डाण पुलाचे पण काम चालू असल्यामुळे धूळ भरपूर होती. यातून वाट काढत आम्ही फाटकाजवळ आलो. अनेकांनी आमच्या सायकल मोहिमेबद्दल विचारपूस केली. त्यांच्याशी गप्पा झाल्या. रेल्वे गाडी निघून गेल्यावर फाटक उघडले गेले. आम्ही रुळ ओलांडून पुढे आलो आणि थोडा वेळ बाजूला थांबून बाकीच्या वाहनांना पुढे जाऊ दिले.



जेवणाची वेळ झाली होती. त्यामुळे पुढे पहिल्या ग्रुप मध्ये असणारे नारायण, फडतरे, देशमुख सर जेवणासाठी हॉटेल शोधू लागले. त्यांना किन्हीराजा गावाजवळ एक ढाबा दिसला. तिथे जेवणासाठी थांबलो. विदर्भ पद्धतीचे जेवण झाल्यावर नेहमीप्रमाणे थोडा वेळ आराम केला. इतरांबरोबर गप्पा मारल्या.

येथे विदर्भात जेवणात वरणभात, भाजी पोळी, दह्याची चटणी किंवा ठेचा आणि लिंबू असं सगळं ताटात असल्याशिवाय जेवण पूर्ण झाल्यासारखं वाटतच नाही. मुळात विदर्भातील लोक तिखट आणि झणझणीत खाणे पसंत करतात. त्यात ठेच्याचा पहिला नंबर लागतो. ठेचा हा विदर्भात खूप आवडीने खाल्ला जातो. येथे कोथिंबिरीला सांभार असं म्हणतात. बिट्टया हा विदर्भातील खूप लोकप्रिय पदार्थ आहे. यामधे गहू जाडसर दळून त्यात थोडे मक्याचे पीठ वापरून बनवतात. बिट्टया हा वांग्याची रस्सा भाजी, वरण, गूळ आणि तुपाबरोबरसुद्धा खाल्ला जातो. बिट्टया आणि रोडगे यामधे एकच फरक आहे तो म्हणजे बिट्टया वाफवून तळतात आणि रोडगे भाजतात. बिट्टयाची पंगत असो किंवा रोडग्याची. दह्याची चटणी असल्याशिवाय ती पूर्ण होत नाही. महाराष्ट्रात कोशिंबीर असते. पण विदर्भात याची जागा दह्याच्या चटणीने घेतली आहे.

किन्हीराजा जवळच सोनाळा येथे अडाण नदीवर धरण बांधले आहे. जलाशय आणि आजूबाजूच्या निसर्गसौंदर्यामुळे हे एक प्रेक्षणीय पर्यटन ठिकाण बनले आहे.

शेलू बाजारच्या पुढे तारहलाला मकान शरीफ दर्गाजवळ थांबलो. आमच्या सायकल पाहून गावातील काही मुले जमा झाली. त्यांच्याबरोबर गप्पा मारुन पुढे निघालो. काही जण आमच्यासोबत त्यांची सायकल घेऊन चालवत आले. गावातली मुले आणि माणसे पण खुश झाली. चहा पाण्यासाठी आग्रह झाला.



संध्याकाळी पाच वाजता आम्ही कारंजाला मुक्कामाच्या लॉजवर पोहोचलो. कारंजा हे वाशिम जिल्ह्यातील तालुक्याचे शहर आहे. या अत्यंत प्राचीन असलेल्या नगरीचे माहात्म्य स्कंदपुराणातील पातालखंडात आले आहे. वसिष्ठ ऋषिंचे शिष्य असलेल्या करंज ऋषिवरुनच या नगरीला करंजपूर हे नाव मिळाले असे म्हणतात. करंजपूरचे कार्यरंजकपूर व नंतर कारंजा झाले. या नगरीत जैन लाड समाजाची वस्ती असल्याने कारंजा लाड असा या गावाचा उल्लेख केला जातो. कारंजा गावाजवळ अडान नदीवर बांधलेले धरण आहे. मात्र त्याचा अधिक उपयोग यवतमाळ जिल्ह्याला होतो.

वाकाटकपूर्व राजवटीपासून ते देवगिरीचे यादव, मोगल, निजामशाही, ईमादशाही, नागपूरकर भोसले अशा अनेक राजवटी या नगरीने अनुभवल्या आहेत. या साम्राज्यांत उभारलेल्या दिल्ली वेस, दारव्हा वेस, मंगरुळ वेस आणि पोहा वेस या चार भग्नावस्थेतील




वेशी आजही कारंजा लाड या गावात आहेत. अहमदनगरच्या बादशहाच्या मुलीला स्त्रीधन म्हणून कारंजा गाव आंदण म्हणून दिले होते असे म्हणतात. त्यामुळे या गावाचा उल्लेख जुन्या कागदपत्रात बिबीचे कारंजे असाही होतो. किल्ला म्हणून ओळखली जाणारी एक गढी येथे अस्तित्वात

होती. तिथे आता बिबीसाहेब दर्गा आहे. त्याचा दरवर्षी उरुस निघतो. या लगतचा भागाला बिबीसाहेबपुरा असे म्हणतात. नगरपालिकेची इमारत म्हणजे प्राचीन हमामखाना आणि पोलीस ठाण्याची इमारत म्हणजे हत्तीखाना असल्याचे सांगितले जाते. अशा या नगरीने अलोट ऐश्वर्यसंपन्नता अनुभवली आहे. याची साक्ष म्हणून कस्तुरीच्या हवेलीचा उल्लेख केला आहे. उंटावरुन कस्तुरी विक्रीसाठी घेऊन जाणाऱ्या व्यापाऱ्याकडून सर्व कस्तुरी खरेदी करुन हवेलीच्या बांधकामात तिचा वापर करणाऱ्या व त्या मोबदल्यात अकबरकालीन नाणी देणाऱ्या लेकुर संघई यांची ही कथा सांगितली जाते. या संघईची एकोणिसावी पिढी आज कारंज्यात आहे. मात्र या हवेलीची प्रचंड दुर्दशा झाली आहे. अशा प्राचीन हवेल्यातील भिंतीतून जाणारे जिने, तळघरे, बाराद्वारी नावाची विहीर आणि त्यातील भुयारी वाटा मात्र अजून शिल्लक आहेत.

शिवपूर्वकाळापासून वैभवसंपन्न असलेले कारंजे हे नृसिंह सरस्वतींचे जन्मस्थान असल्याचे वासुदेवशास्त्री सरस्वतींनी शोधून काढले. येथील काळे आडनावाच्या घराण्यात नृसिंह सरस्वतींचा जन्म झाला. नृसिंह सरस्वतींचे जन्मस्थान असलेला काळयांचा वाड्यासमोर मंदिर उभारुन त्यांत चैत्र वद्य प्रतिपदा, शा.श. १८५६ या दिवशी नृसिंह सरस्वतींच्या पादुकांची स्थापना करण्यात आली. गुरुमंदिर या नावाने ते आज प्रसिद्ध आहे. नृसिंह म्हणजेच नरसिंह सरस्वती (इ.स. १३७८-१४५९) हे श्रीपाद वल्लभ यांच्यानंतरचे दत्तात्रेयांचे दुसरे पूर्णावतार मानले जातात.



महाराष्ट्रातील दत्तसंप्रदायाचा प्रारंभ श्री नृसिंह सरस्वतींच्या अवतारानंतर झाला असे मानले जाते. नृसिंह सरस्वतींनी शिव, विष्णू, देवी, गणेश आणि नृसिंह यांच्या उपासनेचा उपदेश केला. त्यांच्यामुळेच महाराष्ट्रात दत्तोपासना लोकप्रिय झाली. त्यांच्या निवासामुळे औदुंबर, नरसोबाची वाडी, गाणगापूर ही गावे दत्तसांप्रदायिकांची तीर्थक्षेत्रे बनली.

कारंजा लाड गावातली जैन मंदिरे, शिक्षण संस्था तसेच आश्रमशाळा यामुळे या शहरास जैनांची काशी असेही संबोधले जाते. येथे हस्तलिखित जैन ग्रंथांचे मोठे भांडार आहे. चंद्रनाथ स्वामी काष्ठसंघ दिगंबर जैन मंदिर, पद्मावती देवीचे मंदिर, मूलसंघ चंद्रनाथ स्वामी दिगंबर जैन मंदिर आणि दिगंबर जैन पार्श्वनाथ स्वामी सेनगण मंदिर, इत्यादी मंदिरे प्रसिद्ध आहेत.

कारंजा हे आमचे मित्र विवेक महाजन यांचे मूळगाव. सध्या ते येथे नव्हते त्यामुळे त्यांची भेट राहून गेली. त्यांनी शहराची व आजूबाजूची माहिती दिली आणि इतरही मदत केली. लॉजवर आंघोळ झाल्यावर तयार होऊन आम्ही कारंजा शहर फिरण्यासाठी निघालो. श्री नृसिंह सरस्वतींचे जन्मस्थान असलेल्या गुरुमंदिर येथे पादुकांचे दर्शन घेतले. शहरात लोकप्रिय हॉटेल शोधून विदर्भीय पद्धतीचे जेवण जेवलो. तिथे इतरांबरोबर गप्पा रंगल्या. मराठवाडामध्ये आम्ही आमटीचे प्रकार बघितले आणि चाखलेही, परंतु येथे विदर्भात आमटी हा शब्द सहसा वापरला जात नाही. विदर्भात त्याला फोडणीचे वरणच म्हणतात. पण यामध्ये चवीचा खूप फरक असतो. आमटी ही पातळसर असते तर फोडणीचे वरण थोडे घट्टसर असते. विदर्भात आमटी जर म्हटलं तर चिंचेची आमटी किंवा कैरीची केली जाते. अजून एक येथील पदार्थ म्हणजे ताकाची कढी आणि कथली. ताकाची कढी आणि कथली ही ताक आणि बेसन एकत्र करून करतात. कढी ही पातळ आणि कथली ही घट्टसर असते. येथे कानगऱ्या हा एक गोड पदार्थ खाल्ला. याला गोड पुरीसुद्धा म्हणतात. या पुऱ्या रताळ्यापासून बनवल्या जातात.

रात्री आजूबाजूची दुकाने बंद झाल्यावर, सायकली योग्य ठिकाणी एकत्र ठेवल्या. उद्याची तयारी केली आणि झोपी गेलो.

***

# दिवस सहावा: कारंजा ते वर्धा

मार्ग: कारंजा- पिंपळगाव- वाघोडा- पुलगाव- देगाव- सालोड- वर्धा (१४१/ ८०३ किमी)
(जिल्हे: वाशिम- यवतमाळ- अमरावती- यवतमाळ- वर्धा)

सकाळी सर्व आटपून हॉटेलबाहेर आलो. मेहकर शहराप्रमाणे येथेही भरपूर जण सकाळी व्यायाम, चालण्यासाठी रस्त्यावर होते. आम्हाला पाहून सायकलवरुन जाणारे प्रकाश गवळीकर नावाचे काका जवळ आले. ते भारतीय सैन्यदलात सेवा देऊन निवृत्त झाले होते. त्यांनी घोडा सायकलवर देशातील अनेक लांबची ठिकाणे फिरलेली होती. आणि आताही नेहमीच्या कामासाठी सायकलचाच वापर करत होते. आमच्या सायकल मोहिमेबद्दल समजल्यावर ते अजून खुश झाले. सकाळीच गप्पा रंगल्या. गुगल मॅपच्या सहाय्याने आम्ही कारंजा शहराबाहेर मुख्य रस्त्यावर आलो.



थंडी भरपूर होती. पुढे रस्ता एकेरी होता. ब्राह्मणखेडा खेर्डा करत धानोराला पोहोचलो. सूर्य नुकताच उगवत होता. थोडा वेळ थांबून आजूबाजूचा निसर्ग अनुभवला. वाशिम जिल्हा ओलांडून यवतमाळ जिल्ह्याच्या नेर तालुक्यात आलो होतो.

**यवतमाळ जिल्हा** हा महाराष्ट्रातील विदर्भ विभागातील एक जिल्हा आहे. या जिल्ह्याच्या उत्तर दिशेला वर्धा जिल्हा व अमरावती जिल्हा, पूर्व दिशेला चंद्रपूर जिल्हा, दक्षिण दिशेला तेलंगणा राज्य व नांदेड जिल्हा आणि पश्चिम दिशेला हिंगोली जिल्हा व वाशिम जिल्हा आहे. पूर्वी यवती किंवा यवतमाळ म्हणून ओळखले जाणारे हे बेरार सामराज्याचे मुख्य शहर होते आणि जुन्या लिखाणांनुसार जगातील सर्वात सुरक्षित ठिकाण होते. ब्रिटिश राजवटीत यवतमाळ हा वणी जिल्ह्याचा प्रमुख विभाग होता. १९०५ साली वणीचे नाव बदलून यवतमाळ जिल्हा असे झाले.

यवतमाळ शहर हे जिल्ह्याचे मुख्यालय आहे. या जिल्ह्यात वर्धा व पैनगंगा या प्रमुख नद्या आहेत. बेंबळा व निर्गुडा ह्या वर्धा नदीच्या मुख्य उपनद्या असून जिल्ह्यात दोन्हीही बारमाही वाहतात. पूस, अडान, वाघाडी व कुंज ह्या पैनगंगेच्या जिल्ह्यातील महत्वाच्या उपनद्या होत. बेंबळा नदीवरील बेंबळा धरण, अरुणावती नदीवरील अरुणावती धरण व पूस नदीवरील पूस धरण ही काही प्रमुख धरणे आहेत. यापैकी बेंबळा नदीवर असणारे बेंबळा धरण हे यवतमाळ जिल्ह्यातील सर्वात मोठे धरण आहे.बेंबला नदीचा उगम वाशीम जिल्ह्यात कारंजा लाड या शहरातून होतो.कापशी ही बेंबला नदीची उपनदी आहे.




जिल्ह्यातील कापूस हे महत्वाचे पिक असल्यामुळे त्याची प्रचंड बाजारपेठ येथे आहे. कापसावर आधारित उद्दोग जसे कापूस संकलन केंद्रे, जिनिंग फॅक्टरीज, सूतगिरण्या, हातविणकाम इत्यादी येथे पहावयास मिळतात. तसेच इतर अनेक छोटे मोठे उद्योग आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील महत्त्वाची पिके कापूस, ज्वारी, भुईमूग, तूर डाळ ही आहेत. जिल्ह्याला कापूस, लाकूड, चुनखडी, कोळसा व संत्री या वस्तूंद्वारे महसूल मिळतो. जिल्ह्यात विपुल प्रमाणात वनसंपत्ती आहे. तेथून लाकूड, बांबू, तेंदू, आपटा, हिरडा व मोह या उपयोगी वस्तू मिळतात. जिल्ह्यात यवतमाळ, पुसद, वणी, दिग्रस, घाटंजी, पांढरकवडा, राळेगाव, उमरखेड, दारव्हा व नेर ही महत्त्वाची व्यापारकेंद्रे आहेत.



यवतमाळ जिल्ह्यात विविध पर्यटनस्थळे अस्तित्वात आहेत. त्यापैकी कळंबचा चिंतामणी, अर्णी बाबा कंबलपोश दर्गा, जगदंबा देवी केळापूर, भवानी टेकडी दिग्रस, निळोना, वणी, चापडोह, पिंगळाई देवी नाथशक्तीपिठ करळगाव घाट इत्यादी ठिकाणे प्रसिद्ध

आहेत. तसेच जंगलाची भटकंती करणा-यांसाठी तर टिपेश्वर अभयारण्य मेजवानीच आहे. टिपेश्वर वन्यजीव अभयारण्य जिल्ह्यातील पांढरकवडा तहसील अंतर्गत विखुरलेले आहे. हिरव्यागार वनराईमध्ये जवळपास १४८ चौकिमी परिसर अभयारण्याने व्यापलेले आहे. आजूबाजूस वसलेल्या खेड्यातील नागरिक इमारती व जळाऊ लाकडासाठी बहुतांशी याच जंगलावर अवलंबून असतात. उंच डोंगराळ व दऱ्याखोऱ्यांचा भाग असल्यामुळे याठिकाणी विविध जातीच्या वनस्पती आढळून येतात. तसेच घनदाट जंगलक्षेत्र असल्यामुळे वेगवेगळे जंगली पशु पक्षी यांचा नेहमी वास असतो. वाघ, चितळ, सांबर, काळवीट, कोल्हा, अस्वल, मोर, माकड, नीलगाय, जंगली मांजर इत्यादी प्रकारचे प्राणी या अभयारण्यात आढळून येतात.

रस्त्याच्या दोन्ही बाजूला कापसाची शेते होती. कापसाच्या झाडांना कापसाची पांढरी फुले लागली होती. त्यामुळे हिरव्या पांढऱ्या रंगामध्ये शेते सजली होती. या मार्गावर काही धाबे हॉटेल होते. पण हे सर्व रात्री उशिरापर्यंत चालू असल्यामुळे सकाळी उशिरा नऊ वाजल्यानंतर चालू व्हायचे. त्यामुळे सकाळी लवकर नाष्टासाठी खायला मिळायचे नाही. पण काही वेळेला या धाब्यावर असणारे टॉयलेट वापरायचो. आजचा प्रवास यवतमाळ जिल्ह्याच्या सीमेवरुन होता. यामध्ये काही अंतर अमरावती जिल्ह्यातून होते. थोड्या वेळाने अमरावती जिल्हा सुरु झाला.



**अमरावती जिल्हा** हा महाराष्ट्रातील उत्तरेकडील जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्याला बुलढाणा, अकोला, वाशिम, यवतमाळ, वर्धा आणि नागपूर या जिल्ह्यांच्या सीमा लागल्या आहेत. अमरावती जिल्ह्याची सर्वात जास्त सीमा मध्यप्रदेश या राज्याला लागली आहे. जिल्ह्यातील सातपुडा पर्वत हा मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राचा सीमावर्ती प्रदेश आहे. अमरावतीला विदर्भाची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखले जाते. शैक्षणिकदृष्ट्या अमरावतीला विदर्भातील शिक्षणाचे माहेरघरही संबोधले जाते. विदर्भामध्ये प्रशासनाच्या दृष्टीने दोन उपविभाग केले आहेत, नागपूर आणि अमरावती. त्यांपैकी अमरावती उपविभागामध्ये अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम हे जिल्हे येतात.

अमरावतीचे पुरातन नाव उदुंबरावती होते. याचे प्राकृत नाव उमरावती होते. शिवाय हिला प्राचीन काळी इंद्रपुरी म्हणून ओळखले जायचे. उमरावती चे नाव पुढे उच्चारानुसार अमरावती झाले. जुनी अमरावती येथील भगवान आदिनाथ ऋषभनाथ यांच्या संगमवरी मूर्तीच्या पायथ्याशी असलेल्या शिलालेखावर अमरावती या नावाचा पहिल्यांदा उल्लेख आढळतो. या मूर्ती इ.स. १०९७ मधील आहेत.

अमरावती जिल्ह्यातील महत्त्वाचे पीक कापूस हे आहे. पूर्णा, तापी व वर्धा या जिल्ह्यातील प्रमुख नद्या आहेत. वर्धा नदीवर सिंबोराजवळ जिल्ह्यातील सर्वात मोठे धरण आहे. शहानूर नदीवर शहानूर प्रकल्प आहे. अमरावती शहराला वडाळी तलाव व छत्री तलाव या तलावांतून पाणी पुरवठा होतो. अमरावती जिल्ह्यामध्ये रेगूर ही काळी मृदा मोठ्या प्रमाणात आहे. जिल्ह्यातील हवामान उष्ण व कोरडे आहे.



मेळघाटमध्ये आदीवासी लोकांचे वास्तव्य असुन तेथे मुख्यता कोरकू, गोंड, निहाल, बलाई या जातीचे लोक आढळतात व उर्वरीत लोक हे गवळी जातीचे आहे. हे लोक मुख्यता गुरे-ढोरे सांभाळुन आपला उदर निर्वाह करतात. त्यांच्याकडे मोठया प्रमाणात शेळया-मेंढया असतात. दुग्जन्य पदार्थ विक्री करणे हे त्यांचे महत्वाचे उत्पादन साधन आहे. जिल्ह्यातील शेंदूरजना बाजार हे गाव गुरांच्या बाजारासाठी प्रसिद्ध आहे.

सामाजिक क्षेत्रामध्ये अमरावती जिल्ह्याचे नाव खूपच अग्रेसर आहे. संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गुलाबराव महाराज, डॉ. शिवाजीराव पटवर्धन, डॉ. पंजाबराव देशमुख इत्यादी महत्त्वाच्या व्यक्ती या जिल्ह्यात होऊन गेल्या आहेत. जिल्ह्यात अनेक पर्यटनस्थळे आहेत. त्यापैकी सातपुड्याच्या कुशीतील चिखलदरा, गाविलगडचा किल्ला, किचकदरा, वैराट, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, सालबर्डी, कुंडीनपूर, रिद्धपूर, अचलपूर, बहिरम, अंबादेवी मंदिर, श्री क्षेत्र कोंडेश्वर अमरावती इत्यादी प्रसिद्ध आहेत.



पिंपळगाव ओलांडून पुढे आलो. नाष्टाचा वेळ झाला होता त्यामुळे भूक लागली होती. हॉटेल शोधू लागलो. शेवटी सालोड जवळ छोट्या टपरीवजा हॉटेलमध्ये नाष्टासाठी थांबलो. ते नुकतेच उघडले होते त्यामुळे तिथे फक्त तुराचे डाळवडे तयार होते. तेथे खाल्लेल्या तूर डाळवड्याची चव मस्तच होती. असा डाळवडा आतापर्यंत मिळालाच नव्हता. आम्ही सर्व तुटून पडलो. ते पटकन संपले मग अजून गरमागरम डाळवडे बनवले गेले. नंतर मस्तपैकी चहा झाली. तेथे जमलेल्या गाववाल्यांबरोबर गप्पा रंगल्या. या भागात सकाळच्या नाश्त्यामधे पोहे-उपमा तर असतोच, पण त्याचबरोबर मटकी, मूग, हरभरा, बरबटी, घुगऱ्या यांची उसळ केली जाते. घुगऱ्या म्हणजे तुरीची डाळ होण्याआधी पहिले अख्खा दाणा जो असतो त्याला वाळवतात आणि मग त्यालाच घुगऱ्या म्हणतात. इतर बऱ्याच ठिकाणी ही उसळ पोळीबरोबर भाजी म्हणून खाल्ली जाते.



साकळी नदी ओलांडून गावनेर टाळेगाव जवळ आलो. तेथे एका छोट्या नाल्यावर बांध बांधल्यामुळे जलाशय तयार झाला होता. जलाशयाच्या आजूबाजूच्या झुडुपामध्ये भरपूर पक्षांची घरटी होती. हे सर्व पक्षी थव्याने या पाण्यावर इकडून तिकडे उडत होते. मधेच पाण्यामध्ये डुबकी मारुन मासे पकडायचे. एखाद्या पक्षाचे असे वागणे डिस्कवरी चॅनेलवर पाहिले होते. तळ्याकाठी किंवा नदीकाठी बसलेला एखादा पक्षी पाण्यात



डुबकी मारुन मासा पकडतो. इथे तर असंख्य भरपूर पक्षी होते. ते किलबिल करत मासे पकडत होते. थोडा वेळ थांबून ती मजा पाहिली. मस्त विडिओ काढला आणि पुढे निघालो.

बेंबळा नदी ओलांडून वाघोडाजवळ आलो. या रस्त्याच्या समांतर नागपूर- मुंबई समृद्धी हायवे बनत आहे आणि त्याचे काम जोरात चालू होते. त्यामुळे रस्त्याला माती खाडी सिमेंट




वाहून नेणारे मोठे ट्रक डंपर यांची सारखी ये जा चालू होती. धूळ सारखी उडत होती. ऊन पण वाढत चालते होते. एके ठिकाणी या समृद्धी हायवेसाठी लागणारे वस्तूंचे गोडावून ऑफिस होते. तेथे अनेक कामगार काम करत होते. त्यांच्यासाठी एक जवळच छोटी टपरी सारखे हॉटेल बनवले गेले होते. सकाळी फक्त डाळवडे खाल्ले होते. भूक तर सर्वांना लागली होती. त्यामुळे इथे थांबून आम्ही पुन्हा नाष्टा केला. तिथे काही बांधकाम अभियंते आणि कामगार भेटले. त्यांच्याबरोबर गप्पा सुरु झाल्या. यातील अनेकजण मुंबईमध्ये येऊन गेले होते त्यामुळे ते खुश झाले. आमच्या सायकल मोहिमेला शुभेच्छा मिळाल्या.

रस्त्याच्या आजूबाजूला काही ठिकाणी मोसंबीच्या बाग दिसल्या. नुकतीच फळे लागायला सुरवात झाली होती. एका ठिकाणी बागेतील गाववाल्यांनी आम्हाला मोसंबी दिल्या. त्या खाऊन हुरुप आला. सायकल अधिक वेगाने पळवू लागलो. टिटवा ओलांडून टाळेगाव दशसरला पोहोचलो. येथे जवळच बेंबळा नदीवर असणारे बेंबळा धरण आहे. हे यवतमाळ जिल्ह्यातील



सर्वात मोठे धरण आहे. बेंबला नदीचा उगम वाशीम जिल्ह्यात कारंजा लाड या शहरातून होतो.

ऊन वाढत चालले होते. त्यामुळे काही अंतर सायकल चालवल्यावर रस्त्याच्या बाजूला असलेल्या झाडांच्या सावलीत थांबून आराम करायचो. काही वेळाने वर्धा नदीजवळ आलो. नदीमध्ये काहीजण मासे पकडत होते. वर्धा नदी ही महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ प्रदेशातून



वाहणारी एक मुख्य नदी आहे. तिची लांबी ४६४ किमी आहे. मध्य प्रदेश राज्याच्या बेतूल जिल्ह्यात सातपुडा पर्वतातील मुलताई पठारावर ही नदी उगम पावते. मध्यप्रदेश राज्यातून वाहत येऊन महाराष्ट्रात प्रवेश केल्यानंतर ती नागपूर-अमरावती, अमरावती-वर्धा, यवतमाळ-वर्धा, चंद्रपूर-यवतमाळ या जिल्ह्यांच्या हद्दीवरुन वाहत जाते. त्यानंतर चंद्रपूर जिल्ह्यातील घुगुस शहराजवळ वर्धा नदीला उजवीकडून पैनगंगा नदी मिळते. संगमानंतर वर्धा नदी चंद्रपूर जिल्ह्यातून व नंतर महाराष्ट्र-आंध्र प्रदेश राज्यांच्या सीमेवरुन वाहू लागते. त्यानंतर चंद्रपूर-गडचिरोली जिल्ह्यांच्या हद्दीवरुन दक्षिणेकडे वाहत आलेल्या वैनगंगा नदीला सेवनीजवळ ती मिळते. वर्धा-वैनगंगा यांचा संगमानंतरचा प्रवाह प्राणहिता या नावाने महाराष्ट्र राज्य व आंध्र प्रदेश राज्य यांच्या हद्दीवरुन दक्षिणेस वाहत जाऊन गोदावरीला मिळतो. एराई, वेणा, पोथरा, वेंबळा, निर्गुडा, जाम, कार या वर्धा नदीच्या प्रमुख उपनद्या आहेत. वर्धा व




तिच्या उपनद्यांना पावसाळ्यात भरपूर पाणी असते, मात्र उन्हाळ्यात त्या कोरड्या पडून अनेक ठिकाणी डबकी तयार होतात. वर्धा नदीचा प्रवाहमार्ग खचदरीतून आहे असे मानले जाते. उगमापासून ते पैनगंगा नदीला मिळेपर्यंत वर्धा नदीचे पात्र खोल व खडकाळ आहे. वर्धा नदीचे खोरे सुपीक आहे. शेती हा वर्धा खोऱ्यातील प्रमुख व्यवसाय असून भात, ज्वारी, गहू, कापूस इत्यादी पिके होतात. वर्धा नदीच्या तीरावर अनेक ठिकाणी मंदिरे, स्मारके आणि किल्ल्यांचे अवशेष पहावयास मिळतात.

वर्धा नदी ओलांडून पुलगाव शहरात आलो. भूक तर जोरात लागली होती. पुढे असणाऱ्या ग्रुपने मस्तपैकी ढाबा शोधून ठेवला होता. तिथे जेवणासाठी थांबलो. पुलगावमधील ऋषिराज फॅमिली गार्डन आणि रेस्टॉरेंट हा या मार्गावरील एक नावाजलेला ढाबा होता. तिथे असलेला बगिचा मस्तच सजवला होता. कुत्रे, बदक असे अनेक पाळीव प्राणी पण होते. आम्ही मुंबईहून सायकल चालवत आलोय हे समजल्यावर आमचे जोरदार स्वागत झाले.



धाब्यावर पोहोचल्यावर सिडनी सरांच्या लक्षात आले की त्यांची पाण्याची बाटली मागे पेट्रोल पंपावरच राहिली आहे. ते पेट्रोल पंपावरील फिल्टरमधून पाणी भरल्यावर ती बाटली बाजूच्या धक्क्यावरच विसरुन पुढे आले होते. ही बाटली वेगळी होती. त्याच्या जागी दुसरी साधी पाण्याची बाटली सायकल केज मध्ये अडकवता येणार नव्हती. मग धाब्याच्या मालकाला विनंती केली आणि त्याच्या बाईकवर बसून पुन्हा मागे पेट्रोलपंपावर गेले आणि ती पाण्याची बाटली घेऊन आले.

या ढाब्यावर पोटभर जेवण झाले. जेवणात गरमागरम ज्वारीची भाकरी आणि वड्यांची भाजी होती. दही, छास पण मिळाले. जेवण झाल्यावर थोडा वेळ आराम केला. तेथील कर्मचाऱ्यांबरोबर गप्पा रंगल्या, त्यांनी सर्वांबरोबर फोटो काढून घेतले. येथील लोकांच्या मुख्य जेवणात भाकरी किंवा पोळी, तुरीचे साधे किंवा फोडणीचे वरण, भाज्या, चटण्या, कोशिबिंरी आणि लोणचे असे पदार्थ असतात. त्यातील लोणचे हा सर्वाधिक चटकदार आणि चटपटीत पदार्थ. जेवणासोबत बाकी काही नसले तर एकदाचे चालेल, पण लोणचे पाहिजेत. वर्षभर चांगले मुरलेले लोणचे जिभेवर ठेवा, त्याची चव रेंगाळत राहते. मुगाच्या वड्या किंवा इतर सगळ्या डाळी मिक्स करुन तयार केलेल्या वड्यांची भाजी केली जाते आणि ती खूप छान लागते.

उन्हाळ्यात इथल्या प्रचंड उन्हामुळे या काळात भाज्यांची कमतरता येथे जाणवते. म्हणूनच पूर्वीपासून इथे वाळवणाच्या पदार्थांना महत्व प्राप्त झाले आहे. मुगवडी, वाळलेले कांदे, आंबोशी, बोरकुट, सुकवलेल्या भाज्या, लोणचे, सांडगे, सरगुंडे, दही मिरची, धापोडे,

चनोडे, सांड्या, कुरडया, मिरचीचं गोज, वऱ्हाडी ठेचा, उकडलेली बोरे, मुगाचे-उडदाचे पिठाचे पापड हे प्रकार या भागात सगळीकडे सापडतात.

पुलगाव हे वर्धा जिल्ह्यातील एक व्यापारी शहर असून ते वर्धा नदीकाठी वसले आहे. पुलगाव येथे कापसाची मोठी बाजारपेठ आहे. शहरात हातमाग कापडउद्योगाचा विकास होत आहे. येथे कापड, सरकी काढण्याच्या व कापसाच्या गाठी बांधण्याच्या गिरण्या आहेत. भारत सरकारचे दारुगोळ्याचे कोठार येथे असल्याने यास सैनिकी दृष्टीने महत्त्व प्राप्त झाले आहे. येथे दारुगोळा बनवला जातोच, शिवाय देशाच्या विविध ठिकाणी तयार झालेली स्फोटकं पुलगाव लष्करी तळावर



साठवली जातात. देशातील सर्वोच्च शस्त्रघर असलेल्या पुलगाव शस्त्रभांडारात सर्वोच्च लष्करी सामुग्री आहे. या परिसरात जवानांशिवाय अन्य कोणालाही प्रवेश दिला जात नाही. भारत सरकारचे शस्त्रघर असलेल्या भागामध्ये रस्त्याच्या कडेला एक टेकडी होती. औरंगाबादनंतर आम्ही टेकडी इथे पुलगावला पाहत होतो. सिन्नरनंतर आतापर्यंत आम्हाला सपाट रस्ता मिळाला होता.

पुलगावहुन वर्धा ३० किमी होते. त्यामुळे आरामात सायकल हाकत निघालो. आणि सेकापूर देगाव सालोड करत वर्ध्याला पोहोचलो.

**वर्धा जिल्हा** हा गांधी जिल्हा म्हणून ओळखला जातो. वर्धा जिल्हा हा चारही बाजूंनी महाराष्ट्रातीलच इतर चार जिल्ह्यांनी वेढलेला आहे. पूर्व व उत्तरेस नागपूर जिल्हा, पश्चिमेस अमरावती जिल्हा आणि दक्षिणेस यवतमाळ जिल्हा व चंद्रपूर जिल्हा आहे. वर्धा नदी ही अमरावती जिल्हा, यवतमाळ जिल्हा व चंद्रपूर जिल्हा या जिल्ह्यांना वर्धा जिल्ह्यापासून वेगळे करते. वर्धा हे महाराष्ट्राच्या विदर्भ भागातील वर्धा जिल्ह्याचे मुख्यालय व प्रमुख शहर आहे. वर्धा या जिल्हयाला फार पुरातन असा इतिहासाचा वारसा लाभला आहे. वर्ध्याला मौर्य, श्रृंग, सत्वाहन आणि वाकाटकांच्या साम्राज्यात समाविष्ट करण्यात आले होते. पुढे वर्ध्यावर चालुक्य, राष्ट्रकुट, यादव, दिल्ली, बहामनी, बेरारचे मुस्लीम शासनकर्ते, गोंड आणि मराठयांनी राज्य केले.

१८५० च्या दरम्यान वर्धा ब्रिटींशाच्या हाती आले. वर्धा आणि सेवाग्राम स्वातंत्र्य आंदोलना दरम्यान प्रमुख केंद्र होते. विशेषतः १९३४ ला भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची वार्षिक बैठक येथील महात्मा गांधींच्या आश्रमात झाली होती. महात्मा गांधीजींचा सेवाग्राम आश्रम वर्धा शहरापासुन आठ किमी अंतरावर ३०० एकरात विस्तीर्ण पसरलेला आत्मीक आणि मानसिक शांतता प्रदान करणारा आश्रम आहे. या आश्रमाची आणखीन एक विशेषतः म्हणजे महात्मा गांधींनी आपल्या आयुष्याची शेवटची बारा वर्ष येथेच व्यतीत केली. तेथे असणारी बापू कुटी आणि बा कुटी प्रसिद्ध आहेत. सेवाग्राम येथे देशातूनच नव्हे तर परदेशातूनही लोक भेट द्यायला येतात.

सेवाग्रामचे पुर्वीचे नाव सेगाव असे होते, याच मार्गावर गजानन महाराजांचे देखील शेगाव आहे. महात्मा गांधी इथे वास्तव्याला असतांना पत्रव्यवहाराच्या दरम्यान दोन गावं एकाच नावाची असल्याने गोंधळ व्हायचा तेव्हां या अडचणीला लक्षात घेता १९४० ला गांधीजींच्या सल्ल्यानुसार सेगांवचे नाव बदलुन सेवाग्राम असे करण्यात आले. १९३० मध्ये मिठाचा सत्याग्रह करण्यासाठी साबरमती आश्रमातून आपल्या साथीदारासोबत गांधींनी दांडी यात्रा काढली होती. स्वातंत्र्य मिळविल्याशिवाय आश्रमात परतणार नाही, असा त्यांचा संकल्प होता. ब्रिटिश सरकारने मिठावर लादलेल्या कराविरुद्ध गांधीनी गुजरातच्या समुद्रकिनाऱ्यावर दांडी येथे मीठ तयार केले. या सत्याग्रहानंतर त्यांना अटक करुन पुण्याच्या येरवडा येथील तुरुंगात ठेवण्यात आले. १९३३ मध्ये तरूगातून बाहेर आल्यानंतर गांधीजीनी देशव्यापी हरिजन यात्रा काढली. तोपर्यंत स्वातंत्र्य न मिळाल्याने गांधीजी साबरमती आश्रमामध्ये परतले नाहीत. १९३४ मध्ये जमनालाल बजाज तसेच त्यांच्या साथीदारांच्या आग्रहास्तव महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातील मगनवाडी येथे गांधींनी वास्तव्य केले. त्यांनतर दोन वर्षांनी १९३६ मध्ये गांधीजी पहिल्यांदा मगनवाडीहून सेवाग्राम येथे आले व तेथेच त्यांनी राहण्याचा निर्णय घेतला. गांधीजी आणि कस्तुरबा यांचासाठी आश्रमामध्ये छोटे घर बांधले. व जातिभेद



मोडण्यासाठी हरिजन समाजातील महिलांना स्वयंपाकासाठी ठेवले. या आश्रमात असतांना गांधीजींनी अनेक मोठमोठे निर्णय घेतले, कित्येकांना भेटले, अनेकांच्या जीवनाला नवी दिशा दिली. १९४२ मध्ये भारत छोडो आंदोलन ची पहिली सभा सेवाग्राम आश्रमातच झाली होती. इथे आजही सुतकताई होते.



वर्धा जिल्ह्यात अनेक पर्यटन स्थळे आहेत. त्यापैकी महात्मा गांधींचा सेवाग्राम आश्रम, विनोबा भावेंचा आश्रम, विश्व शांती स्तुप, लक्ष्मीनारायण मंदिर, बोर अभयारण्य, पोथारा बांध, बोर बांध, फरीदबाबा दर्गा इत्यादी ठिकाणे पहाण्यासारखी आणि अभ्यासपुर्ण देखील आहेत.



वर्धा शहरात एके ठिकाणी मातीच्या कपमध्ये मिळणारी मलई चहा पिऊन सर्व थकवा गायब झाला. मुक्कामाच्या लॉजवर पोहोचल्यावर नेहमीप्रमाणे आपआपले आटपून आम्ही सर्वजण वर्धा शहर फिरुन आलो. रात्री जेवणामध्ये वांगे भात, स्थानिक विदर्भ पुलाव भात आणि दही असा खास बेत झाला. शहरामध्ये इतरांबरोबर गप्पा मारल्या. आजचा दिवस मस्तच होता.

***

# दिवस सातवा: वर्धा ते भंडारा

मार्ग: वर्धा- पवनार- सेलू- बुट्टीबोरी- नागपूर- मौदा- शहापूर- भंडारा (१३८/ ९४१ किमी)
(जिल्हे: वर्धा- नागपूर- भंडारा)

सुप्रभात वर्धा..!! आम्ही सर्वजण सकाळी तयार होऊन निघालो. थोड्या अंतरावर एक चहाची टपरी उघडलेली होती. तेथे चहासाठी थांबलो. रस्त्यावर भरपूर जण व्यायाम, चालण्यासाठी आले होते. आमच्या सायकल मोहीमेबद्दल समजल्यावर अनेकांनी आमचे अभिनंदन केले आणि पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. वर्धा शहरातून मुख्य रस्त्यावर आलो. दुहेरी मोठा रुंद रस्ता सुरु झाला होता. थोड्या वेळात पवनारला पोहोचलो.

महात्मा गांधींच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेल्या वर्धा शहरापासून दक्षिणेस आठ किमी अंतरावर निसर्गाच्या कुशीत धाम नदीच्या तीरावर पवनार येथे वसलेला आचार्य विनोबा भावे यांचा परमधाम आश्रम दिमाखात उभा आहे. हा आश्रम आजही जगाला आचार्य विनोबा भावेंच्या मानवता व सर्वोदयाची शिकवण देत आहे. पवनारला तशी प्राचीन ओळख आहे. पुरातत्त्व संशोधकांच्या मते पवनार ही प्राचीन काळी राजा प्रवरसेनाची राजधानी होती. आजचे पवनार त्यावेळेस प्रवरपूर या नावाने ओळखले जात होते. कालौघात प्रवरपूरचे पवनार झाले. मात्र,



प्रवरपूरच्या गतवैभवाची साक्ष देणारे किल्ल्याचे अवशेष आजही येथे बघायला मिळतात. पवनारला खरी ओळख मिळाली, ती विनोबाजींच्या परमधाम आश्रमाने. विनोबाजींच्या आध्यात्मिक साधनेचा प्रयोग, त्यांचा सत्याग्रह व सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी केलेल्या अभिनव आंदोलनाचा परमधाम आश्रम साक्षीदार आहे. देशातच नाही, तर जगभरात या आश्रमाची व येथील कार्यपद्धतीची ओळख आहे. गांधीजींचे ज्येष्ठ सत्याग्रही अशी विनोबाजींची ओळख होती. त्यांच्याच आज्ञेनुसार विनोबाजींनी पवनार ही आपली कर्मभूमी निवडली.

प्रत्येक गोष्टीसाठी इतरांवर अवलंबून राहू नका, असा संदेश देतानाच स्वयंपूर्ण होण्यासाठी त्यांनी आश्रमात कांचनमुक्तीचा प्रयोग सुरु केला. भाजीपाला, अन्नधान्य यासाठी बाजारांत पैसा खर्च न करता दैनंदिन गरजा पूर्ण करण्याचा हा एक प्रयोग होता. आश्रमाजवळील जमीन शेतीसाठी व भाजीपाल्यासाठी उपयोगात आणली गेली. आश्रमात लागणारे धान्य व भाजी येथील आश्रमवासी स्वतःच पिकवू लागले. दुधाची सोय करण्यासाठी येथे प्रशस्त गोशाळा आहे. आत्मनिर्भर आर्थिक क्रांतीचे ते पहिले यशस्वी पाऊल ठरले. विज्ञाननिष्ठ प्रयोगातही विनोबाजींची आध्यात्मिक मूल्ये येथे ठळकपणे जाणवतात. ऋषीशेती हा एक पुन्हा अभिनव प्रयोग त्यांनी येथे केला. जमीन नांगरण्यासाठी बैलाची मदत घ्यायची नाही. मजुरांचीही मदत न घेता शेती करायची. सुरुवातीला कठीण वाटणारे हे काम सरावाने आता साऱ्यांच्या अंगवळणी पडले आहे.




विनोबाजींने केलेले प्रयोग आर्थिक, सामाजिक क्षेत्रात क्रांतिकारी ठरले. स्त्रियांवरील अत्याचार व त्यांची होणारी कुचंबणा विनोबाजींना व्यथित करीत होती. त्यासाठी त्यांनी १९५१ मध्ये ब्रह्मविद्या मंदिराची स्थापना केली. स्त्रियांनी स्त्रियांसाठी चालविला जाणारा हा आश्रम महिला सक्षमीकरणाची साक्ष देतो आहे. येथे देश-विदेशांतील साधिका एकत्रितपणे आध्यात्मिक साधना करतात. या आश्रमात कुणीही प्रमुख नाही, कुणी मालक नाही आणि कुणी नोकरही नाही. स्वतःचे काम स्वतःच करायचे हा येथील शिरस्ता. आपण इतरांवर व समाजावर भार होता कामा नये, ही विनोबाजींची शिकवण असल्याने आश्रमातील सर्व कामे येथील साधिकाच करतात. आश्रमातील निवासींची भोजनव्यवस्था, साफसफाई, शेती, भाजीपाल्याचे उत्पादन ही कामे करीत येथील साधिका स्वयंभू झाल्या आहेत. आपल्या पायावर उभ्या आहेत.



हा रस्ता तुळजापूर ते नागपूर हायवे असल्यामुळे सरळ, सपाट होता. त्यामुळे सकाळच्या थंडीमध्ये आम्ही सायकली वेगात पळवत होतो. सेलूला रस्त्याच्या बाजूला असलेल्या एका टपरीवर चहासाठी थांबलो. गरमागरम चहा प्यायलो. तिथे असलेल्या शेकोटीवर शेक घेतला. गप्पा मारल्या आणि पुढे निघालो.



पुढे केळझर, सेलडोह करत हळदगाव टोल नाक्याजवळ आलो. येथे मुख्य रस्त्याला समृद्धी महामार्ग ओलांडून जात होता. नागपूर ते मुंबई अशा प्रमुख शहरांना जोडणाऱ्या या समृद्धी महामार्गाचे काम जोरात चालू होते. हळदगाव टोल नाका ओलांडून पलीकडे



आल्यावर एक छोटे हॉटेल होते. तिथे नाष्टासाठी थांबलो. येथे नागपूर स्पेशल तर्री पोहे खाल्ले. या भागात कोणताही नाष्टा बरोबर तर्री म्हणजे रस्सा असतोच. नंतर कडक चहा झाली. बाजूलाच गाढवभुकी मातेचे मंदिर होते. आम्ही या नावाबद्दल जाणून घ्यायचा प्रयत्न केला पण तिथे असलेल्या कोणालाही या नावाबद्दल माहिती नव्हते. बाजूलाच छोट्या टेकडीवर शिवमंदिर होते. नाष्टा झाल्यावर थोडा आराम केला. तिथे जमलेल्या लोकांबरोबर गप्पा मारल्या आणि पुढे निघालो.

बुटीबोरीला पोहोचलो. येथे नांद नदीवर बांधलेले मातीचे वडगाव धरण आहे. वडगाव धरण हे लोअर वून्ना धरण या नावानेही ओळखले जाते. बुटिबोरीला मोठी औद्योगिक वसाहत आहे. नागपूर जिल्हा सुरु झाला होता.

**नागपूर जिल्हा** हा महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ विभागात मोडतो. या जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय नागपूर येथे असून हे शहर महाराष्ट्र राज्याची उपराजधानी आहे. नागपूर

जिल्हा हा भारताच्या जवळजवळ मध्यभागी असून, भारताचा शून्य मैलाचा दगड नागपूर शहरात आहे. देशच्या मध्यभागात असल्याने देशातील महत्त्वाचे लोहमार्ग व महामार्ग नागपूर जिल्ह्यातून जातात. नागपूर जिल्ह्याचा उत्तरेकडील भाग छिंदवाडा आणि मध्यप्रदेशच्या सिवनी जिल्ह्याने व्यापलेला आहे आणि पूर्वेला भंडारा जिल्हा आहे. दक्षिण आणि पश्चिमेकडे अनुक्रमे चंद्रपूर आणि वर्धा जिल्हा आहे. तर, वायव्येचा काही भाग अमरावती जिल्ह्याने व्यापलेला आहे.




महाराष्ट्र विधानसभेचे हिवाळी अधिवेशन नागपुरात घेतले जाते. तसेच टायगर कॅपिटल ऑफ इंडिया अशा नागपुरास संत्रानगरी असेही संबोधतात कारण शहरातील संत्री प्रसिद्ध आहेत. येथे मोठ्या प्रमाणावर संत्र्याचे पिक होत असल्यामुळे संत्र्याची मोठी बाजारपेठ आहे. कन्हान नदीची उपनदी असलेली नागनदी नागासारखीच वाहात असल्याने आधी या शहराचे नाग असे नाव पडले आणि या नदीमुळेच नागपूर असे नाव ठेवण्यात आले.

येथे तीन हजार वर्षांआधीपासून अर्थातच इ. सनपूर्व आठव्या शतकापासून मानवी अस्तित्व असल्याचे पुरावे सापडले आहेत. पहिला संदर्भ दहाव्या शतकात शेजारील वर्धा जिल्ह्यातील देवळी येथे आढळून आलेल्या ताम्रपटावर उल्लेखित आहे. तिसऱ्या शतकाच्या अखेरीस राजे वाकाटाका घराण्याचे राजे विद्याशक्ती यांनी नागपूरवर राज्य केले असल्याचे म्हटले जाते. वाकाटाका साम्राज्यानंतर हा प्रांत बदामीचे चालुक्य, राष्ट्रकुट यांच्या अधिकारात आला आणि त्यानंतर या प्रांतावर यादवांचे साम्राज्य आले. छिंदवाडा जिल्ह्यातील देवगडचा गोंड राजा बख्त बुलंद शहा याने १७०२ साली नाग नदीच्या तीरावर नागपूर शहराची स्थापना केली. इ.स. १७४२ मधे रघूजीराजे



भोसले नागपूरच्या गादीवर आरुढ झाले. १८१७ मध्ये सीताबर्डीच्या लढाईमध्ये मराठ्यांचा पराभव करुन ब्रिटिशांनी नागपूरचा ताबा घेतला. १८६१ मध्ये नागपूर सेन्ट्रल प्रॉव्हिन्सेस व बेरारची राजधानी करण्यात आली. १८६७ मध्ये नागपूरहून मुंबई शहरापर्यंत ग्रेट इंडियन पेनिन्सुला कंपनीने रेलमार्ग विकसित केला आणि पहिली आगगाडी नागपूरहून निघाली. टाटा समूहाने देशातील पहिला कापड उद्योग याच शहरात सुरु केला.

भारतीय स्वातंत्र्य युद्धातदेखील शहराने महत्त्वपूर्ण योगदान दिले. स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेसची दोन अधिवेशने नागपुरात झाली व असहकार आंदोलन नागपूरच्या १९२० च्या अधिवेशनापासून सुरु झाले.१९२५ साली डॉ.केशव बळीरामपंत हेडगेवार यांनी नागपूर इथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. स्वातंत्र्यानंतर सेन्ट्रल प्रॉव्हिन्सेस व बेरार भारतातील एक प्रांत बनला. १९५० साली मध्य प्रदेश राज्याची निर्मिती झाली व नागपूरला या राज्याची राजधानी होण्याचा मान मिळाला. कालांतराने १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यात आली व वऱ्हाड म्हणजेच विदर्भ नव्या राज्यात आला. एके काळी देशाच्या भौगोलिक सुरक्षिततेच्या दृष्टीने नागपूरला भारताची राजधानी करण्याचाही प्रस्ताव होता. १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूरमध्ये येऊन आपल्या लाखो अनुयायांबरोबर बौद्ध धर्माची दीक्षा घेतली.



नागपूर जिल्ह्याच्या पश्चिम सीमेवर वर्धा आणि पूर्व सीमेवर वैनगंगा नदी आहे. कन्हान ही नागपूर जिल्ह्यातील प्रमुख नदी असून ती जिल्ह्याच्या मध्य भागातून वाहते. ती उत्तरेकडून वाहत येउन पूर्वेकडे जाते आणि जिल्ह्याच्या सीमेवर वैनगंगा नदीला भेटते. नागपूर जिल्ह्यात अनेक नैसर्गिक आणि मानवनिर्मित तलाव आहेत. त्यापैकी अंबाझरी, तेलंगखेडी,



गांधीसागर, सक्करदरा, गोरेवाडा, सोनेगाव इत्यादी तलाव पर्यटकात प्रिय आहेत. ऊस, गहू, संत्री, ज्वारी, तूर, मूग, सोयाबीन, सुर्यफूल, कापूस इत्यादी जिल्ह्यातील मुख्य पीके आहेत. नागपूर शहर हे नैसर्गिक संसाधनांनी समृद्ध आहे. कृषी क्षेत्रासोबतच खनीज संपत्तीचे विपूल साठे या जिल्ह्यात आहेत. सागवन आणि गवताचे सर्वात मोठे उत्पादन नागपूर जिल्ह्यात होत असते.

नागपूर हे विदर्भातील महत्त्वाचे व्यावसायिक केंद्र आहे. नागपुरात अनेक राष्ट्रीय स्तराच्या सरकारी वैज्ञानिक संस्था आहेत. भारतीय सैन्याच्या दृष्टीने नागपूर महत्त्वाचे आहे. भारतीय वायुदलाच्या निर्वहन विभागाचे मुख्यालय नागपूरात असून दारुगोळा कारखाना, स्टाफ कॉलेज या संस्थादेखील शहरात आहेत. जिल्ह्यात अनेक पर्यटनस्थळे आहेत. त्यापैकी दीक्षाभूमी, ड्रॅगन पॅलेस, कामठी, जादू महल, गंगावतरण पुतळा, भारताचा शून्य मैलाचा दगड, मध्यवर्ती संग्रहालय, पेंच प्रकल्प व राष्ट्रीय उद्यान, अंबाझरी तलाव, रामटेक राममंदिर, महाकवी कालिदास स्मारक, मनसर रामधाम, अदासा, आंभोरा, भिवगड किल्ला, सीताबर्डीचा किल्ला, रमण विज्ञान केंद्र, देवलापार गोशाळा इत्यादी प्रसिद्ध आहेत. नागपूर शहरातील मारबत महोत्सव हा या भागाचा एक महत्वाचा सण आहे जो शहराच्या आत्यंतिक श्वापदापासून संरक्षण करण्यासाठी साजरा केला जातो.

नागपूर शहराभोवती असलेल्या रिंग रोडने आम्ही पुढे निघालो. या मार्गावर अनेक उड्डाणपूल होते. या उड्डाणपुलांचा चढ वाचवण्यासाठी मी आणि नितीन भाई काही वेळेला पुलाच्या बाजूला असणाऱ्या रस्त्यावरुन जायचो. असेच दोन तीन उड्डाणपूल न चढता आम्ही बाजूच्या रस्त्याने सायकल चालवत जात होतो. त्यामुळे आम्ही उड्डाणपूल चढवणाऱ्या इतरांच्या पुढे पोहोचलो होतो. त्यामुळे पुढचा



उड्डाणपूल येताच बाकीचे काहीजण आमच्याबरोबर बाजूच्या रस्त्यावरुन निघाले. नेमका तो उड्डाणपूल रेल्वे मार्गावरचा होता. यावेळेला आम्ही फसलो गेलो होतो. मग पुढे रस्ता संपल्यावर हातात सायकल घेऊन रेल्वे रुळ ओलांडून पलीकडे पुढे आलो.

नागपूर शहर ओलांडून पुढे भंडारा दिशेला निघालो. दुपारची जेवणाची वेळ झाली होती. महालगावजवळ अक्षय सायकल हातात घेऊन चालताना दिसला. त्याची सायकल पुन्हा



पंक्चर झाली होती. मी आणि नितीन भाई शेवटी होतो. तो पंक्चर नितीन भाईंनी काढला. टायर पण थोडा फाटलेला होता, त्याला प्याच मारला. तोपर्यंत बाकीचे सर्व पुढे गेले होते. पुढे जाऊन नारायण, फडतरे आणि देशमुख सरांनी दुपारचे जेवणासाठी हॉटेल शोधले होते. गुजराती वेज अंडाकरी मिळणाऱ्या या हॉटेलमध्ये पोटभर जेवलो. मांसाहारी लोकांनी प्रसिद्ध सावजी मटण आणि आम्ही शाहाकारी लोकांनी पाटवडी रस्सा भाजी घेतली. सोबत भाकरी, नागपुरी वडे भात, दही, पापड लोणचे, ठेचा इत्यादी असा खास बेत झाला. येथे नागपुरात पदार्थ सावजी मसाला वापरुन केले जातात. या सावजी मसाल्याला वेगळीच चव आहे. विदर्भाच्या खाद्यसंस्कृतीमधे तिखट आणि तडकदार पदार्थ खाल्ले जातात. त्यामुळे गरम मसाला आणि काळा मसाला जास्त वापरण्यात येतो. मग त्यामधे भर पडते ती सावजी मसाल्याची आणि सावजी जेवणाची. इतर बऱ्याच ठिकाणी भाजीमध्ये गोडा मसाला असतो, पण विदर्भात तो थोडय़ा कमी प्रमाणात वापरतात. जेवण झाल्यावर थोडा आराम केला. इतरांबरोबर गप्पा मारल्या.



आतापर्यंत ९० किमी अंतर झाले होते व आता ४० किमीच्या आसपास अंतर बाकी होते. कन्हान नदी ओलांडून मौदाला आलो. हे नागपूर जिल्ह्यातील एक तालुक्याचे ठिकाण आहे. बोरगाव पार करुन खरबीला आलो. खरबी जवळ असलेला जवाहरनगर येथे युद्ध साहित्य, आयुध निर्माण कारखाना १९६४ पासून आहे. भंडारा जिल्हा सुरु झाला होता.

**भंडारा जिल्हा** महाराष्ट्र राज्याच्या ईशान्य भागात आहे. या जिल्ह्याचा उत्तरेस मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्हा, पूर्वेस गोंदिया जिल्हा, दक्षिणेस चंद्रपूर जिल्हा व पश्चिमेस नागपूर जिल्हा आहे. उत्तरेकडे सातपुडा पर्वताचा डोंगराळ भाग आहे. भंडारा शहर हे या




जिल्ह्याचे मुख्यालय आहे. भंडारा हे नाव भाणारा या शब्दावरुन आले असून येथील स्थानिक लोक अजूनही याचा तसा नामनिर्देश करतात. भाणारा असा उल्लेख इ. स. ११०० मधील एका शिलालेखात मिळतो. भंडारा हे पितळी भांड्यांसाठी पूर्वीपासूनच प्रसिद्ध आहे. त्यावरुनच भाण हा शब्द भांड्यांच्या अर्थाने उपयोगात आला असावा, त्यामुळे याचे भाणारा असे नाव पडून त्याच्या अपभ्रंशाने भंडारा हे नाव शहराला पडले असावे.

हा जिल्हा वनसंपत्तीत व खनिजसंपत्तीत समृद्ध आहे. जिल्ह्यात लोहखनिज विपुल प्रमाणात असल्यामुळे त्याच्या भरपूर खाणी आहेत. येथील प्रमुख पिके तांदूळ, गहू, मिलेट



तृणधान्य, इत्यादी आहेत. येथील तांदळाच्या चिन्नोर, दुभराज, काळी कमोद या सुवासिक जाती प्रसिद्ध आहेत. भंडारा हा महाराष्ट्रातला सर्वात जास्त प्रमाणात तांदूळ पिकविणारा जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे. वैनगंगा ही जिल्ह्यातील प्रमुख नदी आहे. या नदीचा जिल्ह्यातील प्रवाह उन्हाळयातसुद्धा कोरडा पडत नाही. या जिल्ह्यात बावनथडी, चूलबंद, कन्हान, बाघ, गोसे धरण ही धरणे आहेत. येथे भरपूर तलाव आहेत त्यामुळे याला तलावाचा जिल्हा म्हटले जाते. या जिल्ह्यातील अर्थव्यवस्था मिश्र असून ती शेती आणि जंगले यांपासून मिळणार्या उत्पन्नावर आधारित आहे.

जिल्ह्यात अनेक पर्यटन स्थळे आहेत. त्यापैकी अंबागर किल्ला, आंधळगाव कोसा रेशम कापड, अड्यार, बोंडगांव, ब्राह्मी, चोडेश्वरी देवी, चांदपूर, चिचगड, दिघोरी, गोसीखुर्द धारण, महासमाधी भूमी, गायमुख गुहा मंदिर, गोंडुमरी, कोका वन्यजीव अभयारण्य, रावणवाडी धरण, कोरंभी मंदिर, उमरेल करंडला वन्यजीव अभयारण्य इत्यादी प्रसिद्ध आहेत.

भंडारा शहराजवळ पोहोचलो. शहराच्या बाहेर थांबून एका टपरीवर चहा प्यायलो. हातात चहाचा ग्लास आणि समोर होणार सूर्यास्त पाहत चहा पिण्याची मजा काही औरच आहे. घडाळ्यात पहिले तर फक्त साडेपाच वाजले होते आणि सूर्यास्त होऊन अंधार पडत होता. मुंबईहुन कोलकाताला जाताना आम्ही पश्चिमेकडून पूर्वेकडे जात होतो. त्यामुळे दररोज सूर्योदय लवकर व्हायचा आणि संध्याकाळी सूर्यास्त पण लवकर होत होता. दररोज वेळ बदलत होता.



भंडारा शहर पाहत पाहत निघालो. आमच्या सायकल पाहून अनेकांनी आपुलकीने विचारपूस केली. आमच्या सायकल मोहिमेला शुभेच्छा दिल्या. भंडारा बस स्टॅन्डजवळ डॉक्टर अशोकराव ब्राह्मणकर सर यांनी आम्हाला थांबवले. ते पण नेहमी सायकल चालवतात. भंडारामध्ये डॉक्टरांचा एक सायकल ग्रुप असून त्याचे ते सदस्य आहेत. या सायकल ग्रुप मार्फत अनेक उपक्रम राबवले जातात. ब्राह्मणकर सरांनी काही मदत पाहिजे काय याबद्दल विचारणा केली. तसेच रात्रीच्या मुक्कामासाठी आग्रह केला. आमचे मुक्कामाचे लॉज अगोदरच आरक्षित असल्यामुळे आम्ही आदरपूर्वक नकार दिला. त्यांच्याबरोबर गप्पा रंगल्या. भंडारा शहरात पण अनेक सायकल ग्रुप आहेत हे ऐकून प्रसन्न वाटले.



थोड्या वेळाने आम्ही मुक्कामाच्या लॉजवर पोहोचलो. नेहमीप्रमाणे सर्व कार्यक्रम आटोपल्यावर आजूबाजूला फिरुन आलो. अनेकांबरोबर गप्पा मारल्या. भंडारा, गोंदिया, गडचिरोली भागात गोळाभात, वडेभात, भरडाभात, हातफोडणीचा भात, मुगवड्याचा भात, खिचडी असे भाताचे अनेक प्रकार हॉटेल ढाब्यांमध्ये मिळतात. रात्री जेवणामध्ये असे स्थानिक पुलाव भात आणि सोबत सावजी रस्सा, वऱ्हाडी झिंगे असा बेत झाला. इथे या भागाला समुद्रकिनारा नाही त्यामुळे येथे खाऱ्या पाण्यातले मासे मिळत नाहीत. पण या भंडारा जिल्ह्यात अनेक तलाव आहेत आणि या तलावातील गोड्या पाण्यातले मासे येथे आवडीने खाल्ले जातात. त्यात जास्तकरुन झिंगे, रोहू, कटला, मुरगल, मांगुर इत्यादी प्रकारचे मासे वापरले जातात. समुद्रकिनारी असलेल्या लोकांना झिंग्याचे जास्त अप्रूप वाटत नसलं तरी येथे गोंड राजाच्या आश्रयात वाढलेल्या झिंग्यांना मेजवानीत राजेशाही प्रतीक म्हणून ओळखले जाते.

***

# दिवस आठवा: भंडारा ते राजनांदगाव

मार्ग: भंडारा- लाखनी- साकोली- कोहामारा- देवरी- बाघनदी- चिंचोला- टप्पा- वनपुरी- राजनांदगाव (१५६/ १०९७ किमी)
(जिल्हे: भंडारा- गोंदिया- राजनांदगाव)
(राज्य: महाराष्ट्र- छत्तीसगढ)

सकाळी तयार होऊन आम्ही निघालो. काळोख असतानाच भंडारा शहरातून वाहणारी वैनगंगा नदी ओलांडून पुढे आलो. वैनगंगा नदी ही विदर्भातील महत्त्वाची नदी आहे. या नदीचा उगम मध्य प्रदेशातील मैकल पर्वतरांगात शिवनी जिल्ह्यात दरकेसा टेकड्यांत झाला आहे. तिथून ती बालाघाट जिल्ह्यातला सुमारे ९८ किमीचा प्रवास करुन विदर्भातल्या भंडारा जिल्ह्यात प्रवेश करते. विदर्भात ती भंडारा, गोंदिया, नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली इतक्या जिल्ह्यांमधून वाहते. मध्य प्रदेशात वैनगंगेच्या खोऱ्यात दाट अरण्ये व काही ठिकाणी सुपीक गाळाचे प्रदेश आहेत, अरुंद दऱ्या आहेत. पात्रात अनेक ठिकाणी काठावर सुमारे ६० मीटर उंचीच्या ग्रॅनाईट खडकाच्या उंच भिंती आढळतात. काही ठिकाणी नदीने पूर मैदानांचीही निर्मिती केली आहे. वैनगंगेचे खोरे तांदूळ उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. वैनगंगा नदीला वर्धा नदी मिळाल्यावर तिचे नाव प्राणहिता होते. ही प्राणहिता त्यानंतर महाराष्ट्रातून आंध्रप्रदेशात गेलेल्या गोदावरी नदीला मिळते.




आजचे अंतर जास्त होते. राजनांदगाव अजून १४५ किमी दाखवत होते. सायकल पळवायला सुरवात केली. रस्ता दोन पदरी चार लेनचा झाला होता. ठिकठिकाणी छोटे उड्डाणपूल पण होते. आजूबाजूचा भूप्रदेश सामान्यपणे सपाट असून अधूनमधून त्यावर सुट्या डोंगररांगा पसरलेल्या दिसत

होत्या. औरंगाबादनंतर इथे डोंगर दिसायला लागले होते, छोटे चढण उतार पण सुरु झाले होते. नैसर्गिक सौदर्यासोबतच नैसर्गिक साधन संपत्तीने समृद्ध अशा या भंडारा जिल्ह्यात एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी १/३ क्षेत्र जंगलाने व्यापलेले आहे. या जिल्ह्यात न्यू नागझिरा, उमरेड कऱ्हांडला आणि कोका अशी तीन अभयारण्य आहेत. त्यातील कोका अभयारण्य सुरु झाले होते. भंडारा-गोंदिया जिल्ह्यात पसरलेल्या न्यू नागझिरा व नागझिरा अभयारण्याला लागूनच असलेले १००१३ हेक्टर वनक्षेत्र शासनाने २०१३ मध्ये अभयारण्य म्हणून घोषित केले. या अभयारण्याला कोका अभयारण्य असे नाव देण्यात आले. हे अभयारण्य वन्यजीवांसाठी उत्कृष्ट अधिवास असल्याचे निदर्शनास आल्यामुळेच या जंगलाला वन्य प्राण्यांसाठी संरक्षित केले आहे. या अभयारण्याच्या क्षेत्रात वाघ, बिबट, गवा, अस्वल, काळविट, नीलगाय, सांबर, चितळ, रानडुकर इत्यादी




प्राणी आहेत. त्याचबरोबर अनेक पक्षांच्या अधिवासाने व जैवविविधतेने जंगल श्रीमंत झाले आहे. कोका अभयारण्यात जाण्यासाठी भंडाऱ्याहून १९ किमीवर असलेल्या चंद्रपूर या गावी प्रवेशद्वार करण्यात आले आहे. अभयारण्यातील जंगल सफारीचा मार्ग ४७ किमीचा आहे. या अभयारण्यात वन्य प्राण्यांचे दर्शन सातत्याने होत असल्यामुळेच पर्यटकांचा ओढा या अभयारण्याकडे वळला आहे. यामुळे पर्यटनाला चालना मिळू लागली आहे.

साकोलीला आलो. इथून अंदाजे २२ किमी अंतरावर नागझिरा वन्यजीव अभयारण्य आहे. तलावांचा जिल्हा म्हणून प्रसिद्ध असलेल्या भंडारा आणि गोंदिया जिल्ह्याच्या मधोमध असलेले नागझिरा अभयारण्य हे नवेगाव राष्ट्रीय उद्यान (१३३.८८० चौ.कि.मी), नवेगाव वन्यजीव अभयारण्य (१२२.७५६ चौ.कि.मी), नागझिरा वन्यजीव अभयारण्य (१५२.८१० चौ.कि.मी), नवीन नागझिरा वन्यजीव अभयारण्य (१५१.३३५ चौ.कि.मी) आणि कोका वन्यजीव अभयारण्य (९७.६२४) या सर्वांचे क्षेत्र मिळून तयार झाले आहे. संस्कृत भाषेत नाग या शब्दाचा अर्थ हत्ती असा आहे. फार पूर्वी या जंगलात असलेल्या हत्तींच्या जास्त

वास्तव्यामुळे या अभयारण्याला नागझिरा हे नाव पडले असावे असे म्हटले जाते. नागझिरा वन्यजीव अभयारण्याची घोषणा ३ जून १९७० साली करण्यात आली. यात जवळपास २००+ पक्षांची नोंद आहे. शिवाय ढाण्या वाघासमवेत बिबळा, रानकुत्रा, लांडगा, अस्वल, रानगवा, रानडुक्कर, चौशिंगा, नीलगाय, चितळ, सांबर, काकर, रानमांजर, ऊदमांजर, ताडमांजर, उडणखार, गरुड, टकाचोर, खाटीक, राखी धनेश, नवरंग कोतवाल अशा अनेक प्राणी आणि पक्षांचा निवास येथे आहे. या अभयारण्याच्या जवळच कोसमतोंडी, चोरखमारा, अंधारबन, नागदेव पहाडी सारखी प्रेक्षणीय स्थळे आहेत. नागझिरा वन्यजीव अभयारण्यात जाण्यासाठी पिटेझरी आणि चोखमारा असे दोन गेट आहेत. सौंदड तलावाजवळ थोडा वेळ थांबून पुढे आलो. आता कोलकाता ९९८ किमी दाखवत होते. मोहिमेचे अर्धे अंतर कापून झाले होते. आता गोंदिया जिल्ह्यामध्ये आलो होतो.



**गोंदिया जिल्हा** महाराष्ट्राच्या ईशान्य दिशेला असून मध्य प्रदेश व छत्तीसगढ राज्यालगत आहे. गोंदिया हा पूर्वोत्तर विदर्भातील जिल्हा आहे. जिल्ह्याचा बराचसा भाग वनांनी व्यापलेला आहे. जिल्ह्याचे मुख्यालय गोंदिया येथे आहे. गोंड समाज हे येथील जुने रहिवासी आहेत. त्यांचा उद्योग गोंद, डिंक आणि लाख जंगलातून आणून गावात विकण्याचा होता. त्यामुळे या शहराचे नाव गोंदिया पडले असा उल्लेख गॅझेटिअर मध्ये आहे. या जिल्ह्याचे उत्तरेस मध्य प्रदेशातील बालाघाट जिल्हा असुन पुर्वे दिशेला छत्तीसगढ राज्यातील राजनांदगाव जिल्हा आहे. दक्षिण बाजुस महाराष्ट्रातील भंडारा जिल्हा आणि पश्चिमेस चंद्रपूर जिल्हा आहे. जिल्ह्यातील आदिवासी समुदायाची स्वतःची संस्कृती आहे. ते पर्सा पेन या देवाची उपासना करतात. ते शुभ प्रसंगी आणि नवीन पिके येतात तेव्हा रेला हे नृत्य करतात. रेला हे नृत्य आदिवासी समुदायात लोकप्रिय नृत्य आहे. ढोल नृत्य हे सुद्धा लोकप्रिय नृत्य आहे. आदिवासींचे मुख्य उत्सव होळी, दशहरा आणि दिवाळी हे मुख्य उत्सव आहेत. आदिवासी घनदाट जंगलात राहतात. स्थानिक सांस्कृतिक लोकनृत्य दंडर आणि गोंडी नृत्य हे आहे. येथे हिंदी, मराठी, गोंडी, पोवार या बोलीभाषा बोलल्या जातात.

जिल्ह्यात वैनगंगा नदी ही सर्वात मोठी व सर्वात महत्वाची नदी आहे. बाग, चुलबंद, गढवी व बावनथडी सारख्या नद्या वैनगंगा नदीच्या उपनद्या आहेत. हा जिल्हा अविकसीत असुन बहुतेक जमीन जंगलाने व्यापलेली आहे. शेतीचे मुख्य पिक भात आहे. जिल्ह्यातील अन्य कृषी उत्पादन ज्वारी, अळशी, गहू आणि तूर आहे. लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. हा जिल्हा आर्थिकदृष्ट्या मागासलेला असुन संपूर्ण जिल्ह्यात कोणतेही मोठे उद्योग नाहीत. भात हे शेतीचे मुख्य पिक असल्यामुळे जिल्ह्यात तांदळाच्या अनेक गिरण्या आहेत.



गोंदिया जिल्ह्यात अनेक पर्यटनस्थळे आहेत. त्यापैकी नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा अभयारण्य, कचारगढ येथील २५००० वर्ष जुन्या नैसर्गिक गुहा, हाजरा फॉल, पदमपुर, चुलबंध धरण, डाक्राम सुकडी चक्रधर स्वामी मंदिर, बोडलकसा धरण, कामठा, सूर्यदेव मांडोदेवी, नागरा शीव मंदिर, प्रतापगढ, इत्यादी प्रसिद्ध आहेत. तिबेटी शिबिर गोठनगांव येथे असुन हे तिबेटी शरणार्थी यांचे वास्तव्याचे ठिकाण आहे. पर्यटक या ठिकाणी बौद्ध मंदिर आणि तिबेटी महत्वाचे इतर प्रेक्षणीय आकर्षणे बघण्याकरीता भेट देतात.

नाष्टाची वेळ झाली होती. नाष्टासाठी हॉटेल शोधू लागलो. शेवटी कोहामाराला एक छोटे हॉटेल दिसले. तिथे नाष्टासाठी थांबलो. कांदे पोहे व त्यावर चणाभाजीचा रस्सा, मस्तच चव होती. सगळे तुटून पडले. भजी, सामोसा आणि तिथे असलेली सर्व प्रकारची गोड मिठाई खाऊन झाली. घरगुती गावठी दुधाचा चहा झाला. या भागात लाल भोपळा भरपूर पिकतो. येथे सणाला आणि लग्नामध्ये लाल भोपळ्याची भाजी केली जातेच. या भागात सायकलींचा वापर पण भरपूर आहे. गावकरी लोक दैनंदिन कामासाठी आणि शालेय विद्यार्थी शाळेत ये जा करण्यासाठी सायकलचा वापर करताना दिसले.



इथून पुढे देवरी तालुका सुरु होतो तसेच रस्ता एकेरी होऊन नवघर नागझिरा अभयारण्यातून जातो. देवरी हा तालुका गोंदिया जिल्ह्यातील तीन नक्षलग्रस्त तालुक्यांपैकी एक आहे. तो महाराष्ट्र आणि छत्तीसगढच्या सीमेवर वसलेला आहे. नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प हे राखीव क्षेत्र जैवविवधतेने संपन्न असून कान्हा, पेंच आणि ताडोबा व्याघ्र प्रकल्पांना जोडणारा दुवा आहे. नवेगाव राष्ट्रीय उद्यानाची स्थापना २२ नोव्हेंबर,



१९७५ रोजी झाली. हे जंगल मुख्यत्वे मध्य भारतीय पानगळी प्रकारात मोडते. ऐन, हळदू, कलाम धावडा, बीजा, साग, सूर्या अशा प्रकारची झाडे या अरण्यात आढळतात. उद्यानाचा मुख्य भाग हा डोंगराळ आहे. डोंगराच्या पायथ्याशी नवेगाव नावाच्या तळयाने वेढलेले आहे. इटिडोह धरण आणि नवेगाव बांध तलाव असे दोन मोठे जलाशय येथे आहेत. माधव झरी, राणी डोह, कामझरी, टेलनझरी, अंगेझरी, शृंगार बोडी हे झरे आणि पाणसाठी येथे आहेत. हा विभाग पाणथळ आणि दलदल असलेला आहे.

नवेगावचे उद्यान हे मुख्यत्वे विविध प्रकारच्या पक्ष्यांसाठी प्रसिद्ध आहे. नवेगावच्या तळयात हिवाळयात हजारोंनी स्थलांतरित पक्षी येतात. यात विविध प्रकारची बदके, हंस, क्रौंच, करकोचे, बगळे, पाणकोंबडया, पाणकावळे इत्यादी तळयात विविध प्रकारचे पाणथळी पक्षी बघायला मिळतात तर जंगलामध्येही विविध प्रकारचे झाडीझुडुपातील पक्षी पहावयास मिळतात. प्राणी जीवनात येथे वाघ, बिबट्या, अस्वल, तरस, सांबर, नीलगाय, रानगवा, रानडुक्कर, माकडे व वानरे तसेच विविध प्रकारचे साप आढळतात यात पट्टेरी मण्यार




ही दुर्मिळ सर्पाची जात येथे आढळते. येथील सर्वात विशेष म्हणजे तलावात पाणमांजरे आढळतात. विदर्भातील पक्षीअभ्यासकांनुसार महाराष्ट्रात केवळ येथील सारस क्रौंचाची वीण केवळ नवेगाव मध्ये होते.

नितीन भाई आणि मी नेहमीप्रमाणे शेवटी होतो. बाकीचे सर्व पुढे गेले होते. जंगल सुरु झाले. नक्षलग्रस्त भाग, एकेरी छोटा रस्ता, घनदाट वन्य अभयारण्य व ठिकठिकाणी प्रवेश निषेधचे बोर्ड यामुळे भिती कमी आणि उत्सुकता जास्त वाटत होती. आजूबाजूला कोणते प्राणी पक्षी दिसत आहेत काय याचा अंदाज घेत आम्ही सायकल चालवू लागलो. घनदाट, एकमेकांना चिकटलेली झाडे आणि खाली जमिनीवर वाढलेले गवत झुडपे यामुळे जंगलातले दूरचे काहीच दिसत नव्हते. पक्षांचा आवाज येत होता. बाजूच्या झाडे झुडपे वेली वर जंगली फुले पण भरपूर आली होती.



अचानक एक मारुती गाडी बाजूला येऊन आमच्याबरोबर चालू लागली. आणि गाडी पुढे जाऊन थांबली. त्यातून एक जण उतरला आणि आम्हाला त्याने हात दाखवून थांबवले. आम्ही पण थांबलो. जुन्या चित्रपटामध्ये पळवण्यासाठी मारुती गाडी वापरायचे हे आठवले. अभयारण्यामध्ये हा कोण? नक्षलवादी तर नाही ना याचा अंदाज घेत गाडी मध्ये अजून किती जण आहेत हे पहिले आणि गाडीचा नंबर पण पाहिला. गाडी मध्ये दुसरे कोणी नव्हते आणि गाडी उत्तरप्रदेश राज्याचा नंबर असलेली होती. थोडे हायसे वाटले. त्याने जवळ येऊन कुठून आलात, कुठे जात आहेत याबद्दल विचारपूस केली. तेव्हा समजले की तो पण गावी एकटाच जातोय आणि मागे रस्त्यामध्ये आम्हा सर्वांना त्याने पहिले होते. तो वाटेत जेवणासाठी थांबल्यामुळे आम्ही पुढे आलो होतो. आणि उत्सुकतेपोटी आजूबाजूला जंगली प्राण्यांचे अभयारण्य आहे याचा न विचार करता त्याने आम्हाला थांबवले होते. आम्हाला शुभेच्छा देऊन तो पुढे निघून गेला. मग आम्हीही त्या जागी थोडा वेळ थांबून आजूबाजूला हिरवेगार निसर्ग डोळ्यात भरुन घेतला. मन प्रसन्न झाले.



डोंगरगाव देवरी करत आम्ही महाराष्ट्र छत्तीसगढ आंतरराज्य चेकपोस्ट जवळ आलो. बावनदी ओलांडून छत्तीसगढ राज्यातील राजनांदगाव जिल्ह्यामध्ये आलो. बोर्ड जवळ थांबून थोडे फोटो काढले. महाराष्ट्र राज्य सुखरुप पार करुन नवीन राज्यामध्ये प्रवेश करत होतो त्यामुळे मन आनंदित होते.

**छत्तीसगढ राज्य** भारत देशाच्या मध्य पूर्व भागात वसलेले आहे. छत्तीसगढ राज्याच्या उत्तरेला उत्तर प्रदेश व झारखंड, वायव्येला मध्य प्रदेश, पश्चिमेला महाराष्ट्र, दक्षिणेला आंध्र प्रदेश व पूर्वेला ओडीशा ही राज्य आहेत. छत्तीसगढ हे नाव पंधराव्या शतकात परिसरातील ३६ गडांवरुन पडले असावे असा अंदाज आहे. यापैकी रायपुर आणि रतनपूर क्षेत्रात प्रत्येकी १८ गड आहेत. या काळाच्या आधी या भागास दंडकारण्य-दक्षिणकोशल या नावाने ओळखले जात होते.




स्वातंत्र्यपूर्व काळात छत्तीसगढ राज्य मध्य प्रांताचा भाग होते. त्यावेळी येथे बस्तर, कांकेर, नांदगाव, खैरागढ, छुईखदान, कावर्धा, रायगढ, सक्ती, सारंगगढ, सुरगुजा, जशपूर, कोरिया, चांगभरवार आणि उदयपूर संस्थान ही १४ छोटी संस्थाने होती. तर रायपुर, बिलासपूर, दुर्ग ही खालसा राज्ये होती. भारताच्या स्वातंत्र्यानंतर १९४८ साली छत्तीसगढचा समावेष मध्य भारतात करण्यात आला. १९५० साली मध्य भारतचे नाव बदलून ते मध्य प्रदेश करण्यात आले. १ नोव्हेंबर १९५६ ला एकदा आणि महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यावर एकदा मध्य प्रदेश राज्याची नवी रचना करण्यात आली. या प्रत्येक वेळी छत्तीसगढ राज्य मध्य प्रदेशचाच भाग होते. १ नोव्हेंबर २००० ला छत्तीसगढ नावाच्या नव्या, २६ व्या, राज्याची रचना करण्यात आली.

छत्तीसगढ राज्यामध्ये तीन राष्ट्रीय उद्यान, अकरा वन्यजीव अभयारण्य आणि चार व्याघ्र प्रकल्प आहेत. त्यामुळे हे भारतातील एक महत्वपूर्ण पर्यटन केंद्र आहे. इंद्रावती राष्ट्रीय उद्यान सगळ्यात प्रसिद्ध उद्यान आहे. तसेच बरनावपारा वन्यजीव अभयारण्य, तैमूर पिंगला, कांगेर घाटी राष्ट्रीय उद्यान, पेम्ड, संजय राष्ट्रीय उद्यान, सेमरसोत, सीतानाड़ी वन्यजीव अभयारण्य,

उदंति वन्यजीव अभयारण्य, अचानकुमार वन्यजीव अभयारण्य, बादलखोल, भैरामगढ़, गोमर्दा वन्यजीव अभयारण्य इत्यादी वन्यजीव अभयारण्य आहेत.

छत्तीसगढच्या गौरवशाली संस्कृतीची ओळख देणारी कुलेश्वर मंदिर राजिम, शिव मंदिर चन्दखुरी, सिद्धेश्वर मंदिर पलारी, आनंद प्रभु कुटी विहार और स्वास्तिक बिहार सिरपुर, जगन्नाथ मंदिर खल्लारी, भोरमदेव मंदिर कवर्धा, बत्तीसा मंदिर बारसूर आणि महामाया मंदिर रतनपुर यासह पुरातत्वीय दृष्टीने अनमोल अनेक राज्य संरक्षित स्मारके आहेत. भोरमदेव, सिरपुर, राजिम बारसूर, तीरथगढ़ किंवा चित्रकूट जलप्रपात अशी काही ऐतिहासिक प्राचीन पर्यटन ठिकाणे, तसेच कांगेर घाटी राष्ट्रीय उद्यान, केशकाल घाटी, कुटूमसर गुफा, कैलाश गुफा ह्या पण प्रेक्षणीय आहेत. छत्तीसगढ सांस्कृतिक दृष्ट्या भरपूर समृद्ध आहे. येथील पंथी, सुआ, राउत नाच हे लोकनृत्य आणि आदिवासी समुहामधील करमा, गौर, सरहुल हे लोकनृत्य प्रसिद्ध आहेत.

सडक चिरचारी ला एका छोट्या धाब्यावर दुपारच्या जेवणासाठी थांबलो. जेवण तयार नव्हते थोडा वेळ जाणार होता. नितीन भाईंना छत्तीसगढी स्थानिक भाषा बोलता येत होती, त्यामुळे त्यांनी त्या भाषेत धाब्याच्या मालकाबरोबर गप्पा मारायला सुरुवात केली. आमच्या सायकल मोहिमेबद्दल ऐकून मालक खुश आणि आम्हाला मस्तपैकी स्थानिक गरमागरम जेवण मिळाले. छत्तीसगढ राज्यामध्ये प्रवेश करताच आम्हाला मस्तपैकी स्थानिक जेवण मिळाले होते. त्यामुळे आम्ही खुश होतो. सर्वजण त्यावर तुटून पडले. जेवणाबरोबर घरगुती ताक दही पण मिळाले. जेवण झाल्यावर थोडा वेळ आराम केला. गप्पा मारल्या आणि पुढे निघालो.



आजचा आमचा सायकल प्रवास भंडारा, गोंदिया, राजनांदगाव जिल्ह्यातून होता. येथे रस्त्याच्या आजूबाजूला घनदाट जंगले होती. या जंगलात समृद्ध वृक्षराजी ठायीठायी आढळते. अर्थात यातील दोनचार वृक्षच आपण ओळखू शकतो. स्थानिक लोकांशी गप्पा मारल्यावर जंगलातील अनेक गमतीजमती समजत गेल्या. येथील अभयारण्यात वाघ आणि

अनेक दुर्मिळ वन्यजीव आहेत. वनखात्याने स्थानिक आदिवासी लोकांच्या मदतीने आणि मेहनतीने हे जंगल व वन्यजीव राखले आहेत. त्यांची संख्या वाढते आहे. त्यामुळे अनेक पर्यटक हौसेने वेगवेगळ्या अभयारण्यांत सहलींचे आयोजन करत आहेत. येथील काही आदिवासी गावांचे वनखात्याने जंगलाबाहेर पुनर्वसन केले आहे. परिसरातील या गावांमधील लोकांना वनखात्याने वेगवेगळ्या स्वरुपात रोजगार दिला आहे. पर्यटनाशी संबंधित व्यवसाय, निवास, हॉटेल, इत्यादी व्यवस्था अशी साखळी येथील परिसरात आता निर्माण झाली आहे. यामुळे जंगल राखायला हवं, वाढायला हवं, वाघही टिकायला हवेत अशी आपुलकी आणि जबाबदारीची जाणीव या लोकांमध्ये जाणवत होती. जिप्सी चालक, वाटाडे, गाईड म्हणून वनखात्याने येथील स्थानिक लोकांना प्रशिक्षण दिलं आहे. ते उत्तम प्रकारे तुम्हाला जंगलाचा फेरफटका घडवून आणतात.



ही जंगले दरवेळी ऋतूनुसार वेगवेगळ्या रुपात सामोरे येतात. यातील काही भाग बांबूच्या वनांनी व्यापला आहे. येथे सापडणारे मोहाचे झाड हे आदिवासींचे कल्पवृक्ष आहे. नारळासारखे त्याचे अनेक उपयोग आहेत. त्याला आदिवासी प्रवित्र वृक्ष मानतात. ती झाडे ते कधीच तोडत नाहीत. मोहाच्या झाडाच्या फळाला टोळ म्हणतात. आदिवासी मोहफुलांचा उपयोग दारु बनवण्यासाठी पण करतात. दरवर्षी उन्हाळ्यात प्रचंड प्रमाणात मोहाची फुले गळतात. ती वेचून येथील आदिवासी लोक वर्षभराची बेगमी करतो. तो त्यांचा अन्नाचा साठा आहे. तेंदूपत्ता फुटला की तो तोडून आदिवासी वर्षभराची कमाई करतो. त्यापूर्वी तेंदूपत्ता बांधणीसाठी पारंपरिक वाक म्हणजेच झाडाची साल काढण्याचे काम अनेक कुटुंबे करीत असतात. हे सर्व मोठे धन जंगलात विखुरलेले असते आणि आदिवासी लोक अहोरात्र ते धन वेचत असतात. पण त्यांच्यामध्ये यावरुन कधी भांडण होत नाही. जंगलात विखुरलेली मोहफुले आणि तेंदूपत्ता कोणी कुठे वेचावा आणि कसा वाटून घ्यावा याची त्यांची पारंपरिक पद्दत आहे. ती त्यांना एकमेकांसोबत सहयोगी पद्धतीने जगायला शिकवते. हे येथील सांस्कृतिक नाते आहे.



या आदिवासींच्या गरज आणि आकांक्षा वेगळया आहेत. त्यांना जंगले हवेत, जंगलामधील मोकळा वावर हवा व त्यातून आवश्यक गोष्टी वापरण्याचा अधिकार हवा. बाह्य हस्तक्षेपाशिवाय, प्रभुत्वाशिवाय आपल्या पद्धतीने शांतपणे जगण्यासाठी त्यांना सुरक्षित कोपरा हवा. त्यांची गोंडी भाषा, त्यांचा वेष व त्यांची संस्कृती यांना बाहेरच्या लोकांनी हसू नये, तुच्छ लेखण्याचा अपमान करु नये व त्यांच्या जगण्यावर आक्रमण करु नये एव्हढीच त्यांची माफक अपेक्षा आहे.

येथे मिळणाऱ्या साग, बांबू आणि तेंदूपत्ता या प्रमुख वनोपजपासून मोठे उत्पन्न निर्माण होते. पण या जंगलावर संपूर्ण मालकी सरकारची असल्यामुळे त्याचा फायदा आदिवासी लोकांना फारच कमी मिळतो आणि जंगल ठेकेदारच जास्त कमवतात. जंगलमालाच्या विक्रीपासून सरकारला रॉयल्टी मिळते, ठेकेदाराला नफा मिळतो, नोकरशाहीला लाच मिळते आणि नक्षलवाद्यांनादेखील खंडणी मिळते. जंगलातला आदिवासी मजूर म्हणून खपतो फक्त. त्यामुळे येथील जनतेला जंगल हे स्वतःची संपत्ती न वाटता इतरांच्या घशात जाणारी संपत्ती वाटते. येथे उच्च प्रतीच्या बांबू मिळतो. जंगलाच्या या विराट भांडवलाचा फायदा घेत अनेक पेपर मिलचा विकास झाला आहे. हे जंगलाचे उत्पन्न सरकारकडे जाते. त्यातील अतिशय अल्प रक्कम विकास निधी म्हणून येथील आदिवासी जनतेसाठी परत मिळतो. जंगल राखण्याचे आणि त्याचे उत्पन्न स्वतःच्या विकासासाठी वापरण्याचे स्वतंत्र या आदिवासी जनतेला मिळाल्यास त्यांना जंगल हे दुसऱ्याची संपत्ती व आपल्या विकासातील अडथळा वाटणार नाही.



ग्रामीण भागातील लोक उपजीविकेसाठी शेतीबरोबरच पशुपालन यावर अवलंबून आहेत. रस्त्यामध्ये आम्हाला गाय-बैल चरायला घेऊन फिरणारे अनेक जण

दिसले. कळपामध्ये भरपूर गुरे होती. चिंचोला, तेन्दुनाला, कोहाका करत आम्ही राजनांदगावला पोहोचलो.

**राजनांदगाव जिल्हा** हा भारताच्या छत्तीसगढ राज्यात येतो. या जिल्ह्याच्या पश्चिमेला मध्य प्रदेश मधील बालाघाट जिल्हा आणि महाराष्ट्रातील गोंदिया व गडचिरोली जिल्हे आहेत. उत्तरेला कबीरधाम, दक्षिणेला उत्तर बस्तर कांकेर आणि पूर्वेला बेमेतरा, दुर्ग व बालोद जिल्हे आहेत. राजनांदगाव हे मराठी संस्थान, भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर, वल्लभभाई पटेलांनी खालसा केले, आणि तो प्रदेश १९४८मध्ये दुर्ग जिल्ह्यात विलीन केला. १९७३ सालापासून हे शहर आता राजनांदगांव जिल्ह्याचे प्रशासकीय केंद्र आहे. पूर्वी हे नंदीग्राम गावाने ओळखले जायचे. येथील प्राचीन महाल, हवेली, राज मंदिर इत्यादी या ठिकाणाच्या गौरवशाली समाज, संस्कृती, परंपरा व राजांचे महत्व व इतिहास सांगतात. येथे अनेक शासकांनी राज्य केले.

हे ठिकाण मुख्यतः लाकूडाच्या व्यापारासाठी प्रसिद्ध आहे. येथे कृषी आधारित अनेक छोटे मोठे उद्योग आहेत. ग्रामीण भागातील लोक उपजीविकेसाठी पशु पालन, दूध डेअरी, पोल्ट्री आणि मत्स्य पालन यावर अवलंबून आहेत. जंगलात राहणारे काही लोक आयुर्वेदिक औषधे तयार करणाऱ्या उद्योगांसाठी आवळा, महुआ, आंबा, सीताफळ आणि इतर काही औषधी झाडांची पाने गोळा करतात. येथे मुख्यतः तांदूळ, ज्वारी, बाजरी, वेगवेगळ्या प्रकारच्या डाळी इत्यादींचे पीक घेतले जाते.



येथे मोठया प्रमाणात चुन्याचे दगड सापडतात. तसेच वेगवेगळी खनिजे सापडतात. त्यामुळे येथे खाणी आणि खनिज क्षेत्राशी संबंधित उद्योग कारखाने आहेत. राजनांदगाव जिल्ह्यात अनेक पर्यटनस्थळे आहेत. त्यापैकी शिव मंदिर गंडई टिकरी पारा, शिव मंदिर घटियारी, नर्मदा कुंड व मराठा कालीन पंचायतन शैलीचे मंदिर, नैसर्गिक गुहा मंदीप खोल ठाकुरटोला, डोंगरेश्वर महादेव जंगलपुर, कला संगीत विश्वविद्यालय खैरागढ, जगन्नाथ मंदिर व बैरागी राजांची राजधानी, बम्लेश्वरी मंदिर डोंगरगढ, नैसर्गिक गुहा अंबागढ चौकी, पुरातत्व

संग्रहालय, मुक्ति बोध परिसर, त्रिवेणी संग्रहालय राजनांदगांव, खारा वन, मनगटा वन्यजीव उद्यान इत्यादी प्रसिद्ध आहेत.

आजचा आमचा सायकल प्रवासाचा मार्ग नक्षलग्रस्त भागातून होता. महाराष्ट्र आणि छत्तीसगढ सीमेवर असणाऱ्या या वादग्रस्त नक्षलग्रस्त भागाबद्दल आम्ही भरपूर वाचले होते, इतरांकडून ऐकले होते. येथे असणाऱ्या जंगलात लुटले जाते किंवा त्रास दिला जातो अशा घटनांचा काही जणांनी उल्लेख केला आहे. पण आम्हाला यापैकी असा काहीच वाईट अनुभव आला नाही. उलट ठिकठिकाणी गावातील लोकांकडून आमचा आदरपूर्वक पाहुणचार झाला. सर्वांशी मनमोकळेपणाने गप्पा झाल्या. येथील आदिवासी लोक गरीब आणि साधे आहेत, पण ते समाधानी आहेत. निसर्गाच्या सानिध्यात शेती करत रममाण आहेत.



आज राजनांदगावला गाडगीळ सर मुंबईहून रेल्वेने येऊन आम्हाला भेटले. आता आमची टीम नऊ जणांची झाली. एक जण वाढला त्यामुळे सर्व खुश होते. शेवटच्या क्षणाला आलेल्या ऑफिस कामामुळे त्यांना मुंबईहुन आमच्याबरोबर निघता आले नव्हते. ते अगोदरच मुक्कामाच्या लॉजवर पोहोचले होते. त्यांनी त्यांची सायकल जोडून तयार केली. रात्री जेवण झाल्यावर आम्ही शहरात फिरुन आलो.

***

# दिवस नऊवा: राजनांदगाव ते आरंग

मार्ग: राजनांदगाव- ठेकवा- देवडा- दुर्ग- भिलाई- रायपुर- रीवा- आरंग (११६/ १२१३ किमी) (जिल्हे: राजनांदगाव- दुर्ग- रायपुर)

सुप्रभात छत्तीसगढ..!! छत्तीगढ राज्यातील पहिला मुक्काम खासच होता. पहिल्यांदाच या राज्यात सायकल चालवत येत होतो आणि या भागातून प्रवास करण्यासाठी, हा प्रदेश अनुभवण्यासाठी आम्ही सर्वच आतुर झालो होतो. पहाटे तयार होऊन सर्वजण सायकल जवळ आले. तेव्हा समजले की देशमुख सरांची सायकल पंक्चर आहे. मग सकाळी तो पंक्चर काढला आणि निघालो. वाटेमध्ये जे चहाचे दुकान उघडलेले दिसले तिथे चहासाठी थांबलो. नेहमीप्रमाणे तेथील स्थानिक लोकांकडून आमच्या सायकल मोहिमेबद्दल विचापूस झाली, गप्पा रंगल्या व पुढील प्रवासासाठी शुभेच्छा मिळाल्या.



या राजनांदगाव शहरात अनेकजण आपल्या दैनंदिन जीवनामध्ये सायकलचा वापर करत आहेत, हे पाहून बरे वाटले. या भागातील गावामध्ये आम्हाला अनेक तलाव दिसले. काही तलाव तर वेगवेगळया रंगाच्या कमळाच्या फुलांनी भरलेले होते. या तलावांवर काही छोटे घाट पण बांधलेले होते. गावातील अनेकजण सकाळी आंघोळीसाठी या तलावांचा उपयोग करतात. स्त्रीया आणि पुरुषांसाठी वेगवेगळे घाट होते. आम्हाला हे समजल्यावर सकाळी आम्ही कोणत्याही तलावाच्या जवळ जायचो नाही. तलावात कमळाची फुले असली तरी लांबूनच तलाव पाहायचो आणि त्याचा फोटो पण काढायचो नाही.



रस्त्याच्या बाजूला भाताची शेते भरपूर होती. भाताच्या धान्याच्या लोंब्या तयार झाल्या होत्या. सगळी शेते पिवळीशार दिसत होती. काही ठिकाणी भात कापून भारे करुन ठेवलेले होते. थोड्या वेळाने एके ठिकाणी धाब्यावर चहासाठी थांबलो. गरमागरम चहा पिऊन पुढे निघालो. सुंदर, ठेकवा, देवडा करत अंजोर ला आलो. दुर्ग जिल्हा सुरु झाला होता.



**दुर्ग जिल्हा** छत्तीसगढ राज्याच्या मध्यभागी, शिवनाथ नदी आणि महानदीच्या खोऱ्यात वसलेला आहे. दुर्ग जिल्ह्याच्या उत्तरेला बेमेतरा, पूर्वेला रायपुर, दक्षिणेला धमतरी व बालोद आणि पश्चिमेला राजनांदगाव जिल्हे वसलेले आहेत. जिल्ह्याचा अधिकतम भूभाग मैदानी आहे. छत्तीसगढ राज्याचा औद्योगिक विकास दुर्ग जिल्हयांपासून सुरु झाला. येथील भिलाई पोलाद संयंत्र सुरु झाल्यावर आजूबाजूच्या प्रदेशात अनेक लोह, पोलाद संबंधित औद्योगिक कारखाने वसवले गेले. त्यामुळे हा औद्योगिक जिल्हा म्हणून पण ओळखला जातो.

दुर्ग जिल्हा १ जानेवारी १९०६ ला रायपुर आणि बिलासपूर जिल्ह्यातील काही क्षेत्र मिळून बनला. त्याकाळी आजचे राजनांदगाव आणि कबीरधाम म्हणजेच कवर्धा जिल्हे पण दुर्ग जिल्ह्याचा भाग होते. १९७३ ला दुर्ग जिल्ह्याचे विभाजन होऊन राजनांदगाव जिल्हा अस्तित्वात आला. १९९८ ला राजनांदगाव जिल्ह्याचे विभाजन होऊन कबीरधाम जिल्हा अस्तित्वात आला. १९०६ च्या अगोदर दुर्ग रायपुर जिल्ह्यातील एक तहसील होता. २०१२ ला दुर्ग जिल्ह्याचे पुन्हा विभाजन होऊन बेमेतरा आणि बालोद जिल्हे अस्तित्वात आले. दुर्ग जिल्हा छत्तीसगढ राज्याचा गौरव आहे. हा जिल्हा सांस्कृतिक विविधता, सामाजिक सामंजस्य आणि नैसर्गिक संसाधनांनी सजलेला असून येथे अनेक जात पंथाचे लोक राहतात. त्यांचे लयबद्ध लोक संगीत, नाटक आणि नृत्य शैली वेगळेपणा जपून आहेत.



जिल्ह्यातील प्रमुख नदी शिवनाथ असून ती महानदीची उपनदी आहे. ती राजनांदगाव जिल्ह्यातील पानाबरसच्या पर्वतांमध्ये उगम पावते. ती दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहत जात असताना दुर्ग जिल्ह्याला दोन भागात विभागते आणि बिलासपूर जिल्ह्यातील शिवरीनारायणजवळ महानदीला मिळते. शिवनदी दुर्ग जिल्ह्यातून सुमारे २५० किमी अंतर वाहते. खारुन, तांदुला, खरखरा, हाफ, संकरी, आमनेर, सोनबरसा, सुरही, जुझरा, घुघरी, गब्दा, करुणा, लोरी इत्यादी शिवनदीच्या उपनद्या आहेत.



जिल्ह्यामध्ये उच्च प्रतीचे चुन्याचे दगड मिळतात. तसेच काही खनिजे पण मिळतात. नंदिनी, सेमरिया, खुदंनी, पिथौरा, सहगांव, देउरझाल, अहिवारा, अछोली, मातरागोटा, घोटवानी, मेडेसरा इत्यादी ठिकाणी खाणी असून तेथे उत्खनन केले जाते. या खनिजांचा उपयोग भिलाई पोलाद संयंत्रामध्ये पोलाद निर्मितीसाठी केला जातो. चुन्याच्या दगडांचा उपयोग सिमेंट उत्पादनासाठी केला जातो. दुर्ग जिल्ह्यात अनेक पर्यटनस्थळे आहेत. त्यापैकी पार्श्व तीर्थ, पार्श्वनाथ मंदिर नगपुरा, मैत्री बाग प्राणी संग्रहालय, तांदुला डॅम, सियादेवी मंदिर, चंडी मंदिर, कुकूरदेव, बरबसपूर, जग्गनाथ मंदिर भिलाई इत्यादी प्रसिद्ध आहेत.

शिवनाथ नदी ओलांडून पुढे आलो. दुर्ग शहराजवळ बायपास नाक्याला नाष्टा करण्यासाठी थांबलो. येथे भरपूर वेगवेगळे छत्तीसगढी पदार्थ होते. काही ओळखीचे वाटत होते पण त्यांना येथे वेगळ्या नावाने ओळखले जात होते. येथे आम्ही सगळे नवीन वाटणारे येथील पारंपारिक पदार्थ खाल्ले. यामध्ये चीला, फरा, मुठिया, धुसका, चउँसेला पुडी, नमकीन देहरउरी, हथ फोडवा, बरा उरिददार, बरा मूंगद्ध हा



नाष्टा केला. बरा म्हणजे आपल्याकडचे भजी वडे. नंतर काही मिठाई खाल्ल्या. येथे बबरा, देहरउरी, मालपुआ, दूधफरा, अईरसा या ओल्या मिठाई आणि ठेठरी, खुरमी, बिडिया, पिडिया मिष्ठान, पची, पूरन लाडू, करी लाडू, बूंदी लाडू, मूर्रा लाडू, लाई लाडू, खाजा, कोचई पपची, चौसेला, गुलगुला इत्यादी सुक्या मिठाई प्रसिद्ध आहेत. हे सर्व सकाळच्या नाष्टाला थोडे जास्तच होत होते, पण पुढील प्रवासात हे असे पदार्थ खायला मिळतील की नाही हा विचार मनात आला आणि मग आम्ही सर्व पदार्थांची चव चाखली. खरंच छत्तीसगढी खाद्यसंस्कृती खासच आहे याचा प्रत्यय पहिल्याच दिवशी आला.

आमच्या सायकल पाहून काहीजण जवळ येऊन विचारपूस करु लागले. आमच्या सायकल मोहिमेबद्दल समजल्यावर भरपूर गर्दी जमली.येथे नेहरु नगर स्थानिक असोसिएशन, छत्तीसगढ शीख पंचायत आणि दुर्ग नगर पालिका प्रशासकीय अधिकारी यांनी आमचे स्वागत केले. त्यामध्ये देविंदर सिंग भाटिया, इंदर बीर आनंद, सुखबीर ब्रोका, सुनील दुबे, फारुक अन्सारी इत्यादी अनेक नागरिक होते. सर्वांनी आमच्या सायकल मोहिमेला शुभेच्छा दिल्या. सर्वांबरोबर गप्पा रंगल्या. स्थानिक चॅनलसाठी मुलाखती झाल्या. त्या सर्वांचे आभार मानून आम्ही भिलाईला निघालो.



दुर्ग भिलाई परिसरात अनेक पोलाद कारखाने आणि इतर उद्योग आहेत. येथील बहुतेक कामगार आणि नागरिक मोठ्या प्रमाणात सायकलचा वापर करतात. इथे रस्त्यावर आम्हाला एकत्र सायकल चालवत कामावर जाणारे भरपूर ग्रुप दिसले. बहुतेक जणांच्या सायकलला दुपारचा जेवणाचा डब्बा होता. काहीजण तर घोडा सायकलवर बायकोला किंवा दुसऱ्याला डबलसीट घेऊन जाणारे पण दिसले. काही जण आम्हाला मागे टाकून वेगात पुढे पण निघून गेले. या सर्वांबरोबर गप्पा मारत आम्ही निघालो.

भिलाईमध्ये असणारे भिलाई इस्पात संयंत्र म्हणजेच भिलाई स्टील प्लांट हे भारत देशातील प्रमुख इस्पात उत्पादक संयंत्र आहे. त्याची स्थापना १९५५ मध्ये येथे करण्यात आली. इस्पात हे स्टील व पोलाद या नावाने पण ओळखले जाते. हा पोलाद कारखाना रेल्वे




पटरी, मोठ्या पोलाद प्लेट उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. पोलाद हा लोह व कार्बन यांपासून बनवला जाणारा मिश्रधातू आहे. त्यात लोहाचे प्रमाण जास्त असते व कमी प्रमाणात कार्बन असतो. पोलादाचे तीन प्रकारात वर्गीकरण करतात. ०.३ टक्केपर्यंत कार्बन असलेल्या पोलादास मध्यम पोलाद म्हणतात. ०.३ ते ०.६ टक्के कार्बन असेल तर मिडीयम पोलाद संबोधले जाते. तसेच ०.६ टक्क्यावर कार्बन असेल तर त्यास उच्च पोलाद म्हणतात. पोलादाचा पुनर्वापर होतो. लोखंडी भंगारापासून पुन्हा नवे पोलाद ओतले जाते. ते असे पुन्हा पुन्हा ओतूनही करुनही त्याच्या गुणवत्तेत फरक पडत नाही. तेवढेच मजबूत राहते. जूनी जहाजे तोडूनही त्यातून असे भंगार पोलाद मिळवले जाते. भारतात उत्पादन होणाऱ्या पोलादामध्ये मध्यम पोलादाचे प्रमाण सर्वांत जास्त आहे.

पोलादाच्या मिश्रधातूंचा फायदा असा असतो की मूळ धातूपेक्षा वेगळे व चांगले गुणधर्म त्यात असतात. मॅंगेनीज धातू पोलाद निर्मिती प्रक्रियेत वापरुन पोलादाचा कणखरपणा वाढवला जातो. त्याच प्रक्रियेत शिसे हा धातूही वापरला जातो. लोखंडापेक्षा पोलाद अनेकपटीने मजबूत, कणखर असते. पोलादामध्ये आणखी एक घटक मिळवून त्यापासून विशेष पोलाद बनवले जाते. पोलादमध्ये क्रोमियम मिळवले तर त्यापासून स्टेनलेस स्टील पोलाद बनते. स्टेनलेस म्हणजे डाग न पडणारे. स्वयंपाकाची भांडी बनवण्यासाठी याचा



उपयोग होतो. तसेच पोलादात निकेल, तांबे, शिसे, मॅंगेनीझ, सिलिकॉन इत्यादी घटक पदार्थही मिळवून विशेष प्रकारचे पोलाद बनवले जाते. पोलाद वर जस्ताचा मुलामा देऊन त्यापासून ग्लॅल्वनाईझ्ड पोलाद तयार होते. अश्या प्रकारचे एकूण ऐंशीवर धातू आज ज्ञात आहेत. त्यात पोलादाला खूप महत्त्वाचे स्थान आहे. पोलादाचे उत्पादन व वापर किती आहे हे, त्या देशाच्या आर्थिक विकासाचे निर्देशक मानले जाते. कारण त्याचा वापर पायाभूत

सुविधा क्षेत्रात होतो. पोलादाचा वापर बांधकाम क्षेत्रात होतो. घरे, पूल बांधताना ते वापरले जाते. वाहन उद्योगात क्षेत्रात, यंत्रे तसेच घरगूती उपकरणे, रेल्वे, वीज अशा क्षेत्रात पोलादाचा वापर होतो. होतो. संरक्षण खात्याच्या साधन सामुग्रीत मोठ्याप्रमाणात पोलाद वापरात येते.



भिलाईहून तीस किमी अंतरावर रायपुर शहर होते. नितीन भाईंच्या लहानपणी, कुटुंब नोकरीनिमित्त रायपुरला वास्तव्याला होते. त्यांच्या स्वभावामुळे येथे ओळखीची, घरगुती संबंध जपलेली अनेक माणसे जोडलेली गेली. आज दुपारचे जेवण रायपुरला त्यांच्या ओळखीच्या बेबी दीदीच्या घरी होणार होते. रायपुर शहराबाहेर सिडनी सरांची सायकल पंक्चर झाली. सर्व्हिस रोडला बाजूला थांबून पंक्चर काढला आणि पुन्हा हवा भरताना त्यांनी जास्त हवा भरली त्यामुळे पुन्हा पंक्चर झाला. ट्यूब फाटली आणि टायरला भोक पडले. ते दुरुस्त करुन आम्ही रायपुर शहरात निघालो.

नितीन भाईंचे मित्र आमची वाट पाहत होते. आम्हाला उशीर झाला म्हणून ते न्यायला अर्ध्या वाटेमध्ये आले. घरी गेल्यावर आमचे आदरपूर्वक स्वागत झाले. नितीन भाई आणि



आम्ही येणार म्हणून आज सर्वजण घरी थांबले होते. नितीन भाईंची बेबी दीदी, नसू, झक्की, अकिब, हसीफ आणि त्यांचे इतर नातेवाईक पण जमा झाले होते. सर्वांबरोबर गप्पा रंगल्या.

आमच्या सायकल धुळीमुळे खराब झाल्या होत्या. बाजूलाच गाड्यांचे सर्व्हिस सेंटर होते, तिथे आम्ही आमच्या सायकल धुण्यासाठी दिल्या आणि त्याला फक्त पाणी मारुन सायकल धुवायला सांगितले. त्यावेळेला इतर काम चालू असल्याने त्याने दोन तासानंतर

येण्यासाठी सांगितले. आम्ही जेवण करण्यासाठी परत आलो. दुपारचे जेवण थोडे जास्तच झाले. खास मटण बिर्याणीचा बेत होता. शाहाकारी मित्रांना पनीर भाजी, दाल, रोटी, पुलाव असा मेनू होता. नंतर गोड खीर त्यामुळे झोप यायला लागली. सिडनी सरांच्या सायकलचा टायर थोडा फाटलेला होता. त्यामुळे ते नवीन टायर आणण्यासाठी शहरात मोटारबाईकवर गेले. नितीनभाई इतर नातेवाईकांना भेटण्यासाठी गेले. आम्ही पण थोडा वेळ आराम केला. शहरात सिडनी सरांना नवीन टायर मिळाला नाही पण त्या मापाचे दोन जुने टायर मिळाले व ते घेऊन आले. थोड्या वेळाने आम्ही सर्व बाजूला असलेले स्वामी विवेकानंद सरोवर पाहायला गेलो. येताना सायकल घेऊन आलो. सर्वांच्या सायकल चकाचक झाल्या होत्या. रायपुरला राहण्यासाठी आग्रह झाला. पण आजचा आमचा मुक्काम आरंगला ठरलेला असल्यामुळे आम्ही आदरपूर्वक नकार दिला. चहा झाला आणि सर्वांचा निरोप घेऊन पुढे आरंगला निघालो. कुटुंबातील काहीजण आम्हाला शहराबाहेर सोडण्यासाठी व रस्ता दाखवण्यासाठी आमच्याबरोबर आले.





रायपुर शहरात सायकलसाठी वेगळा स्वतंत्र मार्ग आहे. यावरुन फक्त सायकल चालवल्या जातात. आम्ही रायपुर शहरातील तेलीबांधा तलावाजवळ आलो. आमच्या सायकल पाहून अनेकांनी विचारपूस केली. अनेकांनी आमच्या सोबत



फोटो, सेल्फी काढून घेतली. त्यांच्याबरोबर गप्पा रंगल्या. त्यावेळेला हैद्राबादमध्ये डॉक्टरबरोबर घडलेल्या दुःखद घटनेच्या निषेधार्थ सर्वजण जमले होते. आम्हीही थोडा वेळ थांबून आदरांजली वाहिली. रायपुर शहर हे छत्तीगढ राज्याची राजधानी आणि रायपुर जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय असल्यामुळे खूपच मोठे आणि विस्तारलेले आहे.

**रायपुर जिल्हा** छत्तीसगढ राज्याच्या मध्यभागात स्थित आहे. या जिल्ह्याच्या उत्तरेला बलौदाबाजार भाटापारा, पूर्वेला महासमुंद, दक्षिणेला गरियाबंद व धमतरी आणि पश्चिमेला बेमेतरा व दुर्ग हे जिल्हे वसलेले आहेत. महानदी आणि खारुन या जिल्ह्यातून वाहणाऱ्या नद्या असून येथे अनेक पिके घेतली जातात. हा भाग धान्याचे कोठार म्हणून ओळखला जातो.



ऐतिहासिक आणि पुरातत्वीय दृष्टीने रायपुर जिल्हा दक्षिण कोशल साम्राज्याचा भूभाग होता. येथे अनेक शासक होऊन गेले. असे सांगितले जाते की कलचुरी वंशाचा राजा रामचंद्र याचा पुत्र ब्रह्मदेव राय याने १४०२ मध्ये रायपुर नगर वसवले आणि येथे राजधानी बनवली.

रायपुरहून निघेपर्यंत काळोख झाला होता. संध्याकाळचे साडेसहा वाजले होते. आजचे मुक्कामाचे ठिकाण आरंग हे तीस किमी दाखवत होते. आरंगला नितीन भाईच्या ओळखीचे साहू कुटुंब होते. त्यांचे तिथे रिंकू फॅमिली रेस्टोरेन्ट नावाचे हॉटेल होते. सोबतच ते नवीन लॉज सुरु करणार होते. लॉज तयार झाला होता आणि त्याचे उदघाटन आमच्यामार्फत होणार होते. सर्वजण आमची वाट पाहत होते.

सर्वांनी सायकलला असणाऱ्या पुढच्या आणि मागच्या लाईट चालू केल्या आणि सायकल चालवत निघालो. रायपुर शहरापाहून वीस किमी अंतरावर नया रायपुर शहर वसवले गेले आहे. तसेच विमानतळ, क्रिकेट स्टेडियम आणि औद्योगिक कारखाने पण रायपुर शहराबाहेर आहेत. हे सर्व आमच्या रस्त्यावर होते त्यामुळे रस्त्याला लाईट आणि वाहनांची ये-जा भरपूर होती. रायपुरला आमचा थोडा जास्त वेळ गेला होता त्यामुळे आरंगला रात्री उशिरा आठ वाजता पोहोचलो. उशीर झाल्यामुळे आम्हाला वाईट वाटत होते.

आरंगला साहू कुटुंबियांच्या रिंकू फॅमिली रेस्टोरेन्ट हॉटेलजवळ पोहोचलो. तिथे तर आमची वाट पाहत भरपूर जण जमले होते. आम्ही आलो कळल्यावर अजून अनेकजण जमा झाले. आरंगमधील मान्यवर व्यक्ती आल्या. आमचे जोरदार स्वागत झाले.



आम्हा सर्वांना हार घालण्यात आला. पेढे वाटले गेले. आम्ही हे असे काही अपेक्षित केले नव्हते. तो एक न विसरता येणारा क्षण होता.

त्या लॉजमध्ये राहणारे आम्ही पहिलेच ग्राहक होतो. त्यामुळे प्रत्येक रुममध्ये सर्वच वस्तू नवीन होत्या. पलंग, चादर, उश्या, पडदे, पंखा, बादली, टप, टॉवेल इत्यादी सगळेच नवीन होते. जेवणाचा बेत तर भारीच होता. जेवणामध्ये खास छत्तीसगढमधील स्थानिक लोकप्रिय पक्वान्न होते. यामध्ये छत्तीसगढी इढहर, अरबी पत्ता, कोचई पत्ता कढी हा पदार्थ मस्तच होता. यामध्ये अळूच्या वड्या तयार करुन त्या कढीमध्ये किंवा भाजी बनवून खाल्ल्या जातात. आम्ही सर्वजण पोटभर जेवलो. आजचा दिवस खासच होता.

***

# दिवस दहावा: आरंग ते सरायपाली

मार्ग: आरंग- बिरकोनी- पटेवा- पिथोरा- संकरा- बासना- सरायपाली (१२४/ १३३७ किमी) (जिल्हे: रायपुर- महासमुंद)

सकाळी तयार होऊन खाली आलो. पार्किंगची वेगळी सोय नसल्यामुळे सर्व सायकली हॉटेलमध्ये आत उभ्या केल्या होत्या त्या बाहेर काढल्या. हवा तपासली आणि पॅनिअर लावले. काल मिळालेले हार सर्वांनी सायकलला बांधले. मस्तपैकी कडक चहा झाला. सर्वांचे आभार मानून आम्ही निरोप घेतला. जवळच भांड देवल मंदिर होते. ते पाहण्यासाठी आम्ही गावामध्ये शिरलो. सकाळची वेळ होती त्यामुळे मुख्य दरवाजाला कुलूप होते. आमच्या सायकल पाहून गावात गर्दी जमा झाली. त्यापैकी एकाने कुलुपाची चावी आणली व आम्ही आत मंदिराजवळ आलो.



महानदी किनारी असलेले आरंग हे एक प्राचीन पौराणिक आणि ऐतिहासिक नगर आहे. प्राचीन महाभारत काळात इथे मोरध्वज याची राजधानी होती. एका आख्यायिकेनुसार कृष्णाच्या सांगण्यावरुन मोरध्वज राजाने आपला मुलगा ताम्रध्वज याचे अंग, आरा म्हणजेच करवत या लाकूड कापण्याच्या हत्याराने चिरले. आरा आणि अंग या दोन शब्दापासून उत्पत्ती होऊन या नगराचे नाव आरंग पडले. या परंपरेनुसार या गावामध्ये आतापर्यंत आरा या हत्याराचा उपयोग केला जात नाही.

आरंग हे जैन धर्म अनुयायांचे प्रमुख स्थळ आहे. येथे प्राचीन जैन मूर्तींशिवाय गुप्त कालीन मुद्रा, राजर्षितुल्य कुल वंश, शरभपुरीय आणि कलचुरी काळातील अनेक अभिलेख सापडले आहेत. येथे भरपूर ठिकाणी प्राचीन मूर्ती आणि मंदिरांचे अवशेष पडलेले आहेत. आरंगमध्ये प्राचीन काळातील अनेक हिंदू आणि जैन मंदिरे आहेत.

यापैकी नऊव्या शतकात हैहय वंशीय राजांनी बनवलेले भांड देवल मंदिर एक प्रमुख जैन मंदिर आहे. या पाश्चिमाभिमुखी मंदिराचा मंडप नष्ट झाला असून गाभाऱ्यामध्ये तीन जैन तीर्थकरांच्या मूर्ती आहेत. मंदिराच्या बाहेरील भिंतींवर नृत्य करणाऱ्या अप्सरा, यक्ष, यक्षी, मृदूंग ढोल वाजवणारे स्त्री पुरुष अशा खजुराहो मंदिरासारख्या विविध अलंकृत मूर्ती कोरलेल्या आहेत. हे मंदिर भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने स्मारक म्हणून जतन केलेले आहे. त्यामुळे हे पाहण्यासाठी अनेक पर्यटक येथे येतात. प्राचीन भांड देवल



मंदिर पाहून बाहेर आलो, थोडा वेळ लोकांबरोबर गप्पा मारल्या. गावातील काही लहान मुले पण त्यांच्या सायकल घेऊन जमली. आमच्या मोहिमेबद्दल आणि सायकल चालवण्याचे महत्व सांगून आम्ही पुढे निघालो. येथे अनेकजणांना मराठी भाषा पण समजते आणि तोडकीमोडकी बोलता येते.

थोड्या वेळात महानदीच्या पुलावर आलो. समोर सूर्य नुकताच उगवून ढगांमागे लपाछपी खेळत होता. सायकल थांबवून महानदी पाहिली. नदीचे पात्र खूपच विस्तारलेले



होते आणि पाणीही खूप होते. नदीच्या सुकलेल्या पात्रामध्ये वाळू जमा करणे चालू होते. महानदी ही छत्तीसगढ आणि ओडिशा या राज्यामधील मोठी नदी आहे. या नदीचा उगम रायपुर जवळ धमतरी जिल्ह्यातील सिहावा पर्वतरांगेत झाला असून ती अंदाजे ८५५

किमीचे अंतर पार करुन बंगालच्या उपसागराला मिळते. पैरी, सोंढुर, शिवनाथ, हसदेव, अरपा, जोंक, तेल इत्यादी उपनद्यांकडून महानदी मोठ्या प्रमाणात पाणी ग्रहण करते आणि नावाप्रमाणे विशाल रुप धारण करते. छत्तीसगढ मध्ये महानदीच्या तीरावर धमतरी, कांकेर, चारामा, राजिम, चम्पारण, आरंग, सिरपुर, शिवरी नारायण आणि ओडिशामध्ये सम्बलपुर, बलांगीर, कटक इत्यादी ठिकाणे आहेत.

महानदीचा अनेक प्राचीन ग्रंथांमध्ये उल्लेख असून तिला कनकनंदिनी, मंदवाहिनी, चित्रोत्पला, निलोत्पला, महानंदा, महाश्वेता अशा नावाने ओळखले जाते. या नदीच्या



खोऱ्यामध्ये अनेक राज्ये, नगरे, संस्कृती उदयाला आल्या. गंगा नदीसारखी पवित्र असल्याने या नदीच्या तटावर अनेक ऐतिहासिक मंदिरे, घाट, धार्मिक, ललित कला तसेच व्यापारी केंद्र आहेत. प्राचीन काळी या नदीचा उपयोग दळवळणासाठी केला जात असे. व्यापारी जलमार्गाने येथील वस्तूंची आयात निर्यात कोलकाता आणि समुद्रकिनारी असलेल्या बाजारांपर्यंत करत असत. महानदी ओलांडून पलीकडे आलो. रायपुर जिल्हा संपून महासमुंद जिल्हा सुरु झाला.

**महासमुंद जिल्हा** सांस्कृतिक इतिहासासाठी प्रसिद्ध आहे. या जिल्ह्याच्या उत्तरेला बलौदाबाजार भाटापारा व रायगढ, पश्चिमेला रायपुर आणि दक्षिणेला गरियाबंद हे जिल्हे आहेत. पूर्वेला ओडिशा राज्यातील बारगढ जिल्हा आहे. या जिल्ह्याचे प्रशासकीय केंद्र महासमुंद येथे आहे. महासमुंद हे नाव गुप्त साम्राज्यातील राजा समुद्रगुप्त याच्या नावावरुन पडले असे सांगतात. गुप्त साम्राज्याचा काळ भारतीय इतिहासातील सुवर्णकाळ होता. या काळात भारताने कला, साहित्य व विज्ञानात खूप मोठी मजल मारली. या गुप्त साम्राज्याचा कार्यकाळ इ.स. २४० ते इ.स. ५५० पर्यंत मानला जातो. दक्षिण कोशल मोहिमेच्या वेळेला राजा समुद्रगुप्त आपल्या सैन्यासह इथे महानदीच्या किनारी वास्तव्याला होता. त्यामुळे महासमुंद हे नाव तयार झाले.

नैसर्गिक समृद्धतेने नटलेला हा जिल्हा असून येथे अनेक जंगले, अभयारण्य, प्राचीन धार्मिक क्षेत्र आहेत. इथे मोठ्या प्रमाणात तांदूळ पिकवला जातो. या जिल्ह्यातील बागबहरा, बसना आणि पिथोरा या भागात ग्रॅनाईट खडक सापडतात. येथे लाईम स्टोन, शेल, सॅण्ड स्टोन, डोलेराइट अशा अनेक प्रकारचे खडक सापडतात. त्यामुळे येथे भरपूर खाणी असून त्यावर आधारित उद्योग आहेत.



प्राकृतिक सुंदरता, रंगारंग उत्सव आणि सणांसाठी हा जिल्हा प्रसिद्ध आहे. येथे वर्षभर अनेक जत्रा आयोजित केल्या जातात. त्यापैकी चैत्र महिन्यातील रामनवमी जत्रा, वैशाख महिन्यातील अक्थी जत्रा, आषाढ मधील माता पहुंचनी जत्रा इत्यादी भव्य जत्रा स्थानिक लोकांमध्ये भरपूर लोकप्रिय असून त्यात भाग घेण्यासाठी अनेक पर्यटक पण येतात. याशिवाय येथे राहणाऱ्या आदिवासी गावातील रंगीबेरंगी संस्कृती, कला पण आंतरराष्ट्रीय पर्यटकांमध्ये प्रसिद्ध आहे. या जिल्ह्यात कलाकृतीने नटलेली अनेक प्राचीन मंदिरे आणि पर्यटनस्थळे आहेत. त्यापैकी सिरपुर, चंडी मंदिर बीरकोनी, गौधारा दलदली, चंडी मंदिर घुंचापाली, खल्लारी माता मंदिर, श्वेत गंगा बम्हनी इत्यादी प्रसिद्ध आहेत.

रस्त्याच्या दोन्ही बाजूला पिवळ्याधम्मक रंगामध्ये भाताची शेते सजली होती. काही शेतांमध्ये भाताची रोपे कापलेली होती, पेंढा जमा करुन ठेवलेला होता. काही गाववाले सायकल घेऊन घराबाहेर पडले होते. काहीजण सायकलला जेवणाचा डब्बा अडकवून कामावर निघाले होते. आज सकाळपासून ढगाळ वातावरण होते. धुके अजून पण गायब होते नव्हते. हवेत गारवा होता. बिरकोनीला कोडार नदी ओलांडून पुढे आलो. बिरकोनीचे चंडी माता मंदिर प्रसिद्ध आहे.



तुमगावजवळ एक ढाबा दिसला. तिथे चहासाठी थांबलो. थोडा आराम करुन पुढे निघालो. बीरबीरा गावाजवळ कोडार नदीवर धरण बांधल्यामुळे मोठा जलाशय निर्माण झाला आहे. या कोडार जलाशयाला शहिद वीर नारायण सिंह जलाशय म्हणतात. पूर्वी या भागामध्ये दुष्काळ पडत असे. त्यामुळे १९८१ मध्ये कोडार नदीवर धरण बांधले गेले. महासमुंद जिल्ह्यातील हे सर्वात मोठे धरण आहे. या जलाशयातून कालवे काढून पाणी दूरपर्यंत नेण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यातील अनेक गावे सिंचनाखाली आली. या पाण्यावर अनेक पिके घेतली जाऊ लागली.



शहिद वीर नारायण सिंह हे छत्तीसगढ राज्यातील पहिले स्वतंत्रता संग्राम सेनानी होते. ते वंशपरंपरेने सोनाखान भागातील गावांचे जमीनदार होते. ते देशप्रेमी आणि गरिबांचे कैवारी होते. १८५६ मध्ये सोनाखानला दुष्काळ पडला. त्यामुळे त्यांनी इंग्रजांच्या सावकारांकडून गावातील गरीब जनतेसाठी धान्याची मदत मागितली आणि धान्य पिकल्यावर परत करण्याचे आश्वासन दिले. सावकारांनी धान्य देण्यास नकार दिला त्यामुळे त्यांनी धान्याचे गोदाम तोडून गरीब जनतेमध्ये धान्य वाटले. इंग्रजांविरुद्ध लढा पुकारण्यामुळे १८५७ मध्ये इंग्रजांनी त्यांना पकडून रायपुरला जय स्तंभ चौकात फाशी दिली आणि शव तोफेने उडवण्यात आले. शहिद वीर नारायण सिंह यांना सन्मान म्हणून कोडार धरणाला त्यांचे नाव देण्यात आले.



थोड्या वेळाने सिरपुर नाक्याजवळ आलो. आंतरराष्ट्रीय पर्यटकांमध्ये सिरपुर ऐतिहासिक आणि पुरातत्विक महत्वामुळे आकर्षणाचे केंद्र बनले आहे. पाचव्या ते आठव्या शतकादरम्यान सिरपुर दक्षिण कोशल राज्याची राजधानी होती. हे स्थळ पवित्र महानदीच्या

किनारी वसलेले आहे. सोमवंशी राजांच्या काळामध्ये हर श्रीपुर नावाने ओळखले जायचे. येथे सांस्कृतिक आणि वास्तुकौशल्य कलेच्या अनमोल कलाकृती आहेत. प्राचीन काळी हे विज्ञान आणि अध्यात्म यांच्या शिक्षणाचे मोठे केंद्र होते.

रस्त्याच्या आजूबाजूला अनेक ठिकाणी वन्यजीव क्षेत्र, जंगल होते. ठिकठिकाणी वन्य प्राणी रस्ता ओलांडून पलीकडे जात असल्यामुळे, येथे वाहने हळू चालवण्याविषयीचे फलक लावलेले होते. भातशेतीबरोबरच काही ठिकाणी फुलझाडांचे मळे होते. कुहरी, जोगीदीपा करत पटेवा ला आलो. येथून जवळच बारनवापारा वन्यजीव अभयारण्य आहे. महासमुंद आणि बलौदाबाजार जिल्ह्याच्या सीमेवर असलेले बारनवापारा वन्यजीव अभयारण्य सुमारे २४५ चौकिमी क्षेत्रावर पसरले असून १९७६ साली या जंगलास अभयारण्याचा दर्जा देण्यात आला. या अभयारण्यामध्ये वाघ, हरण, बिबळ्या, रानगवे, चिंकारा, सांबर, नीलगाय, वानर, अजगर, नाग, बगळे, पोपट, मोर, बुलबुल असे अनेक प्रकारचे प्राणी आणि पक्षी आहेत. साग, तेंदू, बीर, सेमल, साक, टीक, बेंत, महुआ आणि इतर औषधी झाडे येथे सापडतात. या अभयारण्यांमधून बलमदेई नदी वाहते. वनस्पती विविधता आणि अद्वितीय वन्यजीवन यामुळे येथे अनेक पर्यटक येतात.






घड्याळात नऊ वाजून गेले होते. अनेक विद्यार्थी ग्रुपने सायकल चालवत शाळेत जात होते. काही जण सायकल वर डबलसीट होते. या सर्वांबरोबर गप्पा मारत आम्ही निघालो. येथे माध्यमिक शाळा आणि कॉलेज काही गावांपासून दूर असल्याने भरपूर जण नेहमी ये-जा करण्यासाठी सायकलचा वापर करतात. नाष्ट्याची वेळ झाली होती. फुलवारी जवळ एक छोटे हॉटेल दिसले. तिथे थांबून पोटभर नाष्टा

केला. चीला डोसा, बफौरी मिक्स दाल, धुसका, बरा आणि काही गोड मिठाई खाल्ल्या. हॉटेलमध्ये जे स्थानिक पदार्थ नवीन दिसले तेपण खाल्ले. गरमागरम गावठी दुधाची चहा झाली. बाजूलाच सायकल दुरुस्तीचे दुकान होते. तिथे गाडगीळ सरांनी जुन्या



ट्यूबमधील पंक्चर काढून घेतला. गाववाल्यांबरोबर गप्पा मारल्या.



रस्त्यामध्ये एक जण बाईक वर उलटी सायकल घेऊन जाणारा दिसला. आम्हाला वाटले त्याची सायकल बिघडली किंवा पंक्चर झाली असेल म्हणून त्याला काही मदत पाहिजे का याबद्दल विचारले. त्याच्या सायकलला काही झाले नव्हते व तो एका ठिकाणाहून दुसरीकडे जात होता. आतापर्यंतच्या आमच्या प्रवासात एकाच्याही सायकलमध्ये मोठा बिघाड झाला नव्हता हे महत्वाचे होते.

धांक टोल नाक्याजवळ सरबत पिण्यासाठी व पाणी भरण्यासाठी थांबलो. खुर्चीवर काही वेळ बसलो आणि तेव्हढ्या वेळात अक्षय डोळे मिटून झोपला पण. याच्या नंतरची तीन गावे डुमरपाली, सिंगुपाली आणि सिंधुपाली त्यांच्या नावामुळे लक्षात राहिली.



वरती उन्हाचे चटके वाढले होते. पिथौरा बायपासला पोहोचलो. तिथे दोघे जण थंड




पाण्याच्या बाटल्यांचे दोन बॉक्स घेऊन उन्हामध्ये आमची वाट पाहत उभे होते. आम्हाला त्यांनी थांबवले, आम्ही पण आश्चर्यचकित झालो. विचारपूस केल्यावर समजले की पिथौरामध्ये राहणारे श्री घनश्याम राजपूत यांनी गाडीने रायपुरला जात असताना आम्हाला पहिले होते. त्यांनी त्यांचा मुलगा अभय याला फोन करुन आमचे स्वागत करण्यासाठी पिथौरा शहराबाहेर बायपासला पाठवले होते. अभय एमबीबीएस डॉक्टरकीचे शिक्षण घेत होता. वडिलांचे ऐकून,



अभय आणि त्याचा मित्र थंड पाणी घेऊन आमची वाट पाहत उन्हामध्ये उभा होता. हे समजल्यावर आम्हाला कसेतरीच वाटले. आम्ही भारावून गेलो. त्यांच्याकडून जेवणासाठी आग्रह झाला पण आम्हाला पुढे जास्त अंतर जायचे होते त्यामुळे आम्ही त्यांना मान देऊन फक्त चहासाठी थोडा वेळ थांबलो. थोड्या गप्पा झाल्या आणि सर्वांचे आभार मानून आणि निरोप घेऊन आम्ही पुढे निघालो.

पिथौरा हे तालुक्याचे ठिकाण आहे. हे क्षेत्र पिथौरा चित्रकलेसाठी प्रसिद्ध आहे. येथे या कलेचा उगम झाला असे मानले जाते. पिठौरा नावाचा सण भिल, भिलाला तसेच राठवा या आदिवासी समूहामध्ये साजरा केला जातो. या सणाला घराच्या भिंतींवर आदिवासी देवी, देवता, चंद्रमा, सूर्य, वानर इत्यादी प्राण्यांची चित्र काढली जातात. ती रंगवण्यासाठी पारंपरिक रंगांचा वापर केला जातो. या भिंतीवरील चित्रांमुळे घरामध्ये शांती खुशहाली निर्माण होते असे आदिवासी मानतात.



टेका नंतर मेम्र गावाजवळ एक छोटे वाघदेवी दुर्गा माता मंदिर होते. तिथे सावलीमध्ये थोडा वेळ थांबलो. नितीन भाईंनी झाडाच्या पानाची पिपाणी बनवून वाजवायला सुरवात केली. नंतर पानाची भिंगरी बनवून इकडून तिकडून धावत पळत जाऊन फिरवून आले. लहानपणीचे खेळ सुरु झाले.

नारायण, फडतरे, गाडगीळ सरांनी पुढे जाऊन जेवणासाठी ढाबा शोधून ठेवला होता. भोकलूडीह गावाजवळ असलेल्या या धाब्यावर सर्वजण पोहोचले. जेवणाची ऑर्डर दिलेली होती. जेवण येईपर्यंत आज काय काय झाले त्याबद्दल गप्पा चालू होत्या. काही जण मोबाईल मेसेज पाहत होते आणि काही जण झोडे मिटून झोपले पण होते. वेळेचा पूर्ण सदुपयोग आम्ही करत होतो. जरा वेळ मिळाला की पटकन डुलकी काढायचो. तेव्हढेच ताजेतवाने वाटायचे.



भूक जोरात लागली होती. मस्तपैकी गरमागरम जेवण येताच सगळे तुटून पडले. चना करेला, झोझा, अंगाकर रोटी, सोहारी, लोबिया झुरगा सब्जी, चावल, दाल, चटणी असे चमचमीत जेवण होते. नंतर बोरे बासी हा या भागातील एक प्रसिद्ध पदार्थ खाल्ला. हा पदार्थ तांदूळ पाण्यामध्ये रात्रभर भिजवून बनवला जातो आणि दह्याबरोबर खाल्ला जातो. तो उन्हाची गरमी कमी करण्यासाठी लाभदायक आणि शक्तिवर्धक आहे. हे झाल्यावर सगळे आडवे झाले. थोडा आराम केला आणि पुढे निघालो.

जोंक नदी ओलांडून संकराला पोहोचलो. जोंक नदी ही महानदीची उपनदी आहे. ती पिथौरा जवळ उगम पावते. ९० किमी वाहत जाऊन ती बलौदाबाजार जिल्ह्यातील मरकानाजवळ शिवरीनारायणच्या विरुद्ध तीरावर महानदीला मिळते. ही नदी बारनवापारा

वन्यजीव अभयारण्यांमधून जाते. काही ठिकाणी रस्त्याच्या बाजूला एकाच प्रकारची अनेक घरे बांधलेली होती. आम्ही थांबून विचारले तेव्हा समजले की अनेक जंगले अभयारण्ये वन्यजीव प्राण्यांसाठी राखून ठेवली असल्यामुळे तिथे जंगलात राहणाऱ्या आदिवासी लोकांचे पुनर्वसन नवीन गावे तयार करुन केले गेले आहे. त्यांना नवीन घरे बांधून दिली गेली, शाळा बांधल्या गेल्या. शिक्षण आणि इतर सुखसोई दिल्या गेल्या. त्यामुळे काही जणांना हे पटतेय तर काही जण त्यांचे मूळ जंगलातले आदिवासी पाडे सोडायला तयार नाहीत.



काही ठिकाणी आदिवासी लोकांचे जबरदस्तीने पुनर्वसन करुन तेथे खाणी पाडल्या जात आहेत. येथे मुबलक खनिज आणि जंगली लाकूड मिळत असल्याने अनेक ठिकाणी आदिवासी लोकांची फसवणूक केली जात आहे. अन्याय झालेले काही जण हत्यारे उचलून नक्षलवादी मार्गाने हालचाली करत आहेत. अशा वेगवेगळ्या बाजू आम्हाला समजत होत्या. अशा प्रकारचे एक पुनर्वासित आदिवासी गाव लाटादादर पाहून आम्ही पुढे आलो.

आम्ही ठिकठिकाणी पाणी पिण्यासाठी किंवा आराम करण्यासाठी थांबायचो. तेव्हा स्थानिक लोकांबरोबर गप्पा सुरु व्हायच्या. आम्ही सायकल वर मुंबईहुन आलोय हे ऐकून त्यांना आश्चर्य वाटायचे. पण सायकलवर असल्यामुळे आपुलकीने पाहुणचार व्हायचा. मनमोकळेपणाने अनेक स्थानिक विषयावर गोष्टी रंगायच्या. त्यामुळे तेथील माहिती चालीरीती समजायच्या. असेच काही जणांबरोबर बोलत असताना इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर त्यांना विचारले,



"आपको यहा पे क्यूँ नया गाव बना के दिया?"

"वो खाते थे इसलिये" तिथे असलेली एक बाई पटकन बोलली.

आम्ही विचारले, "वाघ और बाकीके प्राणी जादा परेशान करते है क्या?"

"नहीं" समोरुन उत्तर

"आपनेही अभी बोला ना की प्राणी इनको खाते थे?" आम्ही पुन्हा विचारले

"ये प्राणी को खाते थे"

तिच्या उत्तराने आम्ही स्तंभित झालो. काय बोलावे हे सुचेना. आम्हाला वाटले होते प्राणी यांना त्रास देत असावेत. पण तसे नव्हते.

पूर्वीपासून अन्नासाठी जंगली प्राण्यांना मारले जायचे. ते वन्य प्राणी आपली राष्ट्रीय संपत्ती असून त्यांचे जतन झाले पाहिजे हेही या आदिवासी लोकांना पटलेले आहे. त्यामुळेच अनेक वन्यजीव अभयारण्यं उदयाला आली आहेत. जंगलापासून दूर केले गेलेले, जंगलाचे राजे असणारे हे आदिवासी लोक त्यांच्या काही सणांना मूळ ठिकाणी जाऊन येतात. शिक्षणामुळे येथे सुधारणा होत आहेत. सरकार मार्फत घरामध्ये केल्या जाणाऱ्या लघु उद्योगांचे प्रशिक्षण दिले जात आहे. अनेकांना नोकऱ्या मिळाल्या आहेत. त्यामुळे बहुतेकजण खुश आहेत.

एके ठिकाणी भगत देवरी नावाचे गाव लागले. आपल्या नावाचे गाव म्हणून भगत सर खुश झाले. पिथौरा तालुका ओलांडून बासना तालुक्यामध्ये आलो. येथील ग्रामीण भागातील पुरुष धोती कुर्ता, गमछा व डोक्यावर पागा म्हणजेच पगडी वापरतात. पायामधे भदई नावाच्या विशेष प्रकारच्या चपला घालतात. महिला साडी ब्लॉउज म्हणजेच लुगरा-पोलगा वापरतात. त्या पायामधे अटकारिया नावाच्या चपला घालतात. तसेच त्या बिछिया, पैरपटटी, कमरबंध किंवा करधन हे दागिने वापरतात. नाकामध्ये फुल्ली व कानामध्ये बाला घालतात. उडिशा सीमेवरील महिला जांभळ्या आणि हिरव्या साड्या आवडीने नेसतात.



बासनाहुन सरायपाली सतरा किमी होते. पुढे छुईपाली टोल नाक्याजवळ थोडा वेळ चहा प्यायला थांबलो. बासना आणि सरायपाली तालुका ओडिशा सीमेजवळ असल्याने येथील काही लोक उडिया भाषा पण बोलतात. सरायपाली हे तालुक्याचे ठिकाण आहे. सरायपाली तालुका डोंगर आणि जंगलाने घेरलेला आहे.



सरायपाली शहर पाहत मुक्कामाच्या लॉजवर पोहोचलो. येथे पण भरपूर जण सायकल वापरताना दिसले. आज छत्तीसगढ राज्यातील शेवटची मुक्कामाची रात्र होती. उद्या रात्रीचा मुक्काम ओडिशा राज्यातील संबलपुरला होता. त्यामुळे सर्व तयार होऊन शहरात फिरुन आलो. छत्तीसगढी चाट पदार्थ खाल्ले. रात्री देशी फुटू म्हणजेच मशरुम भाजी, जिमीकंद कढी, झारा कढी, अंगाकर रोटी, चावल असे जेवण झाले. नंतर येथील खास तमसई खीर झाली. या छत्तीसगढ राज्यातील आमचा सायकल प्रवास भारीच आनंददायी झाला होता. छत्तीसगढ राज्य मस्तच आहे.

***

# दिवस अकरावा: सरायपाली ते संबलपुर

मार्ग: सरायपाली- सोहेला- बारगढ- अट्टाबीरा- गोशाळा- संबलपुर (१२७/ १४६४ किमी)
(जिल्हे: महासमुंद- बारगढ- संबलपुर)
(राज्य: छत्तीसगढ- ओडिशा)

सुप्रभात सरायपाली..!! आज आम्ही छत्तीसगढ राज्याची सीमा ओलांडून ओडिशा राज्यात जाणार होतो. सकाळी तयार होऊन लॉजबाहेर आलो. समोरच एक चहाची टपरी चालू होती. तिथे चहा बिस्कीट खाल्ले आणि आम्ही निघालो. सरायपाली शहराबाहेर मुख्य रस्त्यावर आलो. थंडी होती आणि सगळीकडे धुके पसरले होते.

हळूहळू समोर आकाशात तांबडे फुटले. सूर्यदेवतेने दर्शन दिले. थोडा वेळ थांबून आम्ही फोटो काढले. या भागात पण अनेक तलाव होते आणि तलावावर आंघोळीसाठी काहीजण चालले होते. हा रस्ता दुहेरी चार लेनचा होता. छत्तीसगढमध्ये अजून एक वेगळी गोष्ट आमच्या लक्षात आली ती म्हणजे इथे रस्त्याच्या बाजूला जाड लोखंडी रॉड आडवे लावलेले आहेत. इथे लोखंड पोलाद खनिजांच्या भरपूर खाणी आणि त्यावर अनेक उद्योग कारखाने असल्यामुळे लोखंडी रॉडचा वापर हायवे कुंपणासाठी करत असावेत.



सरायपालीहुन निघाल्यावर शब्दाच्या शेवटी पाली असणारी अनेक गावे लागली. वाटेतील काही स्थानिक लोकांना याबद्दल विचारल्यावर समजले की सरायपालीच्या आजूबाजूला अशी अंदाजे तीस गावे आहेत. छिंदपाली, खाम्हारपाली, छुईपाली, परेवापाली, गनियारिपाली, देवांपाली, बंझापाली, पांडकीपाली, गुथानिपाली, सुखपाली, कन्वारपाली, डुमरपाली, पालसापाली, बनिपाली, भिखापाली, बैदपाली, मेधापाली, धुथापाली,

खुरसुपाली, घनापाली, पितईपाली, जोगीपाली, सरईपाली, पथीयापाली, बरीहपाली इत्यादी त्यापैकी काही गावे आहेत. एवढी आजूबाजूला नावामध्ये समानता असणारी गावे, ह्यामध्ये काहीतरी इतिहास किंवा दंतकथा असणार हे नक्की होते. आम्ही याबद्दल जाणून घ्यायचा प्रयन्न केला, पण स्थानिक लोकांकडून काही योग्य माहित मिळाली नाही.




एके ठिकाणी रस्त्याच्या बाजूला असेल्या फलकावरील राफेल हे गावाचे नाव पाहून थांबलो. सध्या सगळीकडे राफेल विमाने हा चर्चेचा विषय होता आणि आम्ही राफेल गावाजवळ आलो होतो. छत्तीसगढमध्ये आम्हाला राफेल सापडले होते. आम्ही सर्व खुश, इथे फोटो काढले.

सिंघोडाला एका छोट्या टपरीवर आम्ही चहासाठी थांबलो. आमच्या सायकल पाहून खूप गर्दी जमा झाली. गावातली मुले त्यांच्या सायकल घेऊन आली. सर्वांबरोबर गप्पा रंगल्या. इथून पुढे घाटी सुरु झाली. या घाटीमध्ये डोंगरावर श्री माता रुद्रेश्वरी मंदिर आहे. प्राकृतिक सौंदर्य, घनदाट जंगल असलेले डोंगर आणि येथील शांत वातावरण त्यामुळे अनेक पर्यटक येथे येतात. आम्हीपण थोडा वेळ थांबून दर्शन घेतले. समोरच रस्त्याच्या पलीकडे पाणी अडवून एक मोठे जलाशय तयार केले आहे. तिथे आम्ही जाऊन आलो.



इथून काही अंतरावर छत्तीसगड राज्य संपून ओडिशा राज्य सुरु झाले. छत्तीसगढ राज्यातील आमचा सायकल प्रवास खूपच आनंददायी अवर्णनीय झाला होता. अनेक नवीन माहिती आम्हाला मिळाली होती. अनेक मित्र जोडले गेले होते. सगळीकडे खूप पाहुणचार झाला होता. छत्तीसगढमधील राजसमुंद जिल्ह्याची सीमा संपून ओडिशा मधील बरगढ जिल्ह्याची सीमा सुरु झाली.

**ओडिशा राज्य** भारताच्या पूर्व किनारपट्टीवर उत्तरेला असून त्याच्या पूर्वेला बंगालचा उपसागर, उत्तरेला पश्चिम बंगाल व झारखंड, पश्चिमेला छत्तीसगढ, नैर्ऋत्येला तेलंगण तर दक्षिणेला आंध्र प्रदेश ही राज्ये आहेत. भुवनेश्वर ही ओडिशाची राजधानी आहे. ओडिशाला ४८५ किमी लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. उडिया ही येथील बोलीभाषा आहे.

ऐतिहासिक काळात ओडिशा कलिंग साम्राज्याचा भाग होता. इ.स.पूर्व २६१ मध्ये मौर्य सम्राट अशोकने कलिंगवर आक्रमण केले होते आणि या युद्धात झालेल्या भयानक रक्तपातामुळे व्यथित होऊन बौद्ध धर्म अंगीकारला होता. ऋग्वेदात उल्लेख आलेल्या कक्षीवान ऋषी हा कलिंग देशाच्या राणीच्या दासीचा पुत्र होता. महाभारतात कलिंगाचे स्थान आर्यावर्ताच्या पूर्वेस असल्याचे सांगितले आहे. परशुरामानेही कलिंग जिंकला होता. इतिहासावरुन असे दिसते की मौर्य साम्राज्याच्या स्थापनेपूर्वी हे एक प्रबळ राज्य होते. ओडवंश, महामेघवाहन वंश, माठर वंश, नल वंश, विग्रह एवं मुदगल वंश, शैलोदभव वंश, भौमकर वंश, नंदोदभव वंश, सोम वंश केशरि, गंग वंश गजपति, सूर्य वंश गजपति इत्यादींचे इ.स.पूर्व तिसऱ्या शतकाच्या अगोदर इथे राज्य होते. उच्छल, उत्कल, उड्रदेश, उडीशा, ओढिया, ओदिशा कळिंग, उत्कलरात, ओड्र, ओद्र, ओड्रदेश, ओड, ओडराष्ट्र, त्रिकलिंग, दक्शिण कोशल, कंगोद, तोषाळी, छेदि, मत्स्य, इत्यादी ओडिशाची अनेक नावे आहेत.




ओडिशा हे भरपूर खनिज संपत्ती असलेले राज्य आहे. छोटा नागपूरचे पठार व पूर्व घाट या राज्यात एकत्र येतात आणि या दोहोंतील खडकांच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे ओडिशामध्ये मोठ्या प्रमाणावर खनिजे मिळतात. खनिज संपत्तीमुळे या प्रदेशांचे मोठ्या प्रमाणात उद्योगीकरण झाले. तसेच दक्षिणेला असलेली महानदी, ब्राह्मणी, सालंदी आणि बैतरणी नद्यांची खोरी सुपीक आहेत. येथे प्रामुख्याने तांदूळ पिकवला जातो. ओडिशा मधील संबलपुर जवळचे हिराकुंड धरण जगातील सर्वात लांब असे मातीचे धरण आहे. ओडिशा मध्ये अनेक

सरोवर असून चिलिका सरोवर आशिया मधील सर्वात मोठा तलाव आहे. राज्यामध्ये काही डोंगराळ भाग असून १६७२ मीटर उंचीवर असलेले कोरापुट जिल्ह्यातील देवमाली सर्वांत उंच ठिकाण आहे. ओडिशाचा ३२ टक्के भूभाग जंगलांनी व्यापलेला असून येथे अनेक वन्यजीव अभयारण्यं, व्याघ्र प्रकल्प आहेत. यापैकी सिमिलिपाल अभयारण्य प्रमुख आहे.



येथील अर्थव्यवस्तेमध्ये कृषी क्षेत्राची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. जवळजवळ ८० टक्के लोक कृषी कार्यामध्ये आहेत. तांदुळाबरोबरच, तीळ, दाली, ऊस, नारळ अशी अनेक पिके घेतली जातात. राज्यात खनिज उद्योगाबरोबरच ग्रामीण भागात लघु, ग्रामीण, कुटीर उद्योगांना प्रोत्साहन दिले जातेय. ओडिशा लोह, कोळसा, क्रोमाइट, मैंगनीज़ आणि डोलोमाइट उत्पादनात इतर राज्यांपेक्षा पुढे आहे.

पुरी येथील जगन्नाथ मंदिर, कोणार्क येथील सूर्य मंदिर इत्यादी जगप्रसिद्ध सांस्कृतिक स्थाने असलेल्या ओडिशामध्ये प्राचीन भारतीय संस्कृतीचे अनेक ठसे आढळतात. भुवनेश्वर येथील मंदिरे, जौगदा येथील शिलालेख, कटकचा बारबाटी किल्ला ऐतिहासिक दृष्ट्या महत्वपूर्ण आहेत. तसेच नंदनकानन, चिलका सरोवर, धौली बौद्ध मंदिर, उदयगिरि-खंडगिरि प्राचीन गुफा, रत्नगिरि, ललितगिरि आणि उदयगिरि मधील बौद्ध भित्तिचित्र व गुफा, सप्तसज्या मनोरम पहाडी दृश्य, सिमिलिपाल राष्ट्रीय उद्यान, हीराकुंड बांध, दुदुमा जलप्रपात, उषाकोठी वन्य जीव अभयारण्य, गोपानपुर समुद्री तट, हरिशंकर, नृसिंहनाथ, तारातारिणी, तप्तापानी, भितरकणिका, भीमकुंड कपिलाश इत्यादी स्थाने प्रसिद्ध आहेत.



ओडिशाला समृद्ध कलात्मक वारसा आहे. येथील वास्तुशिल्प, भिंतीचित्र, दगड व लाकडावरील नक्षीकाम, पट्ट चित्रकला, दागिन्यांवरील हस्तशिल्प कला विख्यात आहे. ओडिशाचे शास्त्रीय नृत्य ओडिशी खूप प्राचीन असून ते ईश्वरासाठी केले जाणारे मंदिर नृत्य आहे. तसेच मुखवटे घालून केले जाणारे छऊ नृत्य पण खूप प्रसिद्ध आहे. येथे अनेक प्रकारचे लोकनृत्य असून मादल आणि बासरीच्या वापर सर्रास अनेक गावात केला जातो.




आता कोलकाता फक्त ६४८ किमी दूर होते. उडिया भाषेमध्ये लिहलेले बोर्ड सुरु झाले होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला भाताची शेती होती तर काही ठिकाणी घनदाट जंगल होते. शेतामध्ये भाताच्या लोंब्या लगडलेल्या होत्या. काही ठिकाणी कापणी चालू होती. येथे बहुतेक ठिकाणी शेतीची कामे यंत्राच्या मदतीने केली जात होती. हा भात रस्त्याच्या बाजूला उन्हामध्ये सुकत घातलेला होता आणि सुकलेला भात गोणीमध्ये भरुन ठेवलेला होता.

भातशेतीत आज उत्पन्न कमी येण्याची वेगवेगळी कारणे आहेत. त्यातील महत्त्वाचे म्हणजे भाताची कापणी, पेंढ्यांची वाहतूक, झोडणी, मळणी करताना भाताचे दाणे पडून जे नुकसान होते, त्यामुळे उत्पादनात १५ ते २० टक्के घट येते. शेतीच्या कामात कापणीला मोठे महत्त्व असते. हल्ली पावसाच्या वेळापत्रकात बदल झाल्यामुळे कापणीचे काम सुरु असताना पाऊस आल्यास शेतकर्यांचे मोठे नुकसान होते. त्याचबरोबर कापणी केलेले पीक



शेतात ठेवलेले असताना पाऊस आला तरी हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. कापणीतील आणखी एक अडचण म्हणजे मजुरांचा तुटवडा. या सर्व अडचणींवर हुकमी

उपाय देणारे अनेक यंत्र असून ते भात शेती चिखलणी, लावणी, कापणी, मळणी, झोडणी अशी सर्व कामे करतात. या भागात कंबाइन राईस हार्वेस्टर नावाचे यंत्र अनेक ठिकाणी वापरले जात होते. या यंत्राच्या वापराने श्रम, पैसा, वेळ यांत बचत होऊन भात उत्पादकांना फायदा होत आहे.

रस्त्यामध्ये काही ठिकाणी रस्ता रुंदीकरणाचे काम चालू होते. काही ठिकाणी रस्ता खणून ठेवलेला होता. सोहेला शहरात पोहोचलो. हे तालुक्याचे ठिकाण आहे. रस्त्यामध्ये एकजण तबल्यासारखे दिसणारे श्री खोल मृदूंग नावाचे ओडिशा मधील प्राचीन वाद्य घेऊन चालत होता. त्याला थांबवून आम्ही त्या वाद्याबद्दल विचारले. हे वाद्य आजही गावामध्ये कीर्तन आणि पारंपारिक सणांमध्ये वाजवले जाते. शहरांमधून जाताना अनेकांनी आमची विचारपूस केली. मुंबईहुन सायकल चालवत आलोय हे समजल्यावर आमच्याभोवती खूप गर्दी जमा झाली. गप्पा रंगल्या.



नाष्टाची वेळ झाली होती. मग शहरातील नावाजलेले हॉटेल शोधून तिथे गेलो. आमच्या सायकल मोहिमेबद्दल समजल्यावर हॉटेलचा मालक पण खुश झाला. चूड पोहा, मुधी, चुदा दही, सप्तपुरी, नारियल भरवा सूजी काकरा, सूजी इडली, ओडिशा स्पेशल एनडुरी पीठा आणि काही गोड मिठाई असा फक्कड नाष्टा झाला. हॉटेलमध्ये जेव्हढे पदार्थ होते ते सगळे चाखले. जोरदार पाहुणचार झाला, गप्पा रंगल्या. सर्वांनी आमच्याबरोबर फोटो काढून घेतले. एव्हढे सर्व खाऊन पण बिल खूपच कमी झाले होते. छत्तीसगढप्रमाणे इथे पण खूप स्वस्ताई होती.





निघताना सायकलजवळ आल्यावर समजले की माझी सायकल पंक्चर झाली आहे. मुंबईहून निघाल्यावर पहिल्यांदाच ओडिशामध्ये येऊन सायकल पंक्चर झाली होती. हॉटेलजवळ गर्दी नको म्हणून सायकल हातात घेऊन पुढे आलो आणि रस्त्याच्या कडेला एका झाडाच्या सावलीमध्ये सायकल उलटी करुन पंक्चर काढला. सोबत नितीन भाई होते. नेहमीप्रमाणे इथे पण आमच्याभोवती गर्दी जमा झाली. गप्पा रंगल्या.

सोहेला शहराजवळ असणारी राणी नदी ओलांडून पुढे आलो. एके ठिकाणी शेकडोने असलेल्या पक्ष्यांचा किलबिलाट होता आणि प्रत्येकजण आपली गाडी थांबवून कुतूहलाने पाहत होता. आम्हीही कुतुहलापोटी विक्रेत्याला विचारले, तर विक्रेत्यांचे उत्तर...चायनीज मुर्गी...चायनीज मुर्गी! करड्या रंगाचे कोंबडी सारखे दिसणारे हे पक्षी, चायनीज कोंबडी म्हणून विकले जात होते. भारतीय बाजारपेठात येणारा चिनी बनावटीचा माल हा इतर मालापेक्षा स्वस्त असल्याने ग्राहकही लगेच त्याकडे आकर्षित होतात. चीनचा माल, कमी किंमत आणि नो वॉरंटी हे समीकरण ठरले आहे. बहुतेक म्हणूनच या विक्रीसाठी आलेल्या चायनीज कोंबड्या विकल्या जात असाव्यात आणि अनेकजण काहीतरी वेगळे म्हणून विकत घेत होते.



थोड्या वेळाने एका कालव्याजवळ पोहोचलो. या कालव्यामधून हिराकुंड जलाशयातील पाणी बारगढ शहरासाठी आणले आहे. या कालव्याला वर्षभर पाणी असते.

त्यामुळे येथील जमिनीमध्ये अनेक पिके घेतली जातात. येथे वर्षातून दोन वेळा भाताचे पीक घेतले जाते. येथे मोठ्या प्रमाणात होणाऱ्या भात उत्पादनामुळे याला ओडिशा राज्याची भात हंडी म्हणतात.

**बारगढ जिल्हा** ओडिशा राज्यात पश्चिमेला वसलेला आहे. या जिल्ह्याच्या पूर्वेला संबलपुर जिल्हा व झारसुगुडा जिल्हा, दक्षिणेला सोनापूर जिल्हा, बलांगिर जिल्हा, पश्चिमेला



नुआपाडा जिल्हा असून उत्तर दिशेला छत्तीसगढ मधील महासमुंद जिल्हा व रायगढ जिल्हे आहेत. जिरा नदीकाठी वसलेले बारगढ शहर हे जिल्ह्याचे मुख्यालय आहे. बारगढचे मूळ नाव बाघर कोटा होते. संबलपुरचा पहिला चौहान राजा बलरामदेव याने येथे काही काळासाठी राजधानी बनवली. आणि त्याच्या स्वरक्षणासाठी मोठा किल्ला बांधला. तेव्हापासून या ठिकाणाला बारगढ नाव पडले. १९९३ ला संबलपुर जिल्ह्याचे विभाजन होऊन हा जिल्हा बनला.

बारगढ मधील दरवर्षी हिवाळयात अकरा दिवस चालणारी धनु जत्रा संपूर्ण जगात प्रसिद्ध आहे. ती पाहण्यासाठी अनेक आंतरराष्टीय पर्यटक येतात. या जत्रेत सगळीकडे खुल्या मंचावर श्रीकृष्ण आणि मामा कंस यांच्यातील पौराणिक कथा दाखवल्या जातात. खुल्या मंचावर सादर होणारी ही जगातील सर्वात मोठी जत्रा आहे.

बारगढ शहरापासून ६० किमी अंतरावर देबरीगढ वन्यजीव अभयारण्य आहे. भारतातील वन्यजीव अभयारण्यांमध्ये सर्वात जास्त जंगली प्राणांची गर्दी असणारे हे अभयारण्य आहे. याला १९८५ मध्ये अभयारण्याचा दर्जा मिळाला. हिराकुंड जलाशयाच्या बाजूला वसलेले असल्यामुळे इथे अनेक



वनस्पती आणि जीव विकसित झाले आहेत. येथे वाघ, बिबळ्या, हत्ती, वनगाय, हरण, ससे, सांबर, कोल्हा, लांडगा, जंगली कुत्रे, अजगर, साप इत्यादी अनेक वन्यजीव पाहायला मिळतात. याशिवाय येथे वेगवेगळ्या प्रकारचे अनेक स्थानिय आणि स्तलांतरित प्रवासी पक्षांच्या प्रजाती दिसतात. हे अभयारण्य देशी विदेशी पर्यटकांमध्ये लोकप्रिय आहे.

आज रात्रीचा मुक्काम संबलपुरला होता. ते इथून ४३ किमी दाखवत होते. जेवणाची वेळ झाली नव्हती अजून वेळ होता. दुपारी खास उडिया पद्धतीचे जेवण जेवायचे होते. आता बारगढ शहरानंतर पुढे कोणते मोठे शहर आहे का ते गुगलवर पहिले. काही अंतरावर अट्टाबीरा हे बारगढ जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण होते. तिथे चांगले हॉटेल धाबे मिळणार हे नक्की होते. त्यामुळे पुढे निघालो. दंता नदी ओलांडून रेंगली कॅम्पला आलो. अट्टाबीराला चांगला ढाबा शोधून दुपारी जेवणासाठी थांबलो. येथे उडिया पद्धतीचे जेवण मागवले. जेवणात जीरा पाकला, भेंडी भाजा, आलु पाक साग, कदली भज्जा, पुलाफ, रोटी आणि चुंगडी मलाई प्रॉन करी, मचा घांत असा खास बेत झाला. नंतर चेना झिली, रसबाली, खाजा अशा काही गोड मिठाई पोटभर खाल्ल्या.




ओडिशाला समृद्ध इतिहास, संस्कृती आणि अनोखी अशी खाद्यसंस्कृती आहे. तांदूळ इथलं प्रमुख पीक असल्यामुळे बहुतेक पाककृती या तांदळापासून तयार होणाऱ्या आहेत. शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही प्रकारच्या पाककृती इथे आवडीने खाल्ल्या जातात. परंतु मांसाहारी पाककृती इथे अधिक प्रसिद्ध आहेत. मांसाहारी पाककृतींमध्ये मासे, खेकडे आणि



चिकनच्या पाककृती लोकप्रिय आहेत. स्वयंपाक करण्याची एक विशिष्ट पद्धत इथे आहे. इथल्या पाककृती तेलाचा आणि मसाल्याचा कमीत कमी वापर करुन बनवल्या जातात. तरीही त्यांना वेगळी चव असते. बहुतेक पाककृतींसाठी मोहरीचं तेल वापरलं जातं, तर काही पाककृतींसाठी तुपाचा वापर केला जातो. इथे काही ठिकाणी पत्रावळीवर पारंपरिक पद्धतीने जेवण वाढलं जातं. गोड पदार्थ बनवताना छेना हा चीजसारखा पदार्थ जास्त वापरला जातो.

अट्टाबीराहुन संबलपुर फक्त २५ किमी होते. जेवण झाल्यावर थोडा आराम करुन पुढे निघालो. झाऊन नदी ओलांडल्यावर संबलपुर जिल्ह्यातील धनकौडा तालुका सुरु झाला. जवळच महानदीवर बांधलेले हीराकुद धरण आहे. हीराकुद हे महानदी आणि इब नदी यांच्या संगमावर वसलेले आहे. येथील खाणीमध्ये सोने आणि हिरा मोठ्या प्रमाणात मिळत असल्यामुळे याचे नाव हीराकुद पडले असे बोलले



जाते. येथे बांधलेल्या धरणामुळे आशियातील सर्वात मोठे मानवनिर्मित हीराकुद जलाशय तयार झाले झाले. या धरणाच्या बांधाची लांबी २६ किमी आहे. जलाशयाची तट रेषा ६३९ किमी लांब आहे. या धरणाचे काम १९४८ ला सुरु होऊन १९५७ ला पूर्ण झाले. हे धरण



जगातील विशाल आणि सर्वात लांब भिंती असलेल्या धरणांपैकी एक आहे. त्यामुळे हे पर्यटकांचे आकर्षण केंद्र आहे. या धरणाचा उपयोग वीजनिर्मिती, पुरांवर नियंत्रण आणि सिंचनासाठी केला जातो. बारगढ कालवा, सासन कालवा आणि संबलपुर कालवा या प्रमुख तीन कालव्यांमार्फत हीराकुद जलाशयाचे पाणी संबलपुर, बोलमगिरी, पुरी, कटक इत्यादी जिल्ह्यांपर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे येथे अनेक पिके घेतली जातात.

गोशाळा इथून मुंडोघाट मार्गे शॉर्टकट होता. त्यामुळे तेथे मुख्य रस्ता सोडून उड्डाण पुलाखाली जाणाऱ्या रस्त्याजवळ थांबलो. आम्हाला पाहून गर्दी जमा झाली त्यांच्या बरोबर थोड्या गप्पा मारल्या, फोटो काढले. हा रस्ता बरोबर आहे ना? त्याची माहिती घेतली. अक्षय नारायण पुढे गेले होते. बाकीचे आल्यावर आम्ही या छोट्या शॉर्टकट रस्त्याने निघालो.



गावातील छोटा रस्ता त्यामुळे वाहने कमी होती आणि दोन्ही बाजूला हिरवीगार शेती झाडे भरपूर होती. थोड्या वेळाने समोरुन येणाऱ्या गाडीने आम्हाला थांबवले आणि विचारपूस केली. त्यामध्ये संबलपुर सायकलिंग क्लबचे देबाशिष सुपकर आणि त्यांचे मित्र होते. गप्पा रंगल्या. त्यांनी रात्रीचा मुक्काम आणि इतर काही मदत पाहिजे का याबद्दल विचारले. त्यांचा मोबाईल नंबर दिला. आमचे रात्रीच्या मुक्कामाचे हॉटेल अगोदरच ठरलेले होते. तेथे ते पुन्हा क्लबच्या इतर मित्रांबरोबर भेटायला येणार होते.

शहर जवळ येऊ लागले तसे रस्त्यामध्ये अनेक जण थांबवून विचारपूस करु लागले. आमच्याबरोबर फोटो काढू लागले. काही मदत पाहिजे का याबद्दल विचारणा होऊ लागली. चहा पाणीसाठी आग्रह होऊ लागला. थोड्या वेळाने भारत सरकारची एक पांढरी गाडी बाजूने पुढे गेली आणि आम्हाला पाहून थोड्या अंतरावर थांबली. त्यामध्ये संबलपुरचे कलेक्टर आणि इतर अधिकारी होते. त्यांनी आपुलकीने विचारपूस केली, फोटो काढला आणि पुढील सायकल प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

थोड्या वेळाने संबलपुर कालव्यावर असणाऱ्या मुंडोघाट पुलाजवळ आलो. हा कालवा हीराकुद धरणाचे पाणी वाहून नेण्यासाठी बांधलेल्या प्रमुख तीन कालव्यांपैकी एक होता. या कालव्याला पाणी भरपूर होते. थोडा वेळ थांबून या पुलाजवळ तयार झालेला मोठा जलाशय पाहिला. मुंडोघाट पूल ओलांडल्यावर रस्ता या कालव्याच्या बाजूने होता. पाण्याने भरुन वाहणारा कालवा, आजूबाजूची हिरवळ आणि पक्षांचे किलबिल अनुभवत पुढे निघालो.

एका ठिकाणी थांबून चहा प्यायलो आणि महानदीच्या मुख्य पुलावर आलो. पलीकडे संबलपुर शहर दिसत होते. गार वारा सुटला होता. सूर्य नुकताच मावळत होता. शहरातील अनेक लोक हे अनुभवण्यासाठी पुलावर आले होते. इथून आमचे रात्रीच्या मुक्कामाचे हॉटेल जवळच एक किमीवर होते त्यामुळे आम्ही पण थोडा वेळ अंधार होईपर्यंत पुलावर थांबलो. आम्हाला पाहुन अनेकजण जवळ आले. त्यांच्याबरोबर गप्पा रंगल्या.



इथे पुलावर संबलपुर युथ हॉस्टेलचे काही सदस्य भेटले. त्यांनी इतर युथ हॉस्टेलच्या काही जणांना बोलावून आमचा सत्कार केला. लोकल न्युज पेपरसाठी मुलाखत घेतली. महानदीचा किनारा बाग आणि लाईटने सजवलेला आहे. तेथे जवळच आय लव्ह संबलपुर चा बोर्ड होता तिथे आम्ही फोटो काढले. आणि जवळच असणाऱ्या हॉटेलवर पोहोचलो.

**संबलपुर जिल्हा** ओडिशा राज्याच्या पश्चिमेला वसलेला आहे. या जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय संबलपुर येथे आहे. संबलपुर हे नाव समलेश्वरी देवीच्या नावावरुन पडले. ही देवी शक्तिरुपात असून या क्षेत्रामध्ये पूजनीय आहे. इतिहासामध्ये याला संबलक, हीराखण्ड, ओद्र देश, ओडियान, उड्डियान, दक्षिण कोशल, कोशल इत्यादी नावाने ओळखले जात असे. येथे अनेक थोर स्वत्रंत सेनानी होऊन गेले.

संबलपुर जिल्हा चार भागात विभागून १९९३ ला बारगढ आणि १९९४ ला झारसुगुड़ा व देवगढ जिल्हे बनले. संबलपुर जिल्ह्याच्या पूर्वेला देवगढ, पश्चिमेला बारगढ, उत्तरेला झारसुगुड़ा व सुंदरगढ आणि दक्षिणेला सोनापूर व अंगुल जिल्हे आहेत. महानदी येथील प्रमुख नदी असून हीराकुद धरणामुळे येथील अधिक जमीन सिंचनाखाली आली आहे. येथे काही डोंगराळ भाग असून पूर्वेकडील बहुतेक भाग जंगलाने व्यापलेला आहे. येथील अर्थव्यवस्था मुखतः शेती आणि जंगल यावर अवलंबून आहे. जिल्ह्यामध्ये इतरही खनिज संबंधी उद्योग आहेत. येथे उच्च प्रतीचे हिंरे सापडत असल्यामुळे प्राचीन काळी हे हिरा व्यवसायाचे प्रमुख केंद्र होते.

संबलपुर जिल्हा आंतरराष्ट्रीय स्तरावर सुती आणि टशर रेशमी वस्त्रांवरील कारागिरी म्हणजेच इकत, आदिवासी समृद्ध विरासत आणि वैविध्यपूर्ण घनदाट जंगल क्षेत्र यासाठी प्रसिद्ध आहे. येथील संबलपुरी साडी प्रसिद्ध आहे. येथे शीतल सष्टी, नौखाई, भाईजिउनतिया, डोला यात्रा इत्यादी अनेक सण साजरे केले जातात. येथील पारंपरिक संबलपुरी नृत्य आणि संगीत वेगळेपण जपून आहे. संबलपुर जिल्ह्यात अनेक पर्यटनस्थळे आहेत. त्यापैकी समलेश्वरी मंदिर, हुमा शिव मंदिर, उषाकोठी वन्यजीव अभ्यारण्य, घंटेश्वरी मंदिर, चिपलिमा, हीराकुद जलाशय, कैटल आइलैंड, गुडगुडा धबधबा इत्यादी प्रसिद्ध आहेत.




संबलपुर शहरात पोहोचत असताना माझ्या सायकलच्या स्टॅण्डचा खालचा भाग रस्त्यामध्ये पडला आणि ते माझ्या लक्षात नाही आले. त्यामुळे आता सायकल उभी करता येत नव्हती. हॉटेलच्या बाजूलाच एक सायकल दुकान होते. तिथे जाऊन नवीन सायकल स्टॅन्डसाठी विचारले. त्यांच्याकडे अनेक सायकल स्टॅन्ड होते पण त्यापैकी एक पण स्टॅन्ड माझ्या सायकलला बसला नाहीत. ते अलेन-की वाले नव्हते. त्यांनी पेडल पुशर सायकल शॉप मध्ये जाण्याचे सुचवले. आणि रस्त्यामधील इतर काही सायकल दुरुस्तीची प्रमुख ठिकाणे पण सांगितली.

मी सायकल घेऊन गुगल मॅप वर शोधत तिकडे निघालो. इतर ठिकाणी अशा प्रकारचे स्टॅन्ड सापडले नाही. पण त्या पेडल पुशर सायकल शॉपमध्ये सायकल स्टॅन्ड मिळाला. सायकल शॉपचे मालक इस्पित सर तेथे नव्हते. पण आमच्या सायकल मोहिमेबद्दल समजल्यावर ते भेटण्यासाठी आले. त्यांना अगोदरच युथ हॉस्टेल ग्रुपने काढलेले आमचे फोटो व्हाट्सअँप वर मिळाले होते. त्यांच्याबरोबर गप्पा रंगल्या. त्यांच्याकडून कळले की संबलपूरमध्ये पण सायकल चालवणारे अनेकजण आहेत. सायकलला नवीन स्टॅन्ड लावून हॉटेल वर आलो. नेहमीचे कार्यक्रम आटपले.

थोड्या वेळाने संबलपुर सायकलिंग क्लब चे देबाशिष सुपकर आणि इतर सदस्य आले. सर्वांनी आमचा सत्कार केला आणि सर्वांबरोबर गप्पा रंगल्या. संबलपुर सायकलिंग क्लब हा संबलपुर मधील नावाजलेला सायकल ग्रुप असून त्यांचेतर्फे वर्षभर अनेक उपक्रम, सायकल मोहिमा राबवल्या जातात. त्यांच्याकडून आम्हाला समजले की



उद्याचा रस्ता एकेरी छोटा असून त्यावर रस्ता रुंदीकरणाचे काम चालू आहे. त्यामुळे सगळीकडे रस्ता खणून ठेवलेला आहे. या रस्त्याला पर्यायी रस्ता देबाशिषने आम्हाला सांगितला. आणि उद्या सकाळी आमच्याबरोबर पण काही अंतर येणार असल्याचे सांगितले.

आजचा दिवस आम्हा सर्वांसाठी खूपच आनंददायी होता. ओडिशा राज्यात आमचा प्रवेश धुमधडाक्यात झाला होता. रात्री स्थानिक संबलपुरी पद्धतीचे जेवण झाल्यावर सर्व आटपून झोपी गेलो.

***

# दिवस बारावा: संबलपुर ते देवगढ

मार्ग: संबलपुर- परमानपुर- जुनादीही- लैदा- कुचिंदा- भोजपुर- शिरीद- तिलैबानी- देवगढ (१२४/ १५८८ किमी)
(जिल्हे: संबलपुर- देवगढ)

सुप्रभात संबलपुर, सुप्रभात ओडिशा..!! पहाटे तयार होऊन हॉटेलबाहेर आलो. संबलपुर सायकलिंग क्लबचे देबाशिष व सॅम आले होते. गरमागरम चहा झाली. देवगढ रस्ता रुंदीकरणाचे काम चालू असल्यामुळे पूर्ण रस्ता खणून ठेवला होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहनांची गर्दी व धूळ त्या मार्गावर असणार होती. म्हणून आम्ही पर्यायी मार्गाने जाणार होतो. आणि देबाशिष, सॅम काही अंतर आमच्याबरोबर सायकल चालवत येणार होते. संबलपुर ते देवगढ अंतर ९० किमी होते. पर्यायी मार्गाने हे अंतर अंदाजे १२० किमी होणार होते. ३० किमी जास्त अंतर होणार म्हणून कोणी नाराज नव्हते. उलट गावातून आडमार्गाने सायकल चालवत जायला मिळणार म्हणून सर्व खुश होते. कोणत्याही भागाचे जनजीवन, संस्कृती, रुढी परंपरा, चालीरीती त्यांची माहिती तेथील गावात गेल्यावरच समजते.



संबलपुर सिटी रेल्वे स्टेशनच्या बाजूने सिंदूरपंकला आलो. इथून मुख्य हायवे रस्ता सोडून पर्यायी समसिंघा रस्ता पकडला. या गावातून जाणाऱ्या रस्ताच्या दोन्ही बाजूला शेती आणि झाडे भरपूर होती. धुक्यामुळे मस्तच वातावरण झाले होते. हवेत गारवा होता. पक्षांची किलबिल चालू होती. थोड्या वेळाने उजव्या बाजूला पूर्व क्षितिजावर सूर्योदय झाला. थोडा वेळ थांबून हे अनुभवले.



रस्त्यामध्ये घोडा सायकल घेऊन त्यांच्या दैनंदिन कामासाठी जाणारे अनेक गाववाले दिसले. थेमरा जवळ पोहोचलो. इथून देबाशिष आणि सॅम परत जाणार होते. त्यांनी पुढील मार्गाबद्दल आम्हाला सांगितले. गावच्या गप्पा झाल्या. त्यांच्यामुळे आम्हाला खूप माहिती मिळाली होती आणि मदत पण झाली होती. त्यांचा निरोप घेऊन आणि मनपूर्वक आभार मानून आम्ही पुढे निघालो.

आजूबाजूच्या वातावरणामुळे या रस्त्यावर सायकल चालवायला खूपच मस्त वाटत होते. गुडेसिंघा गाव ओलांडून सेरसुंताल ला आलो. इथे एक छोटे चहाचे दुकान नुकतेच उघडले होते. तिथे चहा प्यायलो. आणि गाववाल्यांबरोबर गप्पा मारुन पुढे निघालो.

सेरसुंताल ला चहा पीत असताना एक साठीचे काका सायकल वर एक १०-१२ फूट लांबीची काठी आणि कॅरिअरवर बांबूच्या सालांपासून विणलेली चौकोनी पेटी घेऊन



रस्त्याच्या विरुद्ध बाजूने पुढे निघून गेले होते. हळूहळू सायकल चालवत ते खूप पुढे गेले होते. आम्ही थोड्या वेळाने त्यांना गाठले आणि थांबवून विचारपूस केली. ते ४० किमी अंतरावर असणाऱ्या हीराकुद जलाशयात गळाने मासे पकडण्यासाठी जात होते. तिथे भरपूर मासे मिळतात म्हणून आठवड्यातून तीन वेळा हे काका चार तासात ४० किमी अंतर पार करुन जात होते. मासे पकडून झाले की संध्याकाळी पुन्हा तेव्हढेच अंतर सायकल वर परत येत होते. त्यांचा निरोप घेऊन पुढे आलो.

थोड्या वेळाने सासन कालव्याजवळ आलो. हीराकुद जलाशयाचे पाणी आजूबाजूच्या जिल्ह्यात दूरवर घेऊन जाणाऱ्या प्रमुख तीन कालव्यांपैकी हा एक कालवा आहे. या कालव्यामधून अनेक उप कालवे काढून आजूबाजूच्या भागामध्ये पाणी पोचवले आहे. त्यामुळे इथे शेतामध्ये अनेक पिके घेतली जातात. भात तर वर्षातून दोन वेळा पिकवला जातो. एके ठिकाणी रस्त्याच्या बाजूला जडीबुटीवाली औषधे घेऊन एकजण बसला होता. तिथे थांबलो. या भागात जंगले भरपूर आहेत आणि या जंगलात अनेक औषधी वनस्पती, कंदमुळे मिळतात. त्यामुळे येथील अनेक लोक या जंगली जडीबुटी औषधांचा वापर करतात.

वाटेमध्ये ठिकठिकाणी थांबून गाववाल्यांबरोबर गप्पा मारायचो. भरपूर गर्दी जमा व्हायची. त्यांना सायकल चालवण्याचे महत्व पटवून सांगायचो. अनेक वेळा चहापाणी साठी आग्रह झाला. पण नुकताच चहा झाला असल्यामुळे आणि वेळ वाचवण्यासाठी आम्ही नकार देऊन पुढे निघत



असू. परमानपुर ओलांडून बारादूनगुरी जवळ आलो. इथे गप्पा झाल्यावर तेथील गाववाल्यांनी आग्रहाने सर्वांना थांबवून चहा दिला. पुढच्या गावामध्ये उडिया दैनिक समाजचे वार्ताहर बाग सर भेटले. त्यांनी आमची मुलाखत घेतली. आणि आमच्या सायकल मोहिमेची



बातमी दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात छापून पण आली.

थोड्या वेळाने जंगल सुरु झाले. रस्त्याच्या दोन्ही बाजूला घनदाट झाडी होती. काही ठिकाणी बाजूच्या डोंगरात खाणी होत्या. त्याठिकाणी जाणारे उपरस्ते आणि त्याच्या बाजूची झाडी मातीने माखून पांढरी झाली होती. नेहमीप्रमाणे मी आणि नितीनभाई सर्वांच्या शेवटी होतो. पुढे भगत सर हातात सायकल घेऊन चालताना दिसले. त्यांची सायकल पंक्चर झाली होती. एका ठिकाणी उपरस्त्यावर त्यांची सायकल उलटी केली आणि पंक्चर काढले. रेंगाली जंगलातून जाताना गुमलोई जवळ आलो. तेथे वनविभागाचे झारघाटी गरपाटी जंगल विश्रामगृह होते. या जंगलात भरपूर वन्य प्राणी आहेत आणि अनेकवेळेला हत्ती पण येतात.



पुढे एका आदिवासी गावाजवळ थांबलो. लहान मुले पिशवीला दप्तर करुन व शाळेचा गणवेश घालून आनंदात शाळेत चालली होती. त्यांच्या शाळेजवळ पुन्हा थांबलो. कोणीतरी अधिकारी आले म्हणून सर्व मुलांची आणि गाववाल्यांनी गर्दी झाली. गावातल्या लोकांना हिंदी समजत नव्हते. पण तोडक्यामोडक्या हिंदीमध्ये आणि खुणेने गप्पा चालू झाल्या. मुलांनी शाळेतल्या बाईंना सांगितल्यावर त्या पण आल्या. त्यांना थोडे हिंदी येत होते.



आमच्या सायकल मोहिमेबद्दल समजल्यावर त्या पण खुश झाल्या. शाळेच्या कार्यालयात येण्यासाठी आणि चहा पाण्यासाठी आग्रह झाला. वेळेच्या कमतरतेमुळे आम्ही आदरपूर्वक नकार देऊन पुढे निघालो. इथे पण अनेक गावांमध्ये तलाव होते. गाववाले सकाळी आंघोळीसाठी यांचा वापर करतात. या तलावांवर पुरुष आणि स्त्रीयांसाठी वेगवेगळे घाट बांधलेले होते. एका तलावाचा फोटोत काढण्यासाठी गेलो तेव्हा हे समजले.

जुनादीही ला एका छोट्या दुकानात नाष्टासाठी थांबलो. थोडे भजी आणि वडे होते ते पटकन संपले. मालक आणि त्याच्या बायकोने गरमागरम अजून भजी आणि वडे बनवले.



पानाच्या द्रोणात हे आणि सोबत पाण्यासारखी दिसणारी चिंच मिरचीची चटणी मस्तच लागत होते. सर्व तुटून पडले. नंतर त्याला चहा बनवायला सांगितला. दूध नसल्याने त्याने गावठी कोरा चहा बनवला. दोन दोन कप चहा पिऊन सगळे ताजेतवाने झाले. बिलाचे पैसे दिले तेव्हा चहाचे पैसे त्याने घेतलेच नाही. आम्ही दूरवरुन सायकलवर इथे त्यांच्या गावात आलो म्हणून तो पैसे घेत नव्हता. त्याच्या मनाची ही श्रीमंती पाहून आम्ही थक्क झालो.

इथे असलेले बेउरा जंगल, जुन्या प्राचीन जंगलांपैकी एक आहे. येथील गावातील लोक शेती आणि जंगलांवरच अवलंबून आहेत. गावातील कूपनलिकेवर पाण्याच्या बाटल्या भरुन आम्ही पुढे लैदाला निघालो. गावाच्या बाहेर काही ठिकाणी आम्हाला रांगेत समाध्या बांधलेल्या दिसल्या. एका ठिकाणी भाताच्या धान्याच्या गोणी बैलगाडी, टेम्पो, ट्रॅक्टर, ट्रक अशा वाहनामध्ये भरुन रांगेत थांबलेले दिसले. विचारल्यावर आम्हाला कळले की आजूबाजूच्या गावातील लोक त्यांच्या शेतातील भात विक्रीसाठी घेऊन आले होते.



रस्त्यामध्ये अनेक जण सायकल चालवत जाणारे दिसले. काही जण तर डबल सीट होते. या सर्वांबरोबर गप्पा मारत लैदा गावात पोहोचलो. या गावात बाजूबाजूला भरपूर मोठे तलाव होते. त्यापैकी एका तलावाशेजारी पाच मंदिरांचा समूह होता. मुख्य महादेवाचे मंदिर आणि त्याच्या समोर मोठा नंदी होता. तिथे थांबून थोडा आराम केला. मंदिरे रंगाने रंगवल्यामुळे चकचकीत नवीन दिसत होती. पण त्यामुळे त्यांच्यातला जुनेपणा आणि प्राचीन कलाकुसर रंगाखाली लपली गेली होती. पुढे मुख्य बाजारामध्ये एक स्वातंत्रसेनानी भेटले. त्यांनी आग्रहाने त्यांच्या कार्यालयात नेऊन चहा पाणी दिला. आणि स्थानिक दैनिकासाठी आमच्या मोहिमेची बातमी बनवून घेतली. सर्वांबरोबर गप्पा रंगल्या. सर्वांना सायकल चालवण्याचे महत्व पटवून दिले.



भेडेन नदी ओलांडून पुरुणापाणी, कुतुराचुन, सतकमा अशा गावातील जुनी घरे पाहत आणि आजूबाजूचा निसर्ग अनुभवत कुचिंदा कडे निघालो.

या भागात ताडाची भरपूर झाडे होती. काही ताडाच्या झाडांवर ताडी जमा करण्यासाठी मडकी लटकवलेली होती. ती पाहण्यासाठी अनेक ठिकाणी थांबलो, तेव्हा गावातील लोकांकडून ताडी पिण्यासाठी आग्रह पण झाला. ताडी हे ताडफळापासून तयार केले जाणारे पेय आहे. ताडाच्या झाडास माथ्यावर फळाच्या पेंडीच्या बुंध्याला तीक्ष्ण हत्याराने खाच पाडल्यावर, त्यातुन निघणारा गोड रस त्या केलेल्या खाचेखाली मडके बांधून त्यात गोळा करतात. हा रस प्रकृतीने थंड असून आरोग्यासाठी फलदायक आहे. सूर्योदय झाल्यावर जसजसे उन वाढत जाते तसे उष्णतेमुळे आंबू लागतो. त्यापूर्वीच हा पिणे श्रेयस्कर असते. उन्हाळ्यात हा पिण्याने उन्हाचा त्रास होत नाही. शासनाची या पेयास नीरा म्हणून मान्यता आहे. नीरेमध्ये १२ टक्के साखर असते. ताडी आंबल्यावर पहिल्या ३ ते ८ तासात तिच्यात ३ टक्के एथिल अल्कोहोल बनते. ही प्रक्रिया चालू राहिल्यास अल्कोहोल ५ टक्क्यापर्यंत वाढते. त्याहून अधिक झाल्यास ती मनुष्याला पिण्यास योग्य नसते.



कुचिंदा या तालुक्याच्या ठिकाणी आलो. कुचिंदा हे ऐतिहासिक नगर असून येथे अनेक जुन्या प्राचीन वास्तू, मंदिरे, राजवाडा, डाक बंगला इत्यादी आहेत. इथे बस स्टॅन्ड जवळ पोहोचलो तेव्हा आमच्याभोवती भरपूर गर्दी जमा झाली. आमचे स्वागत करण्यात आले. थोड्या वेळात काही वार्ताहर पण आले आणि स्थानिक चॅनेल साठी मुलाखत घेतली गेली. सर्वांबरोबर गप्पा रंगल्या. अनेकांनी फोटो काढून घेतले. दुपारच्या जेवणासाठी वेळ होता म्हणून आम्ही अजून १५- २० किमी जाण्याचे ठरवले. कुचिंदा शहरात अनेक जणांनी थांबवून विचारपूस केली व पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. कुचिंदा



शहराबाहेर खारला नदीवर बांधलेल्या झुलेन पुलाजवळ आलो. हा जुना एकेरी छोटा पूल लोखंड पोलाद यांचा वापर करुन बांधलेला असून तो इंग्रजकालीन आहे.



पंधरा किमीवर भोजपुर मोठे गाव होते. भोजपुरनंतर जंगल असून तिकडे हॉटेल- धाबे नाहीत त्यामुळे भोजपूरच्या पुढे जेवणासाठी जाऊ नका, पुढे दूरवर काही भेटणार नाही असे अनेक स्थानिक लोकांनी सुचवले होते. बॉक्समा नंतर भोजपुर येईपर्यंत वाटेमध्ये जे काही हॉटेल भेटले ते एक तर बंद होते किंवा त्यांच्याकडे फक्त नाष्टा होता. भोजपुरमध्ये पोहोचलो. इथे पण तशीच परिस्थिति. भोजपुर संपत आले तरी हॉटेल सापडत नव्हते. तिथे काही स्थानिक लोकांकडे पुन्हा चौकशी केली. त्यांच्या म्हणण्यानुसार पुढे दोन तीन धाबे आहेत.

भूक तर जोरात लागली होती. आता थोडे मागे जाऊन जिथे नाष्टा मिळत होता तिथे खायचे की पुढे जाऊन जे धाबे आहेत तिथे काय मिळते का हे पाहायचे, हे ठरवण्यासाठी थांबलो. सर्वानुमते ठरले की नाष्टा करुन पोट भरणार नाही त्यापेक्षा पुढे जाऊन जे धाबे आहेत तिथे पाहूया. थोड्या वेळात एक बंद ढाबा दिसला. अजून थोडे पुढे गेल्यावर एक छोटी टपरी होती तिथे पण थोडासा नाष्टा होता. आता छोटे चढ उतार सुरु झाले होते. आणि थोड्या वेळाने एका वाकणानंतर एक मस्तपैकी ढाबा मिळाला. गरम जेवण तयार होते.

काहीजण मागे होते, ते आल्यावर त्यांना गंमत म्हणून सांगितले की जेवण नाही मॅग्गी मिळेल. सगळ्यांनाच भूक लागली होती त्यामुळे काही जण मॅग्गी खाण्यासाठी तयार झाले तर काही जण अजून पुढे जाऊया असे बोलू लागले. येथे पूर्ण जेवण मिळेल हे समजल्यावर सगळे खुश. मस्तपैकी गरमागरम रोटी, प्रसन्नियां, पनी संतुला, मूंग दालमा, पालक सगा भाजा, डालना, कदली मंजा राय,



खाट्टा चटनी, चावल असे स्थानिक उडिया जेवण झाले. जेवण झाल्यावर थोडा आराम केला. इतरांबरोबर गप्पा झाल्या. पाखला भता नावाची एक पाककृती इथे घरांघरांत बनते. ओडिशामध्ये उन्हाळ्याचे स्वागत हा पारंपारिक पदार्थ खाऊन केला जातो. यामध्ये तांदळाचा वापर असून तो बटाटा, तळलेले मासे, पापड, करी, चणे याबरोबर आवडीने खाल्ला जातो. कडक उन्हाळ्यात, शरीरातील गर्मी कमी करण्यासाठी हा पदार्थ लाभदायक ठरतो. दरवर्षी २० मार्च येथे पाखला दिवस म्हणून साजरा केला जातो.

कुचिंदा नंतर हा झारसुगुडा व देवगढ या दोन जिल्ह्यांच्या मुख्यालयांना जोडणारा मार्ग होता त्यामुळे यावर कुठेही खड्डे नव्हते. तसेच या भागात असणाऱ्या गावातील रस्ते पण छोटे आणि बिनाखड्डयांचे होते. अजून एक वेगळी अनुभवलेली गोष्ट म्हणजे इथे रस्त्याच्या बाजूला अनेक ठिकाणी सरकारने मोफत शौचालये बांधली आहेत. आणि तिथेच कूपनलिका पण आहेत. या कूपनलिकांना भरपूर पाणी होते. या शौचालयामध्ये देखरेखीसाठी कोणीही नव्हते पण ती साफ आणि स्वच्छ होती.

इथून पुढे जंगल सुरु झाले. जैव विविधतेने नटलेल्या या भागात अनेक वन्य प्राणी आहेत. अनेक ठिकाणी हत्तीचे नेहमीचे पाणवठ्यावर जाण्याचे मार्ग होते. ते मुख्य रस्त्याला जिथे ओलांडून जात होते तिथे तसे सूचना फलक लावले होते. जंगलामध्ये काही छोटी गावे पण वसलेली होती. घराच्या बाजूला पिवळीधम्मक भाताची शेते पण होती. संध्याकाळची वेळ असल्याने



काही गावातील मुले क्रिकेट खेळत होती. आम्हाला पाहून खेळ सोडून सायकली पाहायला जमली. त्यांच्याबरोबर गप्पा रंगल्या.

पुढील गावात जाणारी काही लहान मुले त्यांच्या एक गिअरच्या साध्या सायकल घेऊन आमच्याबरोबर आली. शिरीद गावानंतर एक घाट लागतो. ते चढण त्या मुलांबरोबर गप्पा मारत चढवले आणि वरच्या गावात पोहोचलो. दोन्ही बाजूला डोंगरांची रांग, घनदाट जंगल आणि त्यामध्ये वसलेली ही छोटी झोपडीवजा टुमदार घरे सगळेच आल्हाददायक होते.

संबलपुर देवगढ जिल्ह्याच्या सीमेवर असणाऱ्या या मरगढ कैलास डोंगर रांगेतील घनदाट जंगल पार करुन कालापाट ला आलो. या जंगलात अनेक ठिकाणी हत्तींचे मार्ग होते पण आम्हाला हत्ती काही दिसले नाहीत. घाट उतरताना तर पाच सहा किमीचा फक्त उतारच होता. एके ठिकाणी थांबून चहा प्यायलो. इथल्या मातीच्या चुली खूपच मोठ्या होत्या आणि चुलीवरची चहा तर अफलातूनच. देवगढ जिल्हा सुरु झाला होता.



**देवगढ जिल्हा** हा ओडिशा राज्याच्या उत्तर पश्चिम भागात वसलेला आहे. या जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय देवगढ येथे आहे. देवगढ बामंडा म्हणजेच बामरा संस्थानाची राजधानी होती. देवगढ जिल्ह्याच्या उत्तरेला सुंदरगढ जिल्हा, पश्चिमेला संबलपुर जिल्हा, दक्षिण व पश्चिमेला अंगुल जिल्हा आहे.

बामंडा या नावाबद्दल अनेक कथा सांगितल्या जातात. काहींच्या मते येथे बामा म्हणजेच बहा आणि मंडा नावाचे दोन राजे राज्य करत होते. त्यांची ही दोन नावे एकत्र होऊन बहामंडा किंवा बामंडा भूभाग तयार झाला. काही काळाने याचाच उच्चार बदलून बामरा झाला. काहींच्या मते श्रीराम वनवासात फिरत असताना येथे आले. या भूमीवर पहिल्यांदा त्यांनी डावे पाऊल ठेवले. संस्कृतमध्ये बामा म्हणजे डावे आणि माडा म्हणजे पाऊल. हा भूभाग पवित्र ब्राह्मणी नदीच्या खोऱ्यामध्ये वसलेला असून बामंडा, अखोज बामंडा, शंखज्योती मंडल, श्रीपुंजी मंडल, गंगा राज्य, बामंडा पती, जादव देश, सिंघन राज्य, बाघर कोटा, बामंडा मंडल अशा अनेक नावाने ओळखला जातो. येथे सापडलेल्या ताम्रलेखानुसार



अकराव्या शतकापर्यंत ब्राह्मणी नदी शंखज्योती मंडल नावाने ओळखली जात असे. याच कारणामुळे गंगा राजघराण्याचा पहिला राजा सरजू देब याने राजघराण्याचे शाही चिन्ह शंख निवडले. आणि भूभागाला शंखज्योती मंडल नाव ठेवले. जे काही काळाने पुन्हा बामंडा नावाने ओळखले जाऊ लागले.

जैवविविधतेने नटलेल्या या देवगढ जिल्ह्याला समृद्ध सांस्कृतिक परंपरा असून डोंगर, झरे, धबधबे, जंगल, शुद्ध वातावरण, समृद्ध वनस्पतिसृष्टी आणि वन्य प्राणीजीवन यांची नैसर्गिक देणगी लाभलेली आहे. जिल्ह्याचा ५३ टक्के भाग जंगलांनी व्यापलेला आहे. ब्राह्मणी, टिकिरा नदी आणि रेंगाली, गोहिरा जलाशय यामुळे येथील प्रदेश सिंचनाखाली आले आहेत. कृषी, पशुपालन आणि जंगले यावर येथील लोकांचे जीवन अवलंबून आहे. या नैसर्गिक साधनांवर आधारित अनेक लघु व ग्रामीण उद्योग सुरु झाले आहे.



या जिल्ह्यात अनेक पर्यटनस्थळे आहेत. देवगढ पासून ६५ किमीवर असणाऱ्या कांजीम गावाजवळ मठगुंफा येथे कित्येक हजार वर्षांपूर्वी चितारलेली प्रागैतिहासिक भिंतीचित्रे सापडली आहेत. तसेच काटसर घाट, गोहिरा धरण, दाराघडी, जाडेश्वर मंदिर, श्री जगन्नाथ मंदिर, देवझरन, कोराडकोट, कैलास पॅलेस, प्रधानपाट इत्यादी ठिकाणे प्रसिद्ध आहेत.



प्रवासुनी ओलांडून तिलैबानीला आलो. इथून पर्यायी रस्ता संपून रुंदीकरणाचे काम चालू असणारा मुख्य संबलपुर- देवगढ रस्ता सुरु झाला. सगळीकडे खडी, माती आणि धूळ होती. ही धूळ उडू नये म्हणून त्यावर पाणी ओतले जात होते. त्यामुळे भरपूर ठिकाणी चिखल झाला होता. रस्त्यामधले खड्डे समाजात नव्हते. आणि अंधार पण पडत आला होता. इथून

देवगढ १४ किमी होते. हे अंतर आम्ही अंधारात चिखलातून चालवत देवगढला पोहोचलो. सायकल आणि कपडे चिखलाने माखलेले होते.

शेवटचे दोन किमी बाकी असताना मुख्य रस्त्यावरील चिखल वाचवण्यासाठी देवगढ बाजारातून गेलो. तिथे भरपूर जणांनी आमचे स्वागत केले. स्थानिक न्युज चॅनेलचे वार्ताहर शिबाशीष झानकर यांची भेट झाली. त्यांनी लॉज जवळ सर्व पोहोचल्यावर सर्वांची मुलाखत घेतली आणि ते मुलाखतीचे व्हिडीओ चित्रण तेथील बातम्यांमध्ये दाखवण्यात आला. रात्री कनक टिव्हीचे रिपोर्टर सत्यनारायण मिश्रा सर भेटले. त्यांना दुसऱ्या दिवशी सकाळी आमचा सायकल चालवतानाचा विडिओ आणि मुलाखत घ्यायची होती.



सायकली चिखलाने माखल्या होत्या. त्या साफ करताना आज भरपूर वेळ गेला. आजच्या दिवसातील आमचा सायकल प्रवास मस्तच झाला होता त्यामुळे सायकल आणि कपड्यांवरील चिखल साफ करताना काही वाईट वाटले नाही. या लॉजमध्ये जेवणाची सोय नव्हती त्यामुळे सगळेजण आंघोळ आणि इतर कार्यक्रम आटपून जेवणासाठी बाहेर गेलो. रात्री जेवणामध्ये खिचडी दही, कुकुड तकरारी चिकन, कानिका चावल, उडिया फिश करी असे जेवण झाले. नंतर रसगुल्ला, रसलाई, खर्मोहण, रसबाली, कलाकंद अशा मिठाई खाल्ल्या. जेवण झाल्यावर शहरात आजूबाजूला फेरफटका मारुन परत आलो. इथे थंडी खूपच पडली होती. उद्या पहाटे किती थंडी असेल याचा अंदाज घेत निद्रिस्त झालो.

***

# दिवस तेरावा: देवगढ ते केन्दुझर

मार्ग: देवगढ- बारकोटे- बामपारडा- पलहरा- दलो- जगमोहनपुर- कांजीपानी- केन्दुझर (१३१/ १७१९ किमी)
(जिल्हे: देवगढ- अंगुल- केन्दुझर)

सुप्रभात देवगढ..!! सकाळी थंडी खूपच होती. काल सांगितल्याप्रमाणे पहाटेच कनक टिव्हीचे रिपोर्टर सत्यनारायण मिश्रा सर आणि शिबाशीष सर आले होते. गरमागरम चहा पिऊन आम्ही निघालो. मिश्रा सर आणि शिबाशीष सर काही अंतर आमच्याबरोबर बाईक वर आले. त्यांनी आमचे सायकल चालवतानाचे विडिओ चित्रण केले. थोड्या वेळाने सूर्य उगवल्यावर एका ठिकाणी थांबून आमच्या सायकल मोहिमेबद्दल मुलाखत घेतली गेली. आम्हीही सायकल चालवण्याचे फायदे, प्रदूषणमुक्त भारत आणि मोहिमेतील गमतीजमती याबद्दल विस्तृतपणे सांगितले, गप्पा रंगल्या. हे शिबाशीष सरांना इतके पटले की पुढील काही दिवसात ते त्यांची बुलेट बाजूला ठेवून सायकल घेऊन फिरायला लागले. आणि आम्हाला एक नवीन सायकल मित्र मिळाला, आजही ते संपर्कात आहेत.





हवेत गारवा होता त्यामुळे पुन्हा चहा झाला. सर्वांचा निरोप घेऊन पुढे निघालो. रस्ता रुंदीकरणाचे काम जोरात चालू होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला पताका सारख्या पट्ट्या लावलेल्या होत्या. खड्डे, खडी, चिखल आणि मातीचे ढीग ठिकठिकाणी होते. पण दोन्ही बाजूला भाताची शेते आणि त्यांच्या मागे घनदाट झाडी असलेली डोंगर रांग यामुळे आजूबाजूचे वातावरण मस्तच होते.

कलामती, बालम, पंचमहा, चक्रपाली इत्यादी गावे पार करुन बारकोटेला पोहोचलो. येथे ब्राह्मणी नदीच्या पुलावर थोडा वेळ थांबलो. अवाढव्य पात्र असलेल्या या नदीचे पाणी खूप दूरवर पसरलेले दिसत होते. ब्राह्मणी नदी ओडिशा राज्यातील महानदीनंतरची सर्वात मोठी नदी आहे. बंगालच्या उपसागरास मिळणाऱ्या या नदीची लांबी ७०५ किमी आहे. बिहार राज्यात छोटा नागपूरच्या पठारावर उगम पावणाऱ्या दक्षिण कोएल व शंख या दोन नद्यांचा ओरिसा राज्यातील सुंदरगढ जिल्ह्यात पनपोश येथे संगम होतो. त्यानंतरच्या संयुक्त प्रवाहास ब्राह्मणी हे नाव पडले आहे. प्रथम दक्षिणवाहिनी असली, तरी बहुतांश ही नदी वायव्य आग्नेय दिशेत सुंदरगढ, देवगढ, अंगुल, धेनकानाल व कटक या जिल्ह्यांतून वाहते. कटक जिल्ह्यात ती धाम्र नदीमुखखाडी व मैपारा नदी या दोन मुखांद्वारे बंगालच्या उपसागरास मिळते. खर्सुआ, किमिरिआ, तिक्किरा, लिंगारी, पतिया या हिच्या प्रमुख उपनद्या होत. या नदीवर बांधलेल्या रेंगाली धरणामुळे मोठा जलाशय निर्माण झाला आहे. ब्राह्मणी नदीस धार्मिक दृष्ट्या महत्व असून या नदीला कालवे काढून आजूबाजूच्या प्रदेशातील बागाइती पिकांना पाणीपुरवठा केला जातो.



ब्राह्मणी नदीच्या पुलावरुन पुढे कल्ला गावात आलो. इथून कल्ला नदी वाहत जाते ती पुढे ब्राह्मणी नदीला मिळते. बामपारडा गावात नाष्टासाठी थांबलो. छोटी टपरी होती. इथे वडा रस्सा खाल्ला. आम्हाला पाहून मालकाने गरमागरम डोसा बनवून दिला. सोबत उडिया करी आणि चटणी, चव खासच होती. नंतर गावठी दुधाची कडक चहा झाली. गावकरी आणि शाळेत जाणारी मुले आमच्या सायकल पाहायला जमली.



त्यांच्याबरोबर गप्पा रंगल्या. नाष्टाचे बिल देऊन निघताना मालकाने सर्वांना चॉकोलेट गोळी दिली. मुंबईहुन सायकल चालवत आलो म्हणून खुश होऊन वाटलेली त्याची ही चॉकोलेट गोळी आमच्यासाठी मोलाची होती. सर्वांचा निरोप घेऊन आम्ही गोळी चघळत पुढे निघालो. बालीपोसी गावात आलो. देवगढ जिल्हा संपून अंगुल जिल्हा सुरु झाला होता.



**अंगुल जिल्हा** ओडिशा राज्याच्या मध्यभागात वसलेला आहे. अंगुल जिल्ह्याच्या पूर्वेला ढेक्कांनाल व कटक जिल्हे, उत्तरेला देवगढ, केंदुझर व सुंदरगढ जिल्हे. पश्चिमेला संबलपुर व सोनेपुर जिल्हे आणि दक्षिणेला बौध व नयागढ जिल्हे आहेत. अंगुल शहर येथे या जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय आहे. अंगुल हे ओडिशा राज्याचे आर्थिक, औद्योगिक आणि सांस्कृतिक केंद्र आहे.

अंगुल जिल्ह्यातून वाहणाऱ्या महानदी आणि ब्राह्मणी नदी यांच्या पाण्यामुळे येथील जमीन सिंचनाखाली आली आहे. त्यामुळे अनेक पिके पिकवली जातात. या जिल्हा खनिजांनी समृद्ध असल्यामुळे खाणी आणि त्यावर अवलंबून उद्योग कारखाने येथे मोठ्या प्रमाणात आहेत. या जिह्यातील रावणछाया हा पारंपरिक बाहुल्यांचा नाच प्रसिद्ध आहे.

संबलपुर आणि देवगढ जिल्ह्यात अनेक ठिकाणी वार्ताहरांनी घेतलेल्या मुलाखती आणि



आमच्या सायकल मोहिमेबद्दलच्या बातम्या अनेक उडिया दैनिक पेपर मध्ये छापून आल्या होत्या आणि टीव्ही चॅनल वर पण दाखवल्या जात होत्या. त्यामुळे येथील अनेक लोकांना आमच्या सायकल मोहिमेबद्दल समजले होते. रस्त्यामध्ये अनेक जणांनी आम्हाला याबद्दल सांगितले. येथील लोकांचे सायकल प्रेम अधिक वाढले होते. सायकल

चालवणाऱ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला गेला होता, त्यामुळे आम्ही खुश होतो. ही आमच्या सायकल मोहिमेची बातमी पाहून अंगुल जिल्ह्यातील पलहरा येथील क्रीडा क्षेत्रातील ग्रुपचे पदाधिकारी बाबुला महाकुल सर यांनी आम्हाला संपर्क केला. त्यांनी देवगढचे मिश्रा सर यांच्यामार्फत आमचा मोबाईल नंबर घेतला होता. ते त्यांच्या ग्रुप मार्फत आमचा सत्कार करणार होते.

रस्ता रुंदीकरणात माती खणून ठेवल्यामुळे बाजूने वाहन गेले की धूळ उडत होती. ऊन पण वाढत चालले होते. आम्ही पलहरा बायपासला पोहोचलो तेव्हा बाबुला महाकुल सर आणि इतर २०-२५ पदाधिकारी, स्थानिक वार्ताहर आमची वाट पाहत थांबले होते. कडक उन्हामध्ये दुपारच्या वेळेला शहराबाहेर हे सगळे आमच्यासाठी जमले होते. सर्वांनी आमचे स्वागत आणि सत्कार केला. चहा नाष्टा झाला. सर्वांबरोबर गप्पा रंगल्या. वार्ताहरांबरोबर मुलाखती झाल्या. सर्वांकडून पुढील सायकल प्रवासासाठी शुभेच्छा मिळाल्या. जेवणासाठी आग्रह झाला पण आम्ही आदरपूर्वक नकार दिला. सर्वांचे आभार मानून आम्ही पुढे निघालो.




पलहरा हा अंगुल जिल्ह्यातील एक तालुका असून हे शहर तालुक्याच्या मुख्यालयाचे ठिकाण आहे. येथील जंगलामध्ये मोठ्या प्रमाणात बांबूची झाडे आहेत. गावातील लोक त्यापासून अनेक कलाकुसरीच्या वस्तू बनवतात. पलहरा पासून मलयगिरी पर्वतरांग आणि जंगल सुरु होते. देवगढ जिल्ह्याची सीमा संपल्यावर पुढे हा महामार्ग फक्त काही किमी



अंतर, अंगुल जिल्ह्याच्या उत्तर भागातून जातो. थोड्या वेळात दलो गावात पोहोचलो. इथे अंगुल जिल्हा संपून केन्दुझर जिल्हा सुरु झाला.

**केन्दुझर जिल्हा** प्राचीन खिज्जिंग राज्याचा एक अंश आहे. या जिल्ह्याच्या पूर्वेला मयुरभंज, बालेश्वर व भद्रक, दक्षिणेला जाजपुर व ढेन्कानाल, पश्चिमेला अंगुल व सुन्दरगड आणि उत्तरेला झारखण्ड राज्यातील पूर्व सिंहभूम हे जिल्हे वसलेले आहेत. केन्दुझर किंवा केउंझर या जिल्ह्याची स्थापना १९४८ मध्ये झाली. केन्दुझर किंवा केन्दुझरगड शहर हे या जिल्ह्याचे प्रशासकीय मुख्यालय आहे.




बैतरणी ही या जिल्ह्यातील प्रमुख नदी आहे. येथे रब्बी आणि खरीप दोन्ही पिके घेतली जातात. भात, ज्वारी, मूग, बिरी, तीळ, भुईमूग, जूट, बटाटे, ऊस, आंबा, टोमॅटो इत्यादी येथील प्रमुख पिके आहेत. हा जिल्हा प्राकृतिक खनिज आणि वन संपत्तीने भरलेला आहे. जिल्ह्याचा पश्चिम भाग उंच डोंगरांचा असून यामध्ये गंधमार्द्दन, मांकडनचा, गोनासिका, ठाकुराणी इत्यादी राज्यातील उंच पर्वत आहेत. येथे अनेक खनिजांच्या खाणी आहेत आणि त्यावर आधारित उद्योग आहेत.

ओडिशा राज्यातील सगळी विविधता या जिल्ह्यामध्ये पहायला मिळते. जगातील सर्वात जुने दगड येथे पहायला मिळतात. येथे गुहेमध्ये कोरलेली आकर्षक प्राचीन भिंतीचित्रे प्रसिद्ध आहेत. बउला पहाड़ी, रावण छाया गुफा, चक्रतीर्थ, गोनासिका, कुशलेश्वर मंदिर, मुर्गा महादेव मंदिर, बडबिल, हदगढ़ अभयारण्य इत्यादी येथील लोकप्रिय पर्यटन स्थळे आहेत. शारहूल, सोहराई, कर्मपूजा, बोडम, चैत्र परब, मकर संक्रांती, नौखाई, राजा परब, बुरानी जत्रा, रथ जत्रा, डोला



यात्रा, बडा ओशा इत्यादी अनेक सण उत्सव येथे वर्षभर साजरे केले जातात. सणांबरोबरच चांगु, चाहु, जुंग, हो ही आदिवासी नृत्य प्रसिद्ध आहेत.

जेवणाची वेळ झाली होती. कांजीपानी घाट सुरु होण्याच्या अगोदर जगमोहनपुरला काही धाबे होते, तेथे दुपारचे जेवण करायचे ठरले. एका ढाब्याजवळ थांबून जेवण तयार आहे काय हे विचारले. जेवण तयार होते. काही जण मागे होते त्यांची वाट पाहत उभा असताना एका बुलेटवर दोघे जण जवळ आले. त्यांनी सायकल मोहिमेबद्दल आपुलकीने विचारपूस केली. त्यांनी पुढे १०० मीटर अंतरावर असणाऱ्या धाब्यावर जाण्यासाठी सुचवले. कारण तो तिथला प्रसिद्ध ढाबा होता. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आम्ही त्या धाब्यावर गेलो आणि खरंच आम्हाला मस्तपैकी उडिया जेवण मिळाले. त्या धाब्यावर भरपूर गर्दी होती. त्यांच्याबरोबर गप्पा रंगल्या. आम्ही मुंबईहून सायकलने आलो म्हणून आम्हाला मालकाकडुन स्थानिक जेवण बनवून मिळाले. सागा, दही बैगना, चिगुंडी तारकरी, सनतुला सब्जी करी, रोटी, चावल, चटणी असा खास बेत झाला. पोटभर जेवण झाल्यावर थोडा वेळ आराम केला आणि सर्वांचा निरोप घेऊन पुढे निघालो.





सायकल घेऊन बाहेर आलो तोच नितीन भाईची सायकल पंक्चर झाली. बाकीचे सर्व पुढे गेले होते. आजूबाजूला जवळपास सावली कुठे आहे ते पाहून नवीन बनलेल्या रस्त्यावर आम्ही सायकल घेतली आणि ती उलटी केली. रस्त्यावरील छोट्या तारेमुळे पंक्चर झाला होता. तारेचा तुकडा टायरमध्ये पण अडकला होता. तो काढला, पंक्चर दुरुस्त केला आणि पुढे निघालो.

कांजीपानी घाटाच्या अगोदर एक आदिवासी वाडी लागली. तिथे टपरीवर चहासाठी थांबलो. सायकल पाहायला गर्दी जमली. त्यांच्याबरोबर गप्पा सुरु झाल्या. पलहराला आमचा सत्कार करताना जे गुलाबाच्या फुलांचे गुच्छ मिळाले होते ते लहान मुलांना दिले. ते पण खुश. जवळच हंडे घेऊन काही आदिवासी बायका बसलेल्या दिसल्या. त्या काय विकत आहेत हे पाहण्यासाठी गेलो तेव्हा समजले की ते एक पांढऱ्या रंगाचे सरबत होते. भाताच्या पेजेपासून हे बनवले जाते. हे उन्हापासून होणारे त्रास कमी करते. हे इथे मोठ्या आवडीने प्यायले जाते. हे सरबत जर अधिक आंबवले तर ते नशा आणणाऱ्या दारुसारखे बनते. इथे मोहाची झाडे पण भरपूर आहेत. मोहाच्या झाडांना फुले आले की ती फुले पण वेचून त्यापासून पण दारु बनवली जाते.



रस्ता रुंदीकरणासाठी आजूबाजूची झाडे तोडली जात होती. इथे असलेली तेंदूपत्त्याची आणि इतर जंगली औषधी झाडे तुटत होती म्हणून काही स्थानिक लोक नाराज होते.

आता १९ किमीचा कांजीपानी घाट चढून जायचे होते. या घाटात समोरासमोर जड वाहनांमुळे गर्दी होऊन त्रास होणार हे नक्की होते. आम्ही घाट चढायला सुरवात केली. थोड्या वेळाने थांबलेल्या गाड्यांची रांग दिसली. जाणारे ट्रक, कंटेनर रांगेत उभे होते. विचारपूस केली असता समजले की, रस्ता रुंदीकरणाच्या कामामध्ये एका ठिकाणी सुरुंग लावून दगड फोडण्याचे काम चालू होते. त्यामुळे घाटातील जड वाहनांची वाहतुन दुपारपासून बंद होती. आणि हलकी लहान वाहने दुसऱ्या लांबच्या पर्यायी मार्गाने वळवली होती. आता आम्ही पण इथेच अडकणार असे वाटू लागले.



बाकीचे सगळे पुढे गेले होते. मी आणि नितीन भाई शेवटी होतो. सगळे ट्रक रस्त्याच्या एका बाजूला रांगेत उभे होते. आणि समोरुन पण कोणतीच गाडी येत नव्हती त्यामुळे रस्त्याचा एक भाग आम्हाला मोकळा मिळाला होता. आरामात सायकल चालवत आम्ही घाट चढू लागलो. जिथे सुरुंगाचे काम चालू होते तिथे पोहोचलो.

पुढे गेलेले आमचे सगळे सहकारी भेटले. सुरुंग लावल्यामुळे त्यांना थांबवले होते. तिथे असलेल्या सरकारी अधिकारी आणि कामगारांबरोबर गप्पा सुरु झाल्या. सुरुंग लावणे थांबले होते त्यामुळे थोड्या वेळाने फक्त आम्हाला त्यांनी सायकल घेऊन पुढे जाऊ दिले. सुरुंगामुळे रस्त्यावर दगड पसरले होते. ते बाजूला करण्याचे काम सुरु झाले होते. हे दगड चुकवत आम्ही पुढे निघालो. काही ठिकाणी सायकल हातात घेऊन पुढे आलो. पलीकडे येणारे ट्रक, कंटेनर रांगेत उभे होते. आम्ही घाट चढवून वरती पोहोचलो. अजूनही वाहनांची वाहतूक सुरु झाली नव्हती. पश्चिम क्षितिजावर सूर्य मावळत होता.



थोड्या वेळाने अंधार झाला आम्ही सायकलच्या लाईट चालू केल्या. त्या उजेडात घाट उतरु लागलो. आणि अचानक भगत सरांची सायकल पंक्चर झाली. रस्त्याच्या बाजूला थांबून पंक्चर काढला आणि रांगेत सायकल चालवत पुढे निघालो. रस्त्यावर गतिरोधक भरपूर होते. ते वाचवत घाट उतरुन खाली पोहोचलो आणि नुकतेच घाटातील मोठ्या जड वाहनांची वाहतून सुरु झाली. ही वाहतूक आम्ही घाटात असताना चालू झाली असती तर आम्हाला सायकल चालवताना त्रास झाला असता आणि त्यामध्ये आमचा जास्त वेळ गेला असता.



कांजीपाणीला थोडा वेळ थांबून गरमागरम चहा प्यायलो. चेंना झिली, खजा, रासोगोला, कोरा खाई, गज्जा, पलुआ लुडू, बडी, रसबाली अशा काही मिठाई खाल्ल्या आणि पुढे निघालो. आजूबाजूला डोंगर आणि भरपूर झाडे असल्यामुळे हवेत गारवा होता. केन्दुझरला पोहोचलो तेव्हा तर खूपच थंडी होती.

लॉजवर सर्व आटपून जेवणासाठी बाहेर पडलो. शहरामध्ये फिरुन एक चांगले हॉटेल शोधून काढले. चातु राय, आलू पोटाला रस करी, माख्ही करी, झींगा मलाई, केबडा कालिया, मिर्च मछली, चावल पुलाफ, रोटी, चटणी असा जेवण झाले. या भागात माशांची डोकी स्थानिक भाज्यांबरोबर शिजवून करी केली जाते. आणि ती येथे आवडीने भाताबरोबर खाल्ली जाते. तसेच बटाट्याचा वापर पण बहुतेक पदार्थामध्ये केला जातो.

आपल्या देशात बहुतेक पिके सारखीच असतात. पण त्यापासून बनवलेले पदार्थ, त्यातील वापरलेले मसाले, पदार्थ बनवण्याची पद्धत वेगवेगळी असल्यामुळे चव बदलत जाते आणि पदार्थाचे नाव पण. एका बाजूने दाक्षिणात्य खाद्यसंस्कृतीचा प्रभाव आणि दुसऱ्या बाजूला उत्तर भारतीय आणि बंगाली खाद्यसंस्कृतीचा प्रभाव यामुळे इथल्या ओडिशामधील पाककृतींमध्ये विविधता आढळते.

***

# दिवस चौदावा: केन्दुझर ते बांगरीपोसी

मार्ग: केन्दुझर- चिलिदा- सिंगाडा- दारी- जशीपुर- बिसोई- बांगरीपोसी (१२५/ १८४४ किमी) (जिल्हे: केन्दुझर- मयूरभंज)

आज हुडहुडी भरवणारी थंडी होती. पहाटे तयार होऊन लॉजबाहेर आलो. सायकल तपासली, टायर मध्ये हवा भरली, कॅरिअरला पॅनिअर अडकवले. आणि सगळे निघाले. तरी तिथे एकाचे पॅनिअर बाकी होते. सकाळी सकाळी कोण पॅनिअर विसरुन पुढे निघाला होता ते समजत नव्हते. नितीन भाईंनी शिटी वाजवून थांबवायचा प्रयत्न केला पण तोपर्यंत सगळे कोपऱ्यावरील वळण घेऊन पुढे गेले होते. थोड्या वेळाने फडतरे सर परत आले. ते त्यांचे पॅनिअर होते. गडबडीमध्ये ते विसरले होते.



शहरामध्ये एका ठिकाणी चहाची टपरी दिसली तिथे थांबून चहा प्यायलो. उजेड झाला होता तरी थंडी कमी झाली नव्हती. चहा प्यायल्यावर थोडी तरतरी आली. आम्हाला पाहून अनेक जणांनी सायकल मोहिमेबद्दल विचारपूस केली. सर्वांबरोबर गप्पा मारत पुढे निघालो.



शहरातील श्री रघुनाथ जेव मंदिर बाहेरुनच पहिले. या मंदिरात मिळणारा खिचडीचा प्रसाद चविष्ट असतो असे तिथे भेटलेल्या लोकांकडून समजले. गुगल मॅपच्या मदतीने शहराबाहेर आलो. मुख्य रस्त्यावर सत्संग विहारची आकर्षक वास्तु बाहेरुन पहिली. येथे श्री श्री ठाकूर अनुकूल चंद्रा यांचे मंदिर आहे. रस्ता रुंदीकरणाचे काम चालू होते. ठिकठिकाणी रस्ता खणून ठेवलेला होता. थोड्या वेळाने रस्त्याच्या आजूबाजूला इमारती संपून शेती दिसायला लागली. चौकोनी आयताकार आकाराची भाताची शेते धुक्यामध्ये हरवली होती.

मुक्तापुर, संकरपुर, चांदपोसी, बेतारतापोसी गावे पाहत पुढे निघालो. थोड्या वेळाने जंगल सुरु झाले. रस्त्यामध्ये काही ठिकाणी हत्तीच्या कळपांचे नेहमीचे येण्याजाण्याचे मार्ग होते. तेथे हत्ती दिसतायत काय याचा अंदाज घेत सायकलचा वेग कमी केला. हत्ती काही



दिसले नाहीत. सूर्य उजाडल्यामुळे आता थंडी कमी झाली होती. एका ठिकाणी थांबून काही जणांनी स्वेटर काढले आणि पॅनिअर मध्ये ठेवले.



येथील गावामध्ये मोठ्या प्रमाणात भाताचे उत्पादन होते. भात शेतीची कामे यंत्राच्या मदतीने केली जातात. एके ठिकाणी यंत्राच्या साहाय्याने भाताची मळणी चालू होती. भाताचे धान्य आणि पेंडा गवत वेगळे केले जात होते. ते पाहण्यासाठी आम्ही थांबलो. गाववाल्यांबरोबर गप्पा मारल्या.

रस्ता रुंदीकरणाच्या कामामध्ये रस्त्याच्या दोन्ही बाजूला असणारे जुने मोठे पसरलेले वृक्ष तुटले गेले होते. त्यामुळे काही ठिकाणी उजाड दिसत होते. काही ठिकाणी या जागेवर नवीन झाडांची रोपे लावून त्याभोवती कुंपण घातलेले होते. येथील अनेक गावांमध्ये आम्हाला छोटे मोठे तलाव दिसले. यातील काही तलाव कमळाच्या फुलांनी भरलेले होते. चिलिदा, तुरुमुंगा गावे पाहत बैतरणी नदीच्या पुलावर आलो. येथे केन्दुझर जिल्हा संपून मयूरभंज जिल्ह्याची सीमा सुरु झाली.



बैतरणी नदी ओडिशा राज्यातील प्रमुख सहा नद्यांपैकी एक नदी आहे. या नदीचा उगम केन्दुझर जिल्ह्यातील गोनासिका डोंगरात झाला आहे. उगम झाल्यावर ही नदी दगडांमधून वाहत खाली येते. नंतर काही अंतर जमिनीखालून वाहते. त्यावेळेला तिचे पाणी दिसत नाही त्यामुळे तेथे ती गुप्त गंगा किंवा गुप्त बैतरणी नदी म्हणून ओळखली जाते. सुरवातीला ही नदी ओडिशा आणि झारखंड राज्याच्या सीमेवरुन वाहते. या नदीची लांबी ३६५ किमी आहे. ही नदी ब्राह्मणी नदीला मिळून पुढे बंगालच्या खाडीमध्ये मिळते. या नदीचे खोरे सुपीक असून येथे अनेक पिके घेतली जातात. बैतरणी नदीवरील पूल ओलांडून पलीकडे मयूरभंज जिल्ह्यात आलो.



**मयूरभंज जिल्हा** हा अनुसूचित जनजाती बहुल जिल्हा आहे. उडिया भाषेबरोबरच संथाल आणि हो या येथील प्रमुख भाषा आहेत. या जिल्ह्याच्या पश्चिम व दक्षिणेला केन्दुझर, पूर्वेला बालेश्वर व पश्चिम बंगाल मधील मेदिनीपुर, आणि उत्तरेला झारखंड राज्यातील पूर्व सिंघभूम हे जिल्हे आहेत. या जिल्ह्याचे मुख्यालय बारिपदा आहे. मयूरभंज हे प्राचीन काळात एक महत्वपूर्ण राज्य होते. नवव्या शतकापासून येथे भंज शासक होते. अठराव्या शतकात हे मराठ्यांच्या अंमलाखाली आले.



बुढाबलंग ही येथील प्रमुख नदी आहे. या राज्यात अनेक पिके घेतली जातात. त्यामध्ये भाताचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. जिल्ह्यात खनिज संपत्ती भरपूर आहे. दक्षिणेला असणाऱ्या मेघासनी पर्वतांमध्ये लोह आणि अभ्रक मोठ्या प्रमाणात मिळते. कृषी आणि खनिज क्षेत्राशी संबंधित अनेक उद्योग येथे

आहेत. बारीपदा, सिमलिपाल राष्ट्रीय उद्यान, खिचिंग, किचकेश्वरी मंदिर, मानत्री, बंथिया जगन्नाथ मंदिर, देवकुंड, भीमकुंड इत्यादी येथील लोकप्रिय दर्शनीय स्थळे आहेत.



सिंगाडा गावात नाष्ट्यासाठी थांबलो. गरमागरम भजी, वडा, पॅटिस, मालपुआ, पोडो पिठा, चाकुली पिठा खाल्ले. चहा प्यायलो. सिंगाडाहुन तेरा किमीवर खिचिंग येथे भंज राजांची कुलदेवता किचकेश्वरी देवीचे, नवव्या शतकात बांधले गेलेले प्राचीन मंदिर आहे.

नाष्टा झाल्यावर पुढे निघालो. काही वेळाने एक गाडी आमच्या पुढे येऊन थांबली. त्यामध्ये रस्ता रुंदीकरणाचे काम करणाऱ्या एल अँड टी कंपनीचे प्रमुख अधिकारी होते. त्यांनी आपुलकीचे विचारपूस केली आणि पुढे काही अंतरावर असणाऱ्या ऑफिसमध्ये चहापाणीसाठी येण्याचे आग्रहाचे आमंत्रण दिले. चहा नाष्टा आमचा नुकताच झाला होता. त्यामुळे फक्त पाणी भरायचे आणि त्यांना भेटून पटकन निघायचे असे ठरले.




रस्त्याचे काम चालू होते. थोडे अंतर गेल्यावर मागच्या चाकातील हवा कमी झाल्याचे समजले. टायर पंक्चर झाला होता. हवा पूर्ण गेली नव्हती म्हणजे छोटा पंक्चर असणार हे नक्की होते. रस्त्याच्या बाजूला सायकल घेतली. कॅरिअरला अडकवलेले पॅनिअर काढून सायकल उलटी केली. टायर काढला आणि ट्यूब काढून पंक्चर कुठे झालाय ते शोधले. टायरमध्ये



अडकलेला काटा किंवा तार काहीच सापडले नाही. तोपर्यंत गाडगीळ सर आणि नितीन भाई पोहोचले होते. आम्हाला पाहून गावातला एक मुलगा पण थांबला. अजून कुठे पंक्चर आहे काय हे चेक करण्यासाठी पाणी पाहिजे होते. जवळच आंघोळीचा छोटा तलाव होता. तिथे गावातील दोन महिला नुकत्याच पोहोचत होत्या. त्या मुलाला घेऊन आम्ही पटकन तिथे गेलो आणि नितीन भाईंनी ट्यूब पाण्यात बुडवून तपासली. एकच पंक्चर सापडला. तिथे पॅच चिकटवला. ट्यूब टायरमध्ये टाकली आणि हवा भरली. सायकलला टायर लावला. सायकल सुलटी करुन कॅरिअरला पॅनिअर अडकवले. पंक्चर किट आणि हवा भरायचा पंप आत पॅनिअर मध्ये ठेवून पुढे निघालो.



पुढे थोड्या वेळाने एल अँड टी कंपनीचे ऑफिस लागले. तेथील रक्षकाने आम्हाला थांबवून ऑफिस मध्ये नेले. कंपनीचे प्रमुख अधिकारी अनादी चरण पांडा सर यांनी आणि इतरांनी आमचे स्वागत केले. सर्वांबरोबर गप्पा रंगल्या. आग्रहाने चहा पाणी नाष्टा झाला. आम्हा सर्वांना त्यांनी रेडियम जॅकेट दिले. इतर काही मदत पाहिजे का, याबद्दल आपुलकीने विचारले गेले. त्या सर्वांचे आभार मानून आम्ही पुढे निघालो.



जशीपुर जवळ सिमलिपाल राष्ट्रीय अभयारण्याचे ऑफिस दिसले. येथे अभयारण्यात जाण्यासाठी गेट पास मिळतात. या ऑफिसमध्ये जाऊन माहिती घेतली. इथून पंधरा किमी अंतरावर सिमलिपाल राष्ट्रीय अभयारण्य आहेत. हे ओडिशामधील एक हत्ती अभयारण्य आहे. या उद्यानाचे नाव येथे जास्त प्रमाणात असणाऱ्या सेमल अथवा लाल कपास या झाडांच्या नावावरुन पडले. पूर्वी या जंगलाचा वापर येथील राजांकडून शिकार करण्यासाठी केला जात असे. १९५६ नंतर हे जंगल वाघांसाठी आरक्षित करण्यात आले आणि वन्यजीव

अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले. हे अभयारण्य २७५० वर्ग किमीच्या क्षेत्रामध्ये पसरलेले आहे. येथे जोरांडा आणि बरेहीपानी यासारखे अनेक धबधबे, झरे आणि बुर्हाबालंगा, पालपला, बंदान, खैरी, देव अशा वर्षभर वाहणाऱ्या नद्या आहेत. त्यामुळे समृद्ध वनस्पती जीवन आहे. तसेच वाघ, हत्ती, हरण, सांबर, बिबळ्या, अस्वल अशा अनेक सस्तन प्राण्यांच्या आणि पक्षांच्या प्रजाती आहेत. खैरी नदीतील रामतीर्थ जवळचे क्रोकोडाईल पार्क प्रसिद्ध आहे. हे देशातील सर्वात मोठे वन्यजीव अभयारण्य आहे. येथील जीप सफारी प्रसिद्ध आहेत. या सफारीमधून जंगली प्राणी, पशु पक्षी आणि आजूबाजूचे नैसर्गिक सौंदर्य पाहता येते. तसेच जंगल वॉक व आदिवासी गावातील जनजीवन अनुभवता येते.




जशीपुर हे मयूरगंज जिल्ह्यातील एका तालुक्याचे ठिकाण आहे. येथे आजूबाजूच्या गावात अनेक प्राचीन मंदिरे आहेत. शहरातून जाताना एका भांड्यांच्या दुकानाजवळ थांबलो. इथे वापरण्यात येणारी काही भांडी वेगळ्या आकाराची होती. काही भांडी कल्हई केल्यामुळे चकचकत होती. दुकानदाराबरोबर गप्पा मारुन पुढे निघालो. येथून जवळच असणाऱ्या बदामपहाड डोंगर रांगेमध्ये लोह आणि सोन्याच्या खाणी आहेत. या भागातील जंगलांमध्ये हत्ती कळपाने फिरत असतात. काही जंगले त्यांच्यासाठी राखून ठेवलेली आहेत.



बनकटी जवळ धाब्यावर जेवणासाठी थांबलो. मिश्रित सब्जी घंता, मूसा आलू करी, मसाले सागा मोंगा, दाल, चावल, चपाती, बसारा, दही कांजी असे जेवण झाल्यावर थोडा वेळ आराम केला. बहुतेक ढाब्यांवर चारपाई असायच्या, त्याच्यावर आडवे झालो की पटकन डोळे मिटायचे. दहा मिनिटे झोपलो तरी ताजेतवाने वाटायचे.

धाब्यावर इतरांबरोबर गप्पा रंगल्या. भारताच्या इतर ठिकाणांपेक्षा ओडिसामध्ये मोठय़ा प्रमाणात सण-उत्सव साजरे होतात. त्यामुळे उत्सव काळात वेगवेगळ्या प्रकारचे गोड पदार्थ इथे केले जातात. इथली जगन्नाथपुरीची यात्रा प्रसिद्ध आहे. यात्रेदरम्यान पीठा म्हणजेच गोडाचे पदार्थ आणि पारंपरिक पदार्थ केले जातात. जगन्नाथ मंदिरात दर दिवशी ५६ प्रकारचे मिठाईचे प्रकार केले जातात. त्याला अभडा प्रसाद म्हणतात. तसेच येथील नुआखाई या सणामध्ये शेतातील पिके, पाऊस आणि शेतीसाठी अनुकूल वातावरण असावे म्हणून देवतांची पूजा करुन आभार मानले जातात. परंपरेनुसार शेतकरी शेतामध्ये पिकलेल्या पहिल्या पिकाचे अन्न देवतांना अर्पण केले जाते. परिवारातील मुख्य व्यक्ती घरातील देवांची पूजा करुन त्यांना भात आणि इतर पदार्थांचा भोग अर्पण करतो. नंतर ते प्रसाद म्हणून इतरांना वाटले जाते. यावेळेला परिवारातील सर्व सदस्य घरामध्ये एकत्र जमून जेवण जेवतात. गावाबाहेर दूर असणारे लोक पण हा सण साजरा करण्यासाठी घरी येतात.



रस्त्याच्या बाजूला दिसणारे डोंगर, घनदाट जंगले, गावातील छोटी घरे पाहत बिसोई ला पोहोचलो. येथून जवळच असलेल्या रायरंगपुर तालुक्यातील गोरुमहिसानी पर्वत रांगेमध्ये देशातील पहिली लोह खनिजाची खाण १९१० मध्ये खणली गेली. त्यावेळेला हा भाग मयूरभंज संस्थानामध्ये होता आणि महाराजा श्रीराम चंद्र भंज देव हे या संस्थानचे राजे होते. नंतर ही खाण टाटा स्टीलला चालवण्यासाठी देण्यात आली. ओडिशा आणि झारखंड राज्याच्या सीमेवर असलेल्या या भागात मोठ्या प्रमाणात खनिज संपत्ती आहे. त्यामुळे येथे अनेक खाणी सुरु झाल्या.



बिसोई हे तालुक्याचे ठिकाण आहे. येथे दहिबाडा, घुग्नी, आलू दम, गुप्चप खाल्ले. गुप्चप म्हणजे पाणीपुरी. नंतर ओडिशा लस्सी प्यायलो. या चाट पदार्थांची चव मस्तच होती. ती नेहमीपेक्षा वेगळी होती. हे चाट खूपच स्वस्त होते.




बिसोई आणि बांगरीपोसी यांच्यामध्ये घनदाट जंगल असलेली डोंगर रांग आहे. हा सिमलिपाल वाघ अभयारण्याचा भाग आहे. या जंगलात अनेक वन्य प्राणी आहेत. या डोंगरात बांगरीपोसी घाटी सुरु होते. पूर्वी या घाटातील मार्गावर बावन्न वळणे होती. बावन्नला उडियामध्ये बामन म्हणतात. त्यामुळे या घाटाला बामन घाटी म्हणून पण ओळखले जाते.

बिसोईहुन पुढे बांगरीपोसी घाटी चढवायला सुरवात केली. थोड्या वेळाने सूर्यास्त होऊन अंधार झाला. घडाळ्यात पाच वाजले होते. आमचा सायकल प्रवास पश्चिमेकडून पूर्वेकडे असल्यामुळे दररोज सूर्यास्त होण्याची वेळ बदलत होती. दररोज सूर्यास्त लवकर होत होता.




आम्ही सायकलच्या लाईट लावल्या. रात्रीच्या मुक्कामाचे हॉटेल बांगरीपोसी शहराच्या अगोदर होते. गुगल मॅपवर ते अंतर अजून दहा किमी दाखवत होते. हवेत गारवा सुरु झाला होता. या घाटामध्ये अजून रस्ता रुंदीकरणाचे काम सुरु झाले नव्हते. त्यामुळे हा छोटा रस्ता होता आणि दोन्ही बाजूला घनदाट झाडी होती. रस्त्याला इतर वाहनांची गर्दी नव्हती नेमकीच वाहने ये जा करत होती. आजूबाजूला कोणी जंगली प्राणी नाही ना याचा अंदाज घेत आम्ही सर्वजण एकत्र रांगेत सायकल चालवत निघालो.

थोड्या वेळाने आम्ही घाटातील माँ द्वारसुनी मंदिराजवळ आलो. इथून पुढे पूर्ण उतार होता आणि मुक्कामाचे हॉटेल पण तीन किमीवर दाखवत होते. मंदिराजवळ थोडा वेळ थांबलो. देवीचे दर्शन घेतले.

घाट उतरुन मुक्कामाच्या हॉटेलवर सातच्या अगोदर पोहोचलो. नेहमीप्रमाणे सायकल साफ केल्या. कपडे धुतले आणि आंघोळ आटपून तयार झालो. जेवण बनायला वेळ होता



मग शेकोटीभोवती बसून गप्पा रंगल्या. रात्री जेवणामध्ये मुधी फूला हुआ चावल, दालमा, मानसा मटण, ओडिशा चिकन, कुकुड तरकारी, चोला बाडा चावल, चटणी असा बेत झाला. येथे मसाला, जिरा, मोहरी, मेथी, काल जीरा या पाच पदार्थांचे मिश्रण पंच फुटना म्हणून ओळखले जाते. याचा वापर जेवण करताना फोडणी देण्यासाठी केला जातो. त्यामुळे जेवण मसालेदार आणि स्वादिष्ट बनते.

आज ओडिशा राज्यातील शेवटचा मुक्काम होता. उद्या आम्ही झारखंड राज्यातून काही अंतर प्रवास करुन पश्चिम बंगाल राज्यात मुक्कामाला पोहोचणार होतो. ओडिशा राज्य नैसर्गिक आणि सांस्कृतिक विविधतेने खुपच सजलेले आहे. या भागात आमचा खूपच पाहुणचार झाला होता. ह्या आठवणी आठवत रात्री झोपी गेलो.

***

# दिवस पंधरावा: बांगरीपोसी ते मेचेदा

मार्ग: बांगरीपोसी- बहरागोरा- खरगपुर- डेब्रा- कोलाघाट- मेचेदा (१५९/२००३ किमी)
(जिल्हे: मयूरभंज- पूर्व सिंहभूम- झारग्राम- पश्चिम मेदिनीपुर- पूर्व मेदिनीपुर)
(राज्य: ओडिशा- झारखंड- पश्चिम बंगाल)

सुप्रभात बांगरीपोसी..!! सकाळी तयार होऊन सर्व निघालो. घडाळ्यात साडेपाच वाजले होते. नुकतेच उजाडत होते पण सूर्य उगवायला वेळ होता. बाजूलाच घनदाट जंगल असलेली डोंगर रांग असल्यामुळे थंडी होती आणि धुके पण पसरले होते. आज आम्ही झारखंड राज्य ओलांडून पश्चिम बंगाल राज्यात पोहोचणार होतो. आजचे अंतर १६० किमीच्या आसपास होते पण आता इथून पुढे पूर्ण उतार आणि सपाट रस्ता होता. ओडिशा राज्यातील डोंगराळ भाग इथे बांगरीपोसीला संपत होता.

सकाळी चहा मिळाला नव्हता त्यामुळे पहिली चहाची टपरी शोधत पुढे निघालो. एके ठिकाणी घरासमोर असलेली टपरी नुकतीच उघडत होते. तिथे चहासाठी थांबलो. त्यांना वीस कप चहा बनवायला सांगितले. छत्तीसगढ आणि ओडिशा मध्ये बहुतेक ठिकाणी चहा पाच रुपयांमध्ये मिळाला होता. आणि तो पण कडक तरतरी आणणारा, घरगुती घट्ट दुधाचा. त्यामुळे आम्ही सगळेजण प्रत्येक वेळेला दोन दोन कप चहा प्यायचो. सकाळी तर चहाबरोबर बिस्कीट पण खायचो. त्यामुळे तेव्हा तीन कप चहा पण व्हायचा. बहुतेक वेळेला चहा नाष्टा छोट्या टपरीवरच व्हायचा तो पण भरपूर पोटभर. त्यामुळे जेथे आम्ही थांबायचो ते खुश व्हायचे. एव्हढे सगळे खाऊन पण बिल खूपच कमी यायचे.



इथे पण सकाळीच वीस कप चहा बनवायला सांगितल्यावर मालक खुश झाला. त्याची लगबग सुरु झाली. मदतीला त्याची बायको आली. त्याने कोळसा टाकून चूल पेटवली.

आम्हाला पाहून शेजारची लोक जमली. त्यांच्याबरोबर गप्पा सुरु झाल्या. मस्तपैकी गरमागरम चहा झाली. त्यांच्याकडे असलेले बिस्कीट आणि चहा पिऊन पुढे निघालो.

बांगरीपोसी शहराजवळून बुधबलांग नदी वाहते. ही नदी सिमलिपाल राष्ट्रीय अभयारण्यामध्ये उगम पावते. बांगरीपोसी शहर ओलांडून पुढे आलो. झारपोखरिया जवळ चेहऱ्याच्या आकाराचे मंदिर दिसले. जमसोला ला बाजारात थांबलो. इथे छेना पोडा चीजकेक खाल्ला. छेनापोडा नावाचा एक गोड पदार्थ इथे प्रसिद्ध आहे. ही पाककृती फक्त ओडिसामध्येच चाखायला मिळते, इतर कुठेच नाही. दूध उकळून त्यात लिंबाचा रस घालून त्यापासून छेना करतात. त्यात साखर आणि सुकामेवा घालून हा पदार्थ ओवनमध्ये तयार केला जातो.



जमसोला ला सुवर्णरेखा नदी वाहते. या सुवर्णरेखा नदीचा उगम रांची जवळ नागरी गावामध्ये झाला आहे. सुवर्णरेखा म्हणजे सोन्याची रेषा. पूर्वी या नदीच्या उगमाजवळ असणाऱ्या पिसका येथे सोन्याच्या खाणी होत्या व या नदीमध्ये मोठ्या प्रमाणात सोन्याचे कण सापडत. त्यामुळे या नदीचे नाव सुवर्णरेखा पडले. आताही किनाऱ्यावर राहणाऱ्या लोकांकडून काही ठिकाणी नदीच्या वाळूमध्ये सोन्याचे कण शोधले जातात. सुवर्णरेखा नदीची लांबी ४७४ किमी असून ती झारखंड, ओडिशा आणि पश्चिम बंगाल राज्यातून वाहत जाऊन बंगालच्या उपसागराला मिळते. या नदीला अनेक नद्या मिळतात त्यापैकी कांची व करकरी या प्रमुख उपनद्या आहेत. देशातील पहिला लोखंडाचा कारखाना या नदीच्या किनारी उभारला गेला. कारखान्याचे संस्थापक जमशेदजी टाटा यांच्या नावावरुन हा प्रदेश आता जमशेदपूर म्हणून ओळखला जातो.



सुवर्णरेखा नदी ओडिशा आणि झारखंड राज्याच्या सीमेवरुन वाहते. इथे ओडिशा राज्यातील मयूरभंज जिल्हा संपून झारखंड राज्यातील पूर्व सिंहभूम जिल्हा सुरु होतो. पुलाच्या दोन्ही बाजूला येणारी जाणारी वाहने तपासण्यासाठी राज्याची पोलीस चौकी होती. ओडिशा राज्यातील आमचा सायकल प्रवास आनंददायी, न विसरता येणारा असा झाला होता. ओडिशा पोलिसाचे आभार मानले आणि आम्ही सुवर्णरेखा नदीवरचा पूल ओलांडून पलीकडे आलो. येथे झारखंड पोलीस चौकी जवळ थांबून पोलिसांबरोबर थोड्या गप्पा मारल्या आणि पुढे निघालो. झारखंड राज्य सुरु झाले.

**झारखंड राज्य** हे पूर्वभारतातील राज्य आहे. धबधब्यांचे राज्य म्हणूनही या राज्याला ओळखले जाते. बिहार राज्याचा दक्षिणेकडील भाग वेगळा काढून, १५ नोव्हेंबर २००० रोजी झारखंड अस्तित्वात आले. झारखंडच्या पूर्वेला पश्चिम बंगाल, पश्चिमेला उत्तर प्रदेश व छत्तीसगढ, उत्तरेला बिहार आणि दक्षिणेला ओडिशा ही राज्ये आहेत. झारखंडची राजधानी रांची असून राज्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ७९,७१४ चौकिमी इतके आहे. जमशेदपूर हे राज्यातील सर्वात मोठे शहर आहे.



वने आणि खनिज संपत्तीची समृद्धी हे या राज्याचे वैशिष्ट्य आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेत या दोन घटकांचा सर्वांत मोठा वाटा आहे. झारखंड राज्यात तांदूळ, गहू, मका, डाळी इत्यादी प्रमुख शेतकी उत्पन्न होते आणि राज्यात अनेक उद्योगही आहेत. झारखंड हे तांबे, कोळसा, लोखंड, मॅंगनिज, अभ्रक, क्रोमाइट, बॉक्साइट इत्यादी खनिजांमुळे देशातील सर्वाधिक समृध्द राज्य म्हणून गणले जाते.

छोटा नागपूरचे पठार, संथाल हे झारखंड राज्यातील पर्वत आहेत तर गंगा, शोण, दामोदर, ब्राम्हणी, सुवर्णरेखा, फाल्गू, कोयल, अजय, अमानत, औरंगा, बैतारणी, बाक्रेश्वर, बनस्लोई, बारकर, बोकारो, बुरहा, देव, व्दारका, गंजेस, हिंगलो, जमुनिया, कांगसाबती, कन्हार, कौन्हारा, खारकाइ, किऊल, कोइना, कोनार, लिलाजान, मयुराक्षी, मोहना, पुनपुन, संख, तेलेन आदी नद्या या राज्यातून वाहतात.

झारखंडमध्ये अनेक आदिवासी जमाती वास्तव्यास आहेत व त्यांच्या स्वतंत्र बोलीभाषाही बोलल्या जातात. मुंडाची कला म्हणून काही चित्रकला ओळखल्या जातात. त्यात साप आणि इंद्रधनुष्याचे पेंटींग, चिखल व खडकांवरची पेंटींग, चटयांवरची पेंटींग यांचा समावेश असतो. तसेच तुरी चित्रकला मध्ये नैसर्गिक मातीच्या रंगात घरातल्या भिंतीवर रंगकाम केले जाते. बिरहोर आणि भुनिया कलेत वर्तुळाकार पेंटीग करताना हातांच्या बोटांचा वापर करतात. घटवाल कलेतली पेंटींग जंगल आणि प्राण्यांची संबंधीत आहे. अशा काही लोकचित्रकला झारखंडमध्ये प्रचलित आहेत.




लोकनृत्य कलाप्रकारांमध्ये कर्मा, मुंडा, झुमार असे काही लोकनृत्य केले जातात. आदिवासी लोकनृत्य पारंपारिक पद्धतीने साजरी केली जातात. ढोल, नगारा, ओरान, तमक, ढोलकी अशी काही लोकवाद्य झारखंडात आहेत आणि याच लोकवाद्यांच्या चालीवर आपले पारंपरिक फेरा नृत्य साजरे केले जाते. होळी, दिवाळी, दसरा, वसंत पंचमी आदी सण तर बेलगाडा मेला सिमारिया, भादली मेला इतखोरी, छात्रा मेला, कोल्हाइया मेला, कुंडा मेला, कुंदारी मेला आदी उत्सव मोठ्या आणि वेगळ्या वैशिष्ट्यांसह झारखंड राज्यात साजरे केले जातात.




भरपूर वनसंपदा आणि सांस्कृतिक विविधतेने नटलेल्या या राज्यात धबधबे, प्राचीन मंदिर, अभयारण्ये असलेली विविध आकर्षक केंद्रे आहेत. हुन्डु, हिरणी, दोसना व दासम हे धबधबे आणि चायबासा, देवघर, दुमका, बेल्टा, हजारीबाग, दालमा इत्यादी ठिकाणी पाहण्यासाठी अनेक पर्यटक येतात.

बहरागोरा नंतर दुहेरी चार लेनचा रस्ता सुरु झाला. काही अंतरावर सायकल पंक्चर झाली. रस्त्याच्या बाजूला सायकल उलटी केली आणि पंक्चर काढू लागलो. हे पाहायला गर्दी जमा झाली. बाजूलाच सायकल दुरुस्तीचे छोटे दुकान होते. तिथला मालक पण त्याचे काम सोडून पाने आणि हवा भरायचा पंप घेऊन आला. सायकलचे चाक काढण्यासाठी पाने लागत नाहीत हे त्याच्यासाठी नवीन होते आणि माझ्याकढे असलेला छोटा हवा भरायचा पंप पाहून त्याला आश्चर्य वाटले. सर्वांबरोबर गप्पा रंगल्या. यातील काही जण मुंबईमध्ये येऊन गेले होते. आणि काही जणांचे नातेवाईक मुंबई मध्ये होते. त्यामुळे मुंबईहून आलोय हे समजल्यावर खास पाहुणचार आणि मदत झाली. आमच्या सायकल मोहिमेबद्दल माहिती सांगत पंक्चर काढला. नंतर हात धुवायला पाणी मिळाले आणि खास चहा पण झाला. या सर्वांचा निरोप घेऊन पुढे निघालो.



वाटेमध्ये मिठाईचे दुकान दिसले की थांबून स्थानिक पदार्थ खायचो. दुधौरी मिठाई, लिट्टी चोखा, ठेकुआ, घुंघुनी, सत्तू, धुसका, पीठा असे झारखंडमधील पदार्थ खात पुढे निघालो. चिचरा ला पोहोचलो. येथे झारखंड राज्यातील पूर्वी सिंहभूम जिल्ह्याची सीमा संपून पश्चिम बंगाल राज्यातील झारग्राम जिल्ह्याची सीमा सुरु झाली. आता रस्त्यावर बंगाली बोर्ड दिसत होते.

**पश्चिम बंगाल राज्य** हे भारतातील पुर्व भागात वसलेले असून, या राज्याच्या मध्यातून कर्कवृत्त जाते. पश्चिम बंगाल राज्याच्या सीमा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या राज्यातील केवळ २२ किमी रुंदीच्या नक्षलबारी पट्टीने आसामसारख्या ईशान्येकडील राज्यांशी संपर्क राहतो. उत्तरेस नेपाळ, सिक्कीम व भूतान यांच्या सीमा पश्चिम बंगालला भिडल्या आहेत. पश्चिमेस बिहार व ओरिसा ही राज्ये, तर पूर्वेस आसाम व बांगला देशाची सीमा असून, गंगा-ब्रह्मपुत्रा नद्यांच्या त्रिभुज प्रदेशातील ही सीमा अत्यंत गुंतागुंतीची आहे. कोलकाता हे राजधानीचे शहर आहे.

पश्चिम बंगाल हे राज्य मुख्यतः मैदानी असून, उत्तरेकडे फक्त पर्वतप्रदेश आहे, पश्चिमेकडील पठारकडा व पुरुलियाचा उंच प्रदेश एकत्रितपणे ६ टक्के क्षेत्र व्यापतात. उरलेला ९४ टक्के भाग गंगेचे मैदान व त्रिभुज प्रदेश यांनी बनला आहे. उत्तरेकडील पर्वतरांगा नेपाळ सिक्कीममधील पर्वतरांगांचे दक्षिणेकडील भाग असून, येथून कांचनजंघा व अन्य शिखरे दिसतात, पण दार्जिलिंग परिसरात राज्यातील सर्वोच्च उंची ३६५८ मीटर आहे. मैदानी प्रदेश उत्तरेस जलपैगुरीपासून दक्षिणेस सुंदरबनपर्यंत सलग पसरला आहे.




बिहारच्या माल्डा भागातून गंगा नदी येते व बांगला देशाच्या सीमेवरच तिच्या दोन शाखा होतात एक शाखा आग्नेयीस बांगला देशामध्ये जाऊन ब्रह्मपुत्रेस मिळाल्यानंतर पद्मा या नावाने वाहते तर दुसरी दक्षिणेस पश्चिम बंगालमधून वाहते. तिला भागीरथी किंवा हुगळी म्हणतात. हुगळी व बांगला देशाची सीमा यांमधील भागास मोरिबंद त्रिभुज प्रदेश म्हणतात तर हुगळीच्या पश्चिमेकडील भागास हॉर्न मैदान म्हणतात. गंगा नदीचे बरेच पाणी बांगला देशातील पद्मा नदीतूनच वाहते म्हणून पद्मा, भागीरथी यांच्या विभाजनपूर्व पात्रात भारताने गंगेवर फराक्का बंधारा बांधला आहे व गंगेचे जादा पाणी भागीरथी- हुगळीमध्ये सोडावयाची व्यवस्था केलेली आहे. दक्षिणेस सुंदरबन हा त्रिभूज प्रदेशाचा नवीन भाग आहे. सुंदरबनात अनेक मुखांनी गंगा नदीचा प्रवाह बंगालच्या उपसागरास मिळतो. येथे अनेक रुंद खाड्या आहेत. त्यांत हुगळी ही खाडी सागर बेटाजवळ वीस किमी रुंद आहे, तर मातला ही दुसरी खाडी पंधरा किमी रुंद आहे. मयूराक्षी ही नदी आपल्या ब्राह्मणी, द्वारका, वक्रेश्वर व कोपाई या



उपनद्यांसह भागीरथीला मिळते. दक्षिणेस अजय व तिच्या दक्षिणेस खारी, बंका व बेहुला या छोट्या नद्या आहेत. तसेच रुपनारायण व कांगसाबती या हुगळीच्या प्रमुख उपनद्या आहेत.

राज्यात अनेक खनिजे आढळतात, तरी त्यांत दगडी कोळसा व आगबंद माती ही दोन खनिजे मूल्यदृष्ट्या ९९ टक्के उत्पादन देतात. भारतातील कोळशाची पहिली आधुनिक खाण राणीगंज येथे याच राज्यात सुरु झाली. देशातील ३० टक्के कोळसा पश्चिम बंगालमध्ये निघत असून, कोळसा उत्पादनात या राज्याचा देशात तिसरा क्रमांक आहे. आसनसोल, दुर्गापूर, दार्जिलिंग कोळसाक्षेत्र विकसित करण्यात आलेले असून, बाग्राकोट व माल येथे खाणी आहेत. कोळशाच्या काही खाणींत आगबंद माती सापडते, ती उच्चतापसह द्रव्ये व भांडी यांसाठी वापरली जाते. शिवाय चिनी माती, डोलोमाइट, शंखजिरे इत्यादी खनिजे व टंगस्टन, मँगॅनीज, लोह, आर्सेनिक यांची धातुके अल्प प्रमाणात सापडतात.

राज्याचा १४ टक्के भाग जंगलव्याप्त आहे. जंगल मुख्यतः उत्तरेस डोंगराळ भागात असून त्यात उष्ण कटिबंधीय वृक्ष आढळतात. पश्चिमेकडील पठार कड्यावर पानझडी अरण्ये आहेत, तर सुंदरबनात खाजणी जंगल आहे. उत्तरेस डोंगरपायथ्याच्या भागांत सदाहरित जंगले आहेत. मैदानी भागात फारसे जंगल नाही. वन्य प्राणिजीवन राज्याच्या उत्तर भागात विपुल आहे. जलपैगुरी, दार्जिलिंग व पश्चिम दिनाजपूर या जिल्ह्यांत गेंडा, हत्ती, हरिण आणि वाघ हे वन्य प्राणी मोठ्या प्रमाणात आहेत. त्यांच्यासाठी जलदापारा अभयारण्य विकसित करण्यात आले आहे. जलभाग विशेष असल्याने अनेक प्रकारचे पाणपक्षी व साप या प्रदेशात आहेत. सुंदरबनमध्ये समुद्रतटीय विपुल प्राणिजीवन आहे.



प्राचीन काळी वंग नावाची जमात या प्रदेशात राहत होती, असे ऐतरेय आरण्यक व बौधायन धर्मसूत्र यांवरुन दिसते. बंग आणि आल म्हणजेच बांध यापासून बंगाल अशी नावाची उत्पत्ती झाली आहे. महापाषाणयुगाचे अवशेष गोपीनाथपुर (बांकुरा) व राणीगंज

(बरद्वान) येथे आढळतात. झारग्राम, तामलूक, दुर्गापूर, राणीगंज, कालिंपाँग, किआयचंद (मेदिनीपुर), छातना येथे उभे पाषाण आढळतात. हरिनारायणपूर व चंद्रकेतुगढ (चोवीस परगणा) येथील अवशेष हडप्पाकालीन असावेत, असा तज्ज्ञांचा कयास आहे. हुगळी जिल्ह्यात समरांगणी पडलेल्यांच्या प्राचीन स्मृतिशिला आढळतात.



वैदिक काळात या भागातील लोकांना दस्यू समजत परंतु रामायण महाभारताच्या काळात आर्यसंस्कृतीचा येथे प्रसार झालेला दिसतो. या महाकाव्यांत व बौद्ध ग्रंथ संयुत्तनिकाया मध्ये येथील पुंड्र, सुम्ह या जमातींचा उल्लेख आढळतो. पाणिनीने गौडपुराचा तर पतंजली आणि कौटिल्य यांनी गौडांचा उल्लेख केला आहे. जैनांच्या आचारांग सूत्रात राढ, बरद्वान भागातील बिकट प्रवासाचे वर्णन आहे. ग्रीक इतिहासकार येथील लोकांना गंगारिदाई म्हणत. या भागात मौर्य, गुप्त, गौड, पाल, राष्ट्रकूट, चालुक्य, सेन, इल्यास, शर्की, हुसेनशाही, मोगल, ब्रिटिश अशा अनेक साम्राज्यांनी शासन केले.

एकोणिसाव्या शतकात पाश्चात्त्य जीवनाच्या प्रभावाने भारतात झालेल्या प्रबोधनाचा उगम बंगालमध्ये झाला. राजा राममोहन रॉय हे या प्रबोधनाचे प्रणेते. विसाव्या शतकातील काँग्रेसप्रणीत स्वातंत्र्याच्या सर्व आंदोलनांतूनही बंगालने भाग घेतला आणि सुरेंद्रनाथ बानर्जी, बिपिनचंद्र पाल, चित्तरंजन दास व सुभाषचंद्र बोस यांसारखे अनेक नेते पुरविले. १९४७ मध्ये बंगालची पुन्हा फाळणी होऊन मुसलमान बहुसंख्य असलेले पूर्वेकडील जिल्हे पूर्व पाकिस्तानात गेले. भारतातील बंगालच्या भागाला पश्चिम बंगाल हे नाव मिळाले.

शेती हा राज्यातील प्रमुख उद्योग आहे. भात, ताग व गहू ही राज्यातील प्रमुख पिके आहेत. चहाखालील क्षेत्रफळ व उत्पादन यांत पश्चिम बंगाल हे भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून चहामळे दार्जिलिंग व जलपैगुरी या जिल्ह्यांत आहेत. दार्जिलिंगच्या भागात थंड हवामानातील फळे मोठ्या प्रमाणात पिकतात. राज्यामध्ये अनेक उद्योग कारखाने आहेत. भारतातील इतर कोणत्याही राज्यापेक्षा या राज्यात अंतर्गत जलमार्ग अधिक महत्त्वाचे आहेत.

कलकत्ता शहर व त्याचा परिसर सोडला, तर पश्चिम बंगालचा भाग अत्यंत ग्रामीण आहे. राज्यातील ६७ टक्के नागरी वस्ती कलकत्त्यामध्ये एकवटलेली आहे. त्यामुळे ग्रामीण भागात शहरी प्रभाव अजूनही अल्प आहे. बहुसंख्य घरे मातीची असतात. जेथून माती काढलेली असते, तेथे खोलगट भागात छोटे तलाव बनतात व हे तलाव माशांच्या वाढीसाठी वापरतात. बंगाली स्त्री-पुरुषांस पांढऱ्या रंगाचे वेड आहे. विशेषत: गडद रंगाची रुंद किनार असणाऱ्या पांढऱ्या साड्या हे बंगाली रमणींच्या पोशाखाचे वैशिष्ट्य आहे. बंगाली लोकांत वैष्णव व शाक्त हे दोन्ही पंथ प्रचलित आहेत. दुर्गापूजा हा सण सर्वांत मोठा असून तो सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये येतो. तो चार दिवस चालतो. दिवाळीच्या दिवशी राज्यात कालीपूजेचा सण असतो. हे येथील प्रमुख सण आहेत.



या राज्यातील बहुसंख्य लोकांची मातृभाषा बंगाली असली तरी हिंदी, बिहारी, ओडिया, इंग्रजी भाषाही तेथे बोलल्या जातात. बंगालीचा उगम साधारणपणे दहाव्या शतकात झाला असल्याचे अभ्यासक मानतात. बंगाली रंगभूमी व चित्रपट आज अत्यंत विकसित अवस्थेत आहेत. हस्तकलांमध्ये चिनी मातीची भांडी, हस्तिदंती कोरीव काम, कृशनगरच्या मातीच्या वस्तू आणि टेराकोटा कलाकृती देशभर प्रसिद्ध आहेत. अत्यंत सुंदर व मुलायम चटया, चामड्याच्या वस्तूही बंगालमध्ये मोठ्या प्रमाणात तयार होतात. दगडांची उणीव असल्याने माती व विटा हेच माध्यम मंदिरशिल्पासाठी जास्त प्रमाणात वापरलेले दिसते.




कलकत्ता व परिसर हा देशातील सर्वांत मोठा नागरी प्रदेश आहे. हे शहर देशातील अत्यंत गर्दीचे असल्याने तेथे जास्त वेगाने वस्ती वाढू नये म्हणून प्रयत्न सुरु आहेत. १९११

पर्यंत हे शहर ब्रिटिश भारताची राजधानी, तसेच दीर्घकाळ देशातील प्रथम क्रमांकाचे बंदर होते. देशाचा ५० टक्के दर्यापार व्यापार या बंदरातूनच चाले आणि त्यामुळे या ठिकाणी अनेक प्रेक्षणीय, शासकीय आणि व्यापारी इमारती झाल्या. डलहौसी चौक, प्रधान डाकघर, उच्च न्यायालय या व इतर अनेक इमारती विख्यात आणि प्रेक्षणीय आहेत. कलकत्याशिवाय दुर्गापूर, खरगपूर, आसनसोल, बरद्वान ही महत्त्वाची शहरे आहेत. दार्जिलिंग हे थंड हवेचे ठिकाण चहाबागांसाठीही प्रसिद्ध आहे. रामकृष्ण परमहंसांचा बेलूर मठ व कालीमातेचे दक्षिणेश्वर मंदिर ही भाविकांची क्षेत्रे आहेत.

पश्चिम बंगाल राज्यातील पश्चिम मेदिनीपुर जिल्हा सुरु झाला होता. २००२ साली मिदनापूर जिल्ह्याचे दोन तुकडे करुन पूर्व मेदिनीपुर व पश्चिम मेदिनीपुर हे दोन वेगळे जिल्हे निर्माण करण्यात आले. हा जिल्हा पश्चिम बंगालच्या दक्षिण भागात झारखंड राज्याच्या सीमेवर आहे. मिदनापूर हे पश्चिम मेदिनीपुर या जिल्ह्याचे मुख्यालय व खरगपुर खालोखाल जिल्ह्यातील दुसर्या क्रमांकाचे मोठे शहर आहे. पश्चिम मेदिनीपुर जिल्ह्याचे पुन्हा विभाजन करुन नवीन झारग्राम जिल्हा बनणार आहे.

सकाळपासून १०० किमी अंतर पार झाले होते. त्यामुळे पुढे खरगपुरला थांबायचे ठरले.



फडतरे सर, देशमुख सर आणि नारायण सर्वांच्या पुढे होते. त्यांनी एक हॉटेल शोधले आणि जेवणाची ऑर्डर दिली. थोड्या वेळाने आम्ही बाकीचे सर्वजण पोहोचलो. बंगाली चिकन करी, छोलार दाल, भात, भाजा बेगूनी, खिमा गुगनी, मांगशोर आलू, झुरी आलू भाजा, चिकन बिर्याणी, अलूर दोम लूची, चटणी, पापड, मिष्टी दोई असे मस्तपैकी बंगाली पद्धतीचे जेवण झाले. जेवण झाल्यावर थोडा वेळ आराम केला, तिथे असलेल्या कुत्रांच्या पिल्लांबरोबर खेळलो, इतरांबरोबर गप्पा मारल्या.

भारताच्या मिश्र संस्कृतीत बंगाली संस्कृतीला मानाचं स्थान आहे. संगीत, अभिनय, साहित्य अशा अनेक क्षेत्रांत बंगाली समाजाने आपल्याला भरभरुन आहेच, पण अतिशय

समृद्ध अशी बंगाली खाद्यसंस्कृती हे बंगाली समाजाने पाककलेला दिलेलं मोठं वरदान आहे. ही खाद्यसंस्कृती माशांच्या आणि इतर पाककृती आणि गोड पदार्थांमुळे खवय्यांमध्ये जास्त प्रसिद्ध आहे. बंगाली लोक दोन प्रकारचं दही आवडीने खातात. आंबट असे नेहमीचे टोक दोई आणि मिष्टी दोई. मिष्टी दोई हा गूळ घालून मातीच्या भांड्यात बनवलेला अतिशय सुंदर पदार्थ आहे. वाफवलेले भापा दोई हा मिष्टी दोईचाच एक प्रकार आहे.

खरगपुर हे ठिकाण आय.आय.टी. साठी प्रसिद्ध आहे. भारतीय तंत्रज्ञान संस्था खरगपुर ही येथे असलेली भारतातील एक नामांकित स्वायत्त तंत्रशिक्षण संस्था आहे. ह्या संस्थेची स्थापना भारत सरकारने अभियंते व शास्त्रज्ञ तयार व्हावे या उद्देशाने १९५१ साली स्थापन केली. ही भारतातील पहिली आय.आय.टी. होती.




आता रात्रीच्या मुक्कामाचे हॉटेल इथून ५५ किमीच्या आसपास होते. रस्त्यामध्ये अनेक कारखाने होते. त्यातील बहुतेक कामगार येण्या- जाण्यासाठी सायकलचा वापर करत होते. त्या सर्वांबरोबर गप्पा मारत आम्ही पुढे निघालो. अनेक ठिकाणी आपुलकीने विचारपूस झाली. जेथे पण आम्ही थांबायचो, आमच्याभोवती पटकन गर्दी जमायची आणि मुंबईमध्ये येऊन गेलेले भरपूर जण भेटायचेच.

बुरमला, आमोदपुर, डेब्रा, रटुलीया करत धर्मापुरला आलो. इथे चहा साठी थांबलो. पूर्व मेदिनीपुर जिल्हा सुरु झाला होता. कांगसाबती नदी ओलांडून पुढे निघालो. कांगसाबती नदीच्या पाण्यामुळे इथे आजूबाजूच्या शेतात अनेक पिके घेतली जात होती. रस्त्याच्या बाजुला अनेक ठिकाणी भाताचे भारे रचून ठेवलेले होते. सूर्य नुकताच मावळत होता. आजचा रस्ता सपाट आणि मोठा होता त्यामुळे



अंतराचे काही वाटत नव्हते. उद्या सर्व कोलकाताला पोहोचणार म्हणून खुशीत होते. सर्वांचा थकवा गायब झाला होता.



अनेक ठिकाणी आम्हाला शेतामध्ये भरपूर दिवे लावलेले दिसले. एका ठिकाणी थांबून त्याबद्दल विचारले तेव्हा समजले की ते फुलझाडांचे मळे होते आणि त्यावर फुले लवकर येण्यासाठी दिवे लावून रात्री पण प्रकाश केला होता.

सर्व एकत्र सायकल चालवत कोलाघाटला आलो. तेथून आत तीन किमीवर मेचेदा ला पोहोचलो. हॉटेल जवळ आलो. हे हॉटेल चांगले नव्हते, सोई काहीच नव्हत्या आणि इथे आगाऊ पैसे पण दिले नव्हते त्यामुळे ते बदलून बाजुला असलेल्या हॉटेल मध्ये आलो.

रात्री जेवणामध्ये पांचमिशाली चोर्चोरी, भोगेर खिचुडी, कोशा मंग्शो, माचेर पातला झोल, दाब चिंगरी, फिश कलिआ, पुलाव, अलूर दोम लूची, चटणी, पापड असा खास बंगाली बेत झाला. नंतर मिष्टी दोई खाल्ले. पश्चिम बंगालमध्ये तांदूळ जास्त प्रमाणात पिकत असल्यामुळे भात हाच येथील मुख्य आहार. माछेर झोल आणि भात हे बंगाली भोजन प्रसिद्धच आहे. माशांचे पदार्थ आवडत नसलेला बंगाली माणूस दुर्मिळच.

येथून हावडा ब्रिज फक्त ७० किमी अंतरावर होता. त्यामुळे उद्या सकाळी एक तास उशिरा निघायचे ठरले. उद्याची तयारी करुन आम्ही झोपी गेलो.

***

# दिवस सोळावा: मेचेदा ते हावडा ब्रिज कोलकाता

मार्ग: मेचेदा- कोलाघाट- बागनान- बिकी हकोला- आलमपुर- हावडा- हावडा ब्रिज कोलकाता (७०/ २०७३ किमी)
(जिल्हे: पूर्व मेदिनीपुर- हावडा- कोलकाता)

सुप्रभात पश्चिम बंगाल..!! आज मोहिमेचा शेवटचा दिवस होता आणि अंतर फक्त ७० किमी बाकी होते. त्यामुळे आज एक तास उशिरा निघणार होतो, पण नेहमीप्रमाणे सर्वजण लवकर उठले आणि तयार होऊन हॉटेल बाहेर आले. सायकल तपासल्या. टायर मध्ये हवा भरली, पॅनिअर अडकवले आणि मुख्य चौकामध्ये आलो. तिथे एका चहाच्या टपरीजवळ थांबलो.



सकाळची वेळ असल्याने अनेकांची कामावर जाण्यासाठी लगभग चालू होती. आजूबाजूचे लोक इथे मुख्य चौकामध्ये येऊन गाड्या पकडत होते. कपामध्ये गरमागरम चहा आला. नेहमीप्रमाणे पारलेजीचे आणि इतर काही बिस्कीट पुडे घेतले. चहा बिस्कीट खात असताना सहज बिस्कीट पुड्याची किंमत पाहिली. आणि ती किंमत पाहून आम्ही अवाक झालो. जो पारलेजीचा बिस्कीटपुडा पाच रुपयाला मिळत होता तो इथे पश्चिम बंगाल मध्ये फक्त तीन रुपयाला होता. इथे खूपच स्वस्ताई होती. आम्हाला सायकल सोबत पाहून अनेक लोकांनी जवळ येऊन विचारपूस केली. सकाळी चालण्यासाठी निघालेले अनेक जण भेटले. त्या सर्वांबरोबर गप्पा रंगल्या. इथेच मेचेदा प्रेस क्लबचे झुल्फिकार अली सर भेटले. त्यांनी स्थानिक चॅनेलसाठी मुलाखत घेतली, विडिओ काढला आणि ही बातमी टिव्ही व बंगाली पेपर मध्ये पण आली.





सूर्य नुकताच उगवत होता. मेचेदा हे शहर कोलाघाट औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पासाठी प्रसिद्ध आहे. या वीजनिर्मिती प्रकल्पांमध्ये मुख्यत्वे उष्णतेचा वापर करुन पाण्याची उच्च दाबावर वाफ बनवली जाते. व या उच्च दाबाच्या वाफेचा उपयोग जनित्र फिरवायला होतो. जनित्र फिरले की वीज निर्मिती होते. वीजनिर्मिती संचात कोणते इंधन वापरायचे हे वीजनिर्मिती प्रकल्पात कोणत्या प्रकारचे इंधन सहजगत्या व अल्प किंमतीत उपलब्ध होईल त्यावर ठरते. भारतात तसेच चीनमध्ये कोळसा मुबलक असल्याने भारतातील बहुतेक वीजनिर्मिती प्रकल्प हे कोळशावर आधारित आहेत. तर अरब देशात कच्च्या खनिज तेलाचे साठे मोठ्या प्रमाणावर असल्याने तिथे खनिज तेलावर आधारित वीजनिर्मिती प्रकल्प आहेत, तर, युरोपातील वीजप्रकल्प मुख्यत्वेकरुन कोळसा व नैसर्गिक वायूंवर आधारित आहेत.



कोलाघाटला मुख्य रस्त्यावर आलो. कोलाघाट हे पूर्व मेदिनीपुर जिल्ह्यातील प्रमुख शहर असून हे रुपनारायण नदीच्या किनारी वसलेले आहे. रुपनारायण नदी ओलांडून पलीकडे आलो. इथे पूर्व मेदिनीपुर जिल्ह्याची हद्द संपून हावडा जिल्हा सुरु होतो. या जिल्ह्याचे मुख्यालय हावडा येथे आहे. या जिल्ह्याच्या पूर्व सीमेवरुन हुगली नदी आणि पश्चिम सीमेवरुन रुपनारायण नदी वाहते. या जिल्ह्यामधून काना, दामोदर, सरस्वती इत्यादी नद्या वाहतात. या नद्यांच्या आजूबाजूला दलदल जमीन आहे. राजापुरदलदल यापैकी सर्वात विस्तृत आहे. या जिल्ह्यात भात हे प्रमुख धान्य असून गहू, ज्वारी, मका, जूट इत्यादी पिकवले जाते.



मुख्य नद्यांना जोडणारे अनेक नाले येथे आहेत. हे वर्षभर पाण्याने भरुन वाहत असतात. त्यांच्या तीरावर नारळाची व इतर हिरवीगार झाडे आणि त्यामध्ये वसलेली टुमदार घरे येथे सगळीकडे पाहायला मिळतात. रस्त्याच्या बाजूला हे पाहत पुढे निघालो. जसेजसे शहराच्या जवळ जाऊ लागलो तसे रस्त्याच्या बाजूला अनधिकृत झोपड्या दिसायला लागल्या. माणसांची गर्दी वाढायला लागली. दामोदर नदीजवळ पोहोचलो. दामोदर नदी ही भारताच्या झारखंड व पश्चिम बंगाल राज्यांमधील एक प्रमुख नदी आहे. प्रामुख्याने छोटा नागपूर पठारामधून वाहणारी दामोदर नदी ५९२ किमी लांबीची असून ती हुगली नदीला मिळते. दामोदर नदीला बहुतेक दरवर्षी पूर येतो.



बामुनहाती जवळ थांबून नाष्टा केला. बंगाली फुचका, बीट चॉप, शिंगरा समोसा, झाल मुरी भेळ, कोचुरी जलेबी असा नाष्टा झाला. तिथे असणाऱ्या सर्व प्रकारच्या मिठाई खाल्ल्या.

उलुबेरिया, पंचला, बिकी हकोला, आलमपुर करत हावडा जवळ आलो. रस्त्यावरील वाहनांची गर्दी वाढली होती. पिवळ्या रंगाच्या भरपूर अँबॅसिडर टॅक्सी दिसायला लागल्या होत्या. बंगाली भाषेत लिहिलेले बोर्ड असलेल्या बस पाहत पुढे निघालो. रस्त्यामध्ये अनेक जणांनी आपुलकीने विचारपूस केली. सर्वांनी आदरपूर्वक स्वागत केले. रस्त्यावर असणाऱ्या ट्रॅफिक पोलिसानी पण रस्ता शोधण्यासाठी मदत केली. त्यांनी एकमेकांना वायरलेस वरुन आमच्याबद्दल सांगितले. त्यामुळे रस्त्यामध्ये न विचारताच आम्हाला पुढे कुठल्या रस्त्याने जायचे त्याबद्दल पोलिसांकडून मदत मिळत होती.



हावडा शहरामध्ये आलो. हे शहर कोलकाताच्या पश्चिमेस हुगली नदीच्या काठावर वसले आहे. हुगली नदीला समांतर रस्त्यावर आलो आणि समोर लांबवर हावडा ब्रिज दिसला. तिथल्या सिग्नलला थोडा वेळ थांबून सर्वांनी पुन्हा पाहिला, मन भरुन आले. थोड्या वेळाने हावडा रेल्वे स्टेशनजवळ पोहोचलो. हे भारतामधील सर्वात वर्दळीच्या व प्रतिष्ठित स्थानकांपैकी एक असून ते भारतीय रेल्वेच्या पूर्व रेल्वे व दक्षिण पूर्व रेल्वे ह्या दोन विभागांचे मुख्यालय आहे.



समोरच मोठा अवाढव्य हावडा ब्रिज दिसत होता. त्या पुलावर जाण्यासाठी कोणता मार्ग आहे हे विचारले आणि तिकडे निघालो. हावडा ब्रिज जवळ आलो. तिथे पोलिसांनी आम्हाला थांबवले आणि सर्वांचे स्वागत केले. त्यांना अगोदरच वायरलेस वर आमच्याबद्दल समजले होते. त्यांनी आम्हा सर्वांना एकत्र जाण्यासाठी सांगितले आणि पुलावर जास्त वेळ थांबू नका अशी विनंती केली.




आणि आम्ही हावडा ब्रिज वर आलो. मुंबईहुन निघून सोळाव्या दिवशी सुखरुपपणे इथे पोहोचलो होतो. टीमच्या एकीमुळे आणि अनेकांच्या मदतीमुळेच हे शक्य झाले होते. आम्ही सायकल बाजूला लावल्या आणि एकच जल्लोष केला. एकमेकांना भेटून आभार मानले. ग्रुप फोटो आणि एकमेकांचे फोटो काढले. पुलावर चालत जाण्यासाठी वेगळा पादचारी मार्ग आहे. तिथे असलेल्या अनेकांनी आमचे स्वागत केले. आमच्याबरोबर फोटो काढून घेतले. आम्हाला तर सेलिब्रिटी झाल्यासारखे वाटत होते. काही जणांकडून कळले की आज पहाटे इथे अमीर खानच्या चित्रपटाचे शूटिंग झाले होते.

हावडा ब्रिज हा भारताच्या पश्चिम बंगाल राज्यातील हुगली नदीवर बांधलेला ऐतिहासिक ब्रिटिशकालीन पूल आहे. ३ फेब्रुवारी १९४३ रोजी वाहतूकीस खुला करण्यात आलेला हा पूल कोलकाता शहराला हावडा ह्या उपनगरासोबत जोडतो. कोलकात्यामधील सर्वात लोकप्रिय खुणांपैकी एक असलेला हावडा पूल इ.स. १९३७ ते १९४३ दरम्यान बांधला गेला. जगप्रसिद्ध बंगाली कवी रविंद्रनाथ टागोर ह्यांच्या आदराप्रिथ्यर्थ १९६५ साली हावडा पूलाचे नाव बदलुन रवींद्र सेतु ठेवण्यात आले पण अजुनही हावडा पुल ह्याच नावाने ओळखला जातो. रोज अंदाजे १.५ लाख वाहने व ४० लाख पादचारी ह्या पुलाचा वापर करतात. हावडा रेल्वे स्थानक हे भारतामधील सर्वाधिक वर्दळीचे रेल्वे स्थानक ह्या पूलाच्या पश्चिम टोकाजवळच स्थित आहे. ह्यामुळे हावडा पूलाला कोलकात्याचे प्रवेशद्वार असेही संबोधतात. हावडा स्थानकाहून कोलकात्याला जाण्यासाठी केवळ हावडा पूलाचाच वापर केला जातो.



हावडा ब्रिज आधारभूत कंसाकृती कमान म्हणजेच कॅन्टिलिव्हर ह्या रचनेचा असून दोन टोकांवरील टेकू सोडल्यास नदीपात्रात कोणतेही खांब किंवा आधार नाहीत. पूलाची एकूण लांबी ७०५ मीटर्स इतकी असून दोन टेकूंमधील अंतर १५०० फूट आहे. पुलाची रुंदी ७१ फूट असून दोही बाजूस १५ फूट रुंदीचे पादचारी मार्ग आहेत. हा पूल बांधण्यासाठी सुमारे २५ हजार टन स्टीलचा वापर करण्यात आला ज्याचा पुरवठा टाटा स्टील कंपनीने



उपलब्ध करुन दिला होता. हावडा ब्रिज ओलांडून पलीकडे कोलकाता शहरात आलो. मुक्कामाच्या लॉजवर जाऊन सायकल ठेवल्या आणि जेवणासाठी बाहेर पडलो. दुपारी मस्तपैकी बंगाली जेवण जेवलो. शहर फिरलो आणि लॉजवर परत आलो. संध्याकाळी हावडा रेल्वे स्टेशनला जाऊन सामान विभागात सायकली जमा केल्या. त्यामुळे दुसऱ्या दिवशी रेल्वेने परतीचा प्रवास करताना सायकली जमा करण्याचा त्रास वाचणार होता.



रात्रीच्या काळोखात हावडा ब्रिज अजून सजलेला दिसत होता. जवळचे हॉटेल शोधून स्थानिक बंगाली जेवण जेवलो. मिष्टी दही व मिठाई खाल्ल्या आणि लॉजवर आलो. गप्पा रंगल्या. सायकल मोहीम सुखरुप पूर्ण झाली हा आनंद होता. पण आता पुन्हा घरी मुंबईला जाऊन नेहमीचे ऑफिस जीवन सुरु होणार म्हणून वाईट पण वाटत होते. मुंबईहुन सायकलवर निघाल्यापासूनचे सोळा दिवस पटकन संपले होते. त्या आठवणी आठवत झोपी गेलो.

***

# कोलकाता शहर भटकंती

कोलकाता ही भारतातील पश्चिम बंगाल राज्याची राजधानी आहे. हुगली नदीच्या किनाऱ्यावरील हे शहर १७७२ पासून १९१२ पर्यंत ब्रिटिश भारताचीही राजधानी होती. भारतातील पहिली भुयारी रेल्वे ही कोलकाता येथे धावली होती.

कोलकाता हे देशातील सर्वात मोठ्या शहरांपैकी एक आहे. त्याला आनंदी शहर असेही म्हणतात. हे भारतातील प्रगत, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय शहर आहे. त्याच्या आधुनिक स्वरुपाचा विकास हा ब्रिटीश आणि फ्रान्सच्या वसाहतवादाच्या इतिहासाशी जोडलेला आहे. आजच्या कोलकात्यात आधुनिक भारताच्या इतिहासाच्या बऱ्याच कथा आहेत. हे शहर भारताच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक बदलांचे मुख्य केंद्र म्हणून ओळखले जात आहे, दुसरीकडे हे भारतातील साम्यवाद चळवळीचा गढ म्हणूनही ओळखले जाते. कोलकाता हे पूर्व भारताचे प्रवेशद्वार म्हणूनही ओळखले जाते. हे देशाच्या विविध भागात रेल्वे, वायुमार्ग आणि रस्तेमार्गे जोडलेले आहे. हे मुख्य रहदारी केंद्र, विस्तीर्ण बाजार वितरण केंद्र, शिक्षण केंद्र, औद्योगिक केंद्र आणि व्यापार केंद्र आहे.



१७५७ नंतर ब्रिटीशांनी हे शहर पूर्णपणे स्थापित केले आणि त्यानंतर १८५० पासून या शहराचा विकास वेगाने झाला, विशेषत: कपड्यांच्या उद्योगाची वाढ येथे नाटकीयरित्या वाढली, परंतु शहर वगळता या विकासाचा परिणाम जवळपास झाला. १९४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी आणि १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धा नंतर बांगलादेश मधून आलेल्या शरणार्थींनी गर्दी केली आणि या शहराची अर्थव्यवस्थेची दुर्दशा झाली.

ऐतिहासिकदृष्ट्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या प्रत्येक टप्प्यात कोलकाताची मध्यवर्ती भूमिका आहे. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसबरोबरच, हिंदू मेळा व क्रांतिकारक संघटना युगांतर, अनुशिलन इत्यादी अनेक राजकीय आणि सांस्कृतिक संस्था स्थापन करण्याचे या

शहराला विशेष महत्त्व आहे. ब्रिटीश सत्तेच्या काळात जेव्हा कोलकाता एकात्मिक भारताची राजधानी होती, तेव्हा कोलकाता हे लंडननंतर ब्रिटीश साम्राज्याचे दुसरे सर्वात मोठे शहर मानले जात असे.

कोलकाता मध्ये मोठ्या प्रमाणात रहदारी कोलकाता उपनगरीय रेल्वे, कोलकाता मेट्रो, ट्राम आणि बसद्वारे उपलब्ध आहे. कोलकाता मेट्रो, भारतीय रेल्वेने चालवलेली, ही भारतातील सर्वात प्राचीन भूमिगत रहदारीची व्यवस्था आहे. येथे सरकारी आणि खासगी ऑपरेटर बस चालवितात. कोलकाता हे एकमेव शहर आहे जिथे ट्राम सेवा उपलब्ध आहे. भाड्याने मिळणार्या यांत्रिक रहदारीमध्ये पिवळ्या मीटर-टॅक्सी आणि ऑटो-रिक्षांचा समावेश आहे. शहरातील काही भागात लोकल कमी अंतरासाठी सायकल रिक्षा आणि हाताने चालविलेल्या रिक्षा सुरु आहेत. हे शहर पूर्व भारतातील एक प्रमुख बंदर आहे. कोलकाता पोर्ट ट्रस्ट हे कोलकाता पोर्ट आणि हल्दिया बंदर सांभाळत आहेत.




कोलकाता मध्ये बर्याच इमारती गोथिक, बारोक, रोमन आणि इंडो-इस्लामिक स्थापत्य शैलीच्या आहेत. ब्रिटीश काळातील बर्याच इमारती चांगल्या प्रकारे जतन केल्या गेल्या आहेत आणि आता हेरिटेज म्हणून घोषित केल्या आहेत, तर बर्याच इमारतीही पाडण्याच्या मार्गावर आहेत. १८१४ मध्ये बांधलेले भारतीय संग्रहालय हे आशियामधील सर्वात प्राचीन संग्रहालय आहे. यात भारतीय इतिहास, नैसर्गिक इतिहास आणि भारतीय कला यांचा मोठा आणि आश्चर्यकारक संग्रह आहे. हुगली नदीजवळील मैदान आणि किल्ला विल्यम, ईडन गार्डन्स, व्हिक्टोरिया मेमोरियल, सेंट पॉलचे कॅथेड्रल चर्च, नाखोडा मशिद, पारसनाथ जैन मंदिर, बेलूर मठ, दक्षिणेश्वर काली मंदिर, मां काली मंदिर,



कालीघाट, मदर टेरेसा होम, अजयभागर, झूलखाना, बिर्ला तारमंडल, हावडा ब्रिज इत्यादी शहरातील मुख्य प्रेक्षणीय स्थळे आहेत.

कोलकातावासीयांना कालकतीया म्हणतात. भारताची पूर्वीची राजधानी असल्याने हे स्थान आधुनिक भारतातील साहित्यिक आणि कलात्मक विचारांचे जन्मस्थान बनले. कोलकातातील लोकांच्या मानसिकतेवर कला आणि साहित्यास नेहमीच खास स्थान आहे. येथे नेहमीच नवीन प्रतिभेला प्रोत्साहन देण्याच्या क्षमतेमुळे हे शहर अफाट सर्जनशील उर्जाचे शहर बनले आहे. या कारणांमुळे कोलकाताला कधीकधी भारताची सांस्कृतिक राजधानी देखील म्हटले जाते.



शहरातील नाटक इत्यादींची परंपरा जत्रा, नाट्य आणि सामूहिक नाट्य म्हणून टिकून आहे. येथील फिल्म इंडस्ट्री टॉलीगंज येथे असून ती टॉलीवूड म्हणून ओळखली जाते. बंगाली महिला सहसा साड्या परिधान करतात. त्यांच्याकडे घरगुती साडी नेसण्याची एक खास शैली आहे जी एक बंगाली ओळख आहे. येथील साड्यांपैकी बंगाली सुती आणि रेशीम जागतिक साड्या प्रसिद्ध आहेत, ज्याला तंत नाव आहे. पुरुष शर्ट पॅन्ट घालतात, परंतु सणप्रसंगी धोतीसह सूती आणि रेशीम कुर्ते घालतात. धोतीचा शेवट हातात घेण्याचा पुरुषांमध्ये एक ट्रेंड आहे, जो एक खास बंगाली ओळख देतो. धोती बहुधा पांढऱ्या रंगाची असते. दुर्गापूजा हा कोलकाताचा सर्वात महत्त्वाचा उत्सव आहे. इतर उल्लेखनीय सणांमध्ये जगधत्री पूजा, पोला बैसाख, सरस्वती पूजा, रथयात्रा, पौष पोर्बो, दिवाळी, होळी, ख्रिसमस, ईद इत्यादींचा समावेश आहे.

सिटी ऑफ जॉय अशा या कोलकाता शहरात आमच्या टीममधील बहुतेक जण अगोदर येऊन गेले होते. पहाटे आम्ही काली माता मंदिरात जाऊन दर्शन घेतले आणि मग शहरातील बस आणि पिवळ्या टॅक्सी पकडून काही प्रमुख ठिकाणी फिरलो. कोलकाता हे देशातील एकमेव शहर आहे जिथे ट्राम सेवा उपलब्ध आहे. त्यामुळे ट्राममध्ये बसून काही अंतर प्रवास केला. व्हिक्टोरिया मेमोरियल संग्रहालय पहिले. मदर तेरेसा यांचे मदर हाऊस पहिले.

अक्षयच्या ऑफिसची कोलकाता येथे पण शाखा होती आणि दुपारी आम्हा सर्वांना तेथे बोलावले होते. तिकडे गेलो. ऑफिस मार्फत सर्वांचा सत्कार करण्यात आला. आमच्या सायकल मोहिमेबद्दल गप्पा रंगल्या. दुपारचे जेवण त्यांच्यामार्फत झाले.

संध्याकाळी बेलूर मठात गेलो. हुगली नदीमध्ये बोटीमधून फिरुन आलो. बेलूर मठ हे रामकृष्ण मिशनचे मुख्यालय आहे. त्याची स्थापना १८९९ मध्ये रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य स्वामी विवेकानंद यांनी केली होती. कोलकाता एक ऐतिहासिक शहर आहे. या शहरात अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. संपूर्ण शहर फिरण्यासाठी काही दिवस नक्कीच पाहिजेत. आमच्याकडे जो वेळ होता त्यामध्ये आम्ही जास्तीच जास्त शहर फिरलो.

२१०० किमी अंतर सायकल चालवत आम्ही कोलकाताला पोहोचलो होतो. ठिकठिकाणीचे स्थानिक पदार्थ पोटभर चापून खात खात आलो होतो. तरीपण अशक्तपणा यायला नको म्हणून कोलकाता ला पोहोचल्यावर पूर्ण दिवसभर फक्त खात फिरायचे हे ठरलेले होते. कोणीतरी म्हटले आहेच, खाल्ल्याने होत आहे रे आधी खाल्लेच पाहिजे..!! या उक्तीप्रमाणे आम्ही येथे मिळणारे जास्तीच जास्त बंगाली पदार्थ खाल्ले.



खाण्यापिण्यातला चोखंदळपणा कोलकातावासीयांचा खास गुण. येथे बंगाली भोजनात भात, मासे, बटाटा, मिठाई हे असतेच. बंगाली थाळी म्हणजे गुलेल कबाब, प्रॉन कटलेट, चोखा, फुलकोपीर भाजा, फिश मलाई करी, फिश पुलाव, चटणी, मिष्टी दोई, पायेश, कलाकंद, पोस्तो बर्फी, भात, तळलेले बटाटा काप, पापड, आचार असे भरपूर काही.

छोलार दाल, भात, भाजा बेगूनी, खिमा गुगनी, चिंगरी मलाई करी, चिकन रेशमी कबाब, शोर्शे पोस्तो चिंगरी, भेटकी फिश, कोछु पत्ता चिन्गरी भाप्पा, शुकतो, आलू फुलकोबी, कोशा मंगशो, माशेर मलाई करी, पाबदा माशेर झाल, रुई माशेर कालिया, रोहू फिश मसाला, पोस्तो मुर्गी, धोकर दालना, आलू पोस्तो, अलूर दोम लूची, चोलर दाल लूची, फिश पुलाव, फिश

बिर्याणी अशा एकापेक्षा एक चविष्ट पाककृती आम्ही खाल्ल्या. खाद्यपदार्थ वाढण्यासाठी केळ्याच्या पानांचा वापर केला जातो. त्यामुळे या पदार्थांची चव जिभेवर कायम रेंगाळत राहते. या जेवणाची लज्जत वेगळीच आहे.

बंगाली भोजनाचा पूर्णविराम नेहमीच मिष्टी दोई आणि गोड मिठाई खाऊन केली जाते. बंगालमध्ये गल्लोगल्ली मिठाईची छोटीमोठी दुकानं दिसतात. येताजाता मिठाई मिळेल अशी खास व्यवस्था असतेच. सीताभोग, जोयनगरेर मोआ, पंतुआ, छेनार जिलपी, खीर कदम, केशर पायेश, संदेश, इंद्राणी, हिरामणी, रसमणी, दुर्गाभोग, रसमोहन, खीरकदम, चमचम,



तालशांश, चंद्रपुली, पान गाजा, जोलभरा संदेश, लेडी किनी, मिहीदाना, चित्रकूट, पतिषपता, चीज जिलेबी, रसगुल्ला, मोहन भोग, लोबोंगो लतिका, राजभोग, मालपुआ, रसमलाई, पयेश, पंतुआ, अमृत, खीरमोहन, लंगचा, छेनार जिलिपी, कांचागोला, चंदन खीर, पाटिशप अशा लज्जतदार नावे असलेल्या अनेक मिठाई आम्ही भरपूर चाखल्या.

तसेच रस्तोरस्ती हातगाड्यांवर मिळणारे काठी रोल, फिश, पनीर चॉप, फुचका, शिंगरा, झालमुरी भेळ, राधा बल्लवी, मसाला कचौरी खाल्ल्याशिवाय कोलकाताची खाद्ययात्रा अपूर्णच. त्यामुळे मग हे पण खावे लागले आणि नंतर झाल मुरी आणि भारेरचा हा मातीच्या कपातला चहाचा अस्सल अनुभव इथल्या गल्लीबोळातून फिरुन घेतला.

बंगाली खाद्यपरंपरा खरंच खूप व्यापक आणि समृद्ध आहे. या शहरात खूपच स्वस्ताई आहे. कोलकाता खरंच गोड मिष्टी शहर आहे.

***

# परतीचा रेल्वे प्रवास

कोलकाताला आम्ही सोळाव्या दिवशी दुपारी पोहोचलो आणि दुसऱ्या दिवशी रात्री मुंबईला परत जाण्यासाठी आमचे रेल्वे तिकीट होते. काही जणांचे दुपारचे विमानाचे तिकीट होते. गेल्या वर्षी आम्ही अमृतसरहून मुंबईला सायकल कुरिअरने पाठवल्या होत्या आणि त्यामध्ये बहुतेक सर्वांच्या सायकलला नुकसान झाले होते. त्यामुळे यावर्षी सायकल रेल्वे सामानाच्या डब्यामधून पाठवायचे ठरले होते.

गाडगीळ सर त्यांची सायकल, चाके काढून बॅगमधून, रेल्वे सीटखाली ठेऊन नेणार होते. त्यामुळे उरलेल्या आठ सायकली रेल्वे एक्सप्रेस गाडीच्या सामान डब्यामधून पाठवणार होतो. संध्याकाळी आम्ही सायकल घेऊन हावडा रेल्वे स्टेशनला गेलो. सामान विभागामध्ये जाऊन सायकल नेण्याविषयी चौकशी केली. आमचे तिकीट असलेल्या रेल्वे एक्सप्रेस गाडीच्या सामानाचा डब्बा भरलेला होता आणि त्यामधून फक्त चार सायकली नेऊ शकत होतो. त्यामुळे उरलेल्या चार सायकली अगोदर जाणाऱ्या एक्सप्रेस गाडीच्या सामानाच्या डब्यामधून पाठवायचे ठरले.



त्याप्रमाणे वजन करुन फॉर्म भरला. सायकलींचे तिकीट प्रत्येकी २७० रुपये झाले. सायकलचे हॅण्डल, सीट यावर ओरखडे येऊ नये म्हणून गोणते- पिशव्या गुंडाळल्या. त्यावर सामान नंबर टाकला आणि त्या सायकली ऑफिस मध्ये ठेवल्या. एक्सप्रेस गाडी सुटायच्या एक तास अगोदर येऊन या सायकली सामान डब्यामध्ये चढवायच्या होत्या. गाडगीळ सर रेल्वेमध्ये असल्याने त्यांच्या ओळखीमुळे आमचे काम लवकर झाले.

दुसऱ्या दिवशी आमचा परतीचा मुंबई प्रवास सुरु होणार होता. आमची रेल्वे एक्सप्रेस गाडी रात्री दहा वाजता हावडा रेल्वे स्टेशनहुन सुटणार होती. त्याच्या दोन तास अगोदर आम्ही रेल्वे स्टेशनला पोहोचलो. आमच्या सायकली रेल्वे सामान विभागातून प्लॅटफॉर्मवर आणल्या. थोड्या वेळाने प्लॅटफॉर्मला आमची एक्सप्रेस लागली.

एक्सप्रेस गाडीच्या सामान डब्यामध्ये सायकल योग्य रीतीने ठेवल्या गेल्या पाहिजेत. सामान डब्यातील इतर सामानामुळे सायकलला हानी होता कामा नये याची काळजी घेणे आवश्यक आहे. अशा वेळेला जर आपण त्या ठिकाणी नसलो तर रेल्वेचे कामगार कशापण पद्धतीने सायकल ठेवतात. आणि त्यावर इतर सामान पण रचतात. त्यामुळे सायकलींना ओरखडे पडतात. काही वेळेला सायकलचे काही भाग वाकले जातात किंवा त्या भागांना हानी पोहोचते. हे टाळण्यासाठी आम्ही आमच्या हातांनी आमच्या सायकली सांभाळून सामानाच्या डब्यात ठेवल्या. त्यावर इतर काही सामान ठेवले जाऊ नये म्हणून आम्ही वरच्या रॅकमध्ये सायकली ठेवल्या.

थोड्या वेळाने एक्सप्रेस गाडी सुरु झाली. कोलकाताचा निरोप घेऊन आम्ही मुंबईकडे निघालो. दुसऱ्या दिवशी पहाटे ओडिशामध्ये पोहोचलो. आमच्या सायकल प्रवासातले अनेक शहरे मागे जात होती. दुपारी छत्तीसगढ मध्ये रायपुरला पोहोचलो. रायपुरला आम्ही ज्यांच्याकडे थांबलो होतो ते नितीन भाईंचे नातेवाईक घरचे जेवण घेऊन आले होते. राजनांदगाव गोंदिया येथील जंगल पाहत महाराष्ट्रातील नागपूरला पोहोचलो. आणि ३२ तासाच्या रेल्वे प्रवासानंतर तिसऱ्या दिवशी पहाटे मुंबई लोकमान्य टिळक टर्मिनस स्टेशनवर पोहोचलो. सामानाच्या डब्याजवळ आलो. सायकल अगोदरच बाहेर काढली गेली होती. सायकल तपासली. त्यावर काहीही ओरखडे किंवा इतर काहीही बिघाड नव्हता. सामान विभागामध्ये जाऊन सामान नंबर आणि फॉर्म दाखवला. तेथील प्रक्रिया पूर्ण करुन स्टेशनबाहेर आलो.




एकमेकांचा निरोप घेऊन सर्वजण घरी निघाले. मी पण सायकल चालवत घरी वरळीला पोहोचलो.

***


# मोहिमेबद्दलच्या बातम्या

मुंबई ते कोलकाता सायकल मोहिमेची तयारी करताना आम्ही या आमच्या मोहिमेबद्दल कुठेही प्रसिद्धी केली नव्हती. कोणत्याही वार्ताहरामार्फत बातमी केली नव्हती आणि ही मोहीम पूर्ण झाल्यावर कुठेही बातमी छापून आणली नाही. सायकलवर भटकायची आवड या एकाच हेतूने एकत्र येऊन ही सायकल मोहीम आखली गेली. सर्वांनी आपापल्या दैनंदिन जीवनामध्ये सायकलचा जास्तीच जास्त वापर करावा यासाठी प्रदूषणमुक्त भारत हे ब्रीद घेऊन आम्ही मुंबईहुन निघालो.

ठिकठिकाणी भेटणाऱ्या सर्वांना सायकल चालवण्याचे महत्व पटवून देत पुढे निघालो. यासाठी आम्हाला सर्वांनी प्रोत्साहन दिले, मदतीसाठी विचारणा झाली. महाराष्ट्र, छत्तीसगढ, ओडिशा, झारखंड आणि पश्चिम बंगाल या राज्यातून सायकल प्रवास करताना ठिकठिकाणी आमचे स्वागत झाले. तेथील वृत्तपत्रे, मासिके, स्थानिक टिव्ही चॅनेल यांनी आमच्या या सायकल मोहिमेची दखल घेतली आणि सायकल चालवण्याचे महत्व व प्रदूषणमुक्त भारत या संकल्पनेचा प्रसार केला. अनेक स्थानिक टिव्ही चॅनेलवर आमच्या मुलाखती दाखवल्या गेल्या. या सायकल मोहिमेबद्दल वृत्तपत्रामध्ये छापून आलेल्या काही बातम्या:



ପ୍ରଦୂଷଣମୁକ୍ତ ଭାରତ ଲାଗି
ସାଇକେଲ ସଚେତନତା ଅଭିଯାନ





## ସାଇକଲ ଯାତ୍ରା ଦଳକୁ ସ୍ୱାଗତ

ଦେବଗଡ଼, ୫।୧୨ (ଇମିସ): ଭାରତକୁ ପ୍ରଦୂଷଣ ମୁକ୍ତ କରିବା ଲକ୍ଷ୍ୟ ନେଇ ଓ ଏଥିଲାଗି ସଚେତନତା ସୃଷ୍ଟି ପାଇଁ ନଭେମ୍ବର ୧୨ରୁ ମହାରାଷ୍ଟ୍ରର ବାନ୍ଦ୍ରାଠାରୁ କୋଲକାତା ଅଭିମୁଖେ ବାହାରିଥିବା ସାଇକଲ ଯାତ୍ରୀ ଦଳ ଗୁରୁବାର ଦେବଗଡ଼ରେ ପହଞ୍ଚି ଥିଲେ। ସେଠାରେ ବିଭିନ୍ନ ସଂଗଠନ ପକ୍ଷରୁ ସେମାନଙ୍କୁ ସ୍ୱାଗତ କରାଯାଇଥିଲା। ଏହି ଦଳରେ ଟିମ ଲିଡର୍ ଅମ୍ବରୀଶ ଗର୍ଗଙ୍କ ସମେତ ଅରୁଣ ଦେଶମୁଖ, ତୁକାରାମ ଫଡତରେ, ଡ. ରାମେଶ୍ୱର ଭଗତ, ନାରାୟଣ ପେରୁମଲ, ସାଇଦେବି ମିରଣ୍ଡା, ନୀତିନ ଭୋସଲେ, ଅକ୍ଷୟ ଖାଁଡେକର, ସୁନୀଲ ଗାଡଗିଲ ସାମିଲ ଅଛନ୍ତି।

नवभारत 8 दिसंबर 2019 पृष्ठ 8

## साइकिल सवार निकले शहर को प्रदूषण मुक्त कराने



## प्रदूषण मुक्त भारत का संदेश देने वालों का स्वागत

लोगों को जागरूक करने मुंबई से कोलकाता के लिए निकले हैं साइकिल से



## ପ୍ରଦୂଷଣ ମୁକ୍ତ ଭାରତ ଗଠନ ଲକ୍ଷ୍ୟରେ ସାଇକେଲ ଯାତ୍ରା



## ପ୍ରଦୂଷଣମୁକ୍ତ ଭାରତ ଲାଗି ସାଇକେଲ ସଚେତନତା ଅଭିଯାନ



## ପ୍ରଦୂଷଣମୁକ୍ତ ଭାରତ ସଂକ୍ରାନ୍ତ ସଚେତନତା



## प्रदूषण मुक्त यात्रा कराने निकले यात्रियों का स्वागत



## पॉल्यूशन के खतरे बताने मुंबई से कोलकाता तक साइकिल यात्रा



## ସାଇକେଲ ଯାତ୍ରା ଦଳକୁ ସ୍ୱାଗତ



# आभार

मुंबई बांद्रा सीलिंक ते हावडा ब्रिज कोलकाता हा अंदाजे २१०० किमीचा सायकल प्रवास खूपच मजेदार होता. ही सायकल मोहीम आम्ही सोळा दिवसात यशस्वीरित्या पूर्ण करु शकलो हे अनेकांच्या मदतीमुळेच. या सर्वांची नावे घेणे नक्कीच कठीण आहे. या सर्वांचा आदर.

या आमच्या सायकल मोहिमेमुळे अनेक माणसे जोडली गेली. अनेकांबरोबर ओळखी झाल्या. अनेक मित्र मिळाले. नवनवीन माहिती मिळाली. हे सर्व अनुभव, घडलेल्या आनंददायी घटना न विसरता येणाऱ्या आहेत. हे सर्व थोडक्यात चित्रांच्या मदतीने मांडायचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे यामध्ये काही अनुभव किस्से पुढे- मागे, कमी- अधिक होऊ शकतात, तसेच यामध्ये काही जणांची नावे लिहायची राहून गेली असल्यामुळे क्षमस्व. रस्त्यामध्ये आम्हाला जी छोटी-मोठी शहरे, गावे, प्रेक्षणीय स्थळे लागली त्यांच्याबद्दल थोडक्यात माहिती इंटरनेटवरुन शोधून लिहिली आहे. यामध्ये काही कमतरता असू शकते.

आम्ही केलेला हा सायकल प्रवास तुम्ही पण करु शकता. त्यासाठी लवकरच तयारीला सुरवात करा. हा मुंबई ते कोलकाता मार्ग मस्तच आहे.

चला तर मग, लवकर सायकल काढा… जग खूपच सुंदर आहे.

धन्यवाद.
अंबरीश सुरेश गुरव.

***

## दुर्ग दुर्घट भारी

*आसेतूहिमाचल*

## सुंदर हा देश

### त्या सुंदर यात्रेसाठी

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण…

कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या "मी पाहिलेला…" सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. वाटा आणि वळणांचा आनंद वाटत रहा.

आपल्या लेखनाची मेल व foto पाठवा. esahity@gmail.com


मुंबई
Durg
कलकाता
ठाणे
कुचिंदा
Arang
जालना
Odisha
हाओड़ा
मयूरभंज
Nagpur
Bhandara
नागपुर
Sambalpur
पिथोरा
बारगढ़
Kolkata
झाड़खंड
Raipur
राजनांदगांव
महाराष्ट्र
ओड़िशा
महासमुंद
झारखंड
मुम्बई
कोलाघाट
Jashipur
हावड़ाब्रिज
कलकाता